स्वमस्तकीं क्षाळुनि देव तों या, श्रीनारदाच्या धरि पादतोयां[1] ॥ १० ॥

पूजी यथाविधि ह्मणे मग पूर्णकाम[2]
स्वामी वदा किमपि जें मज योग्य काम ।
बोले मुनी नवल जो मजला न वाटे
कीं लाविसी जन समस्तहि याच वाटे ॥ ११ ॥
देणार मागितलिया परमा गतीतें
नेवें तिला ह्मणसिही जरि माग तीतें ।
मागेन पाय अवलोकुनियां स्मृतीतें
आलों असें धरुनि निश्चय या मतीतें ॥ १२ ॥

पद तुझे हृदयीं हरि रेखिले, असति ते अजि दृष्टिस देखिले ।
स्मृति अशीच असो हृदयांबुजीं[4], सरस हें घननीळ दयांबु[5] जी ॥ १३ ॥
तेथूनि गेला दुसऱ्या गृहातें, तों कृष्ण फांसे उचलोनि हातें ।
गृहेश्वरीशीं[6] निजउत्सवासीं[7], खेळे हृदंभोरुहगुह्यवासी[8] ॥ १४ ॥
पूजा यथापूर्वचि नारदाची, करूनि त्या भक्तिविशारदाची[9] ।
ह्मणे अपूर्णासहि पूर्णकाम, स्वामी वदाजी मज योग्य काम ॥ १५ ॥
हरि असा जरि मानहि दे वढे, तरि न उत्तर तो क्षितिदेवें[11] दे ।
प्रतिगृहीं करि जो नव लक्षणें, दिसति तीं नव मानवलक्षणें[12] ॥ १६ ॥
आलेत केव्हां पुसतां द्विजाला, तत्पूर्वपूजा[13] गरुडध्वजाला[14] ।
जाणों नसे ठाउक त्या अजाला[15], तेव्हां ऋषी विस्मितचित्त जाला ॥१७॥
घरोघरीं नूतन भाव दावी, माया हरीची किति ते वदावी ।
एवं च ये आणिखिया गृहातें, धरूनि वीणा मुनिवर्य हातें ॥ १८ ॥
तों लेंकुरें खेळवितो हरी तो, जो मोह माया स्मरणें हरीतो ।
त्या बाळका खेळवि लोकरीती, क्रीडा करी लोक जसे करीती ॥ १९ ॥
बोबडी करुनि दाटुनि वाणी, बोलतो परम कौतुकवाणी ।
बाळ बोलति तसेंच हरी तो, बोलतो गृहिणिचित्त[16] हरी तो ॥ २० ॥

---

१ पायांचें तीर्थ. २ संपूर्णांच्या कामना पूर्ण केल्या आहेत ज्यानें. ३ मार्गाला. ४ हृदयकमलांत. ५ कृपारूप उदक. ६ घरधणीण; स्त्री. ७ आपल्या उत्साहानें, " गृहेश्वरीशी आणि उद्धवाशीं " असाही पाठ आहे. ८ हृदंभोरुह म्ह० हृदयकमळ त्यांत राहणारा. ९ भक्तीमध्यें निपुण. १० नारदास. ११ भूसुर; ब्राह्मण अर्थात् नारद. १२ पाहणें. १३ त्यापूर्वी केलेली पूजा; अगोदरच्या घरीं केलेली पूजा. १४ कृष्ण. १५ जन्मरहितास. १६ घरधणिणीचें चित्त; स्त्रीचें मन.

उचचिं नावेंद साकल खोबलें, खजुल देउनि गाय बलें बेलें ।
बसुनियां मग तूं गलु[4]लावली, मजपुलें उलवीं बलिं वावली ॥ २१ ॥
चालोलि[6]या देइन गो[7]ळं गोला, गोळां[8]बिया देइन फालफोला ।
मी ईहुनी आवलतों खलें कीं, ऐसा हली खेलवि लेंकलें कीं ॥ २२ ॥
हरि मुलांसह कंदुक खेळतो, परि न लौकिक केवळ खेळ तो ।
स्वकरिं घेउनि कंदुक शीकवी, गति पहा वदताति कशी कवी ॥ २३ ॥
मुनि[11]मानसवृंदचि[12] कंदु[13]कसे, यदुनंदन कंदुक तेंचि कसे ।
करिं घेउनि नंद[14]न खेळवितो, प्रभु तो मनिं चिज्जडखेळ वितो ॥ २४ ॥
मनकंदुक ते करिंचे पडतीं, विष[16]यक्षितितें न तरी जडती ।
पडतांचि चिदंबरिं[17] जे उडती, हरितें अजि ते बहु आवडती ॥ २५ ॥
मनकंदुक ते कृत[18]कर्म फळें, विषयक्षिति आ[19]फळि दैववळें ।
अधिकाधिक चिद्[20]गगनीं उसळे, उडती मनकंदुक इंदुकळे ॥ २६ ॥
विषयक्षितिऊपरि त्याचि पडे, मन मृन्मय[21]पिंड न तों उपडे ।
निपटूनि तयासहि बाळ करीं, धरिली परि आदर हा न करीं ॥ २७ ॥
[22]प्रतिबिंब चिदंशक बाळक ते, निजमानस इंद्रियचाळक ते ।
चिखलासमही मन खेळविती, विषयप्रिय बंधक खेळ विती[23] ॥ २८ ॥
परि कंदुक खेळचि बिंब हरी, शिकवि प्रभु[24] जो भवबंध हरी ।
मन कर्दम खेळ न तो शिकवी, ह्मणताति जगद्गु[25]रु ज्यासि कवी ॥२९॥
मुनि कौतुक दुरुनि पाहतसे, स्वमनांत पहा तुह्मि सर्व तसे ।

---

१ ऊस. २ खडीसाकर. ३ बरें. ४ गरुडावर. ५ बरी वावडी उडव. ६ चारोळ्या. ७ गोड. ८ गोडंब्या. ९ फार. १० चेंडू. ११ चोवीसपासून तीस श्लोकांपर्यंत श्लोकांचें वृत्त तोटक आहे; हें वृत्त बाराक्षरी असून त्यांत चार 'स' गण असतात. १२ समुदाय. १३ चेंडूप्रमाणें. १४ मुलगा. १५ चैतन्य आणि माया यांचा खेळ. १६ ज्यांचा मनरूप चेंडू विषयरूपी जमिनीवर राहत नाहीं वर उसळतो. १७ चैतन्यरूप आकाश. १८ केलेल्या कर्मांच्या फळानें. १९ आपटतो; मुनींचीं मनें जरी दैवयोगानें विषय भूमीवर आलीं तरी तीं तेथें जडत नाहींत. २० चैतन्यरूप आकाशांत. २१ परंतु त्याच विषयभूमीस इतरांचीं मनें उतरलीं तर तीं मातीच्या पिंडाप्रमाणें जमिनीस अर्थात् विषयांस जडतात. २२ बिंबरूप हरीचें प्रतिबिंब. २३ प्रसवती. २४ भवबंध हरण करणारा प्रभु कंदुक खेळ शिकवितो ह्मणजे तुह्मी विषय भूमीला जरी गेलां तरी तेथें चेंडूसारखे वर या, सक्त होऊं नका असें शिकवितो. चिखलाप्रमाणें तेथें चिकटून रहा असें शिकवीत नाहीं. २५ कारण तो जगाचा गुरु आहे तेव्हां अर्थात् विषयासक्त व्हा असें कसें शिकवील.

विषयक्षितिहूनि तयीं उडती, सुमनें प्रभुला मग आवडती ॥ ३० ॥

इत्यादि लौकिक रसांत अलोक रीती
दावी चरित्र हरि लोक जसें करीती ।
ऐसा लपोनि हरि दूरुनि देखिला हो
तैसाचि तो मुनिवरें मनिं रेखिला हो ॥ ३१ ॥

तेथूनिही अन्यगृहास जावें, त्याही गृहीं येचि रितीं भजावें ।
ह्मणूनि ये मेघतनू समोर, पाहे तया जेंवि घनास मोर ॥ ३२ ॥
करीं घेउनी वाजवी ब्रह्मवीणा, तया देखतां भक्तियोगप्रवीणा ।
पुढें धांवणें पूजनें पूर्वरीती, करी आपणा देव जैसें करीती ॥ ३३ ॥
त्याही गृहीं प्रश्न नवाच केला, त्या कौतुकाचाच ऋषी भुकेला ।
आलेति केव्हां पुसतो मुनीला, जाणो नसे ठाउक मेघनीळा ॥ ३४ ॥
त्यास उत्तर न देत मुनी तो, जाय अन्य सदना नमुनी तो ।
ऐशियाचें परि या नवला हो, देखतांच ऋषि मानवला हो ॥ ३५ ॥
कोणें गृहीं स्नान करी हरी तो, नामें मनाचे मळ जो हरी तो ।
कोणे गृहीं अग्नि यथोक्त होमी, कीं हे करीतो गृहधर्म हो मी ॥३६॥

## चतुर्थसर्ग.

यानंतरें स्वचरिताऽमृत नारदासी
दावी तया स्मर जना सुखनीरदासी ।
वंदूनि त्या हरिचियां पदसारसांतें
वर्णीन भागवतदिव्यकथारसातें ॥ १ ॥

सुना माहेरासीं विविध विभवें पाठवितसे
स्वमाहेरीं ज्या ज्या यदुविर तयां आउवितसे ।
मुळें धाडी त्यांला तदितरगृहीं इंदुवदना
सुना आल्या देखे ऋषिवर रमाकांतसदना ॥ २ ॥

---

१ विषय ज्यांनीं टाकला आहे अशीं मनें ( असे लोक ). २ मेघश्याम कृष्ण. ३ मयूरपक्षी जसा घनास उत्कंठतेनें पाहतो, तसा नारद कृष्णास पाहूं लागला. ४ भक्तियोगामध्यें निपुण अशा नारदास. ५ "शाश्वती स्वरसमा नवला हो, देखतां स्वमनीं मानवला हो।" असाही पाठ आहे. ६ पाप. ७ होम करी. ८ गृहस्थाश्रमाचे धर्म वैश्वदेवादि पंचमहायज्ञ. ९ सुखरूप मेघाला. १० कमळ. ११ पुष्कळ ऐश्वर्य बरोबर देऊन. १२ बोलावणें. १३ ज्या गृहांतून सुना माहेरीं पाठविल्या त्या खेरीज दुसऱ्या गृहांत. १४ चंद्रानना अशा स्त्रिया.

सदनिं पाहतसे मुनि दुसऱ्या, प्रभु स्वयें स्वसुता निज सासऱ्या ।
सजललोचन पाठवि तो हरी, प्रकृतिमोहक जो स्मरणें हरी ॥ ३ ॥

मुली कोठें आल्या श्वशुरसदनाहूनि सदना
मुळहाऱ्यासांगातें कुमुदनयना इंदुवदना ।
दिली क्षेमें[5] त्यातें सजलजलजाक्षें हरि हरी
अविद्यामोहातें स्मरण करितां जो हरि हरी ॥ ४ ॥

करी लेंकराच्या महाउत्सवासी जगत्तात जो द्वारकादुर्गवासी ।
मुलांचीं मुलींचीं स्वयें लोकरीती, करी कौतुकें लोक जैसे करीती ॥५॥
उठोनि एके सदनीं प्रभांतें, हरी करी स्नान मुनी प्रभीं तें ।
देखे पुढें कौतुक काय पाहे, लीला हरीची हृदयीं जपा हे ॥ ६ ॥
घटीं जेविं[12] माती जगीं वासुदेव, स्वयें तोचि तें ज्ञान दे देवदेव ।
अशी चिज्जडीं संधिं[13] संध्या वदावी, असा तो स्वसंध्या[14] अनुष्ठान दावी
जगद्ब्रह्मसंधींत संध्या करीती, न कां कर्म संध्या तया लोकरीती ।
स्वयें जो जगद्ब्रह्म संध्या हरी तो, करी कर्म जो कर्मबंधा हरीतो ॥८॥
करावें कदा कर्म हें शीकवीतो, कथेची वदे रीति ऐसी कवी तो ।
जपे त्यांपुढें वेदमाता हरी तो, स्वबोधेंचि जो भेदमत्ता हरीतो ॥९॥

जया देवांची ही निगम जननी गर्भपरमा
त्रिलोकीं सूर्याहीहुनि वर दिसे तेज चरमा ।
प्रकाशीं प्रेरी हा सकळ जनबुद्धी अधिप तो
स्वयें गायत्रीतें निजमय जगद्धाम जपतो ॥ १० ॥

दर्भ घालुनि मुकुंद करीं तो, पंचयज्ञहि बसूनि करितो ।
हा जनां सुपथ माधव दावी, सज्जनीं गति असीच वदावी ॥ ११ ॥
धेनु भूमि तिल रौप्य सुवर्णें, अंबरें अतिविचित्र सुवर्णें ।

---

१ डोळयांस पाणी आणून. २ कितीएक कृष्णाच्या गृहामध्यें. ३ सासऱ्याहून. ४ बोलावणे करी. ५ कुशल प्रश्न. ६ साश्रुनयनानें. ७ कृष्ण. ८ अविद्या मोहास हरण करी. ९ अज्ञान. १० सकाळीं. ११ शोभा; तेज. १२ घट ह्या विकृत द्रव्यांत जशी अविकृत माती आहे अथवा माती हें अधिष्ठान आणि घटादि द्रव्यें परिणाम किंवा विकार होत तसा ईश्वर हा जगाचा अधिष्ठान आणि जग हा विकार होय. १३ उभयातांस जोडणारा. १४ आन्हिक कर्म. १५ जगत् आणि ब्रह्म यांच्या मेळनांत. १६ गायत्री. १७ हातांत. १८ वैश्वदेव, पितृयज्ञ, भूतयज्ञ इत्यादि पंचमहायज्ञ. १९ "हा बराच पथ माधव दावी" असाही पाठ आहे. २० रूपें. २१ वस्त्रें. २२ उत्तम वर्णांचीं.

ब्राह्मणांसि हरि पूजुनि दानें, देतसे इतरपुण्यनिदानें[1] ॥ १२ ॥
कोणेके सदनीं शशांकवदनी[2] पंकेरुहामोदिनी[3]
त्या अशें इतिवादिनी[4] अनुदिनीं[5] जे ब्राह्मणाल्हादिनी[6] ।
विप्रप्रेम मनीं गजेंद्रगमनी[7] वाढी गृहस्वामिनी
क्लेशार्ते न मनी जनार्तिशमनीं[8] अशें दिवायामिनी[9] ॥१३॥
भोजनानुगुण[10] विप्रदक्षिणा, देउनी नमुनियां प्रदक्षिणा ।
श्रीहरी करुनि शेषें जेवितो, सद्गृहस्थ करि अन्य जेवि तो ॥१४॥
कोठें विचार निगमागमशास्त्ररीती, शास्त्रज्ञ आणिक बहुश्रुतही करीती ।
धर्मार्थकाम निवडी हरि वेगळाले, निर्दोष ज्यांमधिल दोष अहो गळाले॥१५॥
वदे तयां श्रीहरि तो सुजाणा, कीं धर्म कृष्णार्पण कर्म जाणा ।
मिळे स्वधर्में धन अर्थ साचा, द्यावा सुपात्रीं न करूनि सांचा ॥१६॥
जो स्वस्त्रियांशीं ऋतुहेतु काम, तो काम सांगे प्रभु पूर्णकाम ।
जडांत आत्मा पटतंतुरूप, सदा स्फुरे मुक्ति अशा स्वरूपें ॥ १७ ॥
स्वप्रवृत्तिच अनादि पुराणी, गाति जे द्विनवसंख्य पुराणीं ।
त्याचिया करि हरि श्रवणातें, जो पवित्र करितो श्रवणांतें ॥ १८ ॥
पापें जनांचीं श्रवणें गळालीं, अशीं पुराणें प्रभु वेगळालीं ।
जगद्गुरू आइकतो हरी तो, नामेंचि जो पापकुळें हरीतो ॥ १९ ॥
बोलती परमहंसजनादी, वेद पंचम जुनाट अनादी ।
कोणिये सदनिं तो इतिहास, कोणिये घरिं करी अति हास ॥ २० ॥
हास्यदायक विनोदरसाचा, दाखवी हरिहि आदर साचा ।

---

१ पुण्यसंचयास कारण अशीं दानें. २ चंद्रवदना. ३ पंकेरुह म्ह॰ कमल त्या सारखा आहे आमोद म्ह॰ सुवास जीचा अशी. ४ असें बोलणारी. ५ दररोज. ६ ब्राह्मणास आल्हाद म्हणजे आनंद देणारी. ७ गजगामिनी. ८ जनाची पीडा शमन करणाऱ्या कामांत. ९ रात्रंदिवस असें वाढी असा अन्वय. १० भोजनास योग्य अशी. ११ वेदाज्ञ. १२ वेदान्त. १३ पुष्कळ गोष्टी ज्यांणीं ऐकिल्या आहेत असे लोक; ज्ञानी. १४ धर्मार्थकाम या त्रिवर्गांत निर्दोष धर्म म्हणजे कृष्णार्पण केलेलें कर्म; धर्मानें मिळविलेलें द्रव्याचा सत्पात्रीं व्यय हा खरा अर्थ; आणि स्वस्त्रीचे ठायीं भोगवासना हाच खरा काम. १५ संचय न करितां. १६ पटामध्यें तंतूचें ज्ञान तसेंच जडामध्यें आत्म्याचें ज्ञान होणें याचेंच नांव मुक्ति. १७ स्वचरित; "स्वप्रकृतीचे" असाही पाठ आहे. १८ जुनी. १९ अठारापुराणीं. २० कर्णांत. २१ "नामें मनाचे मळ जो हरी तो" असाही पाठ आहे. २२ संन्यासी, योगी इत्यादि. २३ पंचम वेद भारत. २४ तो इतिहास म्ह॰ भारत. २५ हास्य विनोद.

प्रीतिपंकज जयीं उकलो कीं, आपके हरिहि कौतुक लोकीं ॥२१॥
भेदवादमत कौतुकरीती, एक गाति उपहास करीती ।
एक वर्णिति विचित्र कळी* ते, हांसतां हृदय जे उकलीते ॥२२॥
मी अनीश मज ईश्वर दावा, तोचि भेद परतोनि वदावा ।
तूं अनीशचि न ईश्वर पाहें, हाचि गुह्य उपदेश कृपा हे ॥ २३ ॥
जसें पावणें विष्णुसर्वोत्तमातें, तसें पावणें जाण अंधंतमातें ।
घडे भोग दोहीं स्थळीं लिंगदेहा, न देवेश दोघां पुन्हा अंग दे हा॥२४॥
वैकुंठ अंधंतमलोकवासी, न लिंग ना स्थूळ जयीं जिवासी ।
तेव्हां निराकारपणें असावें; कीं रूप ठायीं तरि जी स्फुरावें ॥ २५ ॥
ह्मणे गुरू रूप असे जिवासी, रूपें तया तो उभयत्रवासी ।
चराचराकार जगीं जसा रे, चिद्रूप हे जीव तसेचि सारे ॥ २६ ॥
वर्णाविणें रूपठसा पडेना, वर्णत्व चिद्वस्तुस सांपडेना ।
श्रुत्यर्थ कांहीं तरि वर्ण दावी, हे कल्पना त्या पुरुषें वदावी ॥ २७ ॥
लोहितादि रज आदि गुणांतें, वेद वर्णिति न जीवगुणातें ।
वर्णरूप असतें जरि साच, श्रौत शब्द असताच तसाच ॥ २८ ॥
फळे मूढविश्वास अंधंतमांत, स्वरूपें अशा विष्णु लोकोत्तमांत ।
जया मुक्तितें कावळे श्वान जाती, असें बोलतां लोक हांसोनि जाती२९
असें वेदशास्त्रांत कोठेंचि नाहीं, न वाटे अजी गोडशी कल्पना ही ।
जयां मुक्ति वैकुंठलोकीं अहो तो, मनुष्यत्व टाकूनियां श्वान होतो॥३०॥
मुक्त होतिल तथापि कावळे, जीभ त्यांसि न जसी पिको वळे ।
कीर्तनीं करिल कावकाव ते, वैखरी निजगुणीं उगावते ॥ ३१ ॥
श्वानरूपहि न मुक्ति जी भेली, भुंकणाराचि तथापि जीभेली ।

१ द्वैतवाद; एकजण द्वैत मताचें प्रतिपादन करितो व दुसरा त्याचा उपहास करितो. २ फाटतें. ३ अशक्त; जीव; मी जीव मला ईश्वर दाखवा हा पूर्वपक्ष. आणि तूं अनीश नाहींस ईश्वरच आहेस हा उत्तरपक्ष हाच उलट भेद. ४ अंधतामिस्र लोक, जेथें सूर्याचा प्रकाश मुळींच नाहीं व जेथें पापी लोक जातात. ५ सूक्ष्म; वासनात्मक देह. ६ साकार; वैकुंठांत व अंधतम-लोकांत मर प्राण्यास लिंगदेह नाहीं व स्थूलदेह नाहीं तर तो निराकार असतो किंवा साकार असतो असा शिष्यानें गुरूस प्रश्न केला. ७ श्रुतींतील. ८ कुत्रा. ९ कोकिळेस. १० वाणी आपला गुण प्रगट करितें. ११ चांगली, मुक्त होऊन श्वानरूपानें वैकुंठास जाणें हें मत वामनपंडितांस इष्ट नाहीं. १२ जीभ. * विवादी; युक्ति.

ऐथवां करिल कीर्तिनाश ते, मुक्तिची सकळ कीर्ति नासते ॥ ३२ ॥
जया देह मुक्तीमधें गाढवाचा, तयाची उडे ऐथवां गाढ वाचा ।
वहू फार आनंद मुक्तां जनां दे, स्वयें ज्यांत तो भीमहाराज नांदे ॥३३॥
हें मत श्रुतिविरुद्ध अहाहा, मोक्ष काय वदतील महा हा ।
भेद जो विदित तोचि कळावा, यांत काय उपदेश फळावा ॥३४ ॥
तुह्मीं बोलतां अर्थ जे जे श्रुतीचे, मला वाटती सर्वही अश्रु तीचे ।
दिसे वंदिशाळेंत ते वेदवाचा, रडे आठवूनि प्रभू यादवांचा ॥ ३५ ॥
विनोद हा दाखवितां अजाला, जो कां गुरूराजविनोद जाला ।
शिष्यास तो होउनि तप्त दापी*, कीं रे नव्हे मुक्ति तुतें कदापी ॥ ३६ ॥
शिष्यत्व जो राजविनोद दावी, ह्मणे अशी मुक्तिहि जी वदावी ।
ते मुक्ति त्याच्याच असो अदृष्टीं, दिसो न त्याचें मुखही स्वदृष्टी॥३७॥
तों तन्मतस्थ जन राजविनोद सारे, ते बोलती वदसि शब्द असा कसा रे ।
बापा जरी धरिसि अन्यमताभिमाना, सज्जीव ते धरिति याचि मताभिमाना॥
तो ह्मणे निगमसंमत जे जे, पक्ष त्यांस तुह्मि मानुनि जे जे ।
बोलतां श्रुतिविरुद्धचि वाणी, वाटते मज अमंगळवाणी ॥ ३९ ॥
बौद्धावतारीं हरि लोकलीला, करी तयीं दे बळ या कलीला ।
जे द्वापरीं धर्मसहाय होते, झाले प्रधानांग कलीस ते ॥ ४० ॥
कलीं धार्तराष्ट्र स्वपापें मराया, हरी आणि भीमादि जै धर्मराया ।
सहायें स्वयें तेचि याहो कलीला, हरी बुद्धरूपें करी लोकलीला ॥४१ ॥
नव्हे बुद्धरूपें हरी सेव्य लोकीं, जसें पाप हें बौद्धलोकावलोकीं ।
मतें या रिती दुष्टकाळांत नाना, करीती अतत्त्वार्थवादी तनाना ॥ ४२ ॥
जसे स्वामिनें वेद मिथ्या ह्मणावे, तसे सेवकीं अर्थ मिथ्या गणावे ।
वधी स्वामि तो मुख्य लंकापतीतें, करी मारुती जाळुनी ताप तीतें॥४३॥
प्रधानांग त्या मारुतीभीमसेना, करूनी कलीची महाभीमं सेना ।

---

१ ह्या श्लोकाचा भावार्थ असा आहे कीं, ज्या वैकुंठ लोकांत विष्णु स्वयें वास करितो तेथें मुक्त होऊन गाढवाच्या देहानें प्राणी जर गेला आणि तो भुंकूं लागला तर मुक्तजनांस आनंद होईल काय? अर्थात् हें मत चुकीचें आहे; शिवाय हें मत श्रुतिविरुद्ध आहे. २ ते अर्थ नव्हत तर तिचे ह्म॰ श्रुतीचे अश्रु होत. ३ नदीची. ४ वेदसंमत. ५येथें धर्म शब्द द्व्यर्थी आहे; एक अर्थ धर्मराज व दुसरा अर्थ आचार. ६ मुख्य साहकारी. ७ बुद्धानुयायी लोकांस वामनपंडित नास्तिकांत गणतात, कारण ते वेद मिथ्या ह्मणतात. ८ भयंकर. ९ दटावून बरे.

जसी मर्दिली दाविली लोकलीला, करी पुष्ट तद्वैपरीत्यें कलीला ॥५४॥
स्वयें अप्रमाणत्व आणूनि वेदीं, निषेधूनियां धर्म दैत्यां निवेदी ।
करी श्रीहरी जेधवां पक्ष त्याचा, करी भीमही दास पादांबुजाचा॥४५॥
जयीं घेतला धर्म कृष्णें कडे हो, स्वयें भीम झाला तयीं त्याकडे हो ।
कलीकारणें वेदनिंदा वदावी, प्रधानांगता भीमही त्यांत दावी ॥ ४६ ॥
द्रोणपुत्र अजि शंकर हो तो, शंकरार्य कलिभीतरि होतो ।
तो उभा निगमवृक्ष करीतो, भीम मागुति मुळ्या उकरीतो ॥ ४७ ॥
द्वापरीं कलिकडे शिव होतो, या कलींत विपरीत अहो तो ।
वेदपालक ह्मणोनि ह्मणावा; भीम बुद्ध परि बौद्ध गणावा ॥ ४८ ॥
जसा बंधु होऊनि दुर्योधनाचा, करी यत्न तन्मृत्युच्या साधनाचा ।
तसा वेददायाद होऊनि वेदीं, विरुद्धार्थ बोलोनि भेदीं निवेदी ॥ ४९ ॥
वधी द्वापरीं भीम दुर्योधनासी, कलीमाजि सद्धर्मसद्बोध नासी ।
अहो सारख्या कृष्णभीमप्रवृत्ती, तयीं क्षात्र आतां करी विप्रवृत्ती ॥५०॥
दीसतें मत वरें कलिमाजी, आपल्या स्वमतलोकसमाजीं ।
काजवे झळकती तमरातीं, वेदसूर्यचि तुह्मांस अरांती ॥ ५१ ॥
हे प्रवृत्तिच अनादि पुराणीं, वर्णिती कुमति रीति पुराणीं ।
कीं असेंच कलिमाजि घडावें, तेधवां श्रुतिपथें विघडावें ॥ ५२ ॥
ह्मणुनि सत्यवतीसुत बोलतो, तुह्मिंहि जाणतसालचि बोल तो ।
निगमवृक्ष फळे दशमींच या, वदतसे कलिपातकसंचया ॥ ५३ ॥
ह्मणे व्यास मेघांत पर्जन्यकाळीं, तमें रात्रि जे जों घनीं होय काळी ।
जयीं झांकती चंद्रशुक्रादि हो ते, प्रभा काजव्याची तयीं फार होते ॥५४॥
पापमेघपटळीं कलिकाळीं, मोहरात्रि अतिदारुण काळी ।
झांकतां निगमबोधकरीती, स्वप्रकाश कुमतेंचि करी ती ॥ ५५ ॥
पाखंडखद्योतचि दुष्टकाळीं, प्रकाशती दुर्मतिरात्रिकाळीं ।

---

१ सांगे. २ भीमरूपी बुद्ध. ३ वेदमताचें स्थापन. ४ उलटा. ५ ज्ञाता. ६ नास्तिक. ७ वेदाचा शत्रु. ८ द्वापारामध्यें क्षत्रियधर्मवृत्तीनें व कलीमध्यें ब्राह्मणवृत्तीनें संहार करितात. ९ अंधकार रात्रीं. १० शत्रु. ११ जुनाट. १२ व्यास. १३ आपण असाल. १४ दशमस्कंधीं. १५ अंधकारानें; कलीमध्यें वेदज्ञानाचा लोप झाल्यामुळें पुष्कळ कुतर्क व पाखंड मतें पुढें आलीं. १६ मेघांनीं. १७ वेदज्ञानाचा लोप झाल्यावर.

वाखाणिती भेदचि लोकरीती, सेवा हरीची कपटें करीती ॥ ५६ ॥
आवडे परम शंभु जंगमा, चंदन प्रिय असा भुजंगमा ।
सेव्य विष्णुहि तुह्मांत तसा हो, विष्णु निंद्य कुमतांत असा हो ॥ ५७ ॥
बोल जो त्रिविध जीव बोलतो, निंदितो स्फुट हरीस बोल तो ।
मुक्तिदायक तयीं नव्हे हरी, सर्व जीव भव जो न संहरी ॥ ५८ ॥
जो मुक्तियोग्यचि तयासचि मोक्ष झाला, मुक्तिप्रदत्व मग काय अधोक्षजाला
त्या योग्यतेसहि न दे ह्मणतां हरी तो, संसारबंध तरि काय हरी हरीतो ॥५९॥
जो स्वयें धनिक त्यासिच वाणी, दे कणीक इतरां करि वाणी ।
दे कणीकहि न दे कण कांहीं, सेविल्या गणमणी चणकांही ॥ ६० ॥
न दे अयोग्या हरि जेविं वाणी, हे बोलताहे तुमचीच वाणी ।
तच्छक्ति तेव्हां अतिदीनवाणी, कीं मुक्ति तद्योग्यपणास वाणी ॥ ६१ ॥
जो योग्य त्या शक्त असोन देना, कृपाळु कोणीच तया वदेना ।
न शक्त तेव्हां असमर्थ झाला, कां निंदितां हो गरुडध्वजाला ॥ ६२ ॥
अशक्त कीं निर्दय त्यास बोला, किंवा मनासींच धरा अबोला ।
जें बोलणें यावरतें असारें, एवं पहा हें मत दुष्ट सारें ॥६३ ॥
नामेंच तुष्ट हरि होउनि बोधरीती, दे मोक्ष संमत नव्हे कुमतें धरीती ।
ध्यानेंकरूनिहि न मुक्तिपथास दावी, धिक्कार त्यांसि जिहिं गोष्टि अशी वदावी
अयोग्या नव्हे ध्यान कां हो ह्मणावें, भयें ध्यान कंसादिकींचें गणावें ।
भयें ध्यान अत्यंत झालेंचि ज्याला, तुह्मीं मानितां मुक्ति जीवा दुज्याला॥६५
सर्वां जरी मोक्ष न देव देतो, दे योग्यतामार्ग जना वदे तो ।
मागीतलें कल्पतरू जना दे, साम्यें असा हो सुरराज नांदे ॥ ६६ ॥
एवं तुह्मीं निंदितसां हरी तो, कीं संर्वबंधा न हरी हरी तो ।
देऊनि अंधंतमही कृपा हा, करी असाही ह्मणतांच पाहा ॥६७॥
ह्मणे तयांला सुख तेंचि वाटे, तेव्हां वृथा चालति मुक्तिवाटे ।
न मागती जन्म न दुःख पाहे, अंधंतमीं मुक्ति समा कृपा हे ॥ ६८ ॥
वाईट अंधंतम कां ह्मणावें, कां मुक्तियोग्या वरवें गणावें ।
वैराग्यकष्टाविण हा तमातें, जाती विरागें पुरुषोत्तमातें ॥ ६९ ॥
सुखें तयीं दुःख तमांत नाहीं, न गर्भवासादिक यातना ही ।

---

१ एक पंथाचे लोक जे नेहमी भिक्षा मागत फिरत असतात. २ सर्पास. ३ वैश्य; वणिज. ४ कमताई. ५ वैश्य. ६ वाचा; सरस्वती. ७ वर्णी. ८ समर्थ. ९ देवांचा राजा. १० संसारबंधन. ११ हरण करी. १२ भावे.

संसारिकांहूनि बरे ह्मणावे, कां दैत्य सर्वाधम ते गणावे ॥ ७० ॥
अभक्तां सुभक्तां तयीं तुल्य माना, वृथा बोलतां भक्तपक्षाभिमाना ।
असे साम्य मोक्षास अंधत्तमाचें, असें सिद्ध कर्तृत्व सर्वोत्तमाचें ॥ ७१॥
अशी कल्पना ही प्रमाणाऽनुसारी, दिसेना वृथा गोष्टि वाईट सारी ।
नव्हे मानितां निर्दयत्वाभिमाना, वृथा वाहतां या स्वशास्त्राभिमाना ॥७२॥
मतें हीं कलीचीं महापापसंगें, भविष्यें पुढें तीं विनोदप्रसंगें ।
विनोदीं जनीं वर्णितां गायकांनीं, करी हास्य घे जो जगत्काय कानीं ॥७३॥
वेदार्थदूषक[2] नवश्रुतिकल्पकांची, इत्यादि दाविति अहो मतिरीति काँची[3] ।
कीं भेद[4] लौकिकचि जो निगमीं असेना, वेदश्रुती करि नव्या कलिदुष्टसेना[5] ७४
जे द्वासुपर्णा श्रुति दोन पक्षी[6], बोले तया मानिति भेदपक्षी[7] ।
परस्परें भेद तयां वदेना, तो वेद भेदात्मक भाव देना ॥ ७५ ॥
असे द्वाविमौ श्लोक[8] गीतेंत दोन्ही, वदे भेद त्याला न ऐसें वदोनी ।
जसें द्वासुपर्णी तसें येथ जाणा, कसा बोलवे भेद कृष्णा सुजाणा ॥७६॥
श्रुत्यर्थ ऐसाच महापुराणीं, प्रवृत्ति हे नित्य अशी पुराणीं ।
कीं हे[10] उपाधीस्तव वेगळाले, भेद स्वरूपीं अवघे गळाले ॥ ७७ ॥
भेदीं प्रमाण तरि एक तुह्मां दिसेना, मोडीतसां सकळ अद्वयभेदसेना ।
ऐसें पुसे विरळ त्या सुमहामतीतें, सत्यं भिदा[11] ह्मणुनि दावितसे श्रुती तें[12] ७८
जगीं पाठ ज्या कां श्रुती विप्रसिद्धा[13], तयां वेगळ्या या श्रुती अप्रसिद्धा ।
कुतर्कें कुयुक्ती अशा लाख वीतां, प्रमाणें तशी कल्पितें दाखवीतां॥७९॥
यतीलागिंही ज्या मतीं हेमलाहो, मतस्थापना वाटते हे मला हो ।
घडे ज्या मिषें लाभ ऐसा धनाचा, न ये लोभ रे कृत्रिमा साधनाचा ८०
न दे जो मतस्थाविणें बिंदु तोया, तुह्मां होतसे हो मनीं बेध तो या ।
कलीनें प्रतिष्ठा दिली या मतातें, तशी बुद्धिरूप स्त्रैंय कामतातें ॥८१॥
हिडंबा वधू द्वापरीं भीमसेना, तिची पुत्रपौत्रादि जे भीमें सेना ।

---

१ विश्वरूप धारण करणारा. २ वेदार्थास दूषण देणारी अशी नवी श्रुति करणारे. ३ कशी. ४ द्वैत जें लौकिकांत आहे वेदांत नाहीं तें. ५ नव्या वेदश्रुति ह्याच कलीच्या सेना. ६ जीव आणि ईश्वर असे श्रुतीमध्यें वर्णिलेले पक्षी. ७ द्वैतवादी. ८ " द्वाविमौ पुरुषौ लोके " इत्यादि श्लोक. १६ अध्याय १५. ९ जुन १० जीव व ईश्वर. ११ भेद. १२ द्वैत. १३ ब्राह्मणांस मुखोद्गत असा. १४ नंदन पिता कृष्ण. १५ स्त्री. १६ भयंकर.

तुम्हीं भीमशिष्यें स्वयें तोचि सारे, जलाचा जसा बिंदु देवां कला रे॥८२॥
दयाहीनता[2] वृत्ति हे राक्षसाची[1], तुम्हांमाजि रे दीसती स्पष्ट साची ।
मतस्थाविणें जे न पाजा जळाले[3], स्वभाव स्वयें राक्षसाचा जळाला ॥८३॥
बुद्धें तुम्हां मोहन कामतातें, केलें न हें जाणत या मतातें ।
द्रव्यप्रतिष्ठार्थ धरूनि सारे, विचार नेणा तुम्हि हा असा रे ॥ ८४ ॥
कंटाळलों मी तुमच्या मतातें, देखोनि सर्वत्र असंमतातें ।
पाहेन मी माधव सर्वभूतीं, अद्वैतविद्या हरिची विभूती ॥ ८५ ॥
विनोद वेदश्रुतिदुर्मतांचे, करूनि इत्यादि असंमतांचे ।
खेळोनि हे राक्षसविप्रवृत्ती, निवेदिली हो कलिची प्रवृत्ती ॥ ८६ ॥
वेदामधें व्याकरणानुसार, भेदार्थ वाखाणिति जे असार ।
ते वर्णिले वैष्णव बोधरीतीं, न वाढ जे वेदमतीं धरीती ॥ ८७ ॥
असे जगीं वैष्णव नाम यांला, महात्मता जेविं महात्मयांला ।
गीतेसि तेही धरिती प्रमाण, नेणोनियां व्याकरण प्रमाण ॥ ८८ ॥
महात्मा असा शब्द गीतेंत नाना, तया वाचितां ते करीती तनाना ।
प्रमाणा जयालागिं ओव्या मराठ्या, धरीती करीं काठिया ऊफराट्या॥८९
अधःशाख काठी तिचें ऊर्ध्व मूल, प्रमाणास गीता जया ऊर्ध्वमूल ।
असा वर्णितां धर्महीं[10] जंगमाचा[11], करी हास्य तेव्हां स्थिरा[12]जंगमाचा ॥९०॥
अन्यही कुमत कुत्सक रीती, वेष दावुनि पुढें उतरीती ।
तो मनांत हरि हांसत राहे, दुर्मती त्यजुनि सर्व तन्हा हे ॥ ९१ ॥
लीला विनोद करितां मुनि[13] त्या अजाला, देखें असा विजय यांत चतुर्थ[14] जाला।
लीलाविनोदविजयी प्रभु नाम याचें, ठेवी दरिद्र हरणार सुदामयाचें॥९२॥

---

## पंचम सर्ग.

मुनीलागिं सोळासहस्रा पेदांतें[15], हरी दाखवी सुंदरा संपदांतें ।

---

१ राक्षस. २ निर्दय असणें. ३ उदकाला. ४ दग्ध झाला. ५ कामतात जो कृष्ण त्याणें. ६ अमान्यातें; विरुद्धमतास. ७ ऐश्वर्य. ८ " तयास जे वेदमती धरीती " असाही पाठ आहे. ९ मनुष्याचें शरीर ज्याच्या शाखा म्ह० हात पाय, हे खालीं आहेत व मूल म्ह० डोकें, हेंच ऊर्ध्व आहे. असा त्या श्लोकाचा ते भलता अर्थ करितात. १० मानवी देह. ११ जंगम लोकांचा. १२ स्थावर-जंगमाचा. १३ नारद. १४ लीलाविनोद नामक चतुर्थ सर्ग पूर्ण झाला म्ह० संपला. १५ स्थानांतें.

वदावें किती ज्यास हो पार नाहीं, न तर्कास ये जं सरोजासनाही ॥१॥
कोणी त्या शयनीं विचित्रसुमनीं कृष्णप्रिया कामिनी
कामासक्त मनीं सदा निशिदिनीं मेघांत सौदामिनी ।
कोणी सेव्यमुनीपदाब्ज नमुनी स्वामी गृहस्वामिनी
सेवीती सदनीं मृगांकवदनी प्रेमें दिवायामिनी ॥ २ ॥
स्वजन काम मृगादिक पारधी, करुनि ये परतोनि अपारधी ।
सकळ यादववीर समागमीं, गुणगणीं स्तविजे निगमागमीं ॥ ३ ॥
कोणास दे अभय बोलत उद्धवादी, कोणी जरासुतमुखांस विरुद्धवादी ।
कोणावरी ह्मणति धाडुनि उग्र सेना, तें द्रव्य द्या ह्मणति आणुनि उग्रसेना ४
जे भिऊनि भजती चरणातें, दे तयां अभयही शरणातें ।
ऐसियांत मुरभौमरिपू जी, देखतां मुनिस सादर पूजी ॥ ५ ॥
घरीं एके पाहे यदुपति सुतायोग्य नवरी
जयाच्या पुत्रातें चतुर नवरी कोण न वरी ।
स्वयें पाहे कोठें उचित निजकन्येस नवरा
मुनी देखे ऐशा विविध गति शेषासनवरा ॥ ६ ॥
सरोवरें जीं सदनाचमाजी, जळांत त्या कृष्ण वधूसमाजीं ।
क्रीडे स्त्रियांशीं पडतांचि पाणी, शिंपी तयांही वरि चक्रपाणी ॥७॥
एके घरीं श्रीहरि आंगणांत, अश्वावरी त्या अवलागणांत ।
जो लोटितां वेग उणे मनाचे, करी असा हो अभिराम नाचे ॥८॥
कोठें हरी धांवडितो गजातें, मनीं स्त्रियांच्या करि अंगजातें ।
सर्वत्र त्या दिव्य मनोभिरामा, देखोनिया पावति मोदें रामा ॥ ९ ॥
वोळखि दे न असा यदुराज तो, दुरुनि वेषहि गुप्त विराजतो ।
कवण वृत्त कसे रितिचें वरी, विवरि लक्षितसे स्वगृहांतरीं ॥ १० ॥
लपोनि स्वयें सर्व संसारसाक्षी, पहातो कशा वर्तती सारसाक्षी ।
करी कर्म तो अन्य जैसे करीती,अशा नारदा दाखवी लोकरीती ११

---

१ ब्रह्मदेवासही अतर्क्य. २ पुष्पशय्या. ३ विद्युल्लता. ४ चंद्रतुल्य मुख ज्यांचें. ५ रात्रंदिवस. ६ अपार बुद्धि ज्याची असा. ७ जरासंधादिकांस. ८ भयंकर. ९ मुर दैत्य व भौमासुर याचा शत्रु. १० भजी; भजो. ११ शेषशायी श्रीहरि. १२ स्त्रीसमुदायांत. १३ मनाचे वेगापेक्षां जास्ती. १४ सुंदर. १५ काम; मदन. १६ आनंद. १७ स्त्रिया. १८ ओळख. १९ सर्वद्रष्टा. २० कमळासारखे नेत्र ज्यांचे अशा स्त्रिया.

प्रधान जे लौकिक कारभारी, लपोनि त्यांमाजिहि कैठभारी।
पाहे बऱ्या वाइट लक्षणातें, लक्षी मुनी त्या कमलेक्षणातें ॥ १२ ॥
मुनीलागिं इत्यादि जें देव दावी, नसे अंत वार्ता किती ते वदावी।
ऋषी भागला देखतां लोकलीला, जगीं नाशिते कीर्तनें जे कलीला॥१३॥
एके घरीं आपण आणि राम, विचारितो भक्तमनोभिराम।
कीं संत कल्याण अशा उपायें, करूं जया उद्धरणें स्वपायें ॥ १४ ॥
हांसोनि तो नारद माधवासी, बोले पहा काय रमाधवासी।
ह्मणे तुझ्या या चरितावलोकीं, न शक्त योगींद्र न देव लोकीं॥१५॥

सलगि करुनि तुझी पाहतों स्वैर माया
क्षितिवरि धरिसी जे लोकदृष्टी रमाया।
भयरहित कृपेनें पादसेवाप्रतापें
इतर नर [illegible]ळे हें पाहतां क्षिप्र तापें ॥ १६ ॥

ब्रह्मा तुझी हे निज योगमाया, कांहीं ह्मणे दृष्टिस यो गमाया।
हरूंनि वत्सें परतोन मोजी, जें देखिली आणि ह्मणे नमो जी ॥ १७॥
पाहों ह्मणे अर्जुन विश्वकाया, न शक्त कोणी जिस आयकाया।
तो मोहिला देखुनियां बरा हो, हा दास तैसा ह्मणि घावरा हो ॥१८॥
ह्मणी हे करू मोह माया विभूतीं, हरी दीसताहेस तूं जेंवि भूतीं।
तुझी कीर्ति सर्वत्र कानीं पडावी, तुझ्या प्रीतिची ते कळा सांपडावी१९
दे दास्य या नारदरूपदेहा, जाईल येथूनि निरोप दे हा।
प्रपंच पाहेल फिरोन सारा, तुझी कथा मात्र जयांत सारा ॥ २० ॥
तुझ्या यशें व्याप्त जगत्रयातें, पाहून मी होउनि पात्र यातें।
गाईन इत्यादिक लोकलीला, निर्दाळिती ज्या श्रवणें कलीला॥२१ ॥
ह्मणे हरी बोलसि सर्व साच, प्रभाव मायेस असे असाच।
पाहों तिला ज्या पुरुषें ह्मणावें, तो मोहिला निश्चित हें गणावें ॥ २२ ॥
भजावेंचि मातें तुह्मीं सर्वथा रे, स्वरूपीं तयीं चित्त सर्वत्र थांरे।
पहातांचि मायेस कां सांपडावें, पाहावेंचि कीं आणि फांसां पडावें॥२३॥

---

१ कैठभ दैत्याचा शत्रु. २ पापास. ३ येवो; प्रतीतीस येवो. ४ कृष्ण परमात्मा हा पूर्ण अवतार आहे कीं नाही हें पाहण्यासाठीं ब्रह्मदेवानें कृष्ण गाई चारीत असतां सर्व वत्सें चोरून नेलीं तेव्हां कृष्णानें तितकीं नवीं निर्माण करून ब्रह्मदेवाचा गर्व हरण केला. ५ जे योगमाया. ६ विश्वरूप; कृष्णानें अर्जुनास आपलें विश्वरूप दाखविलें हें वर्णन भगवद्गीता अध्याय ११ यांत आहे. ७ समजा. ८ सारभूत. ९ पातक. १० स्थिर होईल.

तरी नको खेद करूं उगा रे, माया न हे [illegible] उगारे ।
मी ईमधें मम असेंचि वाटे, तेव्हां तुझी बुद्धि चुके सुवाटे ॥ २४ ॥
हे धर्म लोकां हरि शीकवीतो, धरील जो बुद्धि अशी कवी तो ।
तो मोहपाशीं जन सांपडेना, हा मोह तूतें सहसा पडेना ॥ २५ ॥
करी ते जरी मोह माया सुरां रे, तरी खिन्न होऊं नको वासुरां रे ।
करीना तुतें मोह हे स्वैर माया, जिला आजि अंगीकरीतो रमाया॥२६॥
अशा देखतां लौकिका संभ्रमातें, मला सक्त मानूनि पावे भ्रमातें ।
तसा भ्रांत पुत्रा अरे होसिना तूं, ह्मणूनीच माझा खरा होसि नातू ॥२७॥
ये रितीं सरसिजासनतातें, नातुवांसि निज पादरतातें ।
दाविल्या गृहगृहीं निज जाया, दे निरोपहि गदाग्रज जायां ॥ २८ ॥
सोळासहस्र सदनीं हरि एकला हो, देखूनि घे मुनि विचित्र अनेक लाहो ।
ता ध्यान तें करित जाय पदांबुजाचें, माथां धरी अधिप शंभु पदांबु ज्याचें।
जरि मना यदुराजकथारसीं, परम मानुन कौतुक थारसी ।
जिताचि मुक्तिरसास सदा पिसी, न गणितां मग मृत्युस दोपिसी ॥ ३० ॥
निजकथारस हा बरवा मनीं, कथितसे कनकांवर वामनीं ।
सकळ मोक्ष फिके मज लागती, हरिकथाच गमे मजला गती ॥ ३१ ॥
या द्वारकाविजयनामसुधारसाची, ब्रह्मांड भेदुनि अलौकिक धार साची ।
आणूनि उद्धरि जवा पद वामनाचा,तो वामनीं स्वरस नित्य नवा मनाचा॥
ग्रंथ हा स्वसुखरूपउपायीं, अर्पितां त्रिभुवनेश्वरपायीं ।
मुक्तिमाजिहि न जें मन पावे, तें अपार सुख वामन पावे ॥ ३४ ॥

इति श्रीद्वारकाविजय समाप्त.

---

१ वाटतें; भासतें. २ विद्वान्. ३ जो विद्वान मी मायेमध्यें मम नाही असें शिकवितो तो मोहपाशीं सांपडणार नाही. ४ देवांस. ५ वत्सा. ६ ब्रह्मदेवाचा जो पिता त्यानें. ७ नातु जो नारद त्यास. ८ स्वपायीं रक्त असा नारद. ९ गदाच्या धाकील बंधु कृष्ण. १० जाण्यास. ११ पादकमळाचें. १२ पायाचें तीर्थ; गंगा; गंगा ही शंकरानें मस्तकीं धरिली आहे. १३ हें मना श्रीकृष्णाचे कथारसांत जर स्थिर राहशील तर जिवंतपणीच तुला मुक्तीचा लाभ होईल. १४ [illegible] [illegible]. १५ सुवर्णाच्या वर्णाचें अंबर ज्याचें वस्त्र त्याचें. १६ अमृत. १७ [illegible]. १८ विष्णूचा पांचवा अवतार. १९ जें सुख. २० वामनपंडित.

# रुक्मिणीपत्रिका.

( कथेचा सारांश )

रुक्मिणीचा भाऊ रुक्मिया याणें तिला शिशुपाळास देण्याचा निश्चय करून लग्नाची तयारी केली. रुक्मिणीचे मनांत श्रीकृष्णास वरावयाचें होतें, तेव्हां तिनें सात श्लोक लिहून सुदेव ब्राह्मणाबरोबर ती पत्रिका श्रीकृष्णाकडे पाठविली आणि तुझी प्राप्ति नाही झाली तर प्राण देईन असा आपला निश्चय कळविला. ह्या श्लोकांवर वामन पंडितांनी टीका केली आहे,तीस रुक्मिणीपत्रिका असें ह्मणतात. ह्यांतील दोन दोन श्लोक समानार्थक आहेत. कित्येक पुस्तकांत ह्यांतील एकेकच श्लोक दिला आहे. ह्यावरून पंडितांनी ह्या पत्रिकेवर दोन प्रकारची टीका केली असें दिसतें.

श्रुत्वा गुणान् भुवनसुंदर शृण्वतां ते निर्विश्य कर्णविवरैर्हरतोंगतापम् ।
रूपं दृशां दृशिमतामखिलार्थलाभं त्वय्यच्युताविशति चित्तमपत्रपं मे ॥ १ ॥

तापत्रया[1] हरिति श्रोत्रें[2] मनीं रिघोनी, त्रैलोक्यसुंदर तुझे गुण आयकोनी ।
रूपा तुझ्या मदनमोहन सावळ्यातें, निर्लज्ज मन्मन हरी तुजला वरीतें॥१॥
श्रोत्यांचिया श्रवणरंध्रिं रिघोनि चित्तीं, तूझे गुण त्रिविध ताप हरी हरीती ।
ऐकोनिया भुवन[3]सुंदर या गुणांतें, निर्लज्ज चित्त हरि हें तुजला वरीतें॥२॥

का त्वा मुकुंद महती कुलशीलरूपविद्यावयोद्रविणधामभिरात्मतुल्यम् ।
धीरा पतिं कुलवती न वृणीत कन्या काले नृसिंह नरलोकमनोभिरामम् ॥ २ ॥

विद्या वय द्रविण रूप इहीं करोनी, हा आत्मतुल्य पति हेंचि मनीं धरोनी ।
जे सर्वलक्षणांविचक्षण सत्कुलीना, कोण्ही नृसिंह नवरी तुजला वरीना॥३॥
जे सर्वलक्षणाविचक्षण आणि धीरा, तेही तुझे गुण असे जगदेकवीरा ।
ऐकोन कोण नवरी न वरील तूतें, निर्लज्ज यास्तव ह्मणी ह्मणसील मातें॥४॥

तन्मे भवान्खलु वृतः पतिरंग जायामात्मार्पितश्च भवतोऽत्र विभो विधेहि ।
मा वीरभागमभिमर्शतु चैद्य आराद्गोमायुवन्मृगपतेर्बलिमम्बुजाक्ष ॥ ३ ॥

देहार्पणा करुनि तूं पति त्यां वरीला,जाया करीं हरि तुं नेउनि शीघ्र माला ।
सिंहांगनेसि मज नेइल अंबुजाक्षा, जंबूकें चैद्य जरि तूं करिसी उपेक्षा ॥ ५ ॥
त्यां तूज निश्चितं मनें वरिलें अनंता, येऊनियां करिं धरूनि करीं स्वकांता ।
सिंहांगनेसि मज जंबुक[12] अंबुजाक्षा, नेईल चैद्य जरि तूं करिसी उपेक्षा॥६॥

---

१ आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक त्रिविध ताप. २ कर्णरंध्रांत व चित्तांत शिरून. ३ पृथ्वीवरील सर्व वस्तूंत सुंदर. ४ मनमोहन. ५ सर्वलक्षणांनी युक्त असी. ६ [illegible] ७ श्री. ८ मला. ९ हे कमलनेत्रा. १० [illegible] चेदिदेशाचा राजा शिशुपाळ. ११ [illegible]. १२ कोल्हा जो चैद्य.

पूर्तेष्टदत्तनियमव्रतदेवविप्रगुर्वर्चनादिभिरलं भगवान् परेशः ।
आराधितो यदि गदाग्रज एत्य पाणिं गृह्णातु मे न दमघोषसुतादयोऽन्ये ॥ ४ ॥

आराधिला जरि गदाग्रज म्यां अगण्यें, पूर्तेष्टदत्तनियमादिबहूतपुण्यें ।
येऊनियां करिं धरू मज चक्रपाणी, चैद्यादिदुष्ट हरि हे न धरूत पाणी ॥७॥
सर्वेश्वरार्पणविधीकरुनी अगण्यें, केलीं जरी असति कीं बहुजन्म पुण्यें ।
येऊनियां मज करीं धरिं चक्रपाणी, हे नातळोत दमघोषसुतादि कोणी॥८॥

श्वो भाविनि त्वमजितोद्वहने विदर्भान् गुप्तः समेत्य पृतनापतिभिः परीतः ।
निर्मथ्य चैद्यमगधेन्द्रबलं प्रसह्य मां राक्षसेन विधिनोद्वह वीर्यशुल्काम् ॥ ५ ॥

त्वां गुप्त उद्वहनपूर्वदिनींच यावें, येऊनियां मग स्वसैन्यसमेत ठावें ।
चैद्यादिकां मथुनि पौरुषशुल्क द्यावें, मातें निशाचरविधीकरुनीच न्यावें ॥९
लग्नाचिया पहिलिया दिवसांत यावें, संगीं समग्र बळ यादवसैन्य घ्यावें ।
या चैद्यमागधबलांबुधितें मथावें, मातें निशाचरविधीकरुनी हरावें ॥१०॥

अन्तःपुरान्तरचरीमनिहत्य बन्धूंस्त्वामुद्वहे कथमिति प्रवदाम्युपायम् ।
पूर्वेद्युरस्ति महती कुलदेवियात्रा यस्यां बहिर्नववधूर्गिरिजामुपेयात् ॥६॥

बंधू तुझे न वधितां ग्रहमध्यगा तूं, नेऊं कसी असि जरी पुससील मातूं ।
आहेच पूर्वदिवसीं गिरिजेशीं यावें, त्वां येउनी हरि मला हरुनीच न्यावें॥११
अंतःपुरांतुनि तुझे न वधूनि बंधू, न्यावें कसें ह्मणसि तूं जरि सौख्यसिंधू ।
यांचे कुळीं हरि असे कुलदेवियात्रा, तेथें हरूनि मज ने शतपत्रनेत्रा ॥१२॥

यस्याङ्घ्रिपङ्कजरजःस्नपनं महान्तो वाञ्छन्त्युमापतिरिवात्मतमोपहत्यै ।
यर्ह्यम्बुजाक्ष न लभेय भवत्प्रसादं जह्यामसून्व्रतकृशाञ्छतजन्मभिः स्यात् ॥ ७ ॥

रुद्रासि ज्या पदरजेंस्नपनाचि इच्छा, तैसीच संत करितीहि जयाचि वांच्छा ।
त्याचा प्रसाद नंपवें जरि जन्मिं हेची, प्राण त्यजून शतवार वरीन तोची१३
शर्वादि सर्व तुझि इच्छिति पायधूळी, तूझा प्रसाद नव्हतां मज याच काळीं ।
जन्मा शतांत स्मरणें मरणें मुकुंदा, अंतीं तुझ्याच वरणें चरणारविंदा॥१४॥
हरिचरणसरोजीं रुक्मिणीची शिराणी, विशदलिखितरूपें बोलिली जे पुराणीं।

---

१ गदाच्या वडील बंधु. २ अगणित. ३ विहिरी खणणें, यज्ञकरणें इत्यादि पुण्यानें. ४ हात. ५ न शिवोत. ६ लग्नाचे पूर्वदिवशीं. ७ रहावें. ८ पराक्रमरूप देणगी. ९ राक्षसविधीनें. १० सेनासमुद्रास. ११ मंथन करावें. १२ मला. १३ अंतःपुरांत असलेली त्या तुला. १४ मात; युक्ति. १५ अंबिकापूजनास यावयाचें आहे-च. १६ सुखसमुद्र असा तूं. १७ कमलनेत्रा. १८ पायधूळ अंगावर घेण्याची. १९ जर ह्या जन्मीं प्रसाद न पावेन तर. २० शतजन्म घेऊन तूं प्राप्त झाला नाहींस तर शतवार प्राण देईन. २१ शंकर आदि करून. २२ चरणकमलास. २३ हरि-चरणकमलाचे ठिकाणीं. २४ कौतुक. २५ स्पष्ट.

मनुजतनुज जैसा भूतळीं चक्रपाणी, जगदघ हरि भाषारूप हे त्या[illegible] ॥ १८ ॥
असि विदर्भमहीपतिपुत्रिका, लिहि हरिप्रति संस्कृत पत्रिका ।
लिखित भाव तिचा वरदा मनें, उकलिला हृदयांतुनि वामनें ॥ १९ ॥

इति श्रीरुक्मिणीपत्रिका समाप्त.

---

## रुक्मिणीविलास.

करुनि नमन देवा रुक्मिणीनायकातें
निजपद हरि दे जो कीर्तिच्या गायकांतें ।
स्मरत पद तयाचें त्याचिया लोकलीला
कथिन हरिति गातां वर्णितां ज्या कलीला ॥ १ ॥
चिच्छक्तिला सतत चिन्मय जोर्वि योग
श्रीरुक्मिणीस न कधीं हरिशीं वियोग ।
मी वास्तव प्रियतमा परमा रमा ते
मानी अहंकृति शिवे असि मारमाते ॥ २ ॥
कुनारिसि कीं प्रीति अशी नरा हे, अहंकार हा ज्यांत अज्ञान राहे ।
न जें पाहिजे निर्गुणा आपणातें, ह्मणे कृष्ण कां हें शिवे मीपणातें ॥ ३ ॥
ह्मणवुनि खिजवीतो रुक्मिणीतें हरी तो
परम करुण तीच्या मीपणाला हरीतो ।
कथिन चरित तें जें वर्णिलें श्रीशुकानें
मनिं धरुनि पहावें सज्जनीं हें सुकानें ॥ ४ ॥
बोल खोल बहु भागवताचे, श्रीशुका परमभागवताचे ।
पापतापहर या रसमात्रा, त्याचिया कथिन मी रसमात्रा ॥ ५ ॥

---

१ मानवाचा पुत्र. २ जगाचें पाप हरण करणारी. ३ भाषांतररूप. ४ विदर्भ देशाचा राजा भीमक त्याची मुलगी. ५ हरीची कीर्ति गाणारास. ६ त्याच्या लौकिकलीला कथन करीन, ज्या गातां आणि वर्णितां कलीला हरिती, ७पातक. ८ ज्ञानशक्ति. ९ पुढें तेराचा श्लोक पहा. १० मोठी. ११ लक्ष्मी. १२ मदनाची माता, श्री रुक्मिणी तीस असा गर्व झाला. १३ मूढ. १४ अहंकारास. १५ चिडवितो. १६ श्रीमद्भागवताचे. १७ मोठ्या भगवद्भक्ताचे. १८ पाप हाच ताप [illegible] रसायन. १९ केवळ रसास, सर्व रसास.

श्रीरुक्मिणीची बहु गोड वाणी, ग्रंथास तेथें न करीन वाणी ।
कीं कृष्ण जे शब्द अगाध याचे, वदेल ते वर्णिन माधवांचे ॥ ६ ॥
हा प्रेमसंवाद सुखी सुजाणा, करीतसे नामहि तेंचि जाणा ।
आतां शुकाचार्य परीक्षितीतें, सांगे कथा धन्य करी क्षितीतें ॥ ७ ॥
पलंगावरी रुक्मिणीच्या सुसेजे, बसे कृष्ण ते त्यास सेवीतसे जे ।
उभी सुंदरी ढाळिते चामरातें, मनीं जे शिवे मीपणापामरांतें ॥ ८ ॥
कर मुद्यावलयांसह चाळितां, चवरि माधवजीवरि ढाळितां ।
ध्वनि उठे चरणीं मृदु भूषणीं, हृदय लग्न जिचें यदुभूषणीं ॥ ९ ॥
हरिवरि चवरीसी जेधवां हस्त नाचे, दिसति सम रवस्त्रीं कंप कांहीं स्तनाचे ।
चळति कुचयुगाच्या कुंकुमें रत्नहार, स्फुरतिच पदराही आड त्यांचे विहार १०
वरी साजते मेखला[13] तीस मौंजी[14], ध्वनी ऊठती क्षुद्रघंटासमौंजीं[15] ।
असी सेविते सन्निधा श्रीपतीतें, पहातो स्मराचा स्वयें बाप[16] नीतें ॥११॥
चहुंकडूनिहि आनन[17] शोभलें, पदक खालुनि शोभतसे भलें ।
श्रवणिंचे नग[18] हालति दोंकडे, वरुनि चांचर केशहि वांकुडे ॥ १२ ॥
गळसरी[20] दुसरी न धरी गळां, प्रतिभवीं[21] न पती हरि वेगळा ।
अवतरे अवतीर्ण[22] जयीं पती, स्वअनुरूप[23] परस्पर दंपती ॥ १३ ॥
कसि असीस अहंमति[24] वाटते, नरकजन्ममृतीसहि[25] वाट ते ।
ह्मणउनी खिजवूनि तितें हरी, निपुण कृष्ण अहंकृतितें हरी ॥ १४ ॥
वरावे ते राजे निजसम तुवां राजतनये
नये आह्मां ऐसा क्वचिदपि वरूं वो सविनये ।
दिलें बापें भावें त्यजुनि बरवे ते क्षितिपती[26]
पती केला ज्याचे कलपति समुद्रांत लपती ॥ १५ ॥

---

१ भाषण. २ कमताई. ३ खोल. ४ लक्ष्मीपतीचे. ५ जाणत्यास ह्म० ज्ञात्यास सुखी करितो. ६ चवरीतें. ७ क्षुद्र अहंकारास. ८ अंगठ्या आणि कंकणांसह हात हलवीत असतां. ९ अलंकाराचा मृदु ध्वनि उठूं लागला; दुसरा पाठ 'मृदु भाषणीं' व चौथ्या चरणाचे शेवटी 'यदुभाषणीं' असा आहे. १० यादवांचें भूषण जो कृष्ण त्याचे ठिकाणीं. ११ स्तनद्वय. १२ क्रीडा. १३ कमरपट्टा. १४ मध्यें. १५ मेखलेस लाविलेल्या बारीक घुंगरांमधून. १६ स्मराचा बाप कृष्ण. १७ मुख. १८ कर्णभूषणें. १९ दोहीबाजूंस. २० मंगलसूत्र; जिला प्रतिजन्मीं तेंच मंगलसूत्र ह्मणजे तोच एक पति. २१ प्रतिजन्मीं. प्रति अवतारीं. २२ अवतार घेई तेव्हां. २३ योग्य. २४ अहंकार. २५ जे अहंमति नरक, जन्म, आणि मरण यांची वाट होय. २६ बापानें व भावानें नेमलेले राजे.

घालिती नृपति येउनि घाले, यानिमित्त जलधींत निघाले ।
शत्रु ज्यास नृप दानव रीती, ऐसियास नवन्या न वरीती ॥ १६ ॥
त्यजियलेंचि जिहीं स्वनृपासना, करिल त्याचिहि कोण उपासना ।
प्रगट गोष्टिहि हे जनिं हो कसी, कळत तूं ठकलीस अहा कसी ॥१७॥
ज्याचा मनांतिल अगम्यचि पंथ वाटे, जे लौकिकासम न चालति लोकवाटे ।
ऐशाचिया कुलसुता बसतील पाटीं, दुःखांचिया निघानि दाटुनि त्या कपाटीं१८
आम्हीं अकिंचनंचि हे तरि गोष्टि साची, आम्हांसि आवड बहू जन तो तसाची ।
आम्हीं स्वयें प्रियहि त्याचि अकिंचनातें, आढ्यांसि आमासि नसे अतिप्रीतिनातें
ऐश्वर्य वित्त वय आकृति हें समान, स्वार्थार्थ. होतिल परस्पर त्यांस मान ।
मैत्री विवाह न घडे अधमोत्तमातें, तूं भाळलीस नृपनंदिनि काय मातें ॥२०॥
येथें सुजाणपण जाण तुझें बुडालें, कीं दीर्घदृष्टिगत तेज अहो उडालें ।
ज्याला न लेशगुण तो पति काय केला, ज्याकारणें जन अकिंचन वो भुकेला।
अटन करिति भिक्षा भक्षणें ज्या समाजीं, गगनवसन बारा सूत्रही त्या समाजीं ।
अगुणपण जयाचें ऐसिया दादुला गे, तुज नृपतिसुते तो कायसा स्वादु लागे २२
आतां तरी क्षत्रिय तूं भला गे, धरीं जयाचा तुज लोभ लागे ।
जेणें तुला साधिति लोक दोन्ही, आम्हीं वृथा काय बहू वदोनी ॥२३॥
आम्हीं न आणूं जरि तूजलागे, हें दाविता आनन लाज लागे ।
चैद्यादि रायां तव अग्रजाला, ग्यां जिंकितां पौरुष उग्र जाला ॥ २४ ॥
तरी उदासीनपणीं न कामी, न हो कधीं स्त्रीधनपुत्रकामी ।
पूर्ण स्वलाभें असतों उगे ही, देहीं जगींही जसि ज्योति गेहीं ॥ २५ ॥
हें या निमित्त वदणें गदपूर्वजाला, कीं मी प्रिया पतिस हा तिस गर्व जाला ।

१ जरासंधादि राजेलोक हल्ला करितात ह्मणून भिऊन द्वारकेंत वस्ती केली असा अर्थ. २ ह्मणजे ज्यांना राज्य नाहीं. ३ पूजा. ४ लोकांत ही गोष्ट प्रसिद्ध असतां. ५ भासे. ६ कुलवान् मुली अशाच्या पाटीं बसतील ह्मणजे त्याच्या मागें लागतील तर त्यांस महादुःख होईल. ७ "दाटूनिया निघति दुःखमहाकपाटीं" असाही पाठ आहे. ८ दरिद्री. ९ धनाढ्य. १० सेव्यसेवकभाव; "आढ्यांसि आमचिं नसे अतिप्रीति मातें" असा पाठ आहे. ११ लहानमोठ्यांशी मैत्री व विवाह योग्य नाहीं. १२ शहाणपण. १३ दूरदृष्टिविषयक सुजाणपण "दूर दृष्टिगत तेज अहो उडालें" असाही पाठ आहे. १४ सौजन्यादि गुणांचा लेश ज्याला नाहीं; पक्षीं जो निर्गुण आहे. १५ भिक्षाटन करितो त्या समाजीं ज्यास भक्षणें. १६ दिगंबर. १७ निर्गुणत्व. १८ दादल्यास; नवऱ्यास. १९ गोड लागतो. २० इहलोक व परलोक. २१ वडील बंधुरुक्मिया याला. २२ कृष्णाला.

नाहीं वियोग ह्मणवूनि अशी अहंता, राहे उगा हरुनि ते भवभावहंता॥२६॥
जाली असें परिसतांच अनाथवाणी, ठावी नसे जिस कधीं असि नाथवाणी।
त्रैलोक्यनाथ पति हा प्रिय आपणातें, त्यागावया तिस गमे करितो पणातें॥२७॥

शुक ह्मणे स्रवली नयनांबुजीं, धुकधुकी मनिं कंप हृदंबुजीं।
स्वपवनें निजबिंबफलाधरा, करुनि शुष्क पदें उकरी धरा॥२८॥
कुच सुकुंकुमचर्चित चांगले, नयनबिंदु पडों वरि लागले।
गिरियुगीं अतसीकलिकाजळें, स्तनतटीं तसिं वाहति काजळें॥२९॥
नयनिं होउनि शोक पयोधरा, स्रवति लक्षुनि अद्रिपयोधरा।
चपळ वीज गमेच मनासि कीं, मुख सकंप चळे मणि नासिकीं॥३०॥

सलिल बाष्प तिच्या मिरवे गळां, वर न ज्यास शिवे हरिवेगळा।
शुक ह्मणे असुखासें न अंत रे, उपजतां स्वतनुविस्मृति अंतरे॥ ३१॥
दाटुनि कंठ पडली वदनास मुद्रा, शोकें भरे मग जसें भरितें समुद्रा।
घेऊनि चामरचुडासह मुद्रिकाहीं, भूइं पडे उरि नुरे तनुमाजि कांहीं॥३२॥
पडे केळ जैसी महाचंड वातें, असें देखतां ये कृपा माधवातें।
उडी शीघ्र टाकी पलंगावरूनी, धरी उत्तरीयांबरा सांवरूनी॥ ३३॥
उचलुनि चहुंहस्तीं श्रीकरें श्रीधरानें, पुसि नयनजळातें त्यांत एका करानें।

---

१ संसाराचा नायकर्ता. २ अनाथासारखी झाली; दीन झाली. ३ पतीचे शब्द. ४ वाटे. ५ निश्चयास. ६ नेत्रकमळास पाणी आलें. ७ हृदयकमळांत; हृदय कांपूं लागलें. ८ श्वासोच्छ्वासानें ओठ शुष्क झाले. ९ तोंडल्याप्रमाणें रक्तवर्ण अधर. १० पायानें जमीन उकरूं लागली. ११ उत्तम केशराची उटी लावलेले. १२ अतसीपुष्पाची कळी जशी जलप्रवाहानें पर्वतावरून वाहत जावी तसें नयनबिंदूंनीं डोळ्यांतील काजळ उभयस्तनांवरून वाहूं लागलें. १३ शोकरूप मेघ. १४ स्तनरूपी पर्वत लक्षून त्यावर वर्षाव करूं लागले. १५ नासिकमणि ह्मणजे नथ ही जेव्हां सकंप मुखामुळें हाले तेव्हां तीच विद्युल्लतेसारखी या वरील शोकरूप मेघमंडळांत चमकतांना दिसे. १६ तिच्या असुखास अंत नाहींसा झाला ह्मणजे तिला अनंत दुःख झालें. ह्या श्लोकाचा दुसरा पाठ असा आहेः—"हासित बाष्प तिच्या मिरवे गळा, वर न त्यास शिवे हरिवेगळा। शुक ह्मणे स्वसुखास न अंत रे, तिचिच विस्मृति तीसचि अंतरे॥" १७ स्वदेहाचें विस्मरण. १८ तोंड बंद होऊन शब्द निघेना असा अर्थ. १९ समुद्रास भरती यावी तशी तीस शोकाची भरती आली. २० प्रचंड वायूनें. २१ अंगावरील वस्त्र. २२ स्वयें श्रीधरानें श्री (लक्ष्मी.) चहुंहस्तीं उचलूनि. असा अन्वय, दुसरा पाठ असा आहे "उचलिलि चहुंहस्तीं श्रीकरें श्रीधरानें."

कुचयुगुलिं हरीचे गुंतले दोन्हि पाणी, सदृढ धरि चतुर्थे पोटिसीं चक्रपाणी ३४
उदासीन काळत्रयीं त्या सतीचें, करी बंधन प्रेम तें त्यास तीचें ।
समाधान आतां हृषीकेश वाचे, करी आयका शब्द ते केशवाचे ॥३५॥
ह्मणे हरी रुक्मिणिला अहाहा, अनर्थ कां मांडियला महा हा ।
निर्दोष आह्मीं परि ठेविला गे, हा दोष आह्मांवरि जोंवि लागे ॥ ३६ ॥

मजविण न सुखाचा तूज तों हेतु कांहीं
समजत तुझिया या पाहतों कौतुकांहीं ।
निजवचनविनोदें बोलिलों तूजला गे
न कळत गति याची खेद हा तूज लागे ॥ ३७ ॥

जसें नीरें शेतास नेती तयाचें, तुवां योग्य अर्थाऽनुसंधान याचें ।
वदावें असें शब्दही बोलिलों कीं, तुझी होय विख्यात टीका त्रिलोकीं ३८
वदें मी तुझे बोल ते आयकाया, तुवां टाकिली हे मृतप्राय काया ।
विनोदार्थ तो साच चित्तांत भारी, तुवां मानिला वो ह्मणे कैटभारी ३९
तुवां या विनोदार्थ रीती खिजावें, खऱ्या गुह्य अर्थास वर्णीत जावें ।
पहावें मुख प्रेमकोपप्रभावें, तुझें तेधवां बोलिलों याच भावें ॥ ४० ॥
नयनशरधनुष्यें भोंवयांच्या प्रतापें, श्रवणें वरिही येती तांवडे कोपतापें ।
अधर थरथरीती रक्तवर्णे स्वभावें, असिस तुज पहावें बोलिलों याच भावें ४१
प्रियासीं वृथा दीसते ती उगें ही, गृहस्था जना लाभ तो ह्याचि गेहीं ।
विनोदें अशा जो अवो काळ जालो, करी तो सुखी दुःखिता काळजा तो ४२
अलभ्य हा लाभ शतक्रतूनें, तो वाटला नेमें अवक्र तूतें ।
हें जाणती ज्या अतिधीट भारी, प्याड ह्मणे नेणसि कैटभारी ॥ ४३ ॥
बोधी असा सांत्वनें दक्ष तीतें, ह्मणे शुकाचार्य परिक्षितीतें ।
टाकूनियां तेथ भयास देवी, बोलेल तें आइकिजे सदैवीं ॥ ४४ ॥
लक्ष्मी अपांगें मुख.कृष्णजीचें, स्वमानें भंगें मन उष्ण जीचें ।
स्नेहें सलज्जें नयनेंचि पाहे, टाकूनि चिंता कळतां कृपा हे ॥ ४५ ॥

---

१ हात. २ राहिलेल्या चौथ्या हातानें. ३ साध्वीचें. ४ थट्टेच्या भाषणानें. ५ पाणी. ६ शरीर. ७ विनोदाचें भाषण हें साच ह्मणजे खरेंच मानिलेंस. ८ चिडावें. ९ भ्रुकुटिरूप धनुष्याच्या प्रतापानें कर्णापर्यंत येणारे कटाक्षरूपी शर. १० कानावर. ११ मूळचेच रक्तवर्ण असे अधर. १२ घरांत. १३ दुःखित हृदयास. १४ इंद्र. १५ भित्रे. १६ समाधान करण्यांत दक्ष ह्म० कुशल. १७ "टीका प्रिया, त्या समयास देवी" असाही पाठ आहे. १८ रुक्मिणी. १९ वक्रदृष्टीनें. २० "सप्रेम कोपें मन उष्ण जीचें" असाही पाठ आहे. २१ संतप्त.

श्रीरुक्मिणी ह्मणतसे पुरुषोत्तमातें, कीं जी न साम्य मज तूज ह्मणोनि मातें ।
जे बोलिलास हरि ते तरि गोष्टि साची, येते जडांस समता कसि चिद्रसाची ४६
सत्तानुभूति तुझि जे स्वत एव सिद्धा, मी तों गुणं प्रकृति याकारितां प्रसिद्धा ।
तूं चित्समुद्र अजि मी लटिक्या तरंगा, हें तें नव्हे अनृत जाणसि अंतरंगा ४७
दिसे केविं मी त्वत्प्रकाशाविनाही, अजी वस्त्र तंतूविना जेंवि नाहीं ।
स्वयें ब्रह्म तूं मी तुझी स्वैर माया, जगीं जन्मलों तेंच दोघे रमाया ॥४८॥
तूजही जन जनोऽधिप सारे, सेविताति पसरूनि पसा* रे ।
नीच केविं ह्मणवे तव देहा, हें कसें ह्मणि मुकुंद वदे हा ॥ ४९ ॥
ह्मणउनी ह्मणते अजि केशवा, गणिति आत्मपणें जितके शवा ।
अबुध इच्छुनि भाग्य नृपासना, करिति माझिच काम्य उपासना ॥ ५० ॥
मृगजळा मृग धांवति बापुडे, श्रमति तों जळ सत्य न सांपडे ।
तन्हि मनीं अनृतांऽमृतवासना, फलद नृंचि वृथा मदुपासना ॥ ५१ ॥
रजत शुक्तिवरील तयास्तव, श्रमति नेणति जे सुख वास्तवें ।
असुख तें सुख मानुनि वासना, धरिति त करिती मदुपासना ॥ ५२ ॥
तनुस मी ह्मणुनी अभिमानिती, विषय दुःखचि जे सुख मानिती ।
धरुनि ते दृढ दुर्भर वासना, करिति यज्ञ असे मदुपासना ॥ ५३ ॥
भजति केवळ जे तुज केशवा, न अभिमानिति या तितके शवां ।
मृगजळासम भाग्य नृपासना, गणिति ज्यांस चिदर्कउपासना ॥ ५४ ॥
तुतें सेविती सुज्ञ सर्वोत्तमातें, असें अज्ञ ते मागती वित्त मातें ।

---

१ "तुझी माझी योग्यता सारखी नाहीं, तूं आपल्या वैभवाप्रमाण अन्य राजास वरावें" ह्मणून श्रीकृष्ण पंधराव्या श्लोकांत बोलला, त्यावर रुक्मिणी उत्तर देते. २ खरी. ३ अचेतन पदार्थास. ४ जड पदार्थास चैतन्य देणाराची. ५ अस्तित्व. ६ त्रिगुणात्ममाया. ७ ज्ञानसागर. ८ लाटा. ९ खोटें. १० अंतर्भाव. ११ वस्त्रास मूळ कारण तंतु तसा तूं मला मूळ कारण आहेस. तुझ्या इच्छामात्रें करून मी जग उत्पन्न करितें. १२ राजे. १३ या देहास जे लोक आत्मपणें मानितात, जे देहाविषयीं अभिमान बाळगितात. १४ अज्ञ. १५ फलाशेसहित. १६ खोट्या जलाची; मृगजळाची ह्म॰ असत्य सुखाची. १७ फळ देणारा. १८ माझी ( मायेची ) उपासना. १९ रुपें. २० शिंपल्यावरील. २१ ज्या लोकांस वास्तविक ह्म॰ खरें सुख कळत नाहीं त्यांचे श्रम शिंपल्यावरील रजत घेऊं इच्छिणाराप्रमाणें निरर्थक होत व ते मृगजलवत् असत्य सुखासाठीं माझी उपासना करितात. २२ जे देहाभिमान धरून विषयांपासून होणाऱ्या असत्य सुखासच सुख मानून घेतात. २३ देहास. २४ चैतन्य सूर्याची. २५ ज्ञानी. २६ मला. * संसाराचा विस्तार करून.

स्वयें थोर तूं ये रीती श्रीनिवासा, असें मी पदीं श्लाघ्य मानूनि वासा ५५
असमता मज तूज असे खरी, परि असें वदली तुझि वैखरी ।
शरण केविं भयें वरुणालया, तदपि उत्तर घे करुणालया ॥ ५६ ॥
लोकीं नियामक गुणत्रय जेविं राजे, रज्जू फणींत हरि त्यांत असा विराजे ।
सर्वांस घोर न दिसे अतिभ्याड साच, त्रासें ह्मणे भिसि गुणाप्रति तूं तसाच ५७
'या राजयांसिच भितों'जरि हे स्ववाणी,जी स्थापिसी तरि गमेलचि मंदवाणी।
कीं ते' तुवां पळउनी हरिलेंचि मातें, बोलेल हें स्फुट पुढें पुरुषोत्तमातें ॥५८॥
व्यापिलें जग पदें त्रिविक्रमा, भें तया न ह्मणवे उरुक्रमा ।
हाचि अर्थ सकळां परी खरा, रुक्मिणी विनवि वृष्णिशेखरा ॥५९॥
भिऊनियां त्याचि खळा नृपाला, या सागरीं कोण ह्मणे लपाला ।
मनीं समुद्रीं वसतोसि देवा, गुणांसि जाणों भिसि वासुदेवा ॥ ६० ॥
बलाऽढ्यासवें द्वेष हाही तसाची, तुझा मात्र हे गोष्टिही होय साची ।
बळी इंद्रियां दुर्भरांचीच सेना, खरा द्वेष त्यांसीं तयां जें दिसेना ॥ ६१ ॥
ह्मणसि टाकियलें स्वनृपाऽसनीं, तरि जयां तव पाद उपासना ।
नृप पद त्यजिलेंचि तिहीं असे, भरत अंग गयादि किती असे ॥६२॥
ज्याच्या मनांतील अगाध रीती, न लोक मार्गासि कधीं धरीती ।
आह्मीं असे हें वदलासि मातें, वदेन तेंही पुरुषोत्तमातें ॥ ६३ ॥
जे सेविती रस तुझ्या पदसारसांचा,त्यांचा कळे न कवि मार्ग विचार साचा ।
जे आत्मया प्रियतमा तुज आयत्यातें,ध्यातीं द्विपाद पशु जाणति काय त्यातें॥

१ लक्ष्मीचा वास ज्याचे ठिकाणीं. २ वसति; निवास. ३ लहान मोठेपणा. ४ वाणी. ५ समुद्र; श्लोक ५६ यांत राजांच्या भेणें समुद्रांत लपून राहिलों असें ज ह्मटलें त्यावर उत्तर. ६ करुणासागरा. ७ सर्प असून अज्ञानानें रज्जु ह्मणून स मज लें तर तो जसा भयंकर दिसत नाहीं, तसा तूं इतर राजांस त्यांच्या अज्ञानामुळें सर्प असतां भयंकर दिसत नाहींस. ८ ते राजे. ९ हे वामना; वामनानें बळींज वळून त्रिपाद भूमी दान घेत असतां आपल्या तीन पावलांनीं स्वर्ग, मृत्यु, पाताळ, हे तीन्ही लोक व्यापिले, ह्मणून त्यास त्रिविक्रम ह्मणतात. १० दीर्घ पाऊल टाकणारा. ११ यादवश्रेष्ठास. १२ "गुणांसि जाणूनिच वासुदेवा" असाही पाठ आहे. १३ "त्यजियलेंच जिहीं स्वनृपासना" इत्यादि जें (१७) व्या श्लोकांत ह्मटलें त्यावर उत्तर. १४ भरत, अंग, गय, इत्यादि कित्येक राजांनीं तुझ्या प्राप्तीकरितां आपलें राज्य सोडिलें. १५ "ज्याच्या मनांतिल अगम्यचि पंथ वाटे" इत्यादि जें तूं (१८) व्या श्लोकांत ह्मटलें त्यावर उत्तर. १६ पादकमलाचा. १७ दोन पायाचा पशु ह्म० अज्ञानी नर.

तुझा अगम्य पथ हें न अपूर्व कांहीं, कां जें अगम्य निगमा विधि पूर्वकांहीं ।
निर्मूनि पाळुनि जगा निमिषें हरीतो, कर्त्ता नव्हे करुनि केवळ तूं हरी तो॥६८॥
तुझें अलौकिक कथाऽमृत गाति जेणें, ते लौकिकास अजि हाणति लोक तेणें ।
ऐशाचि ही तुझि न कोणि अलोकरीती, आश्चर्य कोण जन येविषयीं करीती ६६

मी निष्किंचन आणिखी प्रियहि मी निष्किंचनाचा खरा
ते निष्किंचनही जन प्रिय मला तैशाचिया शेखरा ।
हें मातें वदलेत अर्थ तुमच्या निष्किंचनत्वीं असा
कीं त्यापासुनियां न किंचिदपि कीं जे ते तुह्मीं जी असा ॥६७॥

नव्हेचि ज्यापासुनि कर्म कांहीं, तया अकर्त्या अजआदिकांहीं ।
तुह्मीं प्रिय प्रीति तुतें तयांची, जगांत पूजा हुतभक्षयांची ॥ ६८ ॥
दारिद्र निष्किंचन शब्द दावी, तयासि हे गोष्टि कसी वदावी ।
तुझ्या प्रिया तूं प्रिय ज्यांस देवा, ते पूज्य लोकां सकळां सदेवा ॥६९॥
बहु धनाढ्य मला भजतीच ना, ह्मणुनि मी प्रिय शुद्ध अकिंचनां ।
जरि असें ह्मणसी सुखदायका, धन तया किति जी यदुनायका ॥७०॥
कुबेरासम द्रव्य तो बोलवेना, धनाच्या मदें मान ज्याची लवेना ।
धनाढ्यत्व तें आढ्यतानामकां जी, घडे त्यास होते सुधा जेवि कांजी॥७१

पदरिं न धनदाच्या कोटि वा अंश कांहीं
मद तरि न असा जो त्या कुबेरादिकांहीं ।
अमितें विभव ज्याला गर्व त्याला दिसेना
तुजचि भजतसे हो श्रीविरिंच्यादि सेनी ॥ ७२ ॥

तया तुझा प्रेमविलास देवा, जी बोलिजे आढ्य जया सदेवा ।
दरिद्र जो नो तुजला भजेना, पाषाण सत्संग जळीं भिजेना ॥ ७३ ॥

---

१ जगाचा सर्ग, स्थिति, आणि क्षणांत लय करतोस. २"आह्मी अकिंचनचि" इत्यादि जें(१९)श्लोकांत ह्मटलेस त्यावर उत्तर. ३ निष्किंचनांचा शेखर शिरोमणी. ४या निष्किंचन शब्दाचा अर्थ दरिद्री असा नाहीं करावयाचा तर त्या पदाचा अर्थ "ज्यापासुन कांहीं एक कार्य होत नाहीं ह्मणजे जो अकर्ता आहे"असा अर्थ आहे. ५श्रीमंत. ६ दरिद्र्यांस. ७गर्वास. ८ अमृत. ९ पेज. १०कुबेराच्या धनाचा कोट्यांश एवढें जरी द्रव्य नसलें तरी त्यास असा गर्व होतो कीं तो कुबेरासमुद्धा ठाऊक नसतो. याचें कारण असें आहे कीं ज्याजवळ अमर्याद द्रव्य त्याला गर्व मुळींच नसतो; उथळ पाण्यासच भारी खळखळाट. ११ अमर्याद संपत्ति. १२ ब्रह्मदेवादि. १३ समुदाय.

धन गज रथ तूझे सर्व सर्वोत्तमा ते
न कळत ममतेनें देखतां चित्त माते ।
तुज शरण न येतां दुर्भरा अंतकाला
गिळि विषयविषाचा त्या मदें भ्रांत काला ॥ ७४ ॥

न भजती मज आढ्य असी खरी, तुझिच हे न घडे हरि वैखरी ।
जरि तदंतरभाव न सांवरी, अनृत अर्थ कलिप्रद सां वरी ॥ ७५ ॥

विवाह मैत्री बरवी समाशीं, घडूं नये ते अधमोत्तमाशीं ।
भावार्थ या श्रीपतिभारतींचा, दावूनि बोले परिहार तीचा ॥ ७६ ॥

तूं राजकन्या परि उग्रसेना, मी सेवितों जेंवि सभव्य सेना ।
बाह्यार्थ हा अर्थ जळो जळाला, डोळां पुन्हां आणिल तो जळाला ॥७७

अतिश्रेष्ठता तुज सर्वोत्तमातें, उणी मी जरी सेवितें उत्तमातें ।
खरें हें तरी योग्य होतें वराया, अजी आयकावें वरें देवराया ॥७८॥

जरि निपटदरिद्री जो न लाहेचि कांजी
तरि अमृत मिळाल्या त्यास सोडील कां जी ।
तसि बहुत उणी मी लभ्य जालासि मातें
म्हणउनि वरिलें म्यां तुज सर्वोत्तमातें ॥ ७९ ॥

निजतनू नर लावुनि सार्थकीं, करितसे भलता पुरुषार्थ कीं ।
सकळपौरुष देह तुझा खरा, कवण तूजसम प्रभुशेखरा ॥ ८० ॥

साधूनि ये रितिहि जी पुरुषार्थ कांहीं, तूझें समत्व न सुरां न अजादिकांही ।
जो तो करील पुरुषार्थ असी प्रसिद्धी, तेव्हां मला उचित हो तव पादसिद्धी८१

फळ चहुं पुरुषार्था तूं निजानंद सारा
तरि सकळ फळात्मा तूंचि कीं सर्वसारा ।
म्हणुनि सुख समस्त त्यागुनी वासुदेवा
. उचितचि वरिलें म्यां तुज जी देवदेवा ॥ ८२ ॥

कुबुद्धि टाकूनि गृहकृत्यें, जे सेविती साधु अवक्र तूतें ।

---

१ उन्मत्त होतें. २ वाणी. ३ कामक्रोधादि सहा रिपु. ४ बरोबरीच्याशी. ५ बोलण्याचा. ६ समाधान. ७ यादवांचा राजा. ८ इतर सैनिकांप्रमाणें मी त्याची सेवा करितों. ९ पाणी. १० मी जरी कमी आहें. ११ जो अत्यंत दरिद्री त्याला कांजी सुद्धां मिळत नाहीं त्याला जर अमृत मिळालें तर तो तें सोडील काय ? तसी मी उणी असतां तुझी प्राप्ति झाली तर तुला सोडूं काय ? १२ प्रभुश्रेष्ठा. १३ धर्म, अर्थ काम आणि मोक्ष असा चतुर्विध पुरुषार्थ. १४ वाईट बुद्धि. १५ काम्य कर्मे. १६ संत

तूं स्वामि ते सेवक सत्क्रियांसी, संबंध ऐसा उचित प्रियांसी ॥८३॥
मिथुनसुखरतातें तूंचि आनंद साचा
मृगें मृगजळिं मानी स्वाद सत्या रसाचा ।
पिउनि सलिल मूढ ध्याति मिथ्याच पाणी
गृहसुख[2]निरतातें दूरि तूं चक्रपाणी ॥ ८४ ॥
ह्मणुनि टाकुनि सर्व यदूत्तमा, भजति नीचपणें तुज उत्तमा ।
उचित अर्पियली तनु[3] हे तुतें, जन्हि उणी वरिलें सुखहेतुतें ॥ ८५ ॥
आतां स्वयें न वदिजे मज निर्विकारी[4], कीं श्लाघ्य मानिति मला जन जे भिकारी
ते तों यती त्यजिति राज्य समग्र सारें, भक्षुनि भैक्ष्य[6] चरितें तुझिं गाति सारें ८६
राज्यादिकें टाकुनि निर्विकारी, त्वदर्थ होताति असे भिकारी ।
राज्यांत दुःखें सुख तूजमाजी, ह्मणुनि तूं श्लाघ्य तयांसमाजीं[7] ॥ ८७ ॥
निष्काम काय वरिला पति निर्विकारी, कीं श्लाघ्य मानिति जया जनहो भिकारी
तूझें सुजाणपण याकरितां बुडालें, जें दुरदृष्टिपण नें ह्मणसी उडालें ॥८८॥
आणीक आपण वृथा गुणहीन साचा, तो वाटला तुज कसा प्रिय मानसांचा ।
नेणोनि हें मजचि ते उचलोनि घाली, माळा न दृष्टि तिचि दूरपथीं[12] निघाली
वदसि ये रिति तूं यदुनायका, परिसें[13] तेविषयीं सुखदायका ।
अजि वृथा ह्मणणें न करीं क्रिया, सहज ज्यास न इंद्रियविक्रिया ॥ ९०॥
जरी तूं न होसी हर्षीकादि[14] सेना, तयां तुजवांचूनी कांहीं दिसेना ।
वृथा ज्याविना इंद्रियादीक सारे, प्रिया आत्मया व्यर्थ होसी कसा रे ॥९१॥
स्फुरसि आत्मपणेंचि निरंजना[15], परम तो प्रिय तूं सकळां जना ।
तुज[16]निमित्त समस्तहि आवडी, जन यदर्थ धनादिक सांवडी[17] ॥ ९२ ॥

---

१ हरिण मृगजळास पाहून उदकाचा स्वाद सत्य मानतो तसा नर प्रपंचांत सुखाचा स्वाद सत्य मानितो. २ प्रपंचसुखांत निमग्न झालेल्यास. ३ शरीर. ४ विकाररहित जो तूं त्यानें ' मला भिकारी लोक मात्र मान देतात ' असें जें ह्मटलें तें ह्मणू नयेस; कारण ते लोक ह्मणजे राज्याचे अधिकारी असून तुझी सेवा घडा-वी ह्मणून आत्मसंयमनानें त्यांनीं आपल्या राज्याचा त्याग केला आहे. ५ इंद्रिय-दमनांत निपुण. ६ भिक्षान्न. ७ त्या अकिंचन लोकांत. ८ निष्काम आणि निर्वि-कारी असा. ९ श्लोक. (२१) यांत जें ह्मटलेंस तें. १० मन. ११ माळ घाली ह्म० पति वरी. १२ दूरवर दृष्टि गेली नाहीं. १३ ऐक. १४ विषयी इंद्रियादिकांची. १५ विकाररहिता. १६ मनुष्यास धनादिकांची आवड आत्म्याकरितां आणि तो आ-त्मा तर तूंच आहेस. १७ जमा करी.

विषयभोग जयाप्रति विंबतो, तंव चिदंश जळीं प्रतिबिंब तो ।
तुज भजेल तयीं परमा गती, ह्मणुनी संत तुतें गति मागती ॥ ९३ ॥

निरसुनि भजत्याच्या[1] सर्वथा मीपणातें
परमकरुण ऐक्यें देसि तूं आपणातें ।
ह्मणुनि भजति तूतें टाकुनी पुत्र दारा[2]
कळेत[3] वरियलें म्यां तुज ऐशा उदारा ॥ ९४ ॥

नव्हे नेणवी जी नव्हे अल्पदृष्टी, नव्हे दोन्हिही माझिया जी अदृष्टीं[4] ।
बहू दूरि आणीकही बुद्धि जाते, निवेदीतसें नाथपादांबुजातें[5] ॥ ९५ ॥

तुझ्या भीवयांपासुनी काळ जाला, तया पाहतां कांप[6] ये काळें जाला[7] ।
शरीरें पदें ब्रह्मपर्यंत नाना, गिळी काय पां[8] राजयांच्या तनाना ॥ ९६ ॥

टाकूनि सर्व तुज दीर्घतरा[9] विचारें, म्यां ये रिती वरियलें न कुबुद्धिचारें ।
अज्ञान आणि अविचार अदीर्घदृष्टी[10], तूझें पद स्मरति त्यांस नसे अदृष्टीं[11] ९७

वाक्यांत या भाव तुझा असाच, कीं अर्थ दूजा अजि होय साच ।
स्थापेल अज्ञानचि तूजमाजी, तें आयकावें करुनी क्षमा जी ॥ ९८ ॥

शार्ङ्गस्वनेंचि[12] पळवूनि नृपाधमांतें[13], सिंहें मृगांतुनि जसें हरिलेंचि मातें ।
तो सागरीं भिउनि त्यांसि ह्मणे दडाला[14], जो हें वदेल मतिमंद ह्मणों जडाला ॥

आणीक एक मन शब्द तुझा न सोसी[15], सक्रोध उत्तर वदेन असी असोसी[16] ।
कीं लोकरीतिरहिता वरितील मातें, त्या[17] पावतील बहुतेक बहुभ्रमातें ॥ १०० ॥

आईक जी जलधिकंकण[18] ज्या क्षितीचें, एकाधिपत्य[19] निरुपद्रव दक्ष तीचें ।
टाकूनिही भ्रमति काय अजी वनांतें, जाऊनि सेविति तुतें जगजीवनातें १०१

आणीक एक मज जें अजि बोललासी, चित्तास तो बहु सखोल कुबोल[20] लासी[21] ।
कीं क्षत्रियर्षभ[22] वरीं अझुनी भलागे, आत्मानुरूप तुज ज्यावरि लोभें[23] लागे ॥ २

तूझें कथामृत रिघेल जिच्या सुकर्णीं[24], जें वर्णिलें अजि शुकादिपिकांशुकांनीं[25] ॥
ते तुज टाकुनि वरील न नश्वरांतें[26], मीं[27] तों तुझीच वरिलें तुज ईश्वरा[illegible]

---

१ भक्ताच्या. २ स्त्री. ३ हें जाणूनच. ४ माझी दृष्टि अजाण नव्हे व अल्पही नव्हे. ५ तुझ्या चरणकमलास. ६ कंप. ७ हरयाला. ८ संबोधनार्थ अव्यय. ९ अत्यंत मोठ्या विचारानें. १० लहान दृष्टि. ११ दैवांत. १२ शार्ङ्गधनुष्याच्या टणत्कारानें. १३ नीच अशा राजांस. १४ लपला. १५ सहन करीना. १६ इच्छा. १७ श्लोक (९८) यांत म्हटलें तें. १८ समुद्र आहे कंकण म्हणजे वेष्टण ज्या पृथ्वीचें. १९ सार्वभौमत्व. २० कुत्सित भाषण. २१ जाळी. २२ क्षत्रियश्रेष्ठ. २३ आवड. २४ उत्तम कर्णांत. २५ शुकाचार्यादि हेच कोकिळ व पोपट ह्यांनीं. २६ नाशिवंतातें. २७ "मी तों तुतेंच वरिलें जगदीश्वरातें" असाही पाठ आहे.

मरणशील असे जरि कामिनी, तुझि कथा परिसे दिनयामिनी।
त्यजुनि तूज अशास वरी न ते, तुझिच मी तरि काय वरीन ते ॥४॥
अंज परम अनादी श्री तदंगें अनादी
अज सकळ जनादी श्री तदंगें जनादी।
निगम वदति ऐसें सर्वही त्यावरूनी
तुज निज अनुरूपा धन्य झालें वरूनी ॥ १०५ ॥
इह परत्र तुवां निजकामना, पुरवितां स्मृति कुत्सित कां मना।
उभय सौख्य तुझ्या पदपंकजीं, बुडविणारचि आणिक पंकिं जी॥६॥
आत्मानुरूप वरिलेंचि जरी मला गे, तूझें मज प्रिय न रूप न नाम लागे।
यालागिं जाइं ह्मणतों ह्मणसी वराया, रायांस यांत तरि आइक देवराया ७
तुज नव्हे किमपि प्रिय हें खरें, जरि असे त्यजिलें सुरशेखरें।
चरण होते तुझे मजला गती, शरण त्यां प्रिय जे मज लागती ॥१०८॥
स्वशरणावरि तूं प्रियचि प्रियां, वचनमाळ तथापिहि अप्रिया।
भय करी तरि हो मजला गती, पद तुझे प्रिय जे मज लागती॥१०९॥
भजति त्यांस अनुग्रह तूं करीं, करिसि जी गुण हा भय हें हरीं।
शरण मी ह्मणवूनि तुझ्या पदा, हरित ते भवसंकट आपदा ॥ ११०॥
अनंतही भवसिंधु जसा खरा, न भजतां तुज जी सुरशेखरा।
शरण मी जरि ये न विनोद हा, करिल ये घाडि शून्य दिशा दहा११॥
आतां हरी नृपति जे मज बोललासी, ते तीस होत पति जे अतिदुष्ट लोंसी।
कानीं जिच्या तुझि कथा न पडे कदापी, दुःखी जितांच मरतां यमलोक दापी।
तुझ्या कथा मृडविरिंचिसभेस देवीं, सन्मानयुक्त धरिजोनि मनीं सदैवीं।
कानीं जिच्या पडति त्या जगदेकसारा, ओपील ते परिसतां नृपलोक सारा१३
स्त्रियांचे ते देवा नृपति खर कीं बैल कुतरे

१ रात्रंदिवस. २ मी तुझीच असतांना ते ह्म० अन्य राजे वरीन काय? ३ जन्मरहित असा तूं अनादि आहेस ह्मणून तुझ्यामुळें श्रीरूप जी मी तीही अनादि आहें. ४ सर्व जनांचें मूळ. ५ वेद. ६ मजयोग्य. ७ इहलोकीं. ८ पादकमलाचे ठिकाणीं. ९ चिखलीं. १० तूं मला प्रिय नाहींस ह्मणून जा असें जर ह्मणशील तर. ११ ईश्वरानें. १२ होवोत. १३ हे प्रिया तूं शरणागतांवर नेहमीं संतुष्टच आहेस. १४ कृपा. १५ खोटा असून. १६ लांडगी. १७ ती जिवंत असतांना दुःखी होईल व मरतांना यमाची जाचणी होईल. १८ मृड ह्म० शंकर, विरंचि ह्म० ब्रह्मदेव. १९ देवांनीं. २० सर्व जगाचा सारभूत असा तूं. २१ सर्व राजांस टाकून देईल. २२ गर्दभ.

अहा कोण्ही बोके वधिति धनराज्यार्थ सुत रे ।
नवोढेच्या लाता खरपुरुष सोसूनि रमती
वृष स्कंधीं घेती श्वनरं अवमानार्ह कुमती ॥११४॥

श्री जों असे ते क्षितिपाळ वर्णी, कंटाळली तप्तसुवर्णवर्णी ।
ओंकारवाणा मुखभाव दावी, जे जे वदे गोष्टिहि ते वदावी ॥ ११५॥
करुनि अंगुलिभंग रमाधवा, म्हणतसे नृप ते अजि माधवा ।
शव जितेच अशांस रमापती, बहुत ओंगळ त्या म्हणती पती ॥११६॥
श्मश्रु रोम नख केश कातडीं, आंत मांस कफ पित्त आंतडीं ।
मूत्र शेंबुड मळादि वाहती, त्यांसि सुंदरपणेंचि पाहती ॥११७॥

मृगजळ पुरुषाचा देह नानाविकारी
रविकिरसम त्यांत श्रीपती या प्रकारीं ।
कुलवधु जरि पातिव्रत्यमार्गेचि पाहे
भवजलधि तरे ते सर्व तूझी कृपा हे ॥११८॥

तुझ्या पदाब्जमकरंद कथारसाचा, हुंगेल जे तिसचि हा सुविचार साचा ।
ठायीं पडे जग भजे अजि त्या पतीतें, मी भोगितें तुज तयाच रमापतीतें ११९
सुधा मानुनीयां पितो एक कांजी, सुधापानकर्त्ता शिवे तीस कां जी ।
तसी टाकुनी मी जगन्मंगलाला, नृपांला तयां कां भजों ओंगळांला ॥१२०॥
हीं उत्तरें सकळ युक्तचि जेंवि झालीं, दुःखें भडाग्निसम तीं अवघीं विझालीं
तो मी उदास म्हणवूनि अगाधवाचा, आणी स्मृतीस मन तो मधु माधवाचा॥
या गोष्टिनें सर्वहि तें उडालें, चिंतार्णवीं चित्त महा बुडालें ।
तो भूमि देखे शरणागतीची, ध्यानीं हरीच्या करुणागतीची ॥ १२२ ॥
एकाविणें इतर रक्षक सीन वाटे, ये तेधवांच शरणागति नीट वाटे ।
ऐसी अनन्यगुरुभक्ति उपासना ही, दे कृष्ण त्यासिच घडे इतरासि नाहीं१२३

१ मुलगा. २ नवरी. ३ केवळ गर्दभ असे लोक. ४ कुत्र्यासारखे पुरुष. ५ तप्त झालेल्या सुवर्णासारखी लाल झाली. ६ अमंगळवाणा. ७ बोटें मोडुन. ८ लक्ष्मीपति जो कृष्ण त्यास. ९ जिवंत असुन ते प्रेताप्रमाणें होत. १० अमंगळ स्त्रिया. ११ सूर्य किरणांप्रमाणें. १२ दुसरा पाठ असा आहे "तूझा पदाब्जमकरंद कथार्थ सारा, हुंगेल जे तिसिच तत्त्वविचार सारा." १३ अमृत. १४ पेज. १५ कांजीस. १६ जगाचें कल्याण करणारास. १७ अमंगळांस. १८ जेव्हां. १९ "आणी स्मृतीस गुण तो प्रभु माधवाचा" असाही पाठ आहे. २० लहान.

दाता सुरद्रुम न मागतियास नाहीं, न प्रार्थितां हरि न दे स्वउपासनाही ।
ते दीधल्यावरि जरी बहु तो उदास, प्रेमेंच रक्षित असे शरण स्वदास २४
जे आवडी त्यजुनियां पदसंपदांची, प्रीतीच मागति सदा हरिच्या पदांची ।
त्यांस दे सुरतरू मग ते स्वदास,स्वामी न सोडिच कदापि जरी उदास२५
हा उदास परि याचि उपायीं, लभ्य यास्तव शिरं प्रियपायीं ।
ठेवुनी ह्मणतसे मृदुवाणी, प्रीति दे न करितां आजि वाणी ॥ १२६ ॥
दे प्रेम याच तुझिया चरणांबुजांचें,माथां सदाशिव धरी शिव अंबु ज्याचें ।
कीं तूं उदास सहवास तुझा कराया, आणीक यत्न न दिसे जगदेकराया२७
कांता जनास सकळाहुनि थोर वाटे, तूं तों न चालसि असे रिति चोरवाटे ।
यालागिं आवडि पदीं स्वसुरद्रुमातें,जी मागणें इतर यत्न दिसे न मातें २८
मातें गुणप्रकृतितें जगदेकराया, तूं पाहतोसि जनबुद्धिस जें कराया ।
लोहा जडा चलन चुंबकसन्निधानें,आतां तसेंचि करणें करुणानिधानें ॥१२९
प्रत्युत्तरें हरिस संमत हें वदोनी, दे उत्तरें कथितसे निजभाव दोनी ।
न स्वानुरूप वरिला नृप कां भला गे,आतां तरी वरिं जयावरि लोभ लागे ३०
अशाहि स्त्रिया देखती वर्तमानीं, ह्मणोनी तुझी गोष्टि मी साच मानी ।
मनीं एक एकीस जें गोड वाटे, तिला अन्य नेऊनि ने अन्य वाटे ॥१३१॥
देखोनि अंबा जशि शाल्वराया, झाली मनीं सिद्ध तया वराया ।
भावानिमित्तें हरि भीष्म तीतें, आणीक दोघी बहिणींसि तीतें ॥१३२॥

---

१ कल्पतरु दाता खरा, परंतु मागीतल्यावांचुन कांहींएक देत नाहीं; तसा हरि प्रार्थिल्यावांचुन उपासना भक्ति देत नाहीं. २ प्राप्त होण्यास योग्य. ३ मस्तक. ४ कमताई. ५ चरणकमलाचें. ६ कल्याणकारक. ७ पादोदक; तीर्थ. ८ कांता थोर वाटते ज्या वाटेनें ती चोरवाट. ९ जड जें लोखंड त्यास लोहचुंबकानें चलन येतें. १० लोहचुंबक. ११ करुणेचा ठेवा जो तूं त्यानें. १२ काशी-राजाची वडील मुलगी अंबा हिला व तिच्या दोघी बहिणी अंबिका आणि अंबा-लिका यांना भीष्मानें आपला सापत्न बंधु विचित्रवीर्य याच्यासाठीं स्वयंवरांत जिंकून आणिलें;परंतु अंबा हिणें सांगितलें कीं मीं मनानें शाल्वराजास वरिलें आहे ह्मणून मी विचित्रवीर्यास वरीत नाहीं. तेव्हां तिला भीष्मानें सोडून दिलें व तिच्या दोघी बहिणींशीं विचित्रवीर्याचें लग्न लाविलें. पुढें अंबा शाल्व राजाकडे आली, पण तो तिचा स्वीकार करीना ह्मणून ती पुनः भीष्माकडे आली. भीष्मानें हाकून दिल्या-मुळें ती अरण्यांत गेली. मग तिच्या आजानें तिला परशुरामाकडे नेलें. त्यानंतर भीष्मास मारण्याकरितां तिनें शिवाची प्रार्थना केली, तेव्हां तीच मरून पुढें शिखंडी झाली. १३ विचित्रवीर्याकरितां. १४ अंबिका आणि अंबालिका.

शाल्वास देखोनि मनोभवार्ता, भीष्में असी आइकतांचि वार्ता ।
तें त्यागिली सांप्रत वर्त्तमानीं, स्त्रिया अशाही मनिं साच मानीं ॥ ३३ ॥
होऊनिही अजि विवाह नवा मनोतें, स्त्री पुंश्चली सरस देखुनि मानवातें ।
चिंती मनीं कुनर संग करी तियेतें, त्यागी भला पतन जीस्तव यास येतें ३४
स्त्रिया दुष्ट कर्में असींही करीती, ह्मणोनि प्रसंगें असी लोकरीती ।
हरी बोलसी जाणसी पूर्ण मातें, वदों कायसी साक्षि सर्वांसमातें ॥ ३५ ॥
धरूनियां श्रीपतिपादपद्मा, हे बोलिली बोल सखोल पद्मा ।
यालागुनी तीस वदे हरी तो, जो दुःख तीचें अवघें हरीतो ॥ ३६ ॥

भलि भलि अमृताचे घोट हे आयकाया
बहुत बहुत होती हे तृषायुक्त काया ।
ह्मणवुनि रचिला हो क्षोभ या मानसाचा
परि वदसि मुखें हा भाव माझाचि साचा ॥ ३७ ॥

प्रसन्न मी नित्यचि तूजलागे, घे तो जरी जो वर तूजलागे ।
परंतु तूतें दिधली स्वकाया, जे देतसे सर्व वरादिकां या ॥ ३८ ॥
जें भाग्य वांछिति विरिंचिशतक्रतूतें, तें मागती सकळही विधि शक्र तूतें ।
एकांत भक्ति हृदयावरि वास तीतें, मोक्षादि सर्व सुख सिद्ध सदा सतीतें ३९
सदा चित्तसमुद्रैक्यविद्यानदी जे, नवें काय आतां तिला ज्ञान दीजे ।
स्वतां त्यास जो मीपणा क्षिप्रसंगें, चढे तो तुवां नासिला या प्रसंगें ॥ ४० ॥
अहंपणा त्यागुनि तीव्रतत्त्वा, झोंबे पुन्हा प्रेम पतिव्रतत्त्वा ।
साध्वी अशा दाखविलें मतीतें, देखोन मी मानवलोंच तीतें ॥ ४१ ॥
वाईट ऐसें तुज बोलिलों कीं, तें आइके जे ललना नृलोकीं ।

---

१ मदनानें पीडित. २ अंबा. ३ हल्ली सुद्धां. ४ समज; मान. ५ नवाच अशा पुरुषाचा अभिलाष करते. ६ जारिणी स्त्री. ७ वाईट पुरुष मात्र तिचा संग करितो, परंतु भला मनुष्य तिचा त्याग करतो, कारण तिच्या संगतीनें त्याचें पतन होतें ह्म० त्यास अधःपात होतो. ८ कधीं कधीं स्त्रिया असें करितात ह्मणून तूं मला असें बोललास, पण तूं मला पूर्णपणें ओळखतो आहेस; कारण तूं सर्वसाक्षी आहेस. ९ सर्वद्रष्टा. १० कृष्णाचे पादकमल. ११ गूढ. १२ लक्ष्मी ह्मणजे रुक्मिणी. १३ माझ्या देहास ही अमृतवाणी ऐकण्याची फार इच्छा होती. १४ ह्मणून मी तुझ्या मनास खवळून राग आणविला. १५ जे माझी काया सर्व वरांस देणारी. १६ ब्रह्मदेव आणि इन्द्र यांणीं वांछिलेलें. १७ इंद्र. १८ रुक्मिणीस. १९ ज्ञानसमुद्रास मिळणारी विद्यारूप नदी. २० भाव. २१ संतुष्ट झालों. २२ जी स्त्री तें ऐकेल. २३ मृत्युलोकीं.

मानींच ते निश्चय दुष्ट मातें, न तूं तसें भाविसि उत्तमातें ॥ ४२ ॥
न अधमासम वो मज मानिलें, जरि बहू तुज म्यां अपमानिलें ।
ह्मणुनि नासुनि नूतन मीपणा, स्थितिहि पूर्विल साधिलि आपणा ॥४३॥
किमपिही नलगे मज वेगळें, ह्मणुनि साधिसि सर्वहि मंगळें ।
मज भजोनिहि ज्यांस मनीं असे, विषयभोगचि आइक ते असे ॥४४॥
ज्या संपदा करिति बंधन दंपतीतें, त्या मागती मजहि मुक्तिचियां पतीतें ।
स्वब्रह्मचर्य तप वेंचिति जे सकामी, ऐशांस हो सुलभ होइन त्यांस कां मी
भोग सर्व घडती पशुदेहीं, त्या तनू नरक शास्त्र वदेही ।
मुक्तिच्या पतिस त्या विषयांतें, मागती न समजे विष यातें ॥ ४६ ॥
सेवून याही पुरुषोत्तमातें, अभाग्य जे मागति भोग मातें ।
परंतु हा शब्द न तूज लागे, कीं एक मीच प्रिय तूजला गे॥ ४७ ॥
घरधणिनि तुवां हे थोर भाग्येंचि वृत्ती
धरियलि चरणीं या जे निवृत्ति प्रवृत्ती ।
खळ जन न कधींही या सुबुद्धीस लाहे
कपटचि मिरवी स्त्री गोष्टि कैंची तिला हे ॥ ४८ ॥
ह्मणुनि तुजसमानचि कामिनी, जरि तयांत वसे दिनयामिनी ।
तरिच त्यास तुझा महिमा नसे, परिसें आणिक निर्मळमानसे ॥४९॥
जे पावले स्वनगरा नृपती विवाहीं, ते मानले मग मृगांबुनदीप्रवाहीं ।
माझ्या कथा परिसतां मज देवराया, केला तुवां परम यत्न अवो वराया ।
लिखित देउनियां द्विजसत्तमा, निजरहस्य मला पुरुषोत्तमा ।
लिहुनि धाडियलें असि दूसरी, कवण ईसि घडेल तुझी सरी" ॥ ५१॥
हेंही असो झगडियांत तुझ्या स्वभावा, म्यां जिंकिलें भगिनिवत्सलसुस्वभावा ।
केलें विरूप परि लेश तुवां न मातें, वाईट वो गणियलें पुरुषोत्तमातें ॥५२॥
हहीं असो न वरणें वर आपणातें, कोणी दुजा ह्मणुनियां करुनी पणातें ।

---

१ मला. २ तुला मजवांचून कांहींच नकोसें आहे ह्मणून तुला सर्व मंगलें साध्य झालीं. ३ स्त्रीपुरुषांस. ४ मुक्तीचा स्वामी ह्म० मुक्ति देणारा. ५ फलांची इच्छा धरून सेवा करणारे. ६ ज्या तनूंत भोग घडतात त्या तनू नरक होत असें शास्त्रमत आहे. ७ मुक्ति देणारा जो मी त्यास. ८ माझी सेवा करून जे लोक भोग मागतात ते अभाग्य ह्म० हतभाग्य. ९वागणूक; वर्तन. १० पार्वे. ११ स्त्री.१२ रात्रंदिवस. १३ ऐक.१४ स्वच्छ अंतःकरण जीचें, असे. १५ मृगजल.१६ पत्रिका. १७ मनांतील गुप्त गोष्ट. १८ बरोबरी. १९ युद्धांत.२० बहिणीवर प्रीति करणारा. २१ एक मिशी व दाढी काढून विरूप केलें. २२ थोडें सुद्धां.

केला विलंब जरि म्यां तरि नेम काय, पत्रांत या लिहियला स्मर हेमकाये ९३
ज्याच्या पदांबुजरजें शिव मज्जनातें, इच्छीतसे प्रिय समस्तहि सज्जनातें ।
जो तूं प्रसाद न तुझा जरि आज लाहें, जन्में शतांत मरणें करणें मला हें ९४
गोष्टीस या प्रत्युपकार कांहीं, दिसे न आह्मां जगकारकांही ।
उत्तीर्ण देऊनिहि आपणातें, नव्हें तुझ्या शुद्ध भलेपणातें ॥ ९५ ॥
हा भाव माझा सकळां कळाया, बोलोनियां दावितसें कळा या ।
धरीं तुझा प्रत्युपकार कांहीं, आह्मां दिसेना जगकारकां ही ॥ ९६ ॥
नृपासि बोले शुक विप्रसंगें, कीं बोल ऐसे सुरतप्रसंगें ।
अनंगलीलेंतहि माधवाचे, सुशब्द ऐसे न अगाध वाचे ॥ ९७ ॥
आणनि कोपोपशमा रमा ते, दात्री रतिप्रेमहि मारमाते ।
स्वयें निजानंदहि लोकरीती, कर्मे करी जेंवि गृही करीती ॥ ९८ ॥
स्वरत नित्यविरक्तहि तो रमें, सह असा जगदीश्वर तो रमे ।
करि विलास घरोघरिंही हरी, चरित तें स्मरतां अशुभें हरी ॥ ९९ ॥

धरिति सुहृदयीं हा प्रेमसंवाद साधू
ह्मणउनि अभिधान ग्रंथही हेंचि साधू ।
गुणलव कथिले हे वामनें केशवाचे
धरुनि चरण चित्तीं श्रीहृषीकेशवाचे ॥ १६० ॥

॥ इति श्रीरुक्मिणीविलास संपूर्ण ॥

---

# भामाविलास.

( कथेचा सारांश. )

एकदां नारदमुनि द्वारकेंत आले होते, त्यांणी कृष्णास पारिजात नामक कल्पवृक्षाचें फुल दिलें; तें श्रीकृष्णानें रुक्मिणीस दिलें. हें वर्तमान सत्यभामेस कळतांच ती सापत्न मत्सरभावानें रुसून बसली; तिची कोणत्याही प्रकारें समजूत होईना. तेव्हां कृष्णानें तिला सांगितलें की, तुझ्या द्वारीं पारिजाताचा वृक्षच लावावयाचा

---

१ सुवर्णाप्रमाणें शरीर जिचें असे स्त्रिये. २ पायधूळ; ' यस्यांघ्रिपंकजरजःस्नपनं महन्त ' इत्यादि श्लोकांत लिहिलेलें स्मर. ३ स्नान. ४ भक्तांस. ५ शंभर जन्म घेऊन असीच तुझी प्राप्ति होईपर्यंत प्राण देईन. ६ जग उत्पन्न करणारा मी त्यास. ७ मी स्वदेह तुला अर्पण करूनही उतराई होत नाहीं. ८ परीक्षित राजास. ९ कोप शांत करून. १० मदनाची माता रुक्मिणी तीस. ११ गृहस्थ. १२ विरक्त असून. १३ रमेसह ह्म० रुक्मिणीबरोबर. १४ पातक.

होता ह्मणून पूर्वी रुक्मिणीस फूल देऊन तिची समजूत केली. असें बहुतप्रकारें तिचें सांत्वन करून त्याणें स्वतः तिची वेणी घालून अलंकार लेवविले. इतक्यांत इंद्रासहित देव भौमासुराचें गाऱ्हाणें घेऊन तेथें आले. तेव्हां भौमासुराचा वध स्त्रीचे हातून आहे हें भविष्य जाणून श्रीकृष्ण सत्यभामेस बरोबर घेऊन त्याचे नगरीवर चालून गेला; व त्याचा वध करून त्याणें हरून बंदीत टाकलेल्या सोळासहस्र राजकन्यांस सोडवून त्यांचें पाणिग्रहण करून मग सत्यभामेसह इंद्राकडे अमरावतीस गेला. तेथून परत येतांना नंदन वनांतील एक पारिजाताचा वृक्ष उपटून गरुडावर घालून परत द्वारकेस आला. ही कथा या प्रबंधांत वर्णिली आहे.

लता सत्या[1] अंकीं[2] खगगमनभक्ताऽमरतरू[3]
तरू[4] हातीं तो श्रीपति भवनदीपार[5] उतरू ।
धरी लक्षी पक्षी[6] करतलयुगीं पादयुगळा
गळां[7] रत्नें ध्यावा द्रुमगरुडसंयुक्त[8] सगळा ॥ १ ॥

खगेंद्रखांदा[9] सुरभूरुहातें,[10] हातें धरी पादसरोरुहातें[11] ।
त्याच्या स्मरा नासिल तो असत्या, सत्यापती[12] दाविल नित्य सत्या[13] ॥ २ ॥
श्रीकृष्णपादाद्भुतवारिजाती,[14] जाती भवार्णी सुखपार जाती ।
जाती उणे[15] त्यांसहि दे पदासी, दासीं[16] अशाच्या स्तविजे पदासी ॥ ३ ॥
ह्मणूनि गातों गुण माधवाचा, वाचाळ[17] मी भाट[18] रमाधवाचा[19] ।
वाचा प्रबंधं[20] प्रभुवैभवाचा, वाचा हरी तें[21] भ्रम या भवाचा ॥ ४ ॥
वदा नाम भामाविलास प्रबंधा, अविद्येचियें[22] जो हरी क्षिप्र[23] बंधा ।
हरी भा[24] प्रभा मा रमा सत्यभामा प्रकाशे न जे कां विनासत्य भामा ॥ ५ ॥

---

१ सत्यभामा; कृष्णास अमरतरु ह्मटलें ह्मणून सत्यभामेस लतेची उपमा दिली. २ मांडीवर. ३ खग ह्म० पक्षी अर्थात् गरुड त्यावर बसून जाणारा भक्तांचा अमरतरु ह्मणजे कल्पवृक्ष जो श्रीकृष्ण तो. ४ पारिजातक. ५ भवसमुद्र उतरून नेणारा नावाडी. ६ गरुड; ज्याचें पादयुगल गरुड तळहातावर धरतो व पाहतो. ७ ज्याच्या गळ्यांत कौस्तुभ आहे. ८ हातांत द्रुम ह्म० पारिजातवृक्ष आहे, गरुडावर बसला आहे, गळ्यांत कौस्तुभ मणि घातला आहे अशी सगळी मूर्ति ध्यानांत आणावी. ९ गरुड. १० कल्पवृक्ष. ११ पादकमल. १२ सत्यभामेचा पति, कृष्ण. १३ सत्यस्वरूपी जो परमात्मा त्यास. १४ श्रीकृष्णपाद हेंच कोणी अद्भुत वारिजात ह्म० कमळ. १५ हीनजातीसही. १६ दासांनीं. १७ बडबड करणारा. १८ स्तुतिपाठक. १९ लक्ष्मीपति जो कृष्ण त्याचा. २० प्रभूचें ज्यांत वैभव वर्णिलें आहे असें काव्य वाचा. २१ संसारभ्रमास हरण करितें. २२ मायेचें बंधन. २३ त्वरित. २४ हरी ह्म० भा ह्म० चित्स्वरूप प्रकाश आहे आणि मा ह्म० रमा किंवा शक्ति (माया) तीच सत्यभामा मिळून भामा शब्द.

कृष्णासि कृष्णपदभक्तिविशारदानें, जें स्वर्गपुष्प दिधलें मुनिनारदानें ।
तें रुक्मिणीप्रति दिलें त्रिजगन्निवासें, जें द्वारका करि सुगंध भरोनि वासें ६
असी गोष्टि दासीजनीं बायकांनीं, विचारूनियां सांगतां जाय कानीं ।
तयीं सत्यभामा महाक्रोध दावी, बुझावी हरी तेंचि लीला वदावी ॥ ७ ॥
गडवडां धरणीवरि लोळते, वदवती न कवीसहि लोळ ते ।
रडत मूर्छित होय घडी घडी, पवन निश्चळ नेत्र न ऊघडी ॥ ८ ॥
अलक स्रर गळांतिल तोडिते, कुरळ केश मुखावरि सोडिते ।
करयुगें उर मस्तक ताडिते, वसन आणिक कंचुकि फाडिते ॥ ९ ॥

महाउष्णश्वासें करुनि वदते शुष्कअधरा
धरापृष्ठीं जोडा न शठ दुसरा या गिरिधरा ।
धरायां माझा हा कर कपटि कैचा जनमला
मला जो निंदूनी कुसुम तिसें देऊनि रमला ॥ १० ॥

सख्याहो मेल्याही शिवहि न शिवो हे यदुपती
पती नानास्त्रींचा पतितें जनही ज्यासि जपती ।
नका येऊं देऊं सदनिं सवतीच्या प्रियकरा
करातें लावीना मज कपटि ऐसें तुह्मि करा ॥ ११ ॥

इत्यादि नानाविध भाव दावी, ते शोकवार्ता किति हो वदावी ।
कृष्णें समाधान विचित्र केलें, त्या वर्णनीं चित्त असे भुकेलें ॥१२॥

रडत रडत मूर्छेमाजि वृत्ती बुडाल्या
परम विकळ मी तूं या स्मृतीही उडाल्या ।

---

१ कृष्णपदाची भक्ति करण्यांत निपुण अशा नारदानें. २ पारिजात वृक्षाचें पुष्प. ३ तीन्ही जगांत वास ज्याचा अशा कृष्णानें. ४समजूत करी. ५ लोळणी. ६ वायु; श्वास. ७ केश व गळयांतील पुष्पांची माळ तोडूं लागली. ८दोन्ही हातांनीं. ९ नेसावयाचें वस्त्र. १० चोळी. ११ दीर्घ आणि उष्ण श्वासानें अधर शुष्क ह्म० कोरडे करून ह्मणते. १२ ओष्ठ. १३ ह्या भूतळावर कृष्णापेक्षां अधिक शठ दुसरा कोणी नसेल असें बोलत. १४ मोठाः " जोडा " असाही पाठ आहे; जोडा ह्म० बरोबरीचा. १५ लबाड. १६ गोवर्धनपर्वत धरणारा कृष्ण. १७ कर धरण्यास ह्म० पाणिग्रहण करण्यास. १८ जन्मला. १९ पुष्प. २० रुक्मिणीस. २१माझें प्रेत. २२ अनेक स्त्रियांचा पति. २३ पापीजन ज्याला जपतात. २४ सवत जी रु० क्मिणी तिच्यावर प्रेम करणारा. २५मला हात लावणार नाहीं अशी तजवीज करा. २६ अंतःकरणाचे व्यापार.

उचलुनि सखियांनीं मंचकीं दिव्य सेजे
निजविलि मृततुल्या सत्यभामा दिसे जे ॥ १३ ॥
ये अशांत सदनांत हरी तो, जो अनादि भवशोक हरीतो ।
किंकरी नमुनियां चरणातें, सांगती सकळ आचरणातें ॥ १४ ॥
सर्वज्ञ तीची समजोनि ठेवी[3], मौनेंचि नाकावरि बोट ठेवी ।
काढी उशी घालुनियां स्वमांडी, त्यानंतरें सांत्वनयत्न मांडी ॥१५॥
स्तनीं आननीं बिंदु जे काजळाचे, तिच्या लोचनींच्या सशोका जळांचे ।
पुशी हस्तपद्मेंचि आधीं हरी तो, जया पाणिनें सर्व आधी हरीतो ॥१६॥
ह्मणे शोक कां प्राप्त झाला महा हा, असी कष्टली कां शुभांगी अहाहा ।
न बोलेचि कां आमुची आजि राणी, जिच्या बोलण्याचीच आह्मां शिराणी॥
कस्तूरि आजि न दिसे वदनीं कपाळीं
हें निष्कलंकपण या द्विजलोकपाळीं ।
मुक्तां द्विजां त्यजुनि कां परि शोक पाळीं
कां क्रोध या शशिस त्यासि जसा कपाळीं ॥ १८ ॥
शोभा कलंक नसतां द्विजलोकपाळा, कस्तूरि हे द्विजमुखीं न दिसे कपाळा ।
हांस्यांत दीप्ति परि जों न दिसे द्विजांची, तों आननेंदु मम हृत्कमलासि जाची
इत्यादि सौंदर्य मुकुंद वर्णी, तें आइके तप्तसुवर्णवर्णी ।
तरी न पाहे मुख कृष्णजीचें, स्वमानभंगें मन उष्ण जीचें॥ २० ॥
जयीं श्रीवत्सांक प्रभु करि निजांकस्थिति शिरीं
शिरा नाडी प्राण प्रगटति न लावूनि उशिरा ।

---

१ पलंगावर. २ दासी. ३ स्वरूप. ४ समजूत करण्याचा यत्न करूं लागला. ५ मुखावर. ६ ज्या हातानें. ७ मानासिक व्यथा. ८ सुंदरी. ९ "आमुशीं" असाही पाठ आहे. आमुशीं, आह्मांस. १० कौतुक. ११ कस्तुरीतिलक. १२ "हे निष्कलंक करणी" असाही पाठ आहे. १३ 'द्विजराजः शशधरो नक्षत्रेशः क्षपाकरः' इत्यादि अमरकोशावरून चंद्रास 'द्विजराज' असें नांव आहे. त्यावरून द्विजपाळ किंवा द्विजलोकपाळ ह्मणजे चन्द्र असा अर्थ झाला. तो चंद्र अर्थात् तुझा मुखचंद्र कस्तुरीतिलक न लाविल्यामुळें निष्कलंक दिसतो. १४ उत्कृष्ट मोतीं. १५ द्विजलोकपाळ ह्म० चंद्र त्यास कलंकरूप शोभा नाहीं. १६ कस्तुरी दांतास लावलेली दिसते; कपाळास लावलेली दिसत नाहीं. १७ हांसताना दंतांचा प्रकाश पडत नाहीं ह्म० तूं हांसत नाहींस. १८ असा तुझा म्लान मुखचंद्र माझे हृत्कमलास दुःख देतो. १९ तप्त सोन्याप्रमाणें वर्ण जिचा. २० मानखंडना झाल्यामुळें. २१ संतप्त. २२ श्रीवत्स ह्म० भृगूच्या लातेचें चिन्ह धारण करणारा प्रभु. २३ तिच्या डोक्यास मांडीवर ठेवी तेव्हां. २४ नाडी प्राण पुनः परत आले.

शिराणी शब्दांची पुरवि तरि डोळे न उघडी
घडी जे मानाची विघडलि असे तोंवर घडी ॥ २१ ॥

बंजागीते जागी स्वमानें परि डोळे न उघडी
घडी एक क्रोधें मन बुडवि मानीं अवघडी ।
घडी पूर्व प्रेम स्थितिस बसतां तीस विघडी
घडी स्त्रीजातीची घडविलि असे ख्याति सुघडी ॥२२॥

जयां देती लाड प्रियपति तयांचाच ठकळा
कळा कांति भ्रांती धरुनि अति धीटाच सकळा ।
कळात्रे या लोकीं ह्मणुनि वदवी ते शशिकळा
कळा हे दावी कीं थट थट वदे क्रोधविकळा ॥ २३ ॥

सख्या दुःखी तुझ्या मजसहित कीं कान उगळे
गळे नेत्रीं पाणी न निघति मुखीं शब्द सगळे ।
किती मी प्रार्थीतों धरुनि शिर अंकाच उपरी
परी क्रोधाची हे अधिकचि दिसे अद्भुत परी ॥ २४ ॥
वदे भामा कोपें अति विकळ चावूनि अधरा
धरापृष्ठीं नाहीं टक तुज असा अंबुजधरा ।
धरावें या अंकीं शिर अजि तिचें पक्षिगमना
मना आलें देणें कुसुम जिस तें कंसदमना ॥ २५ ॥
तों नेत्र मोडुनि वदे ढकलूनि मांडी, भ्रूमंडळीं भ्रमण अंगुलिभंग मांडी ।
तों कृष्णजी करुनि हास्य ह्मणे अहाहा, वेडे अनर्थ इतक्यास्तव कां महा हा२६
अर्पितां मुनिवरें सुमनातें, वाटलें प्रथम हेंचि मनातें ।

---

१ आवड; कोतुक. २ मोडली. ३ जों मानाची घडी विघडली असे तोंवरी घडी (घटकाभर) डोळे न उघडी असा अन्वय. चतुर्थ चरणांत "असे" बद्दल 'बसे' असाही पाठ आहे. तेंथ, तोंवरि घडी (घटकाभर) कृष्ण बसे असा अन्वय. ४ कजाक स्त्री; "बजागीर्चा" असाही पाठ आहे. ५ एक घटका. ६ अवघड मानामध्यें मन बुडवी ह्म० अतिशय मान धरिला. ७ पूर्व प्रेमाची घडी मोडून टाकी. ८ स्त्री जातीची सुघडी (चांगली घडी) घडविली अशी ख्याति आहे असा अन्वय. "घट विधि असंख्यात उघडी" असा एक पाठ आहे. ९ पर्याय; रीति. १० निश्चेष्ट. ११ पृथ्वीचे पाठीवर. १२ कमल हातांत धारण करणारा. १३ गरुडगामिन्. १४ भुवया मोडून. १५ बोटें मोडून. १६ नारदानें.

कीं असा तरु पुरींत असावा, त्यांतही स्वसदनींच वसावा ॥ २७ ॥
तत्रापि जे प्रिय बहू स्वबंधूंचि माजी, तो स्थापणें तरु तिच्या सदनाचि माजी
ते तूं प्रिया तुजचि देइन त्या द्रुमातें, हें वाटलें प्रथम आणं तुझीच मातें २८
तुतें वृक्ष देणेंचि यालागिं आधीं, फुलें नासिला जो तिला होय आधी ।
न जाणोनि केले तुवां कष्ट भारी, समाधान ऐसें करी कैटभारी ॥२९॥
जे शब्द योजित असे मनिं पारिजातीं, जाती तिच्या हृदयसुंदरवारिजातीं ।
जातिस्वभाव तरि ये वदनांबुजातीं, जा तीस द्या तरुहि सेवित दैवजाती[10] ३०
मत्प्रीति तीवरि अगे जसि आरसाची, साची तुझी शपथ लोचनसारसाची ।
साची नसेल वरि त्यांतहि शब्द राणी, राणी वडील म्हणती तिस ते शिराणी
फूल देउनि तिला उतराई, होइं मी समज हे चतुराई ।
देतसें तरुचि तो तुजला गे, खेद हा न करणें तुज लागे ॥३२ ॥
हरी जाणे हें कीं न वदत असें क्रोधनिकरें[12]
करें[13] आलिंगावी प्रिय वदत हे त्यां प्रियकरें ।
करें श्रीचंद्राच्या कठिण शशिकांत[14] द्रवतसे
तसे हेही भाव प्रगट करणारी अमृतसे[15] ॥ ३३ ॥
करूनी अशा सत्य नेमास तीतें, बळें ओढुनी सत्यभामासतीतें ।
दिलें क्षेम त्या दुर्लभा माधवानें, चहूंही भुजीं सत्यभामाधवानें[16] ॥३४॥
असी ते बुझावूनि रंभोरु[18] हातें, तिच्या धूतसे हो मुखांभोरुहातें[19] ।
उटी लावुनी वाटिल्या केशरा जो, स्वहस्तांबुजीं[20] विंचरी केशराजी[21] ३५
पुढें राखडी गुच्छ[22] केशाऽग्रभागीं, मधें भूषणें अन्य त्यांच्या विभागीं ।
वरी शीसफूलाख्य सीतांशु[23] भागीं[24], द्विजें मोतियें[25] लेविलीं त्या शुभागीं[26] ३६

---

१ आपल्याच घरीं; स्वसदनीं या शब्दाची योजना ध्यानांत आणण्यासारखी आहे. यांत तूंच एकटी माझी खरी आवडती असें कृष्णानें दर्शविलें. २ संपूर्ण स्त्रियांमध्यें जी फारच प्रिय तिच्या. ३ वृक्षास. ४ शपथ. ५ मला. ६ मानसिक व्यथा; तुला वृक्ष द्यावयाचा आहे, पण तिला वाईट वाटेल म्हणून अगोदर तिला फूल देऊन तिचें तोंड बंद केलें. ७ हृदयकमलांत. ८ स्त्रीस्वभाव क्रौर्यत्वादि. ९ देवजातींनीं म्ह० देवांनीं सेविलेला असा पारिजात तरु. १० नेत्रकमलाची. ११ उत्तीर्ण. १२ क्रोधावेशानें. १३ किरणांनीं. १४ चंद्रकांतमणि कठीण आहे तरी चंद्राच्या किरणांनीं द्रवतो; तशी ही आलिंगन दिलें असतां द्रवेल खचीत. १५ अमृतासारखे गोड भाव. १६ सत्यभामापतीनें. १७ समजावून. १८ केळीप्रमाणें शोभायमान मांड्या जिच्या. १९ मुखकमलास. २० आपल्या हस्तकमलानें. २१ केशसमुदाय. २२ गोंडे. २३ चंद्रकोर. २४ भांगामध्यें. २५ उत्कृष्ट मोत्यें. २६ मस्तकावर.

मुक्तां द्विजांची नवसिंधुजाची, ज्याची चमू मौक्तिकसिंधुज्याची ।
ज्याची प्रभा क्षीरसमुद्रजातें, त्यातें धरी कृष्ण करांबुजातें ॥ ३७ ॥

करि हरि यमुना हो मूद गंगावनाची
मिरवि धवल पुष्पीं दीप्ति गंगौवनाची ।
सित असित नद्यांच्या संगमीं श्रीत्रिवेणी
तसिच यदुपतीनें घातली चित्र वेणी ॥ ३८ ॥

पतीनें अलंकारितां फार साजे, सखीचे करीं पाहते आरसा जे ।
गमे कीं स्वसौंदर्यसीमा न साहे, प्रियप्रीतिनें वाढवी मानसा हे ॥३९
मुखेंदु शोभे बहु भामिनीचा, नीचा दिसे हा पति यामिनीचा ।
नक्षत्रसेना जसि सिंधुजांची, याची चमू मौक्तिकसिंधुजांची ॥४०॥
बोले सखीवृंद उभा तसाची, साची प्रिया हे पतिमानसाची ।
ह्मणोनि शोभे बहु सत्यभामा, भामापती प्रीतिच सत्य भामा ॥ ४१ ॥
अलंकारितां ये रिती जो हरी तो, अनेकांपरी शोक तीचा हरीतो ।
प्रसंगांत त्या वृंद आले सुरांचे, तिहीं वर्णिले त्रास भौमासुराचे ॥४२॥
आयके वळ हरी नरकाचें, बीज जो परिहरी नरकाचें ।
भीत देखुनि सुरां शरणांतें, नेमिलें असुरनाशरणातें ॥ ४३ ॥
तों दाखवी म्लानमुखांबुजातें, श्रीसत्यभामा न सुखांबु ज्यातें ।
ह्मणूनियां युद्धविलास तीतें, दावी सवें नेउनियां सतीतें ॥ ४४ ॥
या दुःखितांची न हरूनि आधी, स्त्रीकाम कर्त्तव्य अयुक्त आधीं ।
देवार्थ जाऊं तरि हे वंजागी, मूर्च्छेसि जातां करि कोण जागी ॥४५॥

---

१ समुद्रांत उत्पन्न झालेली नवीं मोत्यें. २ चंद्रास. ३ वेणींत शुभ्र पुष्प घातलें त्यास गंगाप्रवाहाची शोभा आली. ४ गंगावनाची. ५ सित ह्म० शुभ्र आणि असित ह्म० कृष्ण, सित असित नद्या ह्म० गंगा यमुना. ६ गंगा यमुना व सरस्वती यांचा संगम. ७ शोभती झाली. ८ दर्पण. ९ सत्यभामा. १० मुखचंद्र. ११ सत्यभामेचा. १२ कमी; उणा १३ रात्रीचा पति चंद्र. १४ सिंधुज ह्म० सागराचा पुत्र जो चंद्र त्याची सेना जशी नक्षत्रगण तशी तिच्या मुखचंद्राची सेना सागरापासून झालेल्या मोत्यांची होय. १५ सागरापासून झालेलीं. १६ सख्यांचा समुदाय. १७ पतीचे मनास खरी आवडणारी. १८ स्त्री. १९ देवांचे समुदाय. २० भौमासुरापासून आह्मांस दुःखें होतात असें सांगीतलें. २१ नरकासुर तोच भौमासुर त्याचें. २२ भ्यालेले. २३ असुर जो भौमासुर त्याच्या नाशाकरितां रणाची ह्म० युद्धाची तयारी केली. २४ कोमेजलेलें. २५ सुखरूप उदकाचा येव; सुखाचा लेश. २६ बरोबर. २७ मनोव्यथा. २८ अयोग्य. २९ हरि. ३० सावध.

दोहीं परी संकट हें हरी तो, संगें तिला नेउनि जो हरीतो ।
ह्मणे खळा मारिन याच वाटे, आणूं तरू कीं सुख ईस वाटे ॥ ४६॥
होती अधिष्ठूनि जशीच मांडी, तसी सवें नेउनि युद्ध मांडी ।
वधूनि भौमासुर पारिजाता, आणी नमो तत्पदवारिजाता ॥ ४७ ॥
प्रकाशतो देऊनि सत्य भामा, तों तोचि तेथें आजि सत्यभामा ।
वाच्यांश तो तो हरि वामनाचा, आत्मा ठसा हा बरवा मनाचा ४८
भा ते प्रभा केवळ चित्स्वरूपें, मा शक्ति शुक्तीवरि जेविं रूपें ।
भामाविलास प्रभु नाम याचें, ठेवी असें कृष्ण अनामयाचें ॥ ४९ ॥
इति श्रीभामाविलास समाप्त ।

# मुकुंदविलास.

( कथेचा सारांश. )

एके दिवसीं श्रीकृष्ण द्वारकेंत यादवांची सभा करून बसले असतां जरासंधानें जे वीससहस्र राजे बंदींत टाकले होते त्यांच्याकडुन 'तुमचा पूर्ववैरी जरासंध यास शिक्षा करून आह्मांस मुक्त करावें' असा निरोप घेऊन एक दूत आला. इतक्यांत नारदमुनीही धर्मराजाच्या राजसूय यज्ञास बोलावणें करण्याकरितां तेथें आले. सभेंत या गोष्टींचा विचार होऊं लागला. यादवांचें ह्मणणें, जरासंध आमचा पूर्ववैरी आहे, त्यास आह्मी स्वहस्तें मारून यश मिळवूं. नारदाचें ह्मणणें कीं पांडवांचे हातून जरासंधास मारून त्यांचा राजसूय यज्ञ शेवटास न्यावा, व स्वभक्त जो धर्म त्यास साम्राज्य दिल्याचें यश कृष्णानें घ्यावें. मग सर्वनीतिज्ञ उद्धव याचा विचार घेतां त्याचें ह्मणणें सर्वांस मान्य झालें. तो ह्मणाला–जरासंधास युद्धांत जिकणें अशक्य आहे. त्याच्या शरीराचे जे दोन सांधे जोडलेले आहेत ते वेगळे केले ह्मणजे त्यास मृत्यु आहे; एरवीं नाहीं. त्याशीं द्वंद्वयुद्ध करणारा कोणी समबळ पाहिजे. याकरितां त्यास फसवुन विप्रवेषानें युद्धभिक्षा मागुन भीमाकडुन त्यास द्वंद्वयुद्धांत मारवावें. याप्रमाणें बेत ठरल्यावर श्रीकृष्ण ससैन्य धर्माकडे इंद्रप्रस्थास गेले. तेथून भीमसेन व अर्जुन या दोघांस बरोबर घेऊन जरासंधाचे नगरास जाऊन द्वंद्वयुद्धांत जरासंधास मारवुन त्याचे पुत्रास गादीवर बसविलें; आणि सर्व राजांस बंदींतून सोडवून त्यांस त्यांचें राज्य परत देवविलें; मग अपार संपत्ति घेऊन श्रीकृष्ण धर्माकडे आले. नंतर राजसूययज्ञास प्रारंभ झाला.

१ जशी मांडीवर बसलेली होती तशीच तिला नेऊन. २ तत्पदकमलास; वारिजात ह्म० कमल. ३ भा ह्म० प्रभा आणि मा–शक्ति. ४ शिंपल्यावर. ५आरोग्याचें.

स्वयें ईश सर्वज्ञही उद्धवातें, पुसे नीति वंदूनि त्या माधवातें ।
तयाच्या वदों त्याच दिव्या कथार्था, शुकव्यासउक्ती करूनी यथार्था ॥ १॥
सुधर्मा सभा भोंवतें वृष्णिचक्रें, हरी मध्यभागीं करीं शंखचक्र ।
घनश्याम हेमांबरीं भासमान, दिसे कोटिकंदर्पशोभा समान ॥ २ ॥
पुढें नाचती संघ नृत्यांगनांचे, जयांचें यथाभाग सर्वांग नाचे ।
सभे बैसले ते समीप द्विजाती, यशें धार्मिकांचीं निरोपीत जाती ॥ ३ ॥

सकवचतनु सारे मस्तकीं टोपे भारी
यदुमधुवर ऐसे त्यामधें कैटभारी ।
करिं सशर धनुष्यें पाठिशीं पूर्ण भाते
हरि मनिं नयनीं हो ये रितीची सभा ते ॥४ ॥

तों दूत ये एक विदेशवासी, साष्टांग वंदी प्रभु केशवासी ।
प्रणाम त्यानंतर राजयांचा, करी पुढें काळ बरा जयांचा ॥ ५ ॥

जरासंधें वंधें धरुनि अयुतद्वंद्व नृपती
बहू केले कष्टी मग हरिहरी हेंचि जपती ।
दुराशा राज्याची त्यजुनि अवघे पातकमळ
स्वदृष्टीनें पाहूं म्हणति हरिचें पादकमळ ॥ ६ ॥
हरिचरण पहाया भूप जो तो भुकेला
वध मगधपतीचा या सुखा हेतु केला ।
म्हणति शरण आलों मुक्ति देणार साची
परि रुचि न तिला हे जे पदाब्जीं रसाची ॥ ७ ॥

म्हणुनि मारुनि मागध माधवा, चरण सत्वर दावि रमाधवा ।

१ स्वतः सर्व शक्तिमान् आणि सर्वज्ञ असूनही उद्धवास राजनीति विचारतो असा जो माधव म्ह० श्रीकृष्ण त्यास वंदन करून. २ उत्कृष्ट. ३ शुकाचार्य आणि व्यास यांणीं सांगितलेल्या. ४ देवसभेसारखी सभा; 'स्यात् सुधर्मा देवसभा' इत्य-मरः ५ यादवसमुदाय. ६ हातांत. ७ कांचनासारख्या वस्त्रांत, पीतवस्त्रांत. ८ प्रकाशणारा. ९ मदन. १० समुदाय. ११ प्रति अवयव. १२ ब्राह्मण. १३ अंगांत चिलखत घातलेले यादव वीर. १४ किरीट. १५ मोठा. १६ कैटभ दैत्याचा शत्रु कृष्ण. १७ बाणांनीं भरलेले भाते. १८ ज्यांच्या मनांत आणि डोळ्यांपुढें हरि दिसतो अशी ते सभा. १९ परदेशांतील. २० ज्या राजांस जरासंधास मारल्यावर चांगला काळ येणार त्यांचा. २१ दोन अयुतें; वीस हजार. २२ जरासंधाचा. २३ हरिचरण पाहण्याचें सुख. २४ आम्ही शरण आलों तेव्हां हरी आम्हांस मुक्ति तर देणार, परंतु हरीचे चरण प्रत्यक्ष पाहण्यांत जी गोडी आहे ती मुक्तींत नाहीं असा अर्थ. २५ चरणकमलांत. २६ मगधदेशाधिपति जरासंध. २७ हे लक्ष्मीपते.

धरुनि भाव मनीं इतुका महा, वदति दूतमुखें नृप कामें हा ॥ ८ ॥
विनंति संपवि दूत विशारद, प्रगट होय अशांतचि नारद ।
नमुनि त्यास सभासदवेष्टित, प्रभु पुसे निजपांडवचेष्टित ॥ ९ ॥
स्वजनवत्सल लौकिकतांडव, स्फुट करूनि ह्मणे भजि पांडव ।
धरुनियां असती कसि कामना, विदित भाव करीं इतुका मना ॥ १०॥

प्रश्नें हरी सुख करी मुनिअंतरंगा, शब्दांत दावुनि दयांबुधिच्या तरंगा ।
जें मी वदेन ह्मणतों पुरुषोत्तमातें, तें हा पुसे ऋषि ह्मणे स्वयमेव मातें ११
मी पांडवांचें बरवें कराया, प्रार्थूं पहातों जगदेकराया ।
त्याची त्वरा या पुरुषोत्तमातें, योजी स्वयें त्यावचनींच मातें ॥१२॥
मी भक्त माझ्या वचनास मान, देणार सर्वत्र जरी समान ।
याकारणें बोलवितो मला हो, ऐशा मुनीला सुखधाम लाहो ॥१३॥

नमुनि मुनि ह्मणे तो राजसूयक्रतूतें
करुनि यजिल राजा पांडुचा पुत्र तूतें ।
स्वचरणशरणातें चक्रवर्ती कराया
लव निजकरुणेचा दावि लौकीक राया ॥ १४ ॥
मिळतिल जन सारे त्या समस्तांस देवा
दिसशिल हरि तेथें सर्वभूतां सदेवां ।
क्रतुवर ह्मणुनी हा होय ऐसी कृपा हे
करुनि निजअपांगें पांडवांलागिं पाहें ॥ १५ ॥
श्रवण कथन ज्याचें दुष्टही अंत्यजातीं
करुनि तरति पापें भस्म होऊनि जाती ।
क्रतुवर हरि होतां त्या तुझे दिव्य पायें
त्रिभुवन जन पाहे तूंचि त्याच्या उपायें ॥ १६ ॥

---

१ इच्छा, मनोरथ. २ विनंती. ३ ज्ञानी, पटु. ४ स्वकीय पांडवांचा वृत्तांत. ५ स्वजनांचा कैवारी. ६ नाच; धांदल. ७ इच्छा. ८ अंतःकरणास. ९ दयारूप सागराच्या लहरी. १० नारद. ११ श्रीकृष्णास पांडवांचें हित करण्याचें आहेच, परंतु मला मान देण्याकरितांच केवळ मला काय हित करावयाचें तें सांगण्यास लाविलो. १२ लाभ; ' सुखसिंधुलाहो ' असाही पाठ आहे. १३ तुझ्या चरणास शरण आला असा त्यास. १४ सार्वभौम राजा. १५ लेश. १६ सदेवां ह्म० देवांसहित सर्व प्राण्यांस. १७क्रतुश्रेष्ठ, उत्तम यज्ञ; राजसूय यज्ञ. १८ नेत्रकटाक्षानें. १९अतिशूद्रादि. २० चरण;या यज्ञाच्या निमित्तानें सर्व त्रिभुवन तुझे पाय पाहील.

तुझ्या कीर्ती गाती अतळवितळीं आणि सुतळीं
सहस्रां तोंडीं ही भुजगपति गातो अतितळीं ।
मनुष्य क्ष्मालोकीं क्षितिसुर सुर स्वर्गभुवनीं
वितान त्रैलोक्यावरि यश तुझें जी जनिं वनीं ॥ १७ ॥

त्वत्कीर्ति या त्रिभुवनांवरि चांदवा हे, मंदाकिनी चरणतोय अमंद वाहे ।
गंगा दुजी तिसरि भोगवती हरी ते, पादोद्भवा जगतिपातक संहरीते ॥१८॥
साम्राज्य या क्रतुमिसें अजि पांडवांतें, देऊनि दाखविं जगीं यशतांडवांतें ।
भावें अशा यश निरूपुनि नारदानें, केलें कथूनि निजकार्यविशारदानें १९

ऐकोनि गोष्टी मुनिनारदाच्या, भक्तांचियः मुक्तिविशारदाच्या ।
आधींच हें कृत्य अगत्य वाटे, तें देखिलें यादवसैन्य वाटे ॥ २० ॥
गमे यादवां कीं नृपांचाचि धांवा, धरूनी मनीं शत्रु आधीं वधावा ।
मुनी पांडवांचेचि सिद्धीस पाहे, मुकुंदास दोहींकडेही कृपा हे ॥ २१ ॥
पक्षद्वयांवरि करूं ह्मणतो कृपा हे, साक्षी हरी निजसभे मतभेद पाहे ।
कीं मागधा वधिन नेउनि भीमसेना, संकल्प हा स्वकृत हें न मनी स्वसेना२२
देखे हरी खवळले यदुवीर भारी, हे नीति त्यांस न वदे मधुकैटभारी ।
कीं सांगतां बहु जरासुतगर्व दूतें, निःसीम कोप चढला सकळां यदूतें२३॥
जरासंध वैरानुबंध स्मरावा, यदूंनीं तयांच्या करें तो मरावा ।
असी धाडितां गोष्टि भूपाळकांनीं, यदूंमाजी घे तीस गोपाळ कानीं ॥२४ ॥

पथीं पायीं जातां प्रगट न करी माग धरणी
पळाला सत्रादां हतबळ असा मागध रणीं ।
पुरींतें तूं जातां विमुख तुज त्या मार्ग गमनीं

१ अतल, वितल इत्यादि सप्तपाताललोक. २ सहस्रमुखांनीं. ३ पाताळीं. ४ भूलोकीं ब्राह्मण आणि स्वर्गलोकी देव तुझ्या कीर्ति गातात. ५ भूदेव; ब्राह्मण. ६ पडदा; छत. ७ लोकामध्यें. ८ चांदवा ह्म० छत; वितान. ९ स्वर्गंगा जी तुझ्या चरणापासून निघालेली. १० नेटानें. ११ तिसरी भोगावती नामक पाताळांतील नदी. १२ राजसूय यज्ञाच्या निमित्तानें. १३ नाच; धांदल; गडबड. १४ स्वकार्यसाधण्याविषयीं कुशळ अशा नारदानें. १५ " आधींच हें कृत्य अगाध वाटे, तों देखिले यादव अन्य वाटे ॥ " असाही पाठ आहे. १६ वाटे. १७ बोलावणें. १८ 'संधीस पाहे ' असा एक पाठ आहे. १९ पांडव आणि यादव या दोन्ही पक्षांवर. २० वेत. २१ न मानी; मागधास भीमसेनाकडून मारवावा हा जो त्यानें स्वतः केलेला संकल्प तो यादवांस रुचेना. २२ यादव. २३ अमर्याद. २४ जरासंधाचें पूर्ववैर यादवांनीं स्मरावें. २५ राजांनीं असा निरोप पाठविल्यावर. २६ मार्गानें. २७ पृथ्वी.

स्वयें केलें मानीं मृगपतिस जैसा मृग मनीं ॥ २५ ॥
करुनि गर्व अपार असा हरी, प्रबळ आपण निर्बळ संहरी ।
ह्मणुनि मारुनि सत्वर या खला, करिं सुखी क्षिति सागरमेखला ॥२६॥
श्रवण हें करितां बहु तापले, अधर चाविति यादव आपुले ।
ह्मणति हे अपकीर्तिच ऊघडी, परिहरूं अरि मारुनि ये घडी ॥२७॥
तनुत्राणें देहीं तटतटित ऐसेचि फुगले
मुनी मध्यें बोले ह्मणुनि अति सक्रोध उगले ।
अशांतें गुह्याचें कथन करितां विप्रवचना
निमित्तें हे केली ह्मणतिल मृषा शब्दरचना ॥ २८ ॥
सर्वज्ञ यास्तवचि लौकिक भाव दावी, कीं नीति उद्धवमुखें स्फुट हे वदावी
त्यातें वदे सदय माधव हें स्ववाचा, कीं उद्धवा नयन तूं निजवैभवाचा २९
आह्मांस तूं तनुस नेत्र जसा तसा रे, वर्तो तुझ्याच वचनें यदुवीर सारे ।
हें उद्धवा तुज विचाररहस्य ठावें, कोणीकडे प्रथम सांग अगा उठावें॥३०॥
त्रिभुवनपतिची हे आयके शुद्ध वाचा
जनिं विजनिंहि कोंदे तोष त्या उद्धवाचा ।
विदित मत सभेचें दूतदेवर्षिवाणी
अणुभरि न जयातें बुद्धिचातुर्य वाणी ॥ ३१ ॥
ह्मणे मुकुंदा मुनिनारदानें, जें बोलिलें बुद्धिविशारदानें ।
ते यागसिद्धी* स्वकरें कराया, जावेंचि तेथें जगदेकराया ॥ ३२ ॥
शरण भूपति सोडवणें खरें, मनिं असें धरिलें सुरशेखरें ।
परि जरासुतमृत्यु जेंधीं घडे, उभयसिद्धिकपाटहि ऊघडे ॥ ३३ ॥
जिंकोनि राजे सहसा धनातें, जो राजसूयक्रतुसाधनातें ।
आणील त्याला मखराजसिद्धी, ते हो न दे मागध हे प्रसिद्धी ॥३४॥

---

१ सिंह. २ समुद्रवलयांकित पृथ्वी. ३ शत्रु मागध राजा. ४ चिलखतानें ५ कृपायुक्त. ६ नेत्रे, द्रष्टा. ७ शरीरास जसा नेत्र ह्म० डोळा तसा तूं आह्मां सर्वांस वाट दाखविणारा. ८ गुप्त विचार. ९ उठून जावें. १० त्रिभुवनाचा स्वामी कृष्ण त्याची. ११ आंत बाहेर. १२ संतोष, आनंद. १३ दूताची आणि देवर्षि ह्म० नारदाची वाणी ह्म० ह्मणणें काय आहे हें व सभेचें मत तुह्मांस विदित आहेच. १४ कमताई. १५ शरण आलेले राजे. १६ सुरश्रेष्ठ कृष्णानें. १७ जेव्हां. १८ द्वार. १९ राजसूय यज्ञास साधनभूत असें धन जो आणील त्यालाच त्या यज्ञाची सिद्धि. २० होऊं देणार नाहीं; 'तेव्हां न दे' असाही पाठ आहे. *यज्ञसिद्धि.

मेल्याविणें तो सहसा धनातें, नेदील देवा क्रतुसाधनातें ।
तैसाचि सोडील न त्यां नृपांतें, दोन्हीं घडावीं खळघातपातें ॥ ३५॥
रणीं मृत्युही त्यास देवा असेना, जरी जाय अक्षौहिणीकोटि सेना ।
जरासंध तो द्वंद्वयुद्धीं वधावा, घडे योग तेव्हां फळे भूपधांवा ॥३६॥
जरासंधदेहास या दोनि भाग, स्वहस्तें चिरूनी करी जो विभाग ।
तयाच्या करें मृत्यु तो या खळाचा, नव्हे अन्यथा घात उच्छृंखळाचा॥३७॥
पाहिजे समवेळीच खळें या, देहसंधिस बळें उखळाया ।
पाडुनी अयुतनागबळातें, कोण जी चिरिल त्या प्रबळातें ॥३८॥
भीम एक समसत्त्व नृपा या, तोचि योग्य खळमृत्युउपाया ।
हें रहस्य विरळांसचि ठावें, सद्य यास्तव मखार्थ उठावें ॥ ३९ ॥
मगधपति वधावा जाउनी त्याच वाटे
समबळि अरि ज्याचा एकला भीम वाटे ।
त्यजुनि सकळ इंद्रप्रस्थभूमीस सेना
गमन अजि करावें घेउनी भीमसेना ॥ ४० ॥
जवळि तूं असतां अजि भीम हा, चिरिल मागधसंधि उभी महा ।
शिखिमुखीं वन अर्पुनि खांडव, करि जसा रणि तांडव पांडव ॥४१॥
करुनि तूं जग मोडिसि माधवा, परि निमित्त विधीस उमाधवा ।
करिसि या रिति या कुरुनंदना, करिं पुढें यदुनंदन कंदना ॥ ४२ ॥
परि द्वंद्वयुद्धांत तो सांपडावा, चमत्कारयोगेंच फांसां पडावा ।

---

१ देणार नाहीं. २ दुष्ट जरासंधास मारल्यावर यज्ञाकरितां धन आणि राजांची मुक्तता ह्या दोन्ही गोष्टी घडतील. ३ हे देवा. ४द्वंद्वयुद्ध; झोंबी.५ "पुढें याग तेव्हां फळे भूपधांवा" असा एक पाठ आहे.६राजांनी मुक्तता होण्याकरितां केलेला धांवा. ७ जरानामक स्त्रीनें सांधिला म्हणून जरासंध. ८ उन्मत्ताचा. ९ तुल्यबल ज्याला आहे असा. १० दुष्टास. ११ त्याच्या शरीराचे जरेनें जोडलेले दोन्ही सांधे उखळण्यास. १२ दहा हजार हत्तींचें ज्याला बळ अशास. १३ तुल्यबल. १४ उपाय. १५ यज्ञासाठीं. १६ मार्गानें. १७ वाटतें. १८ इंद्रप्रस्थग्रामी सेना ठेवून भीमास घेऊन जावें. १९ उभा सांधा. २० अग्निमुखांत; अर्जुनानें खांडवारण्य अग्नीस अर्पण केलें ही कथा प्रसिद्धच आहे. २१ अर्जुन. २२ उमापति शंकर त्यास जसा जगमोडण्याच्या कामांत तूं पुढें करतोस तसें मागधास मारण्याचे कामांत भीमास पुढें कर. " करुनि तूं जग मोडिसि माधवा, परि निमित्त न होसि रमाधवा । मिष करुनि तसें कुरुनंदना, करिं पुढें मगधासहि कंदना ॥ " असाही पाठ आहे. २३ भीमास. २४ युद्ध; २५ भडपणांत.

न दे ब्राह्मणा पाठि नेटूनि दान[1], करावें तयाच्या वधा हें निदान[2] ॥४३॥
स्वयें विप्रवेषासि[3] भीमें सजावें, अकस्मात आतिथ्यकाळास[4] जावें ।
ह्मणों मागतों युद्ध दे हें वदावें, खडोण्या पशूतें तया हेंचि दावें[5] ॥४४॥
असें द्वंद्वयुद्धीं हरी त्या नृपातें, चिरावें क्षितीं[6] पाडुनी घातपातें ।
तयीं यागिं[7] तेव्हांच त्या भूपतीतें, घडे मुक्ति भक्तां स्त्रियांच्या पतीतें[8] ॥४५॥

पदभ्रष्टा राण्या[9] गिरिदरिं[10] अरण्यांत असती
कितेका कुग्रामीं[11] करुनि असती जी स्ववसती ।
दळाया कांडाया इतर गृहकृत्यास बसती
तुतें जेव्हां जेव्हां स्मरति हरि गाती नृपसती[12] ॥ ४६ ॥

निजवुनि नृपकांता पाळणीं बालकांतें, स्मरति तुजचि गाती श्रीजगत्पालकातें ।
करिसिल पतिमुक्ती मागधातें वधूनी, ह्मणुनि भरंवसा हा मानिला त्यां वधूंनीं ॥
गाती तुझें विशद[13] कर्म नरेंद्रकांता[14], कीं मारुनी रिपुसि सोडविशी स्वकांता[15] ।
गोपी जगीं क्षितिपति स्मरत स्वमाया, इत्यादि बंध हरि कीर्ति जगीं सजाया

व्रजसतीसह[16] गाय वनीं हरी, धनददूत[17] तयीं अबला[18] हरी[19] ।
वधुनि ते खळ तो प्रभु त्या वधू[20], त्वरित सोडवि मागध तो वधूं[21] ॥४९॥
जळचरें[22] चरणीं धरितां करी[23], करिं[24] सरोरुह काकुलती करी ।
स्वगति[25] जो तइं दे द्विरदाधिपा[26], वरद तोचि वधू मगधाधिपा ॥ ५० ॥
जनकजा[27] हरितां दशकंधरें[28], वधुनि त्यासहि कौस्तुभकंधरें[29] ।
स्वपदही दिधलें स्वपतीस तो[30], रिपुहर स्वपदप्रद[31] दीसतो ॥ ५१ ॥

---

१ ब्राह्मणांस दान दिल्यावांचून पाठ दाखविणारा नाहीं. "तयालागिं मागूनिया युद्धदाना, करावें तयाच्या वधाच्या निदाना" असाही पाठ आहे. २ आदि कारण. ३ विप्रवेषास सजावें ह्मणजे ब्राह्मणाचा वेष घ्यावा. ४ अतिथि जातात त्यावेळीं; वैश्वदेवसमयीं. ५ खोडकर बैलास हेंच दावें ह्म० दोरी. ६ भुईवर. ७ यज्ञ. ८ "पुढें भुक्ति मुक्ति स्त्रियांच्या पतीतें" असाही पाठ आहे. ९ त्या राजांच्या स्त्रिया. १० पर्वतांच्या दरींत. ११ लहानशा खेडयांत. १२ राजस्त्रियांनीं. १३ पवित्र. १४ राजांच्या स्त्रिया. १५ स्वपतीस. १६ गोपीसह. १७ कुबेराचे दूत. १८ स्त्रिया. १९ हरण करी. २० गोपी. २१ वध करी. २२ नक्रानें. २३ गजेंद्र. २४ सुंडाग्रीं कमल घेऊन काकुलती ह्म० विनवणी करी. २५ मोक्ष. २६ गजेंद्रास. २७ सीता. २८ रावणानें. २९ कौस्तुभमणि ज्याच्या कंधरीं ह्म० कंठीं आहे त्या रामरूप धारण करणाऱ्या विष्णूनें रावणास मारून स्वपद दिलें. ३० तो रिपुहर विष्णु स्वपतीस स्वपदप्रद दिसतो असा अन्वय. ३१ स्वराज्य देणारा.

स्वजननीजनकें यदुशेखरें, वधुनि कंसाहि सोडविलीं खरें ।
कवण त्याविण मागध संहरी, ह्मणुनि भूपसेत्या वदती हरी ॥ ९२ ॥
द्रुतविलंबित वृत्त तसा हरी, नृपहि सोडवि मागध संहरी ।
द्रुतकृपाळु मखार्थ विलंबितो, प्रभुस कार्य असे अविलंबितो ॥ ९३ ॥
चारि हीं द्रुतविलंबित वृत्तें, आयकोनि हरि चारिहि वृत्तें ।
पातला द्रुतचि अल्पविलंबें, कार्य उद्धवहि त्या अविलंबें ॥ ९४ ॥
असे तो पुढें नीट जोडोनि पाणी, असा उद्धवें प्रार्थिला चक्रपाणी ।
ह्मणे हेंचि गाती हरी लोक सारे, हरी तूं नृदुःखें हरिसी कसा रे॥९५॥
गाती असेच शरणागत जे पदातें, व्यासादि जे मुनि अशा यशसंपदातें ।
ऐसेंच उद्धव ह्मणे हरिभक्त सारे, गातां न पावसि ह्मणे हरि तूं कसा रे९६
जरासंध हा सर्वथा जी वधावा, घडे याग तेव्हां फळे भूप धांवा ।
तयीं राजसूयाचिही क्षिप्रसिद्धी, अरी तोचि आह्मा हरी हे प्रसिद्धी ॥९७
नृपां राज्य साम्राज्यही पांडवांतें, सुखी वृष्णिवृंदें करू तांडवांतें ।
यशाची तुझ्या सर्वलोकीं प्रसिद्धी, वधें मागधाच्या अतिक्षिप्र सिद्धी९८

अतिनयनिपुणाची ये रिती शुद्ध वाचा
परिसुनि यदुवृंदस्वामि हीं बुद्धवाचा ।
मुनिवर नृपदूत प्रीति पावोनि सारे
ह्मणति चतुर नाहीं उद्धवा तूजसा रे ॥ ९९ ॥

भीम एक कळला खळहंता, यादवीं दवडिली स्वअहंता ।
गोष्टि अप्रिय मना जयीं वाटे, बुद्धि हे कसुनि लावि सुवाटे ॥ १००॥

हरी इंद्रप्रस्था गमन करुनी पांडुतनया
स्वभक्ताची वाणी स्मरतचि वदे त्या सुविनया ।

---

१ मातापितरांस; देवकीवसुदेवांस. २ राजास्त्रिया. ३ द्रुतविलंबित नामक चौदा अक्षरांचे वृत्त जसें प्रथम जलद ( द्रुतं ) आणि मग सावकाश ( विलंबित ) चालतें तसा तुं मागधास लौकर मारून यज्ञ सावकाश कर. ४ यज्ञार्थ. ५ ( ९२ पासून९२)पर्यंत श्लोक ज्यांत तुझा धांवा केला आहे ते चार श्लोक ह्मणूनच द्रुतविलंबित वृत्तांत घातले आहेत. ६ इतिहास. ७ लौकर. ८ हात. ९यादव. १० नृप्यर्ते. ११ अतित्वरेनें. १२ नीतिनिपुण. १३ यादवांचा स्वामी. १४ नारद. १५ राजांकडून आलेला दूत. १६सा ह्म० सारखा. १७ खळ जो जरासंध त्यास मारणारा. १८ मीपणा. १९ एकादी गोष्ट मनास अप्रिय वाटली ह्म० मनाजोगी झाली नाहीं तर बुद्धि ह्म० विचार त्या मनाची समजूत करून त्यास सुमार्गास लावतो. २० विनयसंपन्न धर्मराजास.

सर्वे ने भीमातें सहज करुणेनें तदनुज्ञा
प्रकारें त्यां मारी मगधपति दे राज्य तनुजा ॥ ६१ ॥
जसें गीत केलें नृपांच्या वधूंनीं, तसें सोडिलें मागधातें वधूंनी ।
हरूनी तयांच्या महा आपदांतें, पदद्वंद्व दावूनि दे संपदातें ॥ ६२ ॥
न करुं ह्मणति राज्यें भूप जे त्यांस देवें
परिहरुनि अविद्या दीधलों त्यां सदेवें ।
मळिण बहुत राजे बद्ध फारां दिसांचे
करुनि विमल दग्ध पापतापादि साचे ॥ ६३ ॥
नव्हे जागरीं बद्धक स्वप्नसेना, प्रबुद्धां तसा बद्ध भोगीं दिसेना ।
असें ध्यान लावूनियां चिद्रसाचें, दिलें राज्य कीं जें न वाटेचि साचें ॥६३॥
सदन्नें संहस्त्रें त्रिविध सदलंकार निकरें
तयां शोभा केली अभय अभयां देउनि करें ।
रथीं एका एका बसवुनि कृपायुक्त हृदयें
तयां आज्ञा देतां गमन करितीं भाग्यउदयें ॥ ६५ ॥
ते सोडवूनि अवघे नरदेव देवें, येऊनियां करविला क्रतु वासुदेवें ।
यागांत मोक्ष शिशुपाळनृपास देवें, देतां दिसे प्रकट सर्वजनां सदैवें ६६
मुक्तिदायक मुकुंदविलास, ग्रंथ यास्तव मुकुंदविलास ।
ध्यात वामन मुकुंदपदांतें, अर्पितां निज मुकुंद पदांतें ॥ ६७ ॥
॥ इति श्रीमुकुंदविलास समाप्त ॥

---

१ अर्जुनासही नेई. २ त्याप्रकारें ह्म० विप्रवेषानें युद्धभिक्षा मागून द्वंद्वयुद्धांत भीमाकडून. ३ जरासंधाचे पुत्रास त्याचें राज्य देई. ४ स्त्रियांनी. ५ मारून. ६ विपत्तीं. ७ माया, मोह; या श्लोकाचा पाठ असाही आढळतो—" ह्मणति न करुं राज्यें भूपवृंदें सदैवें, परिहरुनि अविद्या दीधलीं त्यांस देवें । मळिण बहुतराजे बद्ध फारा दिसांचे, करुनि विमळ दग्धपापतापादि साचे ॥" ८ स्वप्नांत पाहिलेली सेना जशी जागृतास बद्ध करीत नाही ती निद्रितासच बद्ध करिते. त्याप्रमाणें प्रबुद्ध ह्म० जागृत अर्थात् ज्ञानी जे आहेत ते स्वप्नवत् जे भोग त्यांत बद्ध झालेला असा त्यास पाहणार नाहीत. ९ ज्ञानस्वरूप अशाचें ध्यान लागल्यामुळें दिलेलें राज्य त्यांस स्वप्नवत् खोटें भासूं लागलें. १० उत्तम प्रकारचीं वस्त्रें आणि भूषणें दे; निकर ह्म० समुदाय. ११ समुदाय. १२ भयरहित करानें अभय देऊन. १३ त्यांचें भाग्य उदयास आल्यावर. १४ राजे. १५ त्या राजसूय यज्ञांत कृष्णानें शिशुपालाचे शंभर अपराध भरतांच त्याचा शिरच्छेद करून त्यास गति दिली. १६ कृष्णाच्या लीला. १७ कृष्णचरणास १८ 'मुकुंद' हीं अक्षरें.

# सुदामचरित्र.

( कथेचा सारांश. )

सुदामा नामें कोणी एक ब्राह्मण श्रीकृष्णाचा गुरुबंधु होता, त्याच्या घरीं दारिद्र्य ह्मणजे अठराविस्वे होतें; पण तो मोठा भगवद्भक्त होता. त्याची स्त्री मोठी साध्वी असे. तिनें एके दिवसीं त्याजवळ अशी गोष्ट काढिली कीं, द्वारकेमध्यें अपार संपत्तीचा उपभोग घेत श्रीकृष्ण नांदत आहे. तो तुमचा गुरुबंधु व मित्र आहे ह्मणतां तर त्याजकडे जा ह्मणजे आपलें दारिद्र्य तरी विच्छिन्न होईल. सुदामा निर्धनतेच्या लज्जेमुळें धानिक मित्राच्या भेटीस जाण्यास नाखुष असतांही स्त्रीच्या आग्रहामुळें जाण्यास तयार झाला. भेटीस रिक्त हस्तें जाऊं नये ह्मणून मुष्टीभर पोहे घेऊन तो द्वारकेस गेला. तेथें श्रीकृष्णानें त्याचा बहुमान करून सोळासहस्र स्त्रियांसहित त्याची अर्घ्यादि पूजा करून त्याची उत्तम शुश्रूषा ठेवण्यास त्यांस सांगितलें. बिचाऱ्या ब्राह्मणास वाटलें होतें की, श्रीकृष्ण मला कांहीं तरी देईल, परंतु सर्वांचा निरोप घेऊन जेव्हां तो निघाला तेव्हां श्रीकृष्णानें त्यास मोठ्या प्रेमानें आलिंगन देऊन जसा आला होता तसा रिकामाच माघारीं पाठविलें. ब्राह्मण कष्टी होऊन दैवास दूषण देत आपले नगरीस परत आला आणि पहातो तों श्रीकृष्णानें सर्व नगर सुवर्णमय करून आपणास तेथील राजा केलें, तेव्हां श्रीकृष्णानें आपली थट्टा केली हें त्याचे ध्यानांत आलें.

आणखी एक सुदामचरित्र काव्येतिहाससंग्रहांत व एक दोन पोथ्यांत उपलब्ध आहे. त्याच्या पहिल्या श्लोकाचा आरंभ असा आहेः—" मंगलप्रद समस्त मंगला " इत्यादि व शेवटचा श्लोक असा आहे:–

भक्ती न मुक्ति अशि भक्ति सुदामयाची, पाहा विचित्र करणी वरुणालयाची ।
वर्णून आदर बरा बरवा मनाचा, हा विश्वनाथ निजकिंकर वामनाचा ॥ ९१ ॥

ह्या शेवटल्या श्लोकावरून व एकंदर भाषासरणीवरून हें चरित्र वामनाचें नाहीं असें आह्मांस वाटतें ह्मणून तें आह्मी दिलें नाहीं.

हें आख्यान सुद्धां वामनाचेंच आहे अशाविषयीं संशय आहे. परंतु याचे शेवटीं वामनाचें नांव आहे ह्मणून येथें घतलें आहे.

श्रीसद्गुरूच्या पदसारसातें, वंदोनियां त्या कवितारसातें ।
बोलेन मी भागवतीं शुकानें, जो वर्णिला आयकिजे सुकानें ॥ १ ॥

सुदामाच्या धामीं किमपिहि नसे अर्थ बघतां
पहातां वायूची सदनिं दिसते कीं प्रबळता ।
तृणें पर्णें जीर्णें करुनि शत छिद्रें मिरवलें
जणों गंधर्वाचें नगर नभिं जैसें उगवलें ॥ २ ॥
लागे त्या रजनीस विप्रसदनीं काजूंकृमीचा दिवा
जैसा तंतु पट स्वभाविक गमे कीं बांधला चांदवा ।

---

१ पादकमलास. २ जो कवितारस. ३ घरीं. ४ द्रव्य. ५ काजवा नामक कीटक. ६ छत.

पृथ्वीपीठ पलंग विस्तृत दिसे निद्रा करी त्यावरी
कांतालिंगन मंद दे द्विजवरा तो इंद्रियें आवरी ॥ ३ ॥
जन्मादारभ्य नेणे द्विजवरवनिता एकही जीर्ण चोळी
त्या रागें ते स्थळीं ते न कळत पतिला जी करद्वंद्व चोळी ।
दसा येतां दिवाळी किमपि हि न मिळे गोडशी पूर्णपोळी
दोषें दारिद्र्यतापें करुनि निजमनीं आपुलें चित्त पोळी ॥ ४ ॥
वस्त्रें जशीं केवळ मीनजाळीं, वदे कधीं पावकही न जाळी ।
जें धुंडितांही नव खंड खंडें, अप्राप्य कीं जर्जर खंड खंडे ॥५॥
नसे अन्न भक्षावया मंदिरीं हीं, ह्मणोनी तया वर्जिलें उंदिरीं हो ।
न ज्या अंगणीं त्या विहंगादिजाती, गृहा त्याचिया कोण भिक्षेसि जाती ॥६
तो द्विजोत्तम नसा वनवासी, सौख्यलेश न कधींच जिवासी ।
दंपती कृशशरीरगतीनें, वागती परम मंद गतीनें ॥ ७ ॥
खाती कंद मुळें पिती मधुजळें जे नेणती ओंवळें
दंपत्यें अमेळें स्वसाधनबळें ज्यांचें सदा सोंवळें ।
नेसाया धवळें न वस्त्र पिवळें शीतें सदा व्याकुळें
पृथ्वी पादतळें फिरे हळहळें प्रारब्ध दैवागळें ॥ ८ ॥
वस्त्रीं बालतृणांकुरें पसरलीं जाती न आच्छादिलीं
कौपीनांवरछिद्रतोन्मुख सदा लज्जेंचि संस्थापिलीं ।
काखे पुष्कळ दो भुजीं अणिकही संपूर्ण विस्तारिलीं
नाहीं नापित काढण्या ह्मणुनिया स्वस्वस्थळीं थारलीं ॥ ९ ॥
दाढी मिशा वांत्र भूत ज्यातें, अश्लाघ्यतें ने मुखपंकजातें ।
दिसोनि येतो समजा मनीं रे, सळे पळे देखुनि कामिनी रे ॥ १० ॥
नासापुटीं तो भरणी जयांची, अन्यत्र नाहीं गणना तयांची ।
ज्या मस्तकींच्या कबरीभरानें, सभोंवतीं दंग भुजंग रानें ॥ ११ ॥

---

१ भूतल हाच ज्याचा पलंग. २ त्याची स्त्री त्यास मंद आलिंगन देई व तोही इन्द्रियनिग्रह करी; कांता, आलिंगन हे शब्द वेगळे पाहिजेत. ३ ब्राह्मण सुदामा. ४ स्त्री. ५ कंचुकी. ६ दुःखानें हात चोळी. ७ पुरणाची पोळी. ८ मासे धरण्याचें जाळें. ९ अग्नि. १० पक्षी. ११ स्वादुजल. १२ अमंगळपणा. १३ पवित्र. १४ आचरणानें. १५ शुभ्र. १६ थंडीनें. १७ अनवाणी. १८ केश. १९ लंगोटीच्या छिद्रांतून बाहेर येणारीं. २० न्हावी. २१ विसकटलेले केश. २२ स्त्री. २३ नाकपुडींत. २४ ज्या केशांची. २५ जटाभारानें; ज्यांत भुजंगवास करितात अशा जंगलाप्रमाणें केसांचें जंगल वाढलें होतें.

सर्वत्र मंदादर कीं जयाला, बंधू न ते बोलविती जयाला ।
कांता सती होउनियां जयासी, संतोषवार्ता न करी तयासी ॥ १२ ॥
तो काळ कंठी जंव ये रितीनें, तों बोधिला ब्राह्मण कीं सतीनें ।
द्वारावतीचा पति मित्र लोकीं, तूं आपुला बोलसि कीं विलोकीं ॥१३
तडतडां मज तोडिति बाळकें, न मिळती उदरासहि वाळकें ।
बहुत हे समजा शिशुंजाचणी, मन असे पडिलें अतिकांचणी ॥ १४ ॥
ही सोकलीं दूध दहीं तुपासी, सांगों किती दुःखहि तूजपाशीं ।
बाळें अह्मां कां दिधलीं सुदेवें, न जाणतां श्रीपतिवासुदेवें ॥ १५ ॥
जे मागती त्यांस हरी न दे तो, न मागती त्यांस बळेंचि देतो ।
जो कामुकाची समजे अपेक्षा, ह्मणोनि तोंकीं करितो उपेक्षा ॥ १६ ॥
दुर्गंधि तों कधिंचही न चुके मुखाची, शय्यासनीं किमपि गोष्टि नसे सुखाची।
तांबूलहीन वदनाधर पानकालीं, स्वप्नींहि तो मुखिं पडे न कधीं सुकाळीं॥१७
खदिरपर्णरसें दशनांतरें, वदन देखियलें न कधीं बरें ।
परम शुष्क तुझ्या अधरासि या, रसविहीन अपेक्षित कासया ॥१८
जाळिया वमनेंही न मिळे कीं, तुज तें क्रमुक फोडि फळें कीं ।
कोण सौख्य ह्मणवूनि क्रमावें, जें परस्पर मिळोनि रमावें ॥ १९ ॥
स्नेहशून्य वरि भार जटांचे, व्यर्थ हे वरुनि पाय भटाचे ।
दैवहीन अह्मि काय करावें, जाण या अजि वयांत मरावें ॥ २० ॥
मरण कां मज न येचि कळेना, पात्रकीं पडुनि देह जळेना ।
व्यर्थ जन्म धरिला नरलोकीं, कीं अह्मीं उभयतां श्रमलों कीं ॥ २१ ॥
अहा पाप म्यां काय केलें कळेना, पहा सौख्य स्वप्नांतही आढळेना ।
वृथा जन्म घेऊनियां या नृलोकीं, किती यातनीं दंपती शीणलों कीं ॥२२
त्वां हा मनीं खेद न तो करावा, यानंतरें यत्न मनीं धरावा ।
श्रीकृष्णजीच्या चरणा भजावें, भेटावया शीघ्र निघोनि जावें ॥ २३ ॥
सुदामा बोले कीं जरि वदसि जा तूं मज सती
अहो तेथें गेल्या सकळजन देखोनि हंसती ।

---

१ अपमान. २ साध्वी. ३ एक प्रकारची कांकडी. ४ मुलांचें दुःख. ५ जाचणी. ६ ज्यास इच्छा आहे त्याची. ७ इच्छा. ८ मुलांचीं. ९ विडा. १० चुंबन घेतांना. ११ कात. १२ नागवेलीच्या पानाचा रस; तात्पर्यार्थ विडा खाऊन ज्याचे ओष्ठ रक्तवर्ण कधीं झाले नाहींत. १३ दंतच्छद; ओष्ठ. १४ वांति. १५ सुपारीचा तुकडा १६ तेलावांचून. १७ भट. किंवा भिक्षुक पति करून व्यर्थ. १८ अग्नीत.

तयीं चित्तीं दुःखें परम उपजे तीं न धरवे
क्षमा पाहों जातां तदुपरि हि अह्मां न करवे ॥ २४ ॥
अभ्यासनें करुनि हीनहि दीनलोकां, कां बोधनाद पुसती जगती भुलोका ।
आह्मी अकिंचन सकिंचनता जयासी, जागे समान प्रतिपाद्य नहो तयासी २५
ऐश्वर्यें भ्रमले जगीं मिरवले थोडे भले देखिले
नाहीं पारखिले तुवां वळखिले गर्वेचि जे आंखिले ।
तारुण्यें पहिले भरें दडपले सौख्यें सदा मातले
दुष्पंकीं रुतले बळेंचि उतले कामीं सदा रातले ॥ २६ ॥
परधन परदारा सर्व दोषापहारी
अनुदिन प्रियकांताकामसंगी विहारी ।
किमपिहि न करी जो सज्जनांसी प्रवृत्ती
अति कठिण घडेना साधुनिंदानिवृत्ती ॥ २७ ॥
देखतां ऋषि तयासि न पूजी, वाटतो द्विज तयास रिपू जी ।
भोंवयीं करुनि वक्र पाहतो, मित्र भिक्षुक अमान्य अहा तो ॥ २८ ॥
न तो हालवी मस्तकातें कदापी, दुरूनीच तो शुष्कशब्देंचि दोपी ।
तयीं बोबडी ते वळे भिक्षुकाची, न ने गोष्टिही गोड बोले फुकाची २९
अलक्ष्मीस लक्ष्मीस तो वैरभाव, स्त्रियांचाच नैसर्गिकी तो स्वभाव ।
ह्मणूनीच शत्रुत्व या संततीतें, विचारूनि पाहें सती तूं मतीतें ॥३०॥
प्रतिष्ठा लज्जाही धरुनि बसतां काहिं न घडे
प्रयत्नावांचूनी समज सहसा दैव नुघडे ।
दिनानाथा कांता मजवरि करावी बहु दया
विचारें आणावें वचन बरवें स्वात्महृदया ॥ ३१ ॥
करूं नये स्त्रीवचना अमान्य, समस्त लोकांत तुह्मीच मान्य ।
दारिद्र्यदोषासि त्वरें हरावें, प्रस्थान येथूनि उद्यां करावें ॥ ३२ ॥
द्वारावतीचा पति आजि मान, देतो जना अन्य न तो समान ।
अज्ञान हो दांभिक भाग्यवंत, तूं कृष्ण तो जाणासि ज्ञानवंत ॥३३॥
त्याची तुह्मां कीर्ति असोनि ठावी, कां कल्पना व्यर्थ मनीं उठावी ।

---

१ दरिद्री. २ गुंग झाले. ३ रेखिले. ४ माजले. ५ दुर्गुणरूप चिखलांत. ६ रममाण झाले. ७ प्रतिदिवसीं. ८ कांतेसह क्रीडा करणारे. ९ साधुनिंदेपासून पराङ्मुखता. १० कोरड्या शब्दानें; दयारहित शब्दानें. ११ धमकावी. १२ निर्धनता; दारिद्र्य. १३ स्वाभाविक, जन्माचा. १४ श्रीमंतांचे आणि गरीबांचे संततीस क्र० पुत्रादिकांस. १५ मनास.

देवोनिया राज्य बळी सदारा, राहे उभा जो समजा उदारा ॥ ३४ ॥
उचलुनि तळहातें जो धरी पर्वतातें
वसु दिनकृत संख्या जाणसी मारतातें ।
कसि करिल उपेक्षा आपुलीया जनातें
द्विजवरिं समजावें तत्त्व हें कीं मनातें ॥ ३५ ॥
उच्छिष्ट धर्माधरिंचें स्वहातीं, काढीतसे हें जनही पहाती ।
ऐश्वर्यतेचा बडिवार नाहीं, हें जाणसी तूं तंव सज्जनांही ॥ ३६ ॥
देनां उरीं तो भृगु लात सोशी, सुब्राह्मणाचीच तया असोशी ।
जाणोनि हें जा अजि दर्शनासी, दारिद्र्य हें तत्क्षणिं देव नाशी॥३७॥
हे आयकोनि वचनोक्तिसुधा सतीची, मालिन्यता परिहरी अपुल्या मतीची ।
त्यानंतरें करितसे स्वमनी विचार, सांडोनि दे मग समस्तहि पूर्वचार॥३८॥
रित्या हातें जावें स्वमानें समजावें गुणवती
उभी मुष्टी पोहे भरुनि पतिसन्मुख युवती ।
ह्मणे शाकेचें घे देळ अशन मानी वहु चैत्री
ह्मणोनी भर्तारा त्वरित गमनोद्देश सुचवी ॥ ३९ ॥
घेवोनिया पृथुके ते मग चालिला हो, वाचेसि सेवित असे प्रभुनामलाहो ।
तों देखिली दुरुनियां नगरी हरीची, चित्रें विचित्र दिसताति परोपरीचीं ४०
नौरत्नें खचितें करूनि बरवें मंदीर तें देखिलें
सज्जे सुंदर माडिया तदुपरी त्या त्या स्थळीं रेखिलें ।
पाहे पावटणी हिरे जडियले द्वारावतीचे पुरीं
विल्लोरांगणें त्या घरांतहि घरे सौंदर्य तें नूपुरीं ॥ ४१ ॥
नक्षत्रशोभा प्रभु आंगणीरे, विंबे तया कोण असा गणी रे ।
देखोनियां ते द्विजें हंसजाती, मुक्ताभ्रमें सर्व भुलोनि जाती ॥ ४२ ॥

---

१ सस्त्रीक बळीस पाताळाचें राज्य देऊन आपण द्वारपाळ झाला. २ अर्थात् गोवर्धन पर्वत. ३ वसुसंख्याक दिवस; आठ दिवस. ४ मदनपिता कृष्ण. ५ डौल. ६ अति आवड. ७ वचनामृत. ८ मळिणपणा; संशय. ९ आचार; वर्तन. १० तरुणी. ११ भाजींचें पान. १२ खाण्यास; दुर्वास ऋषि पांडवांचा छळ करण्याकरितां आले असतां द्रौपदीनें कृष्णाचा धांवा केला त्यासमयीं कृष्ण उरलेलें भाजीचें पान खाऊन तृप्त झाला. त्या गोष्टीस लक्षून ह्मटलें आहे. १३ गोडी. १४ पोहे. १५ हिरा, माणीक, मोत्यें, गोमेद, इंद्रनीळ, पाच, प्रवाळ, पुष्कराज, आणि वडूर्य अशीं नऊ रत्नें. १६ पायरी. १७ बिलवर. १८ पैंजण. १९ पक्षी. २० मोत्यांचा भास होऊन.

प्रत्यक्ष मानससरोवर त्या द्विजासी,भासोनि धन्य ह्मणतो मनिं ज्या द्विजांसी।
आश्चर्य होउनि तटस्थ उगाच राहे, मिथ्या भ्रमे मतिंत ते गाति कीं नरा हे ॥
जीवेश्वरीं जरि असा भ्रमभेद जाला, यालागिं नेणति तया पुरुषा अजाला।
कृष्णा तुझी प्रकृति काय अशी कुडी रे,जे राजहंस परि घालिति फूगडी रे॥
तो बैसला दिसतसे हरि चित्रशाळे, सोपे समस्त चहुंफेर महाविशाळे ।
ज्याच्या अमीत फिरती वदनेंदु जाया,सिंहासनासमिप तो भयभीत जाया ॥
तो अंगणीं जंव तटस्थ असे उभा रे, विद्युल्लतासम दिसे वनिताप्रभा .रे ।
देखोनि भ्रांत मग तो द्विज पूर्ण जाला,पाहों कसा विसरलाच अधोक्षजाला॥

तों देखे हरि अंगणीं द्विजवरा कीं हा सुदामा खरा
कोठें ये क्षणिं पातला ह्मणुनियां देवांचिया शेखरा ।
वाटे अद्भुत अंतरीं ह्मणुनि ये सिंहासनाखालता
धांवूनी पद वंदुनी करिं धरी जाला मुखें बोलता ॥ ४७ ॥
सिंहासनीं बैसउनी तयासी, सांगे हरी मित्र असें स्त्रियांसी ।
चंद्रानना विस्मित होति भारी,कीं कौतुकाचीच गुडी उभारी॥४८॥
सुदाम्याच्या पायां पडति सकळा इंदुवदना
खुणावूनी सांगे त्वरित अगत्री पुत्र नमना ।
हरीच्या आज्ञेनें द्विजपद सत्या त्याच नमिती
अनेका कृष्णाच्या समज गणितां त्यांस न मिती॥ ४९ ॥
बोले अनंतर तयाप्रति पात्र पाणी, आणा असें त्वरित कीं प्रभु चक्रपाणी ।
प्रक्षालनार्थ चरणा शरणागतीनें, पुजावया परम योग्य हि दंपतीनें ॥ ५० ॥
कुचकलश सुवर्णे कांचनी पे घटातें
अभिनव सति शोभे पूजितां हो भटातें ।
सजल भरित पूर्णा श्री स्वयें श्रीकरानें
धरुनि लवुनि ओती पाय धूतां करानें ॥ ५१ ॥

---

१ ब्राह्मणास. २ राजहंस पक्ष्यांस. ३ कपटी. ४ पडव्या. ५वदनानें चंद्रासारख्या स्त्रिया. ६ स्त्रियांचा प्रकाश. ७ देवांत श्रेष्ठ अशा कृष्णास अद्भुत (आश्चर्य) वाटलें. ८ मनांत. ९ निशाण. १० सुदाम्याचे पाय. ११ कृष्णस्त्रिया. १२ गणती, मर्यादा. १३ भांडें आणि पाणी अर्घ्यादि पूजा करण्याकरितां १४ जोडप्यानें. १५ सोन्याचे घट. १६ या श्लोकार्धाचा अन्वयः—श्रीकरानें करानें पाय धूतां श्री जलभरित पूर्णा घटातें धरुनि लवूनी ओती. १७ श्री ह्म० लक्ष्मी अर्थात् रुक्मिणी आणि श्रीकर ह्म० कृष्ण.

कृष्ण आणखिहि रुक्मिणी सती, पूजितां त्रिजनवृंद हांसती ।
हें समस्त जरि यास साजलें, किं निमित्त मग भाग्य लाजलें ॥ ५२ ॥
केंचा पूजिति जांबवंत वदतां ते जांबवंती रडे
तों तों हांसति गोपिका खदखदां डोळे न कीं कोरडे ।
हास्यानंद हि बिंदु लोचनिं भरे हेमांबरें वारिती
नाटोपूनि कृशोदरें धरिति कीं देहीं करें ये रिती ॥५३ ॥
जों हांसती तों तव अंग नाचे, सभोंवते वृंदहि अंगनांचे ।
चर्चा द्विजाची बहुधा करीती, असो स्त्रियांची असि हेचि रीति ॥५४॥
ज्याचें पायवणी शिरीं धरि धणी जो शूळपाणी क्षणीं
तो हा षड्विध लक्षणीं द्विजपदें प्रक्षालितो जे क्षणीं ।
वामांगीं रमणी रमापति गुणी त्रैलोक्यचूडामणी
सेवे तत्पर भूसुरांप्रति गमे चातुर्यचिंतामणी ॥ ५५ ॥
आतिथ्य सर्व तदनंतर त्या हरीनें, केलें द्विजासि विधियुक्त परोपरीनें ।
तांबूल देउनि पुसे कुशलें मुलें कीं,स्त्री एक आणिक तुला किति लेक लेकी॥
कृष्णा तुझे जाण दयें करूनी, आह्मी असों जीव तनू धरूनी ।
विश्वंभरा जें तुज नाठवावें, तें सौख्य कैचें मनि सांठवावें ॥ ५७ ॥
लज्जेकरुनि द्विज तो पृथुकां न दे हो,तों रुक्मिणीपति तयाप्रति कीं वदे हो ।
भेटीसि काय अणिलें वहतां दिसां हे,तों दे हरीस मग तो द्विज मुष्टि पोहे ५८
तों भोंवत्या सकळही मिळती सती हो, देखोनि मुष्टि पृथुकां मग हांसती हो।
श्रीकृष्णजी परम आदरतेकरूनी, बांधीतसे अपुलिया पदरीं धरूनी ॥५९॥
झोंबी पडे त्यावरि बायकांची, लीला अहो हे यदुनायकाची ।
विप्रप्रसादासि अयोग्य नारी, ह्मणे तयांला मग पूतनारी ॥ ६० ॥
ह्मणे तुह्मां भक्ति नसे द्विजाची, कशी घडे प्राप्ति पृथुरजांची ।
काकूलती येउनि त्यास दारा, पोहे स्वयें मागति त्या उदारा ॥ ६१ ॥
नेदीच पोहे मग तो कदापी, नेत्रें हरी त्या सकळांस दापी ।
स्थळीं स्थळीं स्तब्ध थवे तयांचे, गळोनि जाती मदही स्त्रियांचे ॥ ६२ ॥

---

१ स्त्रीयांचा समुदाय. २ जर कृष्णाचे हातची पूजा यास शोभे असा हा योग्य आहे तर अभागी कां? ३ ह्मातारा अस्वल. ४ डोळे कोरडे नाहीतना असें ह्मणत. ५ जरीच्या वस्त्रानें. ६ पोट धरून हांसतात. ७ थट्टा. ८ पादोदक. ९ भन्व; कुती. १० स्त्री रुक्मिणी. ११ चूडामणी ह्म० शिरोभूषण. १२ब्राह्मणास. १३ शरीर. १४ पोहे. १५ मूठभर. १६ पोह्यांच्या कणाची. १७ स्त्रिया.

तथानंतरें श्रीहरी त्या द्विजातें, पुसे पूर्ववृत्तांत ठेवा गुजातें ।
कसे त्या गुरूचे गृहीं वर्तलों कीं, तुतें ठाउकें काय आहे विलोकीं॥६३॥
नये वर्ण उच्चार जै अक्षरांचा, तयीं क्रोध दावीतसे कीं क्षराचा ।
जसें वागुलाच्या भयें बाळकासी, तसा सद्गुरू अंतरीं तो द्विजासी॥६४॥
माता मृषा क्रोध शिशूस दावी, तसीच शिष्या गुरुरीति दावी ।
घेवोनियां प्रज्वळ जाण भी तें, देखोनियां बालक जेंवि भीतें ॥ ६५ ॥
हरोनियां सर्व पहा अविद्या, बोधीतसे जाण कसी सुविद्या ।
गुरुविणें थोर न तो दिसे रे, आह्मी तुह्मी वर्ततसों कसे रे ॥ ६६ ॥
क्षुधेनें बहू पीडलों जे दिनीं रे, केळे त्यास कैसें पहा तूं मनीं रे ।
दयालुत्व त्या सद्गुरूचेचि पायीं, पडों नेदिती सर्वथा ते अपायीं ॥ ६७ ॥
वेचूं शुभ्रा जाउनि दूर रानीं, आह्मी तुह्मी या अपुल्या करांनीं ।
परस्परें वाहुनिया शिरींरे, न वाटती क्लेशहि अंतरींरे ॥ ६८ ॥
गंगोदका घेउनि घागरीला, राहों न देतां स्वसुखें गरीला ।
जातां पहा अध्ययनी रतीरे, वाटे तुझी जाण सुसंगतीरे ॥ ६९ ॥
एके दिनीं श्रीगुरुचे सतीनें, सांगीतलें कार्य अह्मांस तीनें ।
माते करूं वो ह्मणऊनि वाचे, बोलोनि गेलों शिशु मानवाचे ॥ ७० ॥
जावें ह्मणे आजिच इंधनातें, निघों करोनी निज वंदनातें ।
काष्ठांनिमित्तें मग पर्वतातें, येतें वदा कीं तुमच्या मनातें ॥ ७१ ॥
त्यानंतरें जात असों वनाला, शंका न वाटे पहतां मनाला ।
भारे वहू बांधुनि इंधनांचे, घेतां शिरीं मोर समोर नाचे ॥ ७२ ॥
तों श्रांत झालों मग क्षुत्पिपासीं, वनामधें त्या पडलों उपाशीं ।
तूं भक्षिसी चोरुनिया शिदोरी, शिंकीं वृथा दाविसि दीर्घ दोरी ॥ ७३ ॥
जलेंद गर्जत ये जंव अंबरीं, झळकते आणि वीज न ते वरी ।
सुभय ते स्थळिं वाटतसे मनीं, फिरुनि येत असों जंव नेमुनी ॥ ७४ ॥
कडकडुनि तयीं तो वर्षला मेघ भारी, तेंनुवरि मग जो कां रोमराजी उभारी ।
अशनवसनहीनें आननें म्लानदीनें, करुनि जंव वसों तों वेष्टिलें त्या नदीनें ७६
पहा रवीचा मग अस्त जाला, वडे तयीं व्याकुलता द्विजाला ।

१ गुप्त वृत्तांत ठेवा. २ खोटा. ३ अज्ञान. ४ गोवऱ्या. ५ प्रीति. ६ गुरु जो संदीपन त्याचे स्त्रीनें. ७ लांकडें आणण्यास. ८ त्याची आठवण आहे कां सांग. ९ भुकेनें व तहानेनें. १० मेघ. ११ शरीरावर. १२ रोमांच. १३ अन्नवस्त्रावांचून. १४ म्लान आणि दीन मुखांनीं.

काहीं तरी ठाउकें कीं सुजाणा, पुसे सुदाम्याप्रति देव जाणा ॥ ७६ ॥

केला कोप सतीवरी[2] तदुपरी धांवूनि ये लौकरी
पायीं नम्र मिरीं[3] खडे क्षितिवरी प्रेमा अह्मां किंकरीं[4] ।
हाका मारुनि अंबरीं[5] मुखभरी रेरे सुदाम्या हरी
तों आह्मां वदनावरी मिठि पडे[6] शीतें अहाहा करी ॥ ७७ ॥
मौनें सन्मुख जातसों भ्रमतसों कंपीत कीं होतसों
ओझें मस्तकिं घेतसों हळुहळू पाऊल टाकीतसों ।
विश्राला न दिसों उठों आणि बसों हुंकारही देतसों
पश्चात भेटतसों पुसे तव हंसों संतोष मानीतसों ॥ ७८ ॥

तैं तो ह्मणे श्रम तुह्मां दिधले सतीनें, रुपादिला परम दोष अगत्य तीनें ।
बाळें पहा बहुतही असती भुकेलीं, कष्टी उगेंचि वनिं धाडुनि फार केलीं ७९

वृत्तांत ऐसाच सुदामयातें, पुसे हरी हेंचि पहा तयातें ।
कांहीं तरी आठवते जिवां रे, दिलें न त्वां यासहि सूचवी रे ॥ ८० ॥
तों तो सुदामा मनिं खोंचला हो, कृष्णास या ग्रास न अर्पिला हो ।
ह्मणोनिया प्राप्त दरिद्र झालें, अद्यापि संतप्त न तें विझालें ॥ ८१ ॥

कृष्णार्पणाविण कसें फळ प्राप्त होतें, केल्याच सर्वहि समर्पण यास होतें ।
भक्तीस वश्य अणखी निजमुक्ति देतो, ऐसें मनींच अपुले द्विज कीं वदे तो
पश्चात्तापें म्लानता आननाला, आली वाटे त्याचिया त्या मनाला ।
अंतर्यामीं कृष्ण साक्षी तयाचा, जाणे ऐसें नाशकर्ता भयाचा ॥ ८३ ॥
श्रीकृष्ण पोहे मग तो स्वहातें, घेवोनियां तो करितां स्वहा[7] ते ।
तोषावया चित्त सुदामयाचें, भरूनिया प्रेम महा तयांचें ॥ ८४ ॥
देखोनिया द्विज तया मग वायकांसी, जाऊं पुसे त्वरित कीं यदुनायकासी
'जाऊनि या' ह्मणउनी हरि बोललाहो, श्रीकृष्णआनन[8] विलोकुनि चालिलाहो
तो बोळवीत हरि जात असे पहाहो, तों त्या द्विजासि ह्मणताति सभाग्य हा हो
ब्रह्मादि इच्छिति तयांसहि संग नाहीं, मार्गी असेंचि मग बोलति अंगनाही[9] ८६
द्वारावतीनगरलोक मिळोनि सारे, हा ब्राह्मणोत्तम सभाग्य पहा कसा रे ।
ऐसेचि शब्द उठती सकळां मुखींरे, श्रीकृष्णही ह्मणतसे न तसे सुखी रे ॥ ८७

आतिथ्य तें पूर्ण करोनि सीमा, राहे उभा क्षेत्र धरोनि सीमा ।

---

१ यांतील कांही तरी आठवतें काय? २ गुरुपत्नीवर रागावून. ३ मिरवे; चाले. ४ दासजनांवर. ५ आकाशांत. ६ मुख विवर्ण झालें. ७ स्वाहा करणें ह्म० भक्षण करणें. ८ मुख. ९ स्त्रिया.

पुनः पुन्हा वंदुनियां द्विजासी, आतां ह्मणे काय घरासि जासी ॥८८॥
माझा नमस्कारहि वोहिनीला, सांगा ह्मणे देव तया मुनीला ।
प्रार्थूनिया वंदन जेंचि केलें, त्या वर्णनीं चित्त असे भुकेलें ॥ ८९ ॥
प्रयाण तेथून सुदामदेवें, केलें असें देखुनि वासुदेवें ।
फिरे समस्तां सहवर्तमानें, पाहे सुरांचीच नभीं विमानें ॥ ९० ॥
प्रवेशला कीं सदनीं हरी तो, लीला जसे लोक तसी करीतो ।
त्यानंतरें त्याच सुदामयाचें, जालें कसें आइकिजे तयाचें ॥ ९१ ॥
द्विज मनीं मग होय विचारिता, हलवुनी कर जात असे रिता ।
किमपि नेदुनि शीघ्रचि धाडिलें, मज पुढें किति दुःखहि काढिलें ॥९२
पोटांत क्रोध असतां हरि काय देतो, नाहीं तयासि दिधलें मज केंवि दे तो ।
"नादत्तमुपतिष्ठति"असे रिति वेदवाणी,ते केंवि होइल कदापि असत्यवाणी।
नाहीं तयासि दिधलेंचि पहा वदे तो, त्याला अशी स्मृति असे कधिंही न दे तो
माझे मनीं कृपणता नसती जरी हो, देता मला करुनि पूर्ण कृपा हरी हो॥९४॥

स्वभार्येतें पूर्वी वदत असतां तीस न कळे
दरिद्राच्या द्रोहास्तव परम हें चित्त विकळे ।
पहा काळें कैसें करुनि घडला भ्रंश मतिचा
न मानूनी राहें अजि घरिं नये शब्दहि तिचा ॥ ९५ ॥

अप्रार्थितां प्राप्तहि दुःख होतें, तैसेंचि तेंहि सुख कीं अहो तें ।
असोनिही निश्चय ये रितीचा, प्रसाद हा केवळ त्या सतीचा ॥ ९६ ॥
नसे प्राक्तनीं तें कधीं देव देना, फुकाचा कधीं शब्द कोणी वदेना ।
भला कीं हरी सद्य आतिथ्य दावी, उदासीनता सर्वथा तो न दावी ९७
मान्यतांच धन थोर जयाशी, मेरु पर्वतहि तुच्छ तयासी ।
त्यां बरेंचिहि न मागुनि केलें, चित्त मुख्य हरिलागें भुकेलें ॥ ९८ ॥
मागे हरीस नर तो बरवा न वाटे, मी बोलिलों स्वसुखरूप पहा सुवाटे ।
ऐसें मनीं वदत येत असे स्थळासी, तों देखिलें नगर रम्य महाविलासी ९९
ह्मणे मार्ग मी चूकलों स्वस्थळाचा, कसा भोग कीं पाश हा दुर्बळाचा ।

---

१ वहिनी, भ्रातृपत्नी. २ सुदामा पाहे. ३ रिकाम्या हातानें. ४ न देऊन. ५पूर्वी आपण कांही देवाला दिलें नाहीं तर आपणास कांहीं मिळणार नाही. ६ " तूं भ-क्षिसी चोरुनिया शिदोरी " इत्यादि कृष्णानें ( ७३ ) श्लोकांत ह्मटलेंच. ७ किती दिवसांची मागील गोष्ट काढतो.८ स्त्रीचा.९देवीं.१०मानधुन ज्यापाशी आहे त्यास.

पुन्हा द्वारका देखिली संभ्रमानें, पहा पाहि हे घेतली कां भ्रमानें ॥ १०० ॥

आतां कृष्ण ह्मणेल आणिक घरा आला सुदामा खरा
मागायास, मनीं तयास हि गमे देवांचिया शेखरा ।
मोठा भोग पहा अहा पिडितसे आतां करावें कसें
येती लोक तयांसही पुसतसे गांवासमीपीं असे ॥ १०१ ॥

कोणाची नगरी दिसे महिवरी द्वारावतीचे परी
सज्जे आणिक माडिया तदुपरी विस्तीर्ण ते कुपरी ।
कृष्णानें रचिली नसेल हि पहा किंवा स्वयें दूसरी
इंद्राची अमरावती मज गमे पाहून ते कूसरी ॥ १०२ ॥

तों ते तयास वदती जनलोक सारे, हा मूर्ख केवळ असे पुसतो कसा रे ।
अद्यापि काय न कळेचि सुदामयाची, नीरत्न शोभित अशी नगरी जयाची ॥
आश्चर्य मानित असे मग तो मनांत, कृष्णा दरिद्र हरिलें अमुचें जनांत ।
कोणासही हरि तुझी करणी कळेना, माझें मला सुकृत तों तंव आकळेना १०४
विनापराधी जरि मी ह्मणूं रे, घडे मनीं दोष किती गणूं रे ।
परंतु तूं दीनदयाळ साचा, न आवरे पूर कृपारसाचा ॥ १०५ ॥
ज्यां दीधले मुष्टिभरूनि पोहे, तुझ्या कृपाब्धीं नर कोण पोहे ।
उत्पत्तिचें स्थान रमापतीचें, केलें तुवां आपुलिया रितीचें ॥ १०६ ॥

ऐसा पहा प्रेमभरें करूनी, सुखाश्रुबिंदू वदनावरूनी ।
ते चालती नावरती तयाला, सभोंवते हांसति कीं जयाला ॥ १०७ ॥

नेणोनि हांसति तया जनवृंद सारे, वेडा पहा द्विज अहा रडतो कसा रे ।
ऐश्वर्य येउनिहि कां सुखलेश नाहीं, आश्चर्य वाटत असे सकळा जनांही ॥

वाद्यें अश्वगजादि यानसह ते संमूख येती प्रजा
श्रीकृष्णें करुणार्णवें निज दया केली असे कीं द्विजा ।
गाती भाट अचाट घोष करिती थाटीं पुढें चालती
छत्रें चामरयुक्त मंडित दिसे सर्वत्रही बोलती ॥ १०९ ॥
जों पावला तों गजरें करूनी, गृहासि दारिद्र्य पहा हरूनी ।
सालंकृता स्त्रीसह लेंकरांसी, दृष्टीस देखे धनधान्यराशी ॥११०॥
जें पाहिजे तें परिपूर्ण देखे, दारिद्र्य स्वप्नांतहि जो न देखे ।

---

१ गोंधळला जाऊन, गडबडीनें. २ मोह. ३ सारखी. ४ गर्दी. ५ कौशल्य ६ पुण्य. ७ पोंहून जाईल; तरून जाईल. ८ आनंदाश्रु नेत्रांतून वाहून चालले. ९ वाहनें. १० बंदिजन; स्तुतिपाठक.

स्त्री पाहतो तों जसि उर्वशी[1] हो, तत्काळ जाली ह्मणतो कशी हो ॥१११॥
जो षड्गुणैश्वर्य दया तयाची, दारिद्र्य चिंताच सुदामयाची ।
हरी हरी ये रितिनें सुकानें, सांगीत भूपाप्रति कौतुकानें ॥ ११२ ॥
साम्राज्य वामन तयासहि वामनानें, केली कृपा अनुभवोनिहि या मनानें ।
ऐश्वर्य सां-सहित देहपुरींत ठेवी, ज्याची जनांस न कळे अनुभूति[3]ठेवी ॥
श्रीसद्गुरूच्या पदसारसा रे, अर्पूनियां काव्यमहारसा रे ।
साम्राज्य जाला कृत्यकृत्य लोकीं, तेणें स्वसौख्यासहि पावलों कीं ॥११४॥

॥ इति श्रीसुदामचरित्र संपूर्ण ॥

## गजेंद्रमोक्ष.

( कथेचा सारांश )

हाहा आणि हूहू हे दोन गंधर्व होते. त्यांस देवल ऋषीचा शाप झाल्यामुळें त्रिकूट पर्वतावर त्यांतील एक गज होऊन भटकूं लागला व दुसरा तेथें सरोवरांत नक्र झाला. पुढें तो गजेंद्र तृषार्त होऊन पाणी पिण्यास त्या सरोवरीं आला असतां त्या नक्रानें त्यास आंत ओढिलें. तेव्हां गजेंद्रानें श्रीकृष्णाचें स्तोत्र करून एक कमळ तोडून कृष्णास उद्देशुन टाकलें. तेव्हां श्रीकृष्णानें धांवत येऊन नक्रास मारून गजेंद्रास सोडविलें. व दोघांही गंधर्वांस शापमुक्त केलें.

चक्रायुध[4] स्वमरणार्तिसें[5] जो हरी तो, धांवे चढोनि खगराजभुजीं[6] अहो तो ।
चक्रेंचि नक्रमुख फोडुनि पाय हातीं, ओढी धरूनि हरि हा विधि हें पहाती १
नक्रें तळ्यांत धरिला प्रबळेंचि हस्ती, तो ये ह्मणे व्यथित[7] यूथप[8] पद्महस्ती[9] ।
सत्कीर्ति तूं श्रवणमंगल नाम नाथा सर्वेशं[10] आदिपुरुषा गति दे अनाथा २
गजा दे जो मुक्ती त्वरित विभु[11] नक्रासि दमुनी[12]
मुनी ज्याला शास्त्रीं हरि ह्मणति त्यालाचि नमुनी ।
कथा ते संक्षेपें कथिन वरि पक्षींद्रगमना[13]
मनामध्यें ध्यातों द्विरदवरदा[14] दुःखशमना ॥ ३ ॥

---

१ अप्सराविशेष. २ साहा. ३ अनुभव. ४ चक्र हेंच आयुध ह्म० शस्त्र ज्याचें. ५ आर्ति ह्म० दुःख. ६ गरुडाच्या खांद्यावर. ७ दुःखित. ८ कळपांचा पालक किंवा स्वामी जो गज. ९ पद्म हस्तांत धरणारा विष्णु येवो ह्मणे. १० सर्वांचा स्वामी. ११ प्रभु. १२ शिक्षा लावून. १३ गरुडावर बसणारा. १४ गजेंद्रास वर देणारा.

जळीं दांतें नक्रद्विरदपदमांसास्थि उकरी
करी प्राणत्यागा सुमति सुचली तो झडकरी ।
करी धांवा कीं वो सुलभ वर जो देवनिकरीं
करीं घे अर्पाया कमल पदपद्में सुखकरी ॥ ४ ॥
नसे ठावा ब्रह्मा न शिव अथवा श्रीपतिहरी
हरी जो तापातें उचलुनि कृपासिंधुलहरी ।
हरी वाटे काळा करिस विपती मृत्युभुजगा
जगाचा तूं ऐसा धनि कवण तो पाव मज गा ॥ ५ ॥
करी धांवो दुःखी ह्मणउनि कळे देवनिकरा
करावा तो मुक्त स्वशरण गमे श्रीप्रियकरा ।
करीं चक्रा शस्त्रा प्रभु उचलि यांनीं खगमनीं
मनीं साक्षी तो ये गज जळज घे जो स्वनमनीं ॥ ६ ॥
असा मी सर्वां त्यां त्रिदशनिकरां वंद्य सकळां
कळायाही ये त्यासह करि तया मुक्त विकळा ।
कळा प्रेतप्राय स्मरण करि त्यातें न अवधी
वधी नक्रातें त्या अवसरिं कृपाब्धी निरवधी ॥ ७ ॥
मृताच्या त्या तोंडामधुनि पद तो हा झडकरी
करीतें ओढेना प्रभुच करुणा मागुति करी ।
करी त्याचे पायां धरुनि उचली श्रीशुभकरीं
करींद्रा सारूप्य त्वरितगति दे मुक्तिनिकरीं ॥ ८ ॥
स्तवी ब्रह्मा शंभू त्रिदशपति तो मुक्तहि नवा
नवां भक्तींची हे गति दिधलि ज्याला अभिनवा ।

---

१ गजेंद्राच्या पायांतील मांस आणि अस्थि उकरी; 'मांसास्थि' बद्दल 'मांसास' असाही पाठ आहे. २ चांगली बुद्धि सुचली. ३ देवांच्या समुदायांत. ४ पायानें कमळ उचलून घेतलें. ५ हरण करी. ६ लाटा. ७ सिंह. ८ काळ हाच कोणी करी ह्म० हत्ती त्यास हरी हा हरी ह्म० सिंह आहे असें वाटतें. ९ वि ह्म० पक्षी त्यांचा स्वामी गरुड. १० मृत्युरूप सर्पास हरी हा गरुडच आहे असें वाटतें. " विपति " बद्दल " पळवी " असाही एक पाठ आहे. ११ " वदे दुःखी तेव्हां " असाही पाठ आहे. १२ वहनावर बसून; गरुडावर बसून. १३ आकाशांतून ये. १४ कमळ. १५ पाय. १६ " करी दों पायांतें सह उचलि यांनीं शुभ करीं " असाही पाठ आहे. १७ सारूप्य ह्म० ईशसमान रूप ज्यांत होतें ती मुक्ति. १८ समुदाय. १९ इंद्र. २० नवविधभक्तींची. २१ नवीन.

न वाटे त्यां सर्वां हरिविण धनी आणिक जगा
जगा या हे भक्ति प्रभु मग ह्मणे हें समजगा ॥ ९ ॥
भुजा चारी पीतांबरधर अशी मूर्ति बरवी
रवी जाणों हातीं रथचरण तें दीप्ति मिरवी ।
गदा एके हातीं जळजयुग दोहीं शुभकरीं
करींद्रा वैकुंठ त्वरित हरि दे देव निकरीं ॥ १० ॥
वदे तेव्हां सर्वां द्विरदवरद श्रीपति असा
असारीं संसारीं गजगति असी गातचि असा ।
पहाटे हें गाय प्रतिदिनिंहि माझें चरित रे
तरे दुःखाब्धी तो न परमपदींहूनि उतरे ॥ ११ ॥
गजाची जे मुक्ती क्रमुनि इतरां शक्ति नजनीं
जनीं गाती त्याला फळ परम या विष्णुभजनीं ।
जनीं भक्तस्वामी गजभजक हो गातचि असा
असारीं संसारीं ह्मणुनि विनवी वामन असा ॥ १२ ॥
॥ इति श्रीगजेंद्रमोक्ष समाप्त ॥

## भीष्मप्रतिज्ञा.

—:०:—

( कथेचा सारांश )

श्रीकृष्णानें भारतयुद्धांत मी स्वतः हातांत शस्त्र धरणार नाहीं, असें दुर्योधनाजवळ वचन दिलें होतें. पण पुढें भीष्म सेनापति झाला असतां त्यानें अशी प्रतिज्ञा केली की, जर मी खरा भगवद्भक्त असेन तर अर्जुनाचे रक्षणाकरितां श्रीकृष्णास शस्त्र धरावयास लावीन. मग अर्जुन शस्त्रप्रहारांनीं मूर्छित झालेला पाहून श्रीकृष्ण हातांत रथचक्र घेऊन भीष्मावर चालून गेले आणि भीष्माची प्रतिज्ञा खरी झाली.

---

१ " जगाया हे भक्ति प्रभुच ह्मणती ईश मज गा " असा एक पाठ आहे. २ रथचक्र हातांत होतें तें जणों सूर्यच हातांत आहे असें दीप्त दिसे. ३ दोन कमलपुष्पें. ४ " वदे तेव्हां सर्वांद्विरदवरदा श्रीपति असा " असाही पाठ आहे. ५ साररहित; निष्फल. ६ गजेंद्रास दिलेली गति. ७ उत्तम पदापासून भ्रष्ट होणार नाहीं; ही ह्या आख्यानाची फलश्रुति होय. ८ भक्तांचा गुरु जो गज त्यास.

लक्ष्मीनृसिंहचरणद्वयसारसाचा,[1] जो रेणु[2] मान्य वदती बहुसार साचा ।
प्रत्यूह[3]मत्तगजसिंह तया नमीतों, जाणें तयाहुनि कदापि न आनें[4] मी तों ॥ १ ॥
श्रोत्रयुग्म[5] परिपूत[6] कराया, सावधान जनमेजय राया ।
जो परेशरत[7] धन्य अहो तो, गोष्पदोपम[8] तया भव[9] होतो ॥ २ ॥
प्रतिज्ञा जे केली यदुकुळवरें[10] युद्ध न करीं
धरीना शस्त्रांतें कदनसमयीं[11] मी निजकरीं[12] ।
घडेना हें मिथ्या जरि तरि न मी भागवत[13] रे
प्रतिज्ञेतें भीष्में मनिं अवतिलें[14] या दृढतरें ॥ ३ ॥
पिता शांतनू माय ज्याची नदी[15] जे, स्वयें[16] शुद्ध ऐशास सन्मान दीजे ।
असा[17] गर्व तोही हरावा मनाचा, मनाचा असा भाव त्या वामनाचा[18] ॥ ४ ॥
नृपा ऐकिजे[19] युद्ध देवव्रताचें,[20] गमे हेंचि साफल्य तुझ्या व्रताचें ।
रथीं देखिले कृष्ण कौंतेय[21] दोघे, ह्मणे भीष्म माझ्या शरांतें यदो[22] घे ॥ ५ ॥
भीष्माकडे रव भयानक दुंदुभीचा,[23] होतां वदे तनय आनकदुंदुभीचा[24] ।
दुश्चिन्ह आजि गमतें मज सव्यसाची,[25] जाती शिवा[26] अशिव हे अपसव्य साची
गर्वोक्ति फाल्गुन[27] वदे जगदेकराया, आहे असा कवण तो झगडा कराया ।
म्यां काळखंज[28] वधिले अतुलप्रतापी,[29] पौलोमही असुर गोसुरविप्रतापी[30] ॥ ७ ॥
पितामह वदे तया[31] प्रबळ तूं पृथानंदना
रमेश रथिं सारथी चतुर वागवी स्यंदना[32] ।
स्वयें गतवयस्क[33] मी सरस वीर तूं रे नवा
भिडें रणधुरंधरा जय घडो सुखें वा[34] न वा ॥ ८ ॥

---

१ लक्ष्मी वामन पंडिताची माता व नृसिंह पिता याच्या चरणकमलाचा. २ रजःकण. ३ प्रत्यूह ह्म० विघ्न हाच कोणी गज त्यास मारण्यास समर्थ असा सिंहरूप रेणु. ४ अन्य. ५ दोन्ही कान. ६ पवित्र. ७ ईश्वराचे ठिकाणीं रत. ८ गाईच्या पावलाची उपमा ज्यास; अगदीं लहान. ९ संसारसमुद्र. १० यादवश्रेष्ठ; कृष्ण. ११ लढायीच्या वेळेस. १२ हातांत. १३ भगवद्भक्त. १४ धरिलें; आमंत्रिलें या शब्दापासून हा शब्द निघाला आहे. १५ गंगा. १६ "स्वयें बुद्धि ऐशाच" असाही पाठ आहे. १७ "असा" बद्दल "असो" पाठांतर आहे. १८ कृष्णाचा. १९ "ऐकिजे" बद्दल "ऐक तूं" पाठांतर आहे. २० भीष्म. २१ कुंतीपुत्र अर्जुन. २२ हे कृष्णा. २३ नगाऱ्याचा रव ह्म० ध्वनि. २४ वसुदेवाचा. २५ दोन्ही हातांनीं बाण मारणारा; अर्जुन. २६ भालु; कोल्ही. २७ अर्जुन. २८ राक्षसविशेष. २९ ज्यांच्या प्रतापास तुलना नाहीं असे. ३० गाई, देव, आणि ब्राह्मण यांस पीडा करणारे. ३१ "तवा" असाही पाठ आहे. ३२ रथाला. ३३ म्हातारा. ३४ होवो किंवा न होवो.

पारीक्षिता मग शरासन पांडवानें, ओढूनिया हुतवहार्पितखांडवानें ।
तो भीष्मदेह खचिला शरतांडवानें, ज्याच्या क्रिये सकळ पद्मभवांड वाने
गांगेय कोपा चढला कसा रे, ज्या मानिती हाचि कृतांत सारे ।
गर्जोनियां सिंहरवें जयातें, पाहे जणों मारिल आजि यातें ॥ १० ॥
त्वां काय कर्म करिजे लघुलेंकरानें, बोलूनियां मग धनू धरिलें करानें ।
तों व्यापिलें सकळ सैन्य महाशरांनीं, ग्रीष्मीं जसा पतित होय हुताश रानीं॥
तो स्तोमें येतां बहु सायकांचा, झालाचि पार्थव्यवसाय कांचा ।
काचावला वीर पुढें धसेना, झाली नृपा सर्व भयांध सेना ॥ १२ ॥
पुष्पवर्ण नटला पळसाचा, पार्थ सावध नसे पळ साचा ।
पाहिलें जंव निदान तयाचें, तों दिसे वदन आनत याचें ॥ १३ ॥
प्रतोद मग ठेविला उतरला रथाधस्थळीं
झणे प्रबळ भीष्म हा जय घडे न या दुर्बळीं ।
करीं कमलनेत्र तो पतित चक्र तें स्वीकरी
प्रमोद यमनंदना बहु तसा यशस्वी करी ॥ १४ ॥
असा येतां देखे रथनिकट तो शामळ हरी
नृपा गांगेयाच्या हृदयिं भरल्या प्रेमलहरी ।
शरातें चापातें त्यजुनि वदला गद्गदरवें
जगन्नाथें केलें मज सकळलोकांत बरवें ॥ १५ ॥
ये रथावरि त्वरें यदुराया, खड्ग देइन विकोश कराया ।
तोडिं मस्तक पडो चरणीं या, धन्य होइन तदाच रणीं यां ॥१६॥
श्रीमाधवावांचुनि आन देवा, भजें तरी हो मज आण देवा ।
तुझीच कीं वाहतसें हरी रे, मिथ्या तरी हे झडु वैखरी रे ॥१७॥

---

१ हे जन्मेजय राजा. २ धनुष्य. ३ हुतवह म्ह० अग्नि त्यास अर्पिलें आहे खांडव वन ज्यानें; अर्जुनानें अग्नीस खांडववन देऊन तृप्त केल्याची कथा भारतांत प्रसिद्ध आहे. ४ शरसमूह. ५ ब्रह्मांड. ६ वाखाणी. ७ प्रत्यक्ष हाच यम आहे. ८ अर्जुनास. ९ उन्हाळ्यांत. १० पसरतो. ११ अग्नि. १२ समूह. १३ बाण. १४ प्रयत्न. १५ कच्चा; शिथिल. १६ भ्याला. १७ पळसाच्या पुष्पाप्रमाणें पार्थ रक्तानें लाल झाला. १८ क्षणभर. १९ खालीं केलेलें. २० चाबूक. २१ रथाखालीं. २२ पडलेलें चाक. २३ धर्मराजास. २४ मेघवर्ण. २५ गंगापुत्र भीष्म. २६ प्रेमाश्रूंच्या धारा. २७ कंठ दाटून. २८कोश म्ह० तरवारीचें म्यान् तद्रहित; कोशांतून बाहेर काढून मारण्यास खड्ग देतों ये. २९ समरांत. "सदाच रणीं या" असाही पाठ आहे. ३० अन्य; दुसरा. ३१ तुझीच शपथ वाहतों. ३२ वाणी.

मारावें मजला असेंच असलें चित्तीं तुझ्या केशवा
तें मातें मग कोण रक्षिल पहा विश्वेश नाकेश वा ।
हा मुख्यार्थ जनार्दना मज गमे भक्तप्रतिज्ञा खरी
कीजे सर्वजनांत होइल मृषा हे आपुली वैखरी ॥ १८ ॥

हें भीष्मवाक्य परिसोनि जगन्निवासें, केलें त्रिलोकन मृदुस्मित पीतवासें ।
वेगें फिरोनि चढला मग तो रथातें, पार्थाचिया पुरविणार मनोरथातें ॥१९॥
ज्याच्या कलत्र सकला श्रुति सारसाक्षी, जो जाणता सकलसंसृतिसारसाक्षी ।
त्या भीष्मभाव कळला वसुदेवजाला, आदित्य रुद्र नमिती वसु देव ज्याला
ताताभिधा नृहरिपंडित माय लक्ष्मी, जे सर्वदा सुगुणयुक्त उदार लक्ष्मी ।
शांडिल्य गोत्र कुलदेव नृसिंह ज्याचा, दासानुदास निज वामन हो अजाचा
इति श्रीभीष्मप्रतिज्ञा. ॥ २१ ॥

## जयद्रथवध.

—:०:—

### ( कथेचा सारांश. )

अभिमन्यु रणांत पडला असतां त्यास जयद्रथानें लत्ताप्रहार केला ह्मणून अर्जुनानें सूर्य अस्तास गेला नाहीं तोंच जयद्रथास मारीन अशी घोर प्रतिज्ञा केली ती श्रीकृष्णाने शेवटास नेली, ही कथा ह्या आख्यानांत आहे. हें आख्यान वामन पंडितांचेंच आहे अशाविषयीं संशय आहे.

सौभद्रशोकविवशें रचिलें पणातें, कुंतीसुतें समजल्याविण आपणातें ।
तें वाक्य सत्य करवी तव पूर्वजाचें, श्रीकृष्णनाम भज त्यासि अपूर्व ज्याचें १
मी मारीन जयद्रथासि समरीं जों भानु आहे नभीं
नाहीं होमिन देह हा हुतवहीं सर्वात्मना मी न भीं ।
ऐसें बोलुनि वाक्य त्या परिस तो केला असा नेम रे
रक्षूं त्यासि बळें घडो मग तसें तो स्वापमानें मरे ॥ २ ॥

---

१ नाक ह्म० स्वर्ग त्याचा ईश ह्म० स्वामी. २ अथवा. ३ करावी. ४ खोटी. ५ स्वल्प हास्य केलें. ६ पीतांबरधारी कृष्णानें. ७ स्त्री. ८ वेद. ९ कमलाक्षी. १० द्रष्टा. ११ वसुदेवपुत्राला. १२ द्वादश आदित्य, एकादश रुद्र, अष्ट वसु, प्रजापति व वषट्कार असे तेहतीस देव. १३ वामनपंडिताच्या वडिलांचें नांव नरहरिपंडित, मातेचें नांव लक्ष्मी, गोत्र शांडिल्य व कुलदैवत नृसिंह होतें, त्याचा येथें त्यांनीं उल्लेख केला आहे. १४ अभिमन्यूच्या वधामुळें दुःखाधीन होऊन. १५ अर्जुनानें. १६ असेल.

यानंतरें जथुनि कौरवराजसेना, आली कशी अवनिमंडल जें दिसेना ।
तों पार्थसैन्यहि सवेंचि निघे रणाला, ज्या इंद्रही परि नव्हे क्षम वारणाला ॥

सूचीव्यूह तयांत पद्म रचिलें राहे तदभ्यंतरीं
राजा सैंधव तो जयद्रथ तरी चिंता करी अंतरीं ।
व्यूहाच्या वदनीं कृतांतसमसा आचार्य राहे बळें
जे जे ज्या स्थळिं ठेविले नृपवरें ते राहिले तुंबळें ॥ ४ ॥

वदे कृष्ण पाहें नरा द्रोण हा रे, समस्तास्त्रवेत्ता रणीं जो न हारे ।
जयाचे शरत्रांत भात्यांत कोरे, तयाशीं वृथा झुंज लावूं नको रे ॥ ५ ॥

पंचाशीति जयासि वर्षगणना आपांडुता मस्तकीं
युद्धीं द्रोण तथापि दुर्धर दिसे हस्ती जसा मस्त कीं ।
पार्था तूं न भिडें तयासह नको तो आजि नाटोपतो
पाहा दुःसह वाटतो मज रणीं याचा खेटाटोप तो ॥ ६ ॥

नमस्कार दूरोनियां सव्यसाची, करी बाणयोगें गुरूला तसाची ।
सवेगें पुढें तो पृथापुत्र धांवे, यदर्थ प्रतिज्ञा तयातें वधावें ॥ ७ ॥

सव्यापसव्यकृतसायकतांडवानें, केलें पराजित रणीं रण पांडवानें ।
घालूं शके कवण यावरि वीर घाला, जैसा मृगांत मृगराज तसा निघाला ८

कौंतेयाप्रत देवकीय वदला हे भागले वाह रे
जाले फार तृषार्त यत्न करणें जेणें पिपासा हरे ।
बोले पार्थ जळासि यांसि जपतों मी वारुणास्त्रा रणीं
या वीरांसहि वारितों गज जसा सक्रोध आधोरणीं ॥ ९ ॥

तत्काळ वापी रचिलीच पार्थें, वारोनिया वीर बळें अपार्थें ।
केले युगापासुनि मुक्त देवें, सवेंचि ते घोटक वासुदेवें ॥ १० ॥

आर्द्रपृष्ठ हय पाजुनि पाणी, दों करीं चतुर नीरजपाणी ।
देखतां कुतुक सैनिक सारे, बोलती प्रबळ पार्थ कसा रे ॥ ११ ॥

---

१ जमून. २ निवारण करण्यास. ३ पद्माकार वीरांची रचना. ४ सिंधुदेशचा राजा जयद्रथ. ५ यमासारखा. ६ द्रोणाचार्य. ७ अर्जुना. ८ हरला आहे; पराभव पावे. ९ बाणसमुदाय. १० पंचायशी वर्षें. ११ पांढरे केश. १२ तयारी; आडंबर. १३ अर्जुन. १४ दोन्ही हातांनीं बाण सोडणाऱ्या अर्जुनानें. १५ सिंह. १६ देवकीपुत्र कृष्ण कुंतीपुत्र जो अर्जुन त्यास. १७ घोडे. १८ तृषा; तहान. १९ विहीर; तलाव. २० उपकासाठीं २१ जूं. २२ घोडे. २३ नीरज म० कमल आहे हातांत ज्याच्या असा कृष्ण.

धों धों दुंदुभि वाजल्या उचलला सैन्यीं धुरोळा नभा
गेला सर्व दिशा तमोमय पहा जाला रवी हीनभा[1] ।
मारावा व्यसनस्थ पार्थ वदती आहे रथावेगळा
होतां सज्ज कदापि हा न उतरे काळाचियाही गळां ॥ १२ ॥
राजे मद्रप शाल्व सैंधव शिबी त्रैगर्त कांबष्ठ जे
हांग भ्रांग कलिंग वंग यवन प्राग्जोतिषावंत जे ।
इत्याद्यद्भुत-कोप-कोपनिभृत-स्वाकर्षचाप-स्वरें
आले सन्मुख तेक्षणीं विमुख ते केले प्रतापें नरें ॥ १३ ॥
शाखामृगध्वज[2] बहूत विशाळ वाटे, यासी भिडाल तरि लाविल मृत्युवाटे ।
गांडीवमुक्त शर वाजति हे सणाणा, ऐसा धनुर्धर कसा स्वमनासि नाणा[3] १४
कां उकावत असां परतावें, आमुच्या तरि मतें परतावें ।
गर्जतो विजय दुर्गमरावें[4], कां अशासि खवळोनि मरावें ॥ १५ ॥
संजोगिले[5] तुरग शीघ्र रथासि देवें, केलें पहा सुकृत पांडुसुतें सदैवें ।
दे हात पार्थ चढतां स्वरथावरी तो, एक्या करें हयचतुष्टय[6] सांवरीतो ॥ १६
होतां असा मग रथारुढ कैटभारी, बोले नैरा[7] मन तुझें न भया उभारी ।
अस्ताचला स्वतिलकीकृत भानु गेला, वेड्या जयद्रथवधास्तव तूं भुकेला १७
हें क्लिष्टवाक्य पडतां श्रवणीं विलोकी, सूर्याकडे मग ह्मणे मुख केंवि लोकीं ।
दावूं अतःपर करूं न शकें पणातें, हें वाक्य सत्य करिं होमिंन[8] आपणातें १८
अच्यूत हें समजला जगदांतरात्मा, बोले शतक्रतुसुताप्रति[9] तो महात्मा ।
कां धाकलास इतक्यांतचि यां वधाया, पाहे कशी रचितसें निजयोगमाया १९
तुझें उणें या स्वजनीं दिसावें, रथीं तुझ्या त्यां[10] मग कां बसावें ।
मनीं असे कार्य तुझें सजावें, उगेंचि वाटे मज तूं खिजावें ॥ २० ॥
साधावया अर्जुनकामनेला, अस्तासि मार्तंड[12] निकाम[13] नेला ।
प्रमोद[14] जाला धृतराष्ट्रजाला[15], कीं आज हा सैंधव[16] वीर जाला[17] ॥ २१ ॥
समीप आले नृपलोक सारे, पाहों मरे अर्जुन हा कसा रे ।
कोणी नरासी करिती खटाळी, ते मारिती हांसुनि मूर्ख टाळी ॥ २२ ॥

---

१ निस्तेज. २ शाखामृग ह्मणजे वानर तो आहे ध्वजाचे ठायीं ज्याच्या असा अर्जुन. ३ आणीत नाहीं. ४ मोठ्या शब्दांनीं. ५ संयोगिले; जोडिले. ६ चारी घोडे. ७ हे अर्जुना. ८ नाहीं तर अग्नींत देह टाकीन. ९ इंद्रपुत्र जो अर्जुन त्यास. १० त्यालास. ११ या जयद्रथास. १२ सूर्य. १३ अत्यंत, भगदीं. १४ आनंद. १५ धृतराष्ट्रपुत्रांस. १६ सिंधुदेशचा राजा जयद्रथ. १७ पुनः जन्मला.

पार्था रे रवि हा जयद्रथहि हा हें लक्षे लावीं बरें
बोले अर्जुन लाविलें हरि वदे मारीं, जगच्छेखरें ।
ऐसें त्याप्रति बोधितां झडकरी त्या सैंधवाचा गळा
नेला तोडुनि अर्धचंद्रविशिखें कीं मस्तकावेगळा ॥ २३ ॥
आधींच पार्था सुचवोनि देवें, तो वारिला योगहि वासुदेवें ।
तों देखिला भास्कर सैनिकांहीं, उपाय तेव्हां न चलेचि कांहीं ॥ २४॥
दुर्योधनादिक सशोक सलज्ज जाले, त्यांचे प्रमोदभरदीपक ते विझाले ।
केला जयीं विजय दुर्जय वासुदेवें, हें वाचिजे हरिकथामृत कीं सदैवें ॥२५॥
श्रीशक्ति कर्ण मग भीमसुतासि मारी, त्याचा प्रताप बहु तीव्र त्रिरासि मारी ।
तें आयका वदत वामन लीनवाचा, मेला पुढें तनय द्रोण अशी कुवार्ता २६

॥ इति श्रीजयद्रथवध समाप्त ॥

## दंपत्यचरित्र किंवा अश्वस्नान.

धर्मराजाच्या अश्वमेधार्थ सोडलेल्या अश्वास घेऊन अर्जुन दिग्विजय करून परत आल्यावर त्या घोड्यास स्नान घालण्याकरितां चौसष्ट दंपत्यें कलश घेऊन भागीरथीस उदक आणण्यास चालली त्यांत श्रीकृष्ण आणि रुक्मिणी ह्यांही दंपत्याची योजना झाली. कृष्ण पुढें चालला आहे, रुक्मिणीनें शिरावर घागर भरून घेतली आहे, उभयतांच्या पदरास गांठ दिली आहे; अशा प्रसंगाचें वर्णन ह्यांत आहे ह्मणून ह्या आख्यानास "दंपत्यचरित्र किंवा अश्वस्नान" असें नांव दिलें आहे.

कर्णी पृथेच्या घननीळ लागे, त्यां मेहुणांमाजि गणीं मला गे ।
इच्छा मला ते बहु वाटते हो, विप्रांसवें पाहिन वाट ते हो ॥ १ ॥

१ नेम. २ जगच्छेखरें ऐसें त्याप्रति बोधितां असा अन्वय. जगच्छेखर ह्म० कृष्ण. ३ अर्धचन्द्राकृति बाणानें. ४ तो कुयोग. ५ आनंदरूप तेलानें भरलेले दीप; अर्थात् त्यांचा आनंद नाहींसा झाला. ६ अर्जुन. ७ जिंकण्यास कठीण. ८ भाग्यवंतांनीं. ९ भीमपुत्र जो घटोत्कच त्यावर कर्णानें शक्ति घातली. १० अश्वत्थामा मेला अशी खोटी वार्ता उठली असतां द्रोणानें धर्मास विचारिलें तेव्हां धर्मानें 'नरो वा कुंजरो वा' असें उत्तर दिल्यावर द्रोणानें आपणास मारूं दिलें. यावरून या वामनानें घटोत्कचवध व द्रोणवध हीं प्रकरणें लिहिलीं असावीं असें वाटतें, ११ कुंतीच्या. १२ त्या चौसष्ट दंपत्यांत.

कुंती ह्मणे त्या कमलापतीतें, योजूं कसी मी तुज दंपतीतें ।
न पाहवे रे तुझिया पदांतें, जे छेदिती सर्वहि आपदांतें ॥ २ ॥

हंसतवदन कुंती बोलली श्रीहरीतें
धरिल कसि शिरीं रे रुक्मिणी घागरीतें ।
पदतल मृदु तैसे स्कंधही रम्य पाणी
सजल घट धराया योग्य ना चक्रपाणी ॥ ३ ॥

माझें शरीर तरि हें समुळीं वृथाहो, ऐकोनिया वचन हास्य करी पृथाहो ।
होऊनि दंपति हरी तरि काय जासी, हें ऐकतां बहुत हर्ष असे अजासी॥४॥
जो धन्य देह झिजतो द्विजधर्मकामीं, तो घेउनी नच करीं तरि धर्म कां मी ।
बोलोनिया वचन हें हरि चालिलाहो, 'घे रुक्मिणी घट करीं' मग बोलिलाहो
स्वामी बरें ह्मणुनि ती घट घे स्वहातीं, ऐकोनियां नृप ऋषी नयनीं पहाती ।
जीचे कृपेंकरुनियां विधि सर्व चाले, ते आदिशक्ति घट घेउनि मार्ग चाले६

करातें जोडूनी विनवित असे पद्मनयना
नव्हे योग्य स्वामी तुज तरि असें शेषशयना ।
तुझ्या नामीं झाले रत जन तयां सौख्य करिसी
असा तो तूं माझ्या सदनिं सखया काम करिसी ॥ ७ ॥
जगन्नाथा देवा सलगि तुजसीं फार करितों
न जाणूनी तूतें सुहृदकुळिचा भाव धरितों ।
न सांगावें तेंही करिसि करवीतों अभि तुला
वदोनीया ऐसें यदुतिलक साष्टांग नमिला ॥ ८ ॥
हरी बोले प्रेमें स्तविसि नृपति व्यर्थ मजला
जसे बंधू भीमार्जुन गृहिं तसा मीहि तुजला ।
तुझ्या कार्यासाठीं सगुण मजला देह धरणें
असोनीया ऐसें जइं न करिं तें व्यर्थचि जिणें ॥ ९ ॥

---

१ दुःख; विपत्ति. २ हास्यमुख करून. " हंसत वदत कुंती आणखी त्या हरीतें " असाही पाठ आहे. ३ खांदा. ४ हात. ५ पाण्यानें भरलेली घागर. ६ जन्मरहित जो कृष्ण त्यास. ७ ब्राह्मणाच्या आणि धर्मराजाच्या कामीं. ८ रुक्मिणी. ९ " आश्चर्य ते नृप इ० " असा एक पाठ आहे. १० कुंती. ११ ह्या श्लोकांत धर्माची उक्ति आहे असें दिसतें. १२ मित्रभाव. १३ हे धर्मराजा. १४ " जसे बंधू भीमार्जुन सकल तैसा मि तुजला" असा एक पाठ आहे. १५" वदोनियां ऐसा " असा दुसरा पाठ.

स्त्रिया बंधू पुत्रांसहित अवघे काम करुनी
नव्हे उत्तीर्णातें अनुदिनिं असें मानित मनीं ।
तुझ्या अश्वस्नाना उदक जरि आणील रमणी
तरी हे होईल त्रिभुवनसतीमस्तकमणी ॥ १० ॥

बोलोनियां हें हरि चालिला हो, भागीरथीचें तट पावलाहो ।
भरूनि दे कुंभ रमाशिरीं हो,आश्चर्य ऐसें हरि तो करी हो ॥११॥

पदर उभयतांचे बांधिले कौतुकानीं
कुरुपतिललनांहीं ऐकिली मात कानीं ।
अभिनव मग तोहीं देखिला पूतनारी
घटसहित सवें ते चालिली पूत नारी ॥ १२ ॥

ह्मणे मस्तकीं वेदना काय होते, हरी बोलतां बोलिली श्री अहो ते ।
नसे धर्मकार्जी कदा खेद मातें, रमा बोलिली वाक्य सर्वोत्तमातें ॥१३॥

विशेष तुझ्या हरि संनिधानें, जे राहती त्यां सुख सावधानें ।
मी धन्य होतें द्विजधर्मकामीं, नाहीं तरी मी अवघी रिकामी ॥१४॥

वाद्यांसहीत ऋषि ते नृपसन्निधानें
आले शिरीं कलश घेउनियां निधानें ।
तो न्हाणिला हय करें अवनीपतीचा
श्रीकांत भक्तजनवत्सल या रितीचा ॥ १५ ॥

अपारें अशीं भक्तकामें करीतो, पदीं आपुल्या नेतसे लोकरी तो ।
कथेच्या रसें शुद्ध केलें मनाला, कलीमाजि या तारिलें वामनाला ॥१६॥

॥ इति श्रीदंपत्यचरित्र समाप्त ॥

## शुकाष्टक.

चिंध्या न सांपडति काय उग्याचि वाटे, कंथेनिमित्त जरि शीत तनूस वाटे।
ऐसें असोनि ह्मणतो शुक वाक्य कीं कां,ज्ञाते भले भजति दुष्टधनांधलोकां॥
अन्नाविणें विकल देह ह्मणाल होतो, भिक्षाशनें भजनहेतु जितांचि होतो ।

१ माझी स्त्री रुक्मिणी. २ तिन्ही लोकांच्या साध्वीस्त्रियांमध्यें शिरोमणि ह्म० श्रेष्ठ होईल. ३ पवित्र स्त्री रुक्मिणी. ४ "असें ऐकतां बोलली" असा दुसरा पाठ. ५दुसरा पाठ "जे राहती त्या सुखराजधानी" ६ घोडा. ७ पृथ्वीपति धर्म त्याचा. ८ मार्गी. ९ मोधडी करण्यास वाटेंत पडलेल्या चिंध्या मिळत नाहींत काय १० भासे. ११ गलित. १२ भिक्षान्नानें. १३ " भजनहेतुहि पूर्ण होतो " असा एक पाठ आहे.

तें तों मिळेचि ह्मणतो शुक, यावरी कां,ज्ञाते भले भजति दुष्टधनांधलोकां २
कोठें मिळे न जरि भैक्ष्यहि याप्रकारीं, बोले तरू नसति काय परोपकारी।
ऐसें असूनि ह्मणतो शुक यावरी,कां, ज्ञाते भले भजति दुष्टधनांधलोकां ॥३॥
पाणी अगत्य तरि पात्रमिसें अपेक्षा,त्याची भले न धरिती करिती उपेक्षा।
कीं आटती शुक ह्मणे न नद्या अहो कां, ज्ञाते भले भजति दुष्टधनांधलोकां ४
राहावया मठ गृहादिक तों सजावें, त्याकारणें जरि धनांधगृहास जावें।
कोणी गुहा शुक ह्मणे न निरोधिल्या कां,ज्ञाते भले भजति दुष्टधनांधलोकां ५
भोगीं विरक्त हरिभक्त नसे असोशी, भिक्षाशनादिक तथापि न देह सोशी।
त्याला ह्मणे हरि उपेक्षिल काय हो कां,ज्ञाते भले भजति दुष्टधनांधलोकां ६
ऐसें ह्मणे शुक तथापि हरीस योग,-क्षेमार्थ सेविति तयांस न भक्तियोग।
कीं तो सकामी[11] इतुकी जरि वासनाही,त्याचा शुकोक्तें[12] मग भार हरीस नाहीं७
प्रारब्धनिष्ठ सुखदुःख समान पाहे, देतो स्वभक्ति हरि त्यासि ह्मणे कृपा हे।
त्याचें अगत्य पुरवी हरि लौकरी तो, किंवा अहो सहनशील तया करीतो८
ज्यावीण देह न चले हरि लौकरी तो, दे अर्थ कीं दृढशरीर असें करीतो।
भिक्षाशनादि मग तो स्वमुखेंचि सोशी, ज्याला नसे विषयभोग सुखीं असोशी
योगभ्रष्टासि[13] जन्म द्विविध[14] हरि वदे अर्जुनातें विशेषें
त्यांत श्रीमंत योगी शुचिगृहिं उपजे भोगवांछाविशेषें ।

---

१ भिक्षान्न. २ उपकार करणारे. ३ उदक जरी जरूरीचें आहे तरी भले ह्म० साधुलोक पात्राची आपेक्षा करीत नाहींत. ४ "कीं आटल्या शुक ह्मणे न नद्या जर्यी कां" असा दुसरा पाठ आहे. ५ धनानें उन्मत्त झालेल्या लोकांच्या घरास. ६ पर्वतांच्या दरी कां कोणी बंद करून ठेविल्या ह्मणून घर बाधण्यासाठीं धनांधांकडे जावें. ७ हरिभक्त हा भोगाविषयीं विरक्त असून त्यास कशाचीच आशा नसते. ८ आशा. ९योगक्षेम ह्म०चारितार्थ;जे आपला चरितार्थ व संसार चालण्यासाठींच केवळ हरीस भजतात त्यांस भक्ति कोठची? १० 'कीं तो' याबद्दल 'किंवा' असा एक पाठ आहे. ११ तो मनांत फलेच्छा धरून भक्ति करणारा. १२ शुकाच्या वचनावरून सकामभक्ति करणाराच्या चरितार्थ चालविण्याचा भार हरीवर नाहीं. १३ भगवद्गीतेंत (अध्याय ६ श्लोक ३७,३८,३९; ) यांत अर्जुनानें प्रश्न केला कीं कोणा योग्याचें मनःसंयमन न झाल्यामुळें चालित झालें तर त्यास काय गति होते? त्यावर श्रीकृष्ण उत्तर करितात. तो भ्रष्ट योगी पुण्य कर्में करणारा असल्यामुळें दुर्गतीला जात नाहीं. तो पवित्र अशा श्रीमानाच्या घरीं अथवा बुद्धिमान अशा योग्याच्या कुळामध्यें जन्माला येतो व पूर्वजन्मींच्या बुद्धिसंस्काराची त्यास प्राप्ति होते आणि योगसिद्धि मिळण्याचा तो पुनः यत्न करितो. १४ दोन प्रकारचे. श्रीमंतांचे घरीं किंवा योग्याचे कुळीं.

भोग श्रीमंत भोगी तरि मति[1] पहिली पावतां देवदेवा
वैराग्यें सेवितो तो सकळ सहनता सत्सदन्नादि देवा ॥ १० ॥
सुखी देह जो जो कदन्नासि सोशी, सदन्नादिही घे नसोनी असोशी ।
द्विधाही ह्मणे उत्तमश्लोक पाळी, सुखें भोगवी भोग जे जे कपाळीं॥११
रक्षी न काय अजित स्वपदाब्जदासां,तें बोलिला शुक असें असिया उदासां।
भावार्थ हा निवडिला स्फुट वामनानें, मानूनि निश्चय असा बरवा मनानें ।

॥ इति श्रीशुकाष्टक समाप्त ॥

---

१ पूर्वजन्माचा बुद्धिसंस्कार. २ उत्तम अन्नें. ३ वाईट अन्न, अपौष्टिक अन्न.
४ स्वचरणकमलाचे दास त्यांस.

# करुणाष्टक

लोपोनि भास्कर जयद्रथ मारियेला, लज्जा[1]नळांतुनि धनंजय वांचवीला ।
लाक्षागृहीं विवरें पांडव रक्षियेले, माझेविशींच मन निष्ठुर कंवि केलें॥१॥
दुग्धा मिषें *द्विजसुतें स्तविला मुरारी, दुग्धा[2]र्णवीं अचल ठेविसि पुतनारी ।
कुब्जे[3]चि भक्ति तरि देखुनि क्षेमें[4] दीलें, माझेविशींच मन निष्ठुर कंवि केलें २
आणोनि राजतनया[5] अधमें[6] सभेला, दुष्टोत्तरें करवि नग्न जरी सतीला ।
तीकारणें स्वकरिं अंबर[7] नेसवीलें, माझेविशींच मन निष्ठुर कंवि केलें॥३
उत्तान[8]पाद नृप केवळ पुण्यराशी, तत्सूत तो ध्रुव तपोधन योग[9]राशी ।
त्याकारणें अचळ[10]धाम करून दीलें, माझेविशींच मन निष्ठुर कंवि केलें॥४॥
नक्रें जळांत चरणीं धरिलें गजेंद्रा, स्नानोत्तरें करुनिया स्तवि देव-इंद्रा ।
तें दीनबंधु ब्रिद सत्वर रक्षियेलें, माझेविशींच मन निष्ठुर कंवि केलें ॥५॥
वृत्रा[11]रि कोपुनि शिळाघन वर्षवीला, तेव्हां भयप्रलयकंप गमे जनाला ।
घेवोनि त्या गिरि करीं व्रज रक्षियेलें, माझेविशींच मन निष्ठुर कंवि केलें६
सिंधू[12]जळांत कनका[13]पुर दूर गांवें, तेथोनि शीघ्रगति †मोक्षपुरीस यावें ।
काष्टाग्नि घे भरत दर्शन त्यासि दीलें, माझेविशींच मन निष्ठुर कंवि केलें७
जें[14] शापें[15]दग्ध पडली बहुतां दिसाची, लावोनि पाय हरिली जडता[16] तियेची ।
त्या भक्तवत्सलपणाप्रति काय झालें, माझेविशींच मन निष्ठुर कंवि केलें॥८।
दुर्योधनें ऋषि[17]स धाडियलें वनातें, धर्मा छळूनि मुनि मागति भोजनातें ।
त्यांकारणें परम अन्न निशीं[18]तें दीलें, माझेविशींच मन निष्ठुर कंवि केलें ९
दारिद्रतेकरुनि पीडित तो सुदामा, मुष्टीभरूनि पृथु[19] आणित कृष्णधामा
देऊनि कांचन[20]पुरी द्विज[21]राज केलें, माझेविशींच मन निष्ठुर कंवि केलें॥१०॥
त्रिकाळीं करा घोष या अष्टकाचा, मनींचा पुरे अर्थ[22] तेव्हांच साचा ।
विनंती असे भक्त हो वामनाची, उपेक्षा न कीजे यया अष्टकाची ॥११ ॥

॥ इति श्रीकरुणाष्टक समाप्त ॥

---

१ लज्जारूप अग्नीतून. २ दुग्धसमुद्रीं. ३ कंसाचे गृहांतील कुरूप दासी. ४ आलिंगन. ५ द्रौपदी. ६ अधम दुर्योधन त्यानें. ७वस्त्र ८ सूर्यवंशीय राजा ध्रुवाचा पिता. ९ योगी. १० ध्रुवपद; अढळपद. ११इंद्रानें गोकुळांत अतिवृष्टि केली तेव्हां तूं गोवर्धनगिरि उचलून व्रजाचें रक्षण केलेंस. १२ समुद्रांत. १३सुवर्णपुरी लंका. १४ अहल्या. १५ पतीच्या शापानें. १६ पादस्पर्शानें शिळा होती तिची पुनः स्त्री केली. १७ दुर्वासादि ऋषींस. १८रात्रीत. १९पोहे. २० सुवर्णनगरी. २१ ब्राह्मणांचा राजा केलें. २२काम. *उपमन्यु. †अयोध्या, मथुरा इत्यादि सप्त मोक्षपुरी प्रसिद्ध आहेत.

# दशावतार.

—:०:—

मी नमीन हरि–मीने[1] मनानें, जो सुरीं स्तवियलो[2] नमनानें ।
वेद घेउनि जळींच पळाला, शंख[3] दैत्य, वधि त्या चपळाला ॥ १ ॥
कासवें[4] धरुनि मंदरें[5] साचा, मंथिला जलधि मंद रसाचा ।
देव हो अमृतपान करा या, दानवांवरि कृपा न कराया ॥ २ ॥
जो हुताशन[6] खरा हवनाचा, तोचि होउनि वराह वनाचा ।
उद्धरी क्षिति रसातळगामी[7], तोचि[8] हो तुरगसा[9] चलगामी ॥ ३ ॥
लांकडामधुनि[10] देव निघाला, घातला दितिसुतावरि[11] घाला ।
दुर्जनांसि गति या दमनेची[12] । जे न राखतिल याद[13] मनाची ॥ ४ ॥
याचिली बळिस भू[14] पदमानें[15], स्थापिला प्रबळ भूप दमानें ।
थोरें[16] लाभ मख[17]–आचरणाचा, लाभ जो हरिचिया चरणांचा ॥ ५ ॥
जें प्रयुक्त मुनि[18] भार्गव हातें, तें रिपूवरिच शस्त्र वहातें ।
त्या भयें युवति[19] बालक रानीं, धावती धरुनि बाल करांनीं ॥ ६ ॥
मेळवोनि रिसें[20] वानर जाती, त्यांत दोघे[21] जण ते नर जाती ।
राक्षसाधिप[22] वधूनि करानें, आणिली निजवधू निकरानें ॥ ७ ॥
देवकी[23]-उदरिंचा सुत आठवा, तो हरी पळ पळांतरिं आठवा ।
अलभ हा सुलभ जो ऋषिदेवां, लाधला स्वसुतसा वसुदेवा ॥ ८ ॥
देखतां बहुत चोज[24] लपाला, सेविताति मुनि हो जठ पाला ।
बुद्धिगोचर[25] तरी गवसेना, एक ठायिं परि नित्य वसेना ॥ ९ ॥

---

१ मत्स्यावतार धरणारा हरी. २ ' विनविला ' असें एक पाठांतर आहे. ३ शंख (शंखासुर) दैत्य वेद घेऊन जळीं पळाला त्या चपळाला वधी असा अन्वय. ४ कच्छरूप धरून. ५ मंदराचल. ६ अग्नि. ७ पातालांत गेलेली. ८ ' जो दिसेच तुरगांत लगामी ' आणि ' जो दिसे सुरनगातळगामी ' असे दोन पाठ आहेत. ९ घोड्यासारखा चपळ. १० नृसिंह. ११ इतर असुरांप्रमाणें हिरण्यकशिपु हाही दितीचाच पुत्र होता. १२ शिक्षा. १३ स्मृति. १४ त्रिपादभूमी. १५ पावलाच्या मापानें. १६ " थोर लाभ मजलाचि रजाचा, भार जो हरिचिया चरणाचा । " असाही पाठ आहे. १७ यज्ञ. १८ परशुराम. १९ क्षत्रियराजांच्या स्त्रिया. २० अस्वल. २१ रामलक्ष्मण. २२ रावण. २३ या श्लोकाबद्दल पुढील श्लोक आढळतोः— " जो क्षणे त्वरित कंस वधावा, या क्रियेंकरुनि वास वधावा । तो पहा हरि निवास कळांचा, जीवरूप बरवा सकळांचा ॥ " २४ नवल. २५ " बुद्धगोचर [illegible] गवसेना, एक ठाव तरि योग वसेना ॥ " असा एक पाठ आहे.

काळ जो कलियुगीं यवनांचा, रक्षिता सकळही भुवनांचा ।
होउनी विविध या अवतारीं, कीर्तनें करूनि वामन तारीं ॥ १० ॥
॥ इति श्रीदशावतार समाप्त ॥

---

# नृहरिदर्पण

—:०:—

## ( कथेचा सारांश.)

हिरण्यकशिपुस मारण्याकरितां आणि भगवद्भक्त प्रऱ्हाद याचें रक्षण करण्याकरितां श्रीविष्णूनीं नृसिंहावतार घेतला ही कथा या प्रकरणांत आहे ह्मणून यास 'नृहरिदर्पण' असें नांव दिलें आहे. श्रीमद्भागवत सप्तमस्कंध यांत अशी कथा आहे कीं, हिरण्यकशिपु आणि हिरण्याक्ष ह्मणुन दोन प्रबळ दैत्य बंधु होऊन गेले. त्यांतील हिरण्याक्षास विष्णूनें वराहावतार धरून मारिलें. तव्हां बंधूबद्दल सूड घ्यावा ह्मणुन हिरण्यकशिपूनें उग्र तपश्चर्या करून ब्रह्मदेवास प्रसन्न करून असा वर मागुन घेतला कीं, मला मनुष्यापासुन किंवा पशुपसून, घरांत किंवा बाहेर, दिवसा किंवा रात्रीं, भूमीवर किंवा आकाशांत, शस्त्रापासुन किंवा अस्त्रापासून इत्यादि मृत्यु नसावा. नंतर वरें करून मत्त व अजेय होऊन इंद्रादि देवांचा, ऋषींचा, ब्राह्मणांचा वगैरे द्वेष व छल करूं लागला. त्या हिरण्यकशिपूस प्रऱ्हाद नामें विष्णुभक्त पुत्र झाला. 'विष्णु आपल्या कुळाचा शत्रु आहे, त्यानें तुझ्या चुलत्यास मारिलें, त्याचें भजन तूं करूं नको' असा पुत्रास बोध केला, परंतु व्यर्थ. इतर दैत्यांच्या मुलांसही प्रऱ्हाद गुरु होऊन ते विष्णुभजन करूं लागले. ह्मणून दैत्यानें त्यास मारून टाकण्याविषयीं पाहिजे तेवढे प्रयत्न केले. पण तो मरेना. शेवटीं, दैत्य ह्मणाला, तुझा देव सर्वत्र आहे ह्मणतोस तर ह्या स्तंभांत आहे काय ? जर असेल तर तो तुझें मजपासून रक्षण करो. असें ह्मणुन स्तंभावर त्यानें मुष्टिप्रहार केला. तोंच त्या खांबांतून श्रीनृसिंहमूर्ति प्रकट झाली. दैत्यास सृष्टींतील कोणत्याही प्राण्यापासून मृत्यु नव्हता ह्मणून श्रीविष्णूनें विलक्षण असा नर आणि सिंह मिश्र देह धारण केला; व भूमीवर किंवा आकाशांत त्यास मृत्यु नसल्यामुळें त्यास मांडीवर घेऊन, दिवस व रात्री वर्ज्य करून ह्मणजे संध्यासमयीं, उंबऱ्यांत सजीव नाहींत किंवा निर्जीव नाहींत अशा नखशस्त्रांनीं पोट विदारण करून मारिलें.

---

१ या दोन चरणांबद्दल पुढील पाठांतरें सांपडतात:—" वंदिला मुनिजनीं निजभावें । कल्किनाम समजा तुह्मि भावें ॥ " आणि " उद्धरि क्षितिस ह्या निजभावें ॥ कल्किरूप समजा निजभावें ॥ "

हरि नरहरिरूपें क्रूर दैत्यां विभक्तां
परम सुलभ शांत श्रीकरें स्वात्मभक्तां ।
स्वचरण शरणातें सौम्यही शीघ्र तो कीं
जननिभय मनीं कां मानिजे व्याघ्रतोकीं ॥ १ ॥

नरतनू मुख उत्कटें केशरी, कटितटीं पिंवळा पट केशरी ।
परम सौम्य रमा हृदयांबुजीं, मज असा वरुषे स्वदयांबु जी ॥ २ ॥
विषमकारक कोप हरी समीं, करिन वंदन त्या नृहरीस मी ।
कथिन दिव्य चरित्रकथा रती, तरति यांतचि जे जन थारती ॥३ ॥
वचन अल्प कथा अधिका दिसे, धरिति संत मुखें सनकादिसे ।
बहुत सूचउनी चिमणा असे, 'नृहरिदर्पण' यास ह्मणा असें ॥ ४ ॥
ग्रंथ हा नृहरिदर्पण जाणा, सूचवी बहुत अर्थ सुजाणा ।
वामनीं त्रिभुवनीं प्रकटावें, यांत ये रितिच पुण्य लुटावें ॥ ५ ॥
जया निर्गुणत्वें स्वसंकल्प नाहीं, करी ईश्वरत्वें जगत्कल्पना ही ।
स्थितीमाजि ही त्यामधें स्वैरभावें, जगीं त्याच नानावतारीं रमावें ॥६॥
स्वयें कल्पितो जो जगीं कल्प कांहीं, करीतो जनोद्धार संकल्प कांहीं ।
ह्मणे म्यां स्वदिव्यावतारीं रमावें, जळीं भूतळीं व्योमही आक्रमावें ॥७॥
विना ज्ञान जे भक्त वैकुंठवासी, अमुक्तस्थळीं योजिलें त्या जिवांसी ।
तयां माजिही द्वारपाळद्वयातें, स्वयें जन्म द्यावें गमे अद्वयातें ॥ ८ ॥

---

१ अभक्तां दैत्यांस क्रूर. २ हरि, विष्णु स्वभक्तांस शांत. ३ वाघिणीच्या पिलांस जशी तिची भीति नाही तशी हरिभक्तांस त्याचा भीति वाटत नाही. ४ भयंकर. ५ वस्त्र. ६ दयारूप उदकाची वृष्टि करी. ७ सुख. ८ स्थिर राहतात. सावधानपणें ऐकतात. ९ ब्रह्मदेवाचे मानस पुत्र. १० हा नृहरिदर्पण नामक प्रबंध लहान आहे तथापि यांत पुष्कळ गोष्टीचा बोध होतो. ११ आपला निश्चय. १२ स्वेच्छेनें. १३ आकाश. १४ ज्ञानावांचून वैकुंठासही मुक्ति नाही, . ह्मणून जयविजय ह्या द्वारपाळांस भगवताचें पूर्ण ज्ञान नसल्यामुळें ते अमुक्तस्थळी होते. वामनाचे मतें वैकुंठ दोन आहेत, एक अनादि आणि एक नूतन " जें वैकुंठभुवन । वैकुंठावतारीं कमलनयन । निर्मिताजाला नूतन । प्रार्थनेकरूनी लक्ष्मीच्या ॥ १७० ॥ ज्ञानावांचूनि भक्तजन । पावती तें वैकुंठभुवन । ते स्थळी मधुसूदन । द्वारपाळ करी तयांतें ( नक्रगजेंद्रांस ) ॥ १७१ ॥ " यथार्थदीपिका अध्याय १४. ) १५ अंधरास.

न कळतां निजतत्त्व हि सादर, स्वभजनीं द्विज देघ सहोदर ।
धननिमित्त परस्पर शापिती, द्विरद नक्रहि एकनदींपती ॥ ९ ॥
धरी गंडिकेमाजि हस्तीस पायीं, न सोडीच तो ग्राह कोणा उपायीं ।
गजें प्रार्थितां नक्र हाणोनि चक्रें, हरी सोडवी पाहती देवचक्रें ॥ १० ॥
शिळा गंडकीच्या तदारभ्य देवें, स्वमूर्तीच केल्या तया वासुदेवें ।
अमुक्तस्थळीं द्वारपाळद्वयातें, करी कीं न ते जाणती अद्वयातें ॥ ११ ॥
न सोडी अमुक्तस्थळीं कर्मवारें, नव्हे ज्ञान तैसेंचि तें दुर्निवारें ।
तयां यास्तव क्रोधसंस्कार भारी, करी दैत्य इच्छी असें कैटभारी॥१२॥
द्वारीं तिहींच सनकादिकमानसाचा
केला दुरुक्तिवचनें अपमान साचा ।
ते शापिती असुरयोनित त्यांस जाया
दोनीं हरी करिच कीर्ति जगीं सजाया ॥ १३ ॥
जयविजय असे ते जावळे हो दितीचे
असुर इतर जाले पुत्रपौत्रादि तीचे ।

---

१ हे जयविजय द्वारपाळ पुर्वी कोण होते यांची पद्मपुराणांतील कथा येथे दिली आहे. ते दोघे सहोदर बंधु असून परस्पर शापानें त्यांतील एक गजेंद्र झाला व दुसरा गंडकीनदींत नक्र होऊन राहिला. नंतर श्रीविष्णूनीं गजेंद्रास सोडविल्यावर उभयतां वैकुंठांत द्वारपाळ झाले. ही गजेंद्राची कथा वामनानें यथार्थदीपिका अध्याय (१४) ओव्या (१६१–१७०) यांत दिली आहे. २ नदी-गंडकी तिचा स्वामी नक्र झाला. ३ नक्र. ४ देवसमुदाय. ५ 'जळीं नक्रातें विदारूनी । चक्रें विदारिली मेदिनी । गंडकीमध्यें तेंपासुनी । चक्रांकित शिळा जालिया ।। १६७ ॥ यथार्थदीपिका अध्याय (१४). ६ श्रीहरीस त्यांनीं पूर्णपणें ओळखिलें नाहीं म्हणून ते नूतन वैकुंठांत अमुक्त राहून जन्ममरणास पात्र झाले. ७ एकदां ब्रह्मदेवाचे पुत्र सनकादिक वैकुंठास गेले असतां या जयविजय द्वारपाळांनीं त्यांस आंत जाण्यास अटकाव केला. त्यामुळें त्यांस कोप येऊन त्यांनीं तुमचें देवत्व जाऊन तुम्हांस असुरयोनि प्राप्त होऊन तुमच्या हातून अतिनिंद्य कर्में घडतील असा शाप दिला. पण पुनः त्यांस दया येऊन ते म्हणाले कीं तुम्ही तीन वेळ असुरयोनि पावून नंतर पुनः पूर्वपदाप्रत याल. त्याप्रमाणें जयविजय हे अनुक्रमानें हिरण्यकशिपु व हिरण्याक्ष, रावण व कुंभकर्ण, आणि शिशुपाळ व दंतवक्र असे तीन जन्म राक्षस झाले. अशी कथा भागवत सप्तमस्कंधांत आहे. ८ जसे इतर असुर दितीचे पुत्रपौत्रादि झाले तसे जय विजयही दितीचे दोन जावळे पुत्र झाले.

प्रथमचि उपजे तो धाकुटा बंधु होतो
धरणिधर वराहें मारिला दैत्य हा तो ॥ १४ ॥
बुडे क्ष्मा तयीं उद्धरी जो क्षमेला, तया क्रोडरूपें हिरण्याक्ष मेला।
सखा दूसरा ज्येष्ठ त्या अग्रजाला, मनीं क्रोध अत्युग्र उत्पन्न जाला१५
हिरण्याक्ष नामें वधी क्रोड ज्याला, सखा बंधु साचाच जो त्या दुजाला।
मुनी बोलती अग्रजज्ञानरीती, श्रुतीच्या पथें ज्येष्ठ ज्याला करीती ॥ १६ ॥
दोतें बिंदु पहिला स्थिर होतो, जन्मतो तनुज मागुति हा तो।
अग्रजन्म उदरांत जयाला, अग्रजत्व ऋषि देति तयाला ॥ १७ ॥
तो हिरण्यकशिपू प्रियभावा,—कारणें निजतमोगुणभावा।
दाखवी त्वरित ठोकुनि मांडी, द्वेष विष्णुचरणाप्रति मांडी ॥ १८ ॥
अजर अमर काया आपुली तो कराया
तप करि वर मागे धातया लोकराया।
न मृति मज ह्मणे हो चेतनाचेतनांहीं
मरण हरि असें कीं दीसरातींत नाहीं ॥ १९ ॥
त्या वरें अमरमानवलोकीं, स्वामि तोचि फळ हें अवलोकी।
देववृंद अवघाच पळाला, [12]भीति सर्वहि तया चपळाला ॥ २० ॥
ते देवही प्रार्थिति देवदेवा, कीं आपुलें घे पद देवदेवा।
जाली बहू बुद्धि अधीरवाणी, तों बोलली हो अशरीर वाणी॥२१॥
कीं हा तपें तोषुनि अब्जजाला, त्याच्या वरें सर्व अवध्य जाला।
तथापि मारीनचि दुर्धरा या, गांजील माझ्या जयिं भक्तराया ॥ २२ ॥
प्रल्हाद त्याचा सुत त्या कुमारीं, घडे जयीं द्वेष मुकुंद मारी।
केव्हां असें होइल हे अँसोशी, दुःखें बहू तो सुरवृंद सोशी ॥ २३ ॥

---

१ "प्रथम उपजला तो धाकटा बंधु होतो" असा एक पाठ आहे. अगोदर जन्मला ह्मणूनच हिरण्याक्ष धाकटा बंधु. कारण जुळयामध्यें ज्याचा गर्भसंभव अगोदर होतो तो मागून बाहेर येतो. जन्मसंभव अगोदर ह्मणून तो वडील. २ वराहरूप धरून विष्णूनें त्यास मारिलें. ३ पृथ्वी. ४ वराह. ५ आधीं जन्मला जो हिरण्याक्ष त्याचा ज्येष्ठ बंधु हिरण्यकशिपु यास बंधूचे निधनामुळें अतिक्रोध उत्पन्न झाला. ६ ज्याचा पहिल्यानें गर्भसंभव होतो तोच अग्रज. ७ क्रोध. ८ प्रजापति. ९ मरण. १० सजीव किंवा निर्जीव यांपासून. ११ दिवसा किंवा रात्रीं. १२ "भी लपोनि अवघा चपळाला." १३ हे देव (तो हिरण्यकशिपु) आमचें पद घे तें देवा ह्मणजे देवता. १४ आकाशांतून शब्द झाला. १५ तोषवून. १६ कमलयोनि; ब्रह्मदेव. १७ अत्युत्कट इच्छा.

ऐशी प्रतीक्षा हृदयांत देवा, जो दैत्य त्या भागवता वदेवा ।
पुरोहितांच्या सदनींच ठेवी, ते शीकवीती अति नीच ठेवी ॥ २४ ॥
एके दिनीं घे सुत दैत्य अंकीं, तो स्नेह त्याचा गणवे न अंकीं ।
पुसे तया भागवतोत्तमातें, कीं आवडे जें तुज सांग मातें ॥ २५ ॥
प्रल्हाद बोले सदन त्यजावें, तपोवनालागिं अगत्य जावें ।
तेथें भजावें हरिच्या पदातें, जो आपदांतें हरि दे पदातें ॥ २६ ॥
दैत्येश्वरा आवडि हेचि मातें, कीं सेवणें श्रीपुरुषोत्तमातें ।
त्यजूनि विष्णूसि भजे गृहातें, तो आपुला घात करी स्वहातें ॥ २७ ॥
दुःखार्णवीं जो धरि कांस याची, चिंता तयाला मग कासयाची ।
न वीसरावेंचि कदापि त्याला, प्रल्हाद इत्यादि वदे पित्याला ॥ २८ ॥
परिसतां असुरेश्वर हांसला, मग ह्मणे कवणें शिशु नाशिला ।
शिकविलें वरवें अथवा जसें, वदति तेंचि मुलें अशिं राजसें ॥ २९ ॥
ह्मणे हा करावा गुरूनें विचार, स्वयें लेंकुरा ठाउका काय चार ।
हरी आमुच्या वाइटाचा भुकेला, तयाचे जनीं हा कुळीं भेद केला ॥ ३० ॥
ह्मणों देव होऊनिया भृंगपक्षी, गृहामाजि येऊनियां विष्णुपक्षी ।
अशीं नाशिती लेंकुरें हो निधानें, द्विजें राहिजे जे स्थळीं सावधानें ॥ ३१ ॥
गुरूतें असें दैत्य सांगोनि धाडी, तया वाटला गोष्ट हे देवधाडी ।
भिऊनी मनीं तर्क नाना करीती, तया पुसती विप्र सामादि रीती ॥ ३२ ॥

अरे हे प्रल्हादा गुरु पुसति, कोठून शिकसी
कशी होती प्रज्ञा त्यजुनि तिस तूं स्वैर ठकसी ।
स्वयें तूझ्या पोटांमधिल अथवा बुद्धि उकळी
कळी हृत्पद्माची उगवलि कशी वेउनि कळी ॥ ३३ ॥
ह्मणे श्रीप्रल्हाद स्वपर ह्मणिजे भ्रांति उकळी

---

१ भगवद्भक्त प्रल्हादास. २ पुरोहित शुक्राचार्य. ३ रीति. ४ मांडीवर. ५ आंकड्यांनीं. ६ गति. ७ कांबर; दुःखसमुद्र उतरण्याकरितां जो विष्णूच्या कांसेस लागतो त्यालाच बुडण्याची भीति नाहीं. ८ आचार; लोकरीति. ९ विष्णूभक्तांनीं प्रल्हादास शिकवून हा आमच्या कुळांत भेद करावयाचा प्रबंध मांडिला आहे. १० विष्णुपक्षाकडील; विष्णूच्या बाजूचे. ११ विष्णूनें पाठविले. १२ सामदानादि उपायचतुष्टयाची योजना करून. १३ बुद्धि. १४ स्वेच्छेनें. १५ ही करणी तुझ्या मनाचीच आहे अथवा कोणी शिकविलेली आहे. १६ 'कशी' बद्दल ' कळी ' असा पाठ आहे. १७ कलह. १८ हा माझा तो तुझा असा स्वपरभाव हा केवळ भ्रमाचा तरंग होय.

कळी[1] ईच्यामूळें असुर अमरीं आणि सकळीं ।
कळी हृत्पद्माची उकलिल कशी मोहरजनीं
जनीं ऐशा मूढां[2] मति न धरितां विष्णुभजनीं ॥ ३४ ॥
स्वपर ह्मणुनि ज्याची मोहिते स्वैर माया
स्ववश करि तिला जो षड्गुणत्वें[3] रमाया ।
नमिन मि भगवंता जो तुह्मां आकळेना
स्वपर[4]कुमतिभेदें तोचि आत्मा कळेना ॥ ३५ ॥
उपाध्ये हो नेणा तुह्मि जरि तया श्रीकरधरा
धरा पोटीं हे कीं मग न करणें स्पंद अधरा[5] ।
धरास्वामी चक्रें वधि मम हिरण्याक्ष चुलता
लता बुद्धीची त्या तरुवरि करी योग भलता ॥ ३६ ॥
शिळा[6] चुंबी लोह भ्रमवि तिस येतांच जवळी
वेळी[7] तैसी माझी मतिहि हरि ते त्यास कवळी ।
वळी[8] पोथ्यांच्या या तुह्मि असुर रीती शिकवितां
वितां[9] व्यर्थें काव्यें अलवण[10] हरीवीण कवितां ॥ ३७ ॥
प्रऱ्हाद बोलोनि असें द्विजांला, जाला उगा ध्यात अधोक्षजाला ।
पुढें न बोलेच पुरोहितातें, तातें दिला धाडुनि जो हितातें ॥ ३८ ॥
तों बुद्धि कोपें खवळे द्विजाची, जाची ह्मणे टाकिं कथा अजाची[11] ।
बाभूळ हे चंदन काननासी, नाशील भेटोनि निरंजनासी[12] ॥ ३९ ॥
प्रऱ्हाद हा विष्णु कुठार दंड, दंडप्रसंगें असुरां उदंड ।
दैत्यांचिया चंदनकाननासी, नाशील भेटोनि निरंजनासी ॥ ४० ॥
भविष्यानुरूपें वदे विप्रवाणी, नसे तर्जना[13]भर्जनालागिं वाणी[14] ।
असे दंड दुःशब्दें[15] दंडें करीती, पुनः शीकवीती तया लोकरीती ॥ ४१ ॥

---

१ कलह. २ मूढजनांनी विष्णुभजनी मति धरिली नाहीं तर मोह जाऊन हृदय कसें विकाश पावेल? ३ षड्गुणैश्वर्यानें; ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, ज्ञान, आणि वैराग्य हे सहा गुण ईश्वराचे अंगी आहेत ह्मणून त्यास षड्गुणैश्वर्यसंपन्न हें विशेषण योजितात. ४स्वपरभाव हा भेद तुमच्या मनांत वसत असल्यामुळें परमेश्वर हा सर्वांचा एकच आत्मा आहे हें अद्वैत तुह्मांस कळत नाहीं. ५ अधर हालवणें ह्मणजे व्यर्थ बोलणें. ६ लोहचुंबक; 'शिळे चुंबे लोह भ्रमत' असाही पाठ आहे. ७ वळवी. ८ ओळी. ९ प्रसवतां; करितां. १० अळणी. ११ ईश्वराची. १२ निरुपाधिक चैतन्य जो विष्णु त्यास भेटून हा कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ होईल. १३ निर्भर्त्सन, धिक्कार. १४ कमताई. १५ शब्दांचा मार.

तो रीति ते दानववैभवाची, वाची मनींच स्मृति माधवाची ।
बाहेर आणी न अधोक्षजाला, जाला भला हें गमलें द्विजाला ॥ ४२ ॥
बापास तो भेटवितां सुतातें, तातें निजांकावरि सुव्रतातें ।
घेतां सुखाची न दिसेचि वाणी, वाणी वदे राजस मंजुवाणी ॥ ४३ ॥
बा, शीकलासि गुरुपासुनि जो पसारा,सारा असो तुज रुचे वद त्याच सारा ।
गोष्टी वदे कुशल त्यावरि ज्या पित्याला,त्या लागतील मधुरा न कदापि त्याला

श्रवण हरिकथेतें कीर्तनीं गात जावें
स्मरण चरणसेवा अर्चनींही भजावें ।
नमन करुनि दास्यें सख्य आत्मर्पणातें
करुनि तरति वाटे सार हें आपणातें ॥ ४५ ॥
हिरण्यकशिपू स्वयें परिसतां अशी वैखरी
ह्मणे गुरुसुता तुझी कपटमित्रता हे खरी ।
पुरोहित वदे न मी न जन अन्य हा भाव दे
अशी सहज बुद्धि कीं तव कुमार जें जें वदे ॥ ४६ ॥

गुरुमुखें न अरे जरि शीकसी, कुमति उद्भवली तुज हे कशी ।
सुत ह्मणे विषयांत सदा पित्या, अशि न बुद्धि नरासि कदापि त्या॥४७
सार मानित असे विषयातें, विष्णुभक्ति गमते विष यातें ।
नें स्वयें हरि तया प्रिय वाटे, बोधिला तरि न योचि सुवाटे ॥ ४८ ॥
सर्वप्रयत्नें भजती गृहातें, न सेविती भागवतामहातें ।
गृहव्रतीं ते मति त्या जनाची, न गोष्टि ही घे भवभंजनाची ॥ ४९ ॥
जे दीस नेती धनमानसंगें, कीं रात्रि निद्रा सुरतप्रसंगें ।
गृहव्रतीं ते मति त्या जनाची, न गोष्टि ही घे भवभंजनाची ॥ ५० ॥

---

१ बाह्य वर्तन त्यांच्या उपदेशाप्रमाणें करून मनांत मात्र श्रीविष्णूचें ध्यान करी. २ सगळा राहूं दे, त्यांतील मुख्य गोष्टी सांग. ३ मुख्य भाग. ४ गोड. ५ 'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥' ही नवविध भक्ति ह्या श्लोकांत वर्णिली आहे. ६ 'गात जावें' याबद्दल 'या भजावें' असाही पाठ आहे. ७ वाणी. ८ गुरु शुक्राचार्य ह्याचे शंड व अमर्क असे दोन पुत्र हिरण्यकशिपूचे आचार्य होते, त्यांपैकीं एकास लक्षून हें हिरण्यकशिपूचें वाक्य आहे. 'ह्मणे गुरुस तो तुझी' असाही पाठ आहे. ९ ही बुद्धि माझी किंवा इतर कोणाच्या शिक्षणाची नव्हे, तर ती त्याचे अंगचीच आहे. १० 'न स्मरे हरि तयां प्रिय वाटे' असा एक पाठ आहे. ११ गृहाचें व्रत ह्म० संसार. १२ संसारनाशक ईश्वराची. १३ दिवस.

चिंता मनीं नित्य असे गृहाची, त्याला गमे कीं पुरुषार्थ हाची ।
गृहव्रतीं ते मति त्या जनाची, न गोष्टि ही घे भवभंजनाची ॥ ५१ ॥
चिंता मनीं एक वसे गृहाची, चिंतामणी प्राप्त तरी स्पृहाची ।
गृहव्रतीं ते मति त्या जनाची, न गोष्टि ही घे भवभंजनाची ॥ ५२ ॥
करोनि पापें भरिती गृहातें, जे दोष आरोपिति निस्पृहातें ।
गृहव्रतीं ते मति त्या जनाची, न गोष्टि ही घे भवभंजनाची ॥ ५३ ॥
टाकिलें अजि जरी विषयातें, वाटलें गृह जरी त्रिष यातें ।
प्रीति त्या जलजनाभजनाची, घे न तो मनिं न ये भजनाची ॥ ५४ ॥

हरीतंतूआड त्रिभुवनपटाचा पदर जी
असे जों लोळेना नर गुरुवराच्या पदरजीं ।
जडीं दावी ब्रह्म श्रुतिनिकर त्याच्याचि करजीं
विदेही देहीही अमर जगदानंदकर जी ॥ ५५ ॥

हे तों गुरू पापतरू ह्मणावे, अंधाहुनी अंध असे गणावे ।
दे प्रीति कृष्णीं गुरु तोच साच, श्रुत्यर्थइत्यर्थ असे असाच ॥ ५६ ॥
पशू जसे चाविति चाविल्यातें, पुनःपुन्हा सेविति सेविल्यातें ।
कृष्णीं नव्हे प्रीति कदापि त्याला, प्रल्हाद इत्यादि वदे पित्याला ॥५७॥

करी जो प्रल्हाद प्रिय भजनवार्ताच परमा
रमाकांताच्या त्या चरणिं मन पावे उपरमा ।
रमाया ही वृत्ती हरिच जग होऊनि पसरे
सरे द्वैतभ्रांति स्वपर अनुसंधान विसरे ॥ ५८ ॥

असें वर्णितां वर्णितां श्रीअजाला, पित्याचेच अंकीं समाधिस्थ जाला ।
अहो तो निजांकावरूनी अभाग्यें, दिला लोटुनी लभ्य जो पूर्वभाग्यें ॥५९॥

---

१ चिंतिलें फळ देणारा मणि जरी प्राप्त झाला तरी त्याची आशा सुटत नाहीं. २ कमल आहे नाभीच्या ठिकाणीं ज्याच्या असा जो विष्णु त्याच्या भक्ताची. ३ जों नर गुरुवराच्या पदरजी लोळेना (तों) हरिरूप तंतु त्रिभुवन पटाच्या पदरा आड असे, असा अन्वय; ह्मणजे गुरूस शरण गेल्यावांचून जगद्रूप पटाचें जें उपादान कारण हरिरूप तंतु तो दिसणार नाहीं. ४ तो गुरु जड सर्वांत ब्रह्म भरलें आहे, ह्म॰ घटपटादि समस्त प्रपंच ब्रह्माचा विकार आहे असें दाखवितो. ५ श्रुतिसमुदाय. ६ नखाग्रीं; ज्याच्या नखाग्रीं सर्व श्रुति आहेत असा गुरु केल्यावांचून ईश्वराचें स्वरूप कळत नाहीं. ७ इतर गुरु अंधपरंपरेनें वागणार. ८ शांति. ९ परापरभाव; हा माझा आणि तो तुझा असा भाव.

ताऊनि डोळे अतिकोपतापें, मारा ह्मणे राक्षस हो प्रतापें ।
कुपुत्र पोटांतिल रोग वाटे, छेदूनि लावा यमलोकवाटे ॥ ६० ॥
याचा वधी जो चुलता सखा रे, हा त्यासि पूजी तुह्मि यासि खा रे ।
दांतें नखें पर्वतशस्त्रपातें, मारा ह्मणे राक्षस निस्त्रपातें ॥ ६१ ॥
जो विष्णु माझा स्वपितृव्यहंता, त्यातें भजों केंवि न हे अहंता ।
वैरी महा आपुलिया पित्याचा, जाणे असें, दास तथापि त्याचा ॥६२॥
मी बाप माझी न लगेच माया, तो आवडे विष्णु कुलाधमा या ।
हें पांचवें वर्षचि या कुमारा, तों हा असा सत्वर यास मारा ॥ ६३ ॥
उचंबळे कोप मनीं न सांचे, साचेच ते भारहि राक्षसांचे ।
गदा त्रिशूळें करिती क्षतातें, तातें स्वयें मारवितां सुतातें ॥ ६४ ॥
ते मारिती बाप ह्मणेचि मारा, मारा न लागे तरि त्या कुमारा ।
न तोडि तें खड्ग हते न भाला, भा लागते कीं तमही नभाला ॥ ६५ ॥
शस्त्रें क्षतें न करितां अजितव्रतातें, शंका मनीं धरियली अजि तीव्र तातें ।
तो मारणादि करवूनि अघातपातें, त्यातें वधीनचि ह्मणे खळ घातपातें॥६६॥
न अग्निहीमाजि अहो जळाला, न मग्नही तो करवे जळाला ।
उरावरी आदळि पर्वतातें, केलें उपायांतर सर्व तातें, ॥ ६७ ॥
इत्यादि केले जरि घात नाना, तो विष्णुनामें करितो तनाना ।
मुखीं हरी तोचि मनीं हरी तो, नेत्रीं हरी दिग्भ्रम जो हरीतो ॥ ६८ ॥
प्रल्हाद इत्यादिक भाव दावी, ती भक्ति त्याची कितिहो वदावी ।
न मृत्यु एवं च कदापि त्याला, वाटे मनीं धाक तयीं पित्याला ॥ ६९ ॥
चिंतार्णवांत बुडतां असुराधमातें, वाटे मनीं मरण याच निमित्त मातें ।
तों नीतिनें करिति ते द्विज बोध राया, कीं बाळचेष्टित न योग्य मनीं धराया॥
वाडिल शुक्र तपाहुनि ये कवी, तरि सुबुद्धि अशासहि शीकवी ।
जरि असा तरि बुद्धचि तो असे, भृगुकुमार भयें वदती असें ॥ ७१ ॥

---

१ मृत्युलोकास. २ 'राक्षस' याबद्दल 'सत्वर' असा पाठ आहे. ३ निर्लज्जास. ४सखा चुलता हिरण्याक्ष मारणारा. ५स्वाभिमान. ६ माईना. ७ मार. ८नभाला भा ह्म० प्रकाश किंवा तम लागतें काय ? आकाश जसें उभयतापासून अलिप्त राहतें तसा तो प्रल्हाद मारापासून निराळाच राहिला. ९ कडेलोट वगैरे करून. १० पाण्याला मग्न करवेना ह्म० तो पाण्यांत बुडेना ११ इतर उपाय. १२ दिशाभूल. १३ चिंता-रूप समुद्रांत. १४ 'असुरोत्तमातें' असा एक पाठ आहे. १५ शहाणा. १६ शुक्राचार्याचे पुत्र शंड आणि अमर्क.

राजा ह्मणे मग तयांच पुरोहितांतें, कीं यास न्या स्वसदनीं शिकवा हितातें ।
ऐसें करा त्वरित कीं धरि लोकरीती, नेऊनिया द्विज गृहास तसें करीती॥७२॥
तेथें मुलें जीं गुरुगेहवासी[1], तीं योजिलीं सर्व जगन्निवासीं ।
त्या दैत्यबाळां गुरु हाचि झाला, जो[2] दाखवी स्वात्मसुखीं अजाला ७३
मुलांस त्या विस्मय थोर वाटे, कीं लागला हाचि कसा सुवाटे ।
ते पूसती हें तव या द्विजांला, ठावें न, तूतें गुरु कोण जाला ॥ ७४ ॥
प्रल्हाद सांगे स्वपिता तपातें, जाऊनि सोशी हिमें-आतपातें[3] ।
इंद्रासि मागें विजयीं शिरांणी[4], धरूनि ने तो दितिजेंद्रराणी[5] ॥ ७५ ॥
गर्भांत मी हें भय तीस वाटे, तों भेटला तो मुनिवर्य[6] वाटे ।
ह्मणे सतीची हरिसी त्रपा[7] हे, सहस्रनेत्रा[8] निज नेत्रिं पाहें ॥ ७६ ॥
ह्मणे इंद्र पोटीं इच्या पुत्र वाटे, तया जन्मतां लावणें मृत्युवाटे ।
प्रतापें दिसे अग्नि कुंडीं विधूमीं[9], वधूनी तया सोडवीतों वधूं मी ॥७७॥
ऋषी बोले भक्त त्रिभुवनपतीचा परम हा
महा योगी पैं हा धरिसि ह्मणि ऐसा नियम हा ।
महात्मा हा ज्याची अचल हरिसेवाविभैवधी[11]
वधी यातें कोण प्रभुकवँच यातें निरवधी[13] ॥ ७८ ॥
इंद्रें भिऊनि नमिली दितिजेंद्रराणी, हो सुप्रसन्न हरिभक्ति अशा शिराणी ।
जातां सुरेंद्र तिस सोडुनिया सुवाटे, केली प्रदक्षिण गुरू हरिभक्त वाटे ॥७९॥
जननिलाच तयीं मुनिशेखरें, श्रुतिरहस्य[15] निरूपियलें खरें ।
परि मदर्थ अनुग्रह तो करी, उमजला मजला हरि लौकरी ॥ ८० ॥
उमजला मजला हरि ज्या मुखें, गुरुच तो रुचतो हृदयीं सुखें ।
शिकवणें कवणें मज त्या विना, निजपणीं[16] जपणी[17] जड दाविना ॥८१॥
मानूनि मिथ्या न गणीं भवीसीं[18], होतों बहू वत्सर[19] गर्भवासी ।
भिऊनियां या असुरप्रसंगा, त्याच्याच या दुर्जनविप्रसंगा[20] ॥ ८२ ॥

---

१ गुरुच्या घरात राहणार विद्यार्थी. २ " जो दाखवीतो स्वसुखा अजाला " असा पाठ भेद आहे. ३ थंडी आणि ऊन. ४ लाभ. ५ हिरण्यकशिपूची स्त्री. ६ नारद. ७ लज्जा. ८ हे इंद्रा. ९ धूमरहित अग्नीसारखा प्रखर. १० दैत्याची राणी. ११ हरिसेवा करणें ह्या ऐश्वर्यांतच ज्याची बुद्धि रत झाली असा भगवद्भक्त प्रल्हाद इचे उदरांत आहे. १२ ईश्वर आहे ज्याचें अंगत्राण. १३ चिरकाळ. १४ श्रेष्ठ. १५ बीज. १६ आत्म्याव्यतिरिक्त कांहीं नाहीं अशी मनाची खातरी करून देणें हें जडाचें ह्मणजे मूर्खाचें काम नाहीं. १७ जपणें. १८ संसार. १९ वर्षे. २० शंडादि आचार्य यांच्या संगतीला भिऊन.

प्रपंच मिथ्या परि दुष्टसंगें, वाटे खरासा विषयप्रसंगें ।
म्यावें कुसंगाप्रति साधकानें, न शब्द त्याचा धरिजे स्वकानें ॥ ८३ ॥
दैत्यार्भकां[1] हा हितशब्द वाटे, समस्त ते लागति त्याच वाटे ।
हें सर्वही आयकतांच तातें, पाचारिलें[2] क्रोधवशें सुतातें ॥ ८४ ॥
गालिप्रदानीं न करूनि वाणी, वाणी वदे हो अपवित्रवाणी[3] ।
म्हणे मरूं इच्छिसि रे निपातें, मारीन जो तूं न भिसीच मातें[4] ॥ ८५ ॥
मी क्रुद्ध होतां मज लोक सारे, भीती भिसी एक न तूं कसा रे ।
या शासना[5] लंघिसि दुर्गमातें, कोण्या बळें सत्वर सांग मातें ॥ ८६ ॥
प्रऱ्हाद बोले जग गांजितोसि, ज्याच्या बळें आत्मपणें[6] जितोसी[7] ।
रक्षी अनाथा मजला हरी तो, ज्याला असा बापचि संहरीतो ॥ ८७ ॥
माझें तुझेंच बळ तो इतकेंचि नाहीं, त्याचेंच कीं बळ असे सकळा जनाहीं ।
तूं शत्रु मानिसि तया असुरस्वभावें, तो टाकिसील मग देखसि आत्मभावें[8] ॥ ८८ ॥
जिंकिले म्हणसि लोकहि सारे, त्यांस नागविसि तस्करसा[9] रे ।
ते न ज्यास वश होती मनींच, स्वर्ग मृत्यु जित मानिति नीच ॥ ८९ ॥
शत्रु सा[10] स्वहृदयींच रहाती, नित्य नागविति हें न पहाती ।
शासनें दश दिशांत करीती, देखतों अशिहि कौतुकरीती ॥ ९० ॥
चोर सा स्वहृदयांत रहाती, आणि मानिति चराचर हातीं ।
श्लाघ्यता स्फुटहि तेच करीती, देखतों अशिहि कौतुक रीती ॥ ९१ ॥
सा शत्रु कामादिक तूं निकामी[11], न जिंकसी चित्त धरूनि कामीं ।
का श्लाघ्यता व्यर्थ तुवां वदावी, प्रऱ्हाद इत्यादिक भाव दावी ॥ ९२ ॥
या गोष्टिनें फारचि तप्त झाला, घे खड्ग बोले मग आत्मजाला ।
कीं तूं मरूं इच्छिसि रे निपातें[12], स्वयें असें बोलसि संनिपातें[13] ॥ ९३ ॥
शब्दांसि या उत्तर हेंचि वाटे, कीं तूज लावूं यमलोकवाटे ।
जितोसि तूं हा क्षण कोण सोशी, मी सोशितों आइक ते असोशी ॥ ९४ ॥
त्रिभुवनेश्वर जो मजवेगळा, तुज गमे सकळांहुनि आगळा ।
जरि दिसेल अरे मज ईक्षणीं[14], वधिन त्याच पुढें तुज ये क्षणीं ॥ ९५ ॥

---

१ दैत्यांच्या मुलांस. २ प्रऱ्हादास. ३ अमंगळ शब्द. ४ 'म्हणे खळा दैत्यकुळाधमातें' असाही पाठ आहे. ५ या आज्ञेस. ६ अहंपणानें. ७ जिवंत आहेस. ८ 'तो टाकि देखसिल त्यास निजात्मभावें' असा पाठ आहे. ९ चोरासारखा. १० साहा; षड्रिपु. ११ अत्यंत. १२ घातानें; "कीं तूं मरूं इच्छिसि तो निपात । स्वयें असें बोलवि संनिपात" असा एक पाठ आहे. १३ संनिपात वायूनें. १४ डोळ्यांस.

जरि समर्थ असेल तुझा धणी, तरि तुझी पुरवील्चि तो धणी ।
परि वद स्थल कोण तया असे, ह्मणुनि गर्जत शब्द करीतसे ॥ ९६ ॥

‘ असे कोठें तो रे तुज बहुत ज्याचे भरंवसे ’
‘ वसे सर्वाठायीं स्थिरचर पटीं तंतु गवसे ’ ।
‘ दिसेना कां स्तंभीं ’ ‘ मज दिसतसे तो नरहरी
हरीतो दुष्टांचे त्वरित मद जो एकचि हरी ’ ॥ ९७ ॥

‘ असे स्तंभीं ’ ऐसा श्रवणिं पडतां शब्द असुरा
सुरापानीं मत्त स्वहितविषयीं जो निजसुरा ।
सुराधीशद्वेषें करुनि दृढ खड्ग क्षयंकरें
करें हाणी मुष्टीकरुनि खळ खांबासि निकरें ॥ ९८ ॥

स्तंभ तो अनचितांचि कडाडी, अब्जजांड अवघेंचि तडाडी ।
अब्जजादिहृदयांत धडाडी, काळमेघ शतनाद गडाडी ॥ ९९ ॥
खरी कराया निजभृत्यवाणी, आणी स्व कीं व्याप्ति हि न वाणी ।
स्तंभीं सभे अद्भुत मूर्ति दावी, मनुष्य ना सिंह तनू वदावी ॥ १०० ॥
मनुजरूप नव्हे नच केसरी, सकळ सृष्टि करूं न शके सरी ।
कनकवर्ण कटीं पट केसरी, प्रकट होय असा नरकेसरी ॥ १०१ ॥

पसरितें मुख मोठें आंत दंष्ट्रा कराळा
परम चपळ जिव्हा खड्ग जैसा निराळा ।
नयनयुगल जाणों तापले हेमपाणी
चहुं भुजिं नखशस्त्रें देखिला चक्रपाणी ॥ १०२ ॥

मानी मनीं देखुनि दुष्ट भारी, कीं मूर्तिनें या मज कैठभारी ।
मारील कीं जो वर धातयाचा, केला चुकावा बहुधा तयाचा ॥ १०३ ॥
सिंहावरी त्या मग दैत्य हस्ती, धांवे गदा घेउनि थोर हस्तीं ।
पतंग अग्नीवरि जेंवि जातो, हाणी गदा घोर अधोक्षजा तो ॥ १०४ ॥

---

१ पूर्ण हौस. २ या श्लोकांत दैत्याचे प्रश्न आणि प्रल्हादाचीं उत्तरें आहेत. ३ चराचर जगद्रूप पटाचा जो ईश्वर तंतु म्ह० उपादान कारण असा. ४ मद्यपानी. ५ झोंपेंत असलेला; अज्ञानांत असलेला. ६ ईश्वराच्या. ७ नाशकरणारा खड्ग. ८ जोरानें. ९ ब्रह्मांड. १० ब्रह्मादि देवांच्या हृदयांत धडकी भरली. ११ सर्वव्यापी मी आहें या गोष्टीस उणेपणा येऊं दिला नाहीं. १२ शरीर. १३ सिंह; “ प्रकट नरकेसरी ” असा एक पाठ आहे. १४ वस्त्र. १५ ‘ पसरित ’ बद्दल ‘ पसरत ’ असा पाठ आहे. १६ भयंकर. १७ सोन्याच्या रसाप्रमाणें. १८ ब्रह्मदेवाचा.

विधिवर प्रतिपालक जो हरी, न दिवसा न निशींत[1] हि संहरी ।
ह्मणुनि युद्ध निशामुखिं[2] तो करी, मग वधी बुडतां रवि लौकरी॥१०५॥
अमर तो मरतो अतिलौकरी, चपळ तो पळतो धरितां करीं ।
उखळला खळ लाघव लक्षणीं, विलपती लपती सुर ते क्षणीं ॥ १०६ ॥
आश्चर्य हें नृहरि मानुनियां महास्यें[3], सक्रोध हास्य करि उत्कट अट्टहास्यें[4] ।
तों झांकिले नयन भीति मनीं निघाली, मांडीवरी हरि असुरास धरूनि घाली ॥
न धरणीवरि मृत्यु न वा नभीं, वर असा ह्मणऊनिच जो न भी[5] ।
निज तनूवरि त्या खळशेखरा, चिरि धरूनि करी वैरही खरा ॥ १०८॥
न गेहीं[8] न बाहेर यालागिं दारीं, बसे उंबरा पोट त्याचें विदारी ।
सजीवें अजीवें मरेना तसाचि, चिरोनि नखें ते करी गोष्टि साची ॥१०९॥
चळवळे निसटे करि तांतडी, असुर तो हरि काढूनि आंतडीं ।
उदर फाडुनि घालितसे गळां, करि सुमंगळ देव अमंगळा ॥ ११० ॥
चिरूनि वारणगंड[11] जसा हरी[12], असुर मारुनि शोभतसे हरी ।
दितिज[13] तो गज केशव केसरी, इतर साम्य करूं न शके सरी[14] ॥ १११ ॥
दितिज यूथपें[15] तो मृति पावला, असुरवारणें यूथहि धांवला ।
मृतकें[17] तें ढकलोनि धरातळीं, वधि तया हरि लाथबुक्यांतळीं ॥ ११२ ॥
पदतळें कितिएक नखें करें, तुडविले दनुजेंद्रभयंकरें ।
असुरनाथ नृपासन[19] त्यावरी, हरि बसे परि कोप न सांवरी ॥ ११३ ॥
निववि कोप असें सुर धांवया, विनविती स्तविती बहुधा तया ।
विधि ह्मणे दुरुनीच नमो हरी, कवण या समयीं मन मोहरी ॥ ११४ ॥
स्तविति देव अजी कनकांबरा, असुर मारियला ह्मगती वरा ।

---

१ रात्रींत. २ संध्यासमयी. ३ विशाल मुखानें. ४ मोठ्यानें हांसणें. ५ भय पावतो. ६ खलश्रेष्ठास; दुष्टास. ७ ब्रह्मदेवाचा वर; शस्त्रानें मरणार नाहीं, दिवसा किंवा रात्री मरणार नाहीं, भूमीवर किंवा आकाशांत मरणार नाहीं इत्यादि वर खरा केला. ८ घरांत. ९ नखें सजीव किंवा निर्जीव दोन्ही नाहींत. १० त्या अमंगळ राक्षसास सुमंगळ करी. ११ हत्तीचें गंडस्थळ. १२ सिंह. १३ दिति कश्यपाची किंवा पुत्र; दैत्य. १४ बरोबरी. १५ कळपाचा स्वामी. १६ स्वामी मेल्यावर असुररूप हत्तींचा कळप धांवून आला. १७ प्रेत. १८ देवानें. १९ सिंहासन. २० [illegible] त्याचा कोप शांत करण्यास देव सांगूं लागले. २१ दुरूनच नमस्कार असो. २२ [illegible]. २३ नृसिंहास.

पारि अनावर कोप रमापती, सभय लोक चतुर्दश कांपती ॥ ११५ ॥
विधि प्रार्थितो तेधवां श्रीरमेला, ह्मणे थोर जो दुष्ट तो स्वैर मेला ।
करीं जाय भाते[1] प्रभू क्रोध शांत, त्रिलोकीं निती हे दहाही दिशांत ॥११६॥
प्रार्थितां अमर[2] सागरजा ते, सांवरोनि कनकांबर जाते ।
जाय पाद कितिएक रमा तैं, तों गमे भय चराचरमाते[3] ॥ ११७ ॥
परततां कर्वं[4]यंबर नावरे, पदरही हृदयावरि वांवरे[5] ।
स्मरणभाव[6] न शीघ्र तिचा वळे, नयन चंचल जीभहि चावळे ॥ ११८॥
मग प्रऱ्हादातें ह्मणति अवघे भक्तपरमा[7]
रमा ब्रह्मा कीं न स्वकृत विभुकोपा उपरमां[8] ।
रमाकांता ये ना तुजविण दया दैत्यदमना
मनाच्या विश्रामा त्वरित करिं गा क्रोधशमना ॥ ११९ ॥
ज्याला भिती देव विरिंचि[10] पद्मा, प्रऱ्हाद त्याच्या धरि पादपद्मा ।
आणी जया वंदिति सर्वभूतें, करी तया दंडवत प्रभूतें ॥ १२० ॥
बाळकें स्वचरणांबुरुहातें, वंदितां प्रभु जगद्गुरु हातें ।
ऊचलोनि अवलोकुनि ठेवी, मस्तकीं अभय हस्तक ठेवी ॥ १२१ ॥
करस्पर्शें झालें परमसुख त्या दैत्यतनया
न या संसाराचें स्मरण उरलें त्या सुविनया ।
नद्यो[11] नेत्रीं दोनी स्रवति न निघे शब्द सगळा
गळा दाटे प्रेमें त्वरित हरि घे मोहुनि गळां ॥ १२२ ॥
प्रऱ्हाद या उपरि होउनि सावधान, प्रेमें स्तवी त्रिभुवनेश दया[13]निधान ।
ब्रह्मादि सात्त्विक[14] तयां कळसी न देवा, मी तों ह्मणे असुर राजस वासुदेवा ।
भक्तीकरूनि तुज गाइं अधोक्षजाला, जालासि तूं स्वपददायक[15] त्या गजाला ।

---

१ हे लक्ष्मी प्रभूच्या कोप शांत कर जा. २ देवांनी सागरजा ह्म० लक्ष्मी हिची प्रार्थना केल्यावर. 'प्रार्थितां अमृतसागरजा ते' असाही पाठ आहे. ३ चराचर सृष्टीची जननी. ४ वेणी वरचा पदर. ५ चळूं लागला. ६ ती लौकर शुद्धीवर येईना. ७ परम भक्तास (प्रऱ्हादास). ८ रमा किंवा ब्रह्मा हे प्रभुचा कोप शांत करण्यास समर्थ नाहींत. ९ शांति. १० ब्रह्मदेव आणि लक्ष्मी. ११ अश्रूच्या नद्या वाहूं लागल्या. १२ 'त्वरित हरि जो मोह सगळा' असा एक पाठ आहे. १३ दयेच्या ठेवा. १४ सात्त्विक गुणविशिष्ट जे ब्रह्मदेवादि त्यांसही तुझें पूर्ण स्वरूप समजत नाहीं, मग मी जो रजोगुणी त्यास तूं कसा कळसील? १५ मोक्षदायक.

मारूनि नक्र गति दे हिरदा तयाला, यालागिं मी स्तवितसें वरदोनयाला १२४
मुखांतूनि नक्राचिया कुंजरांशी, जसें सोडवीलें कृपापुंजराशी ।
तसें सोडवीलें मला देवदेवा, पित्याच्या करापासुनी वासुदेवा ॥१२५॥
प्रल्हाद इत्यादि करी स्तुतीतें, अर्पी नृसिंहासि सरस्वतीतें ।
कृपा तयाऊपरि देव दावी, यानंतरें तेंचि गमे वदावी ॥ १२६ ॥
ऐशा स्तुतीनें हरि तुष्ट जाला, बोले कृपेनें असुरात्मजाला ।
कीं·वर्णितां या निगमागमातें, संतोषलों मी वर माग मातें ॥ १२७ ॥

म्हणे श्रीप्रल्हाद प्रभु वचन हें लोभकर जी
रजीं मातें घाली म्हणि म्हणुनि हा शब्द वरंजीं ।
रजीं या पायाच्या सुख कवण नाहीं मज हरी
हरी दुःखें सारीं तव गुणकथा श्रीनरहरी ॥ १२८ ॥

अंतरीं धरुनि पूर्ण रिरिक्षा, पाहतोसि निजभक्तपरीक्षा ।
अन्यथा स्वजनभावच नासी, कां वदे करुण या वचनासी ॥ १२९ ॥
स्वामीस जो वेंचिलें काम्य वाणी, वाणिज्य तें भक्ति हि दीनत्राणी ।
वाणीच कीं सेवक वेतनाचा, निष्काम तो पंथ पुरातनाचा ॥ १३० ॥
जशी लौकिकी भक्ति भृत्या जनाची, तशी क्षुद्र देवांसही पूजनाची ।
न तूं स्वामि तैसा नव्हे भृत्य कामी, वरा अल्प यालागिं मागेन कां मी १३१
म्हणसि मागचि जी कमळावरा, त्वरित दे तरि या अमलो वरा ।
किमपिही उपजे नच कामना, करिं असें विधिच्या जनका मना ॥१३२॥
मनीं उद्भवे जेधवां काम कांहीं, तपातें हरी तेजलज्जादिकांहीं ।
तनू प्राण सर्वेंद्रियां कष्ट भारी, जळाला करीं काम हा कैटभारी ॥ १३३ ॥
सकळ काम मनामधुनी त्यजी, सुख अपार तयासचि सत्य जी ।
वरचि देशिल जी जरि लौकरी, न उपजे मनिं काम असें करीं ॥ १३४ ॥
प्रल्हादशब्दें हरि तुष्टला हो, घ्यावा म्हणे हाचि यथेष्ट लाहो ।
लक्ष्मीपतीचें मन मोहरीतो, बोले असा त्यास वदे हरी तो ॥ १३५ ॥

---

१ वर देणाऱ्यास. २ हत्तीस. ३ समुदाय. ४ वाचा; स्तुति. ५ वेदशास्त्र जो मी त्यातें. ६ रजोगुणांत. ७ हा शब्द मला प्रपंचांत घालील म्हणून उच्चारूं नको. ८ रक्षि- तुमिच्छा, रक्षण करण्याची इच्छा; "पूर्णनिरीक्षा" असाही पाठ आहे. ९ नाहीं तर कारण ईश्वर भक्ति नाशीची करणारें "वर माग" हें वचन कां बोलेल? १० काम्य- फळ इच्छिणें हा वाणशाचा व्यापार. ११ वरून वरून. १२ निर्मळ; निष्पाप. १३ मोहतो; 'जो हरितो' असाही पाठ आहे.

कीं बोल हे सत्य न अन्यथा रे, मद्भक्ति चित्तांत न अन्य थारे ।
ज्याला असें कांहिं न पाहिजे तें, त्याचें असें म्यां मन पाहिजेतें ॥१३६॥
ऐसें तथापि जिस सिंधुचियाच पाळी,पाळीं स्वभूमि फळ हें तुझिया कपाळीं।
पाळी तुझी ह्मणुनि सर्व वसुंधरा या,राया तुतें इतर योग्य न तें धराया१३७

एकाहत्तर चौकड्या कलिकृतत्रेतायुगद्वापरीं
हें मन्वंतर काळ एक इतुका जो होय या ऊपरी ।
प्रल्हादा इतुकीं युगें अधिकही कांहीं तुझ्या शासनीं
पृथ्वी सर्व असो ह्मणे नरहरी ये बैस सिंहासनीं ॥ १३८ ॥

त्या माजि माझी स्मर हे कृपा कीं, या पूर्विच्या पातकपुण्यपाकीं ।
उद्विग्न दुःखीं न सुखीं स्पृहा ही, ऐसें असावें अतिनिस्पृहांहीं ॥ १३९ ॥

स्पृहाद्वेषत्यागें अनुभवि अहो योग भलता
लता प्रारब्धाची असिच जरि तोडी कुशलता ।
वदे प्रल्हादातें हरि कुशलभागा समज गा
जगामध्यें ऐसे तुह्मि सकळ मद्भक्त मजगा ॥ १४० ॥

जडीं ही चिद्रूपा कपट पट तंतूस मज गा
जगामध्यें पाहे हरि सुमनहारा न भुजगा ।
जगाया या लोकीं भजनगुण गातो सतत रे
तरे त्याचे पायीं जन भवनदी पार उतरे ॥ १४१ ॥

प्रपंचाच्या त्रासें वनिं वसति कीं मौन धरिती
तरी त्यांची भेटी क्षय भवभयाचा न करिती ।
व्रती या गोष्टीचे वुध असति कीं विष्णुभजनीं
जनीं जाणावे ते रवि हरिति अज्ञानरजनी ॥ १४२ ॥

दे मुक्तिही भुक्तिहि भक्तराया, दे भक्तिही अन्य जना तराया ।
प्रल्हाद माथां धरि शासनातें, अंगीकरी तातनृपासनातें ॥ १४३ ॥

---

१ हिके. २ पाहतों. ३ जीस समुद्राची पाळी ( मर्यादा ) त्या पृथ्वीस. ४ रक्षण कर; राज्य कर. ५ पृथ्वी. ६ एकाहत्तर चवकड्यांचें एक मन्वंतर होतें आणि चौदा मन्वंतरें ह्मणजे एक कल्प किंवा ब्रह्मदेवाचा एक दिवस. हल्लीं सातवें वैवस्वत मन्वंतर आहे. ७ परिणाम. ८ दुःखामुळें उद्विग्न होऊं नको किंवा सुखामध्यें कशाचीही स्पृहा धरूं नको. ९ हरि हाच कोणी पुष्पांचा हार आहे भुजंग नाहीं असें जो पाहतो. १० भवभयाचा नाश करीत नाहीं. ११ अज्ञानरूप अंधकार. १२ भोग. १३ सिंहासन; पित्याचें राज्य.

स्वपितयास न हो अधमा गती, ह्मणुनियां विनवी शिशु मागुती ।
हरि ह्मणे "सुत ज्यांस असा असे, सुगति पावति पातकिही असे ॥ १४४ ॥
एकवीस निजपूर्वज सारे, उद्धरी सुत वितां तुजसा रे ।
सत्क्रिया करिं तथापि तयाची, ज्यां तनू चिरिलि ज्या पितयाची" ॥ १४५ ॥
यांपरी निजकृपाभवलोका, दाउनी अपुनर्भव लोका ।
जाय हें चरित लोक तराया, ठेविलें भवनदी उतराया ॥ १४६ ॥
भुक्ति मुक्ति अशि दाखवि भक्ता, वामनें मन तया अविभक्ता ।
अर्पिलें करुनि अर्पण बोला, ग्रंथ हा नृहरिदर्पण बोला ॥ १४७ ॥
नृहरि थोर लहान हि दर्पण, प्रभु तयांत करी स्वसमर्पण ।
इतुकियांत चरित्र समस्त कीं, जनिं धरू सुपुरुष हि मस्तकीं ॥ १४८ ॥
बोलतो करुनि अर्पण बोला, ग्रंथ हा नृहरिदर्पण बोला ।
वामनें त्रिभुवनीं प्रगटावें, यांत ये रिति च पुण्य लुटावें ॥ १४९ ॥

॥ इति श्रीनृहरिदर्पण समाप्त ॥

---

# वामनचरित्र.

—:०:—

## ( कथेचा सारांश. )

इंद्राचा पराभव करण्याकरितां दैत्यांचे कुलगुरु भृगु यांणीं बळीच्या हातुन विश्वजित् नांवाचा यज्ञ करविला, तेव्हां अग्नींतुन दिव्यरथ निघाला. त्या अजिंक्य रथांत बसून बळीनें इंद्रावर स्वारी केली, आणि त्याचा पराजय करून इंद्रपद घेतलें; तें पुनः इंद्रास द्यावें ह्मणून, श्रीविष्णूनीं वामन अवतार घेतला. मग बळि यज्ञ करीत असतां त्याजकडे जाऊन आपल्या पावलानें त्रिपाद भूमि दान मागितली. बळीनें भूमिदानाचें उदक सोडल्यावर वामनानें विश्वरूप धारण करून दोन पावलांत भूलोक व स्वर्गलोक व्यापिले आणि तिसरें पाऊल भूमि मागूं लागला, तेव्हां बळीनें आपलें वचन सत्य करण्यासाठीं आपल्या मस्तकावर तिसरें पाऊल ठेवावयास सांगितलें. मग वामनानें त्याच्या मस्तकावर पाय देऊन त्यास पाताळीं घातलें अशी कथा श्रीमद्भागवतांत आठव्या स्कंधांत आहे.

---

१ नीच; अधोगति. २ पुनः. ३ जन्म देतां. ४ "ये रिती निजकृपा–भवलोका, दाउनी नरहरी निजलोका" असाही पाठ आहे. ५ ज्यांत पुनर्जन्म नाहीं असा लोक. ६ आरसा.

इंद्राचें पद दैत्यराज बळि तो विप्रमसांदें हरी
तेव्हां कश्यपमंदिरीं अदितिच्या दिव्यव्रतें श्रीहरी ।
झाला वामन मुंजि तेचि समयीं होतांचि भिक्षाछळें
सर्वस्व त्रिपदें हरी स्मर मना त्याचीं पदें कोमळें ॥ १ ॥

बळीयाग तो नर्मदेच्या तटाकीं, करी आहुती शुक्र अग्नींत टाकी ।
अकस्मात तों देखतां वामनाला, सुखाचा गमे पूर्णठेवा मनाला ॥ २ ॥
करिं कमंडलु दंड मृगाजिन, त्रिजग माप करी बटु वामन ।
सकळवेदविशारद चांगला, कटितटीं अतिसुंदर मेखला ॥ ३ ॥
श्रुतिमयें[4] वचनें वदतां पटू, बळिमखाप्रति अद्भुत ये बटू ।
लुटलुटां द्विजअर्भक एकटू, करि उदार कथा भलता लटू ॥ ४ ॥
करिं कमंडलु ये जगजीवन, त्रिजग उद्धरि जो पदजीवन ।
स्ववचनें बळिचें मन मोहरी[10], रुचिर वामन पाद नमो हरी ॥ ५ ॥
देखोनि ऐशापरि त्या द्विजाला, चित्तीं बळीच्या बहु तोष जाला ।
येऊनियां संमुख पाय वंदी, वर्णी गुणां होउनि भाट बंदी ॥ ६ ॥

तूं गा कोण, अपूर्व[13], कोण वसती, हें विश्वें[14] जी तत्त्वता.
पाळी कोण तुतें, अनाथ[15] अजि मी त्राता न मातापिता. ।
द्यावें काय तुतें, त्रिपाद धरणी माझ्या पदें फार घे,
नेघें[16], वामन बोलिला बळिस कीं, तृप्ती त्रिलोकीं रिघे. ॥ ७ ॥

पूजी बळी मग ह्मणे वटुवामनातें, कीं माग जें तुज अभीष्ट गमे मनातें ।
देणार गा इतर मी मज काम नाहीं, जें मागसी पुरवितों तव कामना ही ८
ह्मणे धन्य राया स्ववंशानुसार, प्रभू बोलसी हा तुझा बोल सार[19] ।
रणीं आणि दानीं तुझीया कुळीं रे, न दे पाठ कोण्हीच राया बळी रे ९

१ कुलगुरु जो भृगु त्याच्या प्रसादानें. २ भिक्षेच्या कपटानें (मिषानें). ३ 'त्रिजग मोजिल तो बटु' असाही पाठ आहे. ४ वेदाक्षरें. ५ हुशार. ६ "पटु बटु वचनें चिमणा लटु" असा एक पाठ आहे. ७ बालक. ८ एकटा. ९ अज्ञान. १० मोही. ११ "वामन रूप नमो हरी" असा पाठ आहे. १२ स्तुतिपाठक. १३ अपूर्व ह्म० नवीनच; गर्भितार्थ अनादि. १४ विश्वाचे पाठीवर कोठें तरी किंवा सर्व विश्वभर. १५ अनाथ ह्म० माझें कोणी रक्षणकर्ता नाहीं; गर्भितार्थ ज्याला कोणीच स्वामी नाही, तोच सर्वांचा स्वामी. १६ फार घेणार नाहीं. १७ तीन पावलें भूमि दिल्यानें तिन्ही लोक दिल्याची तृप्ति पावेन; पण तीन पावलांनीं तिन्ही लोक व्यापिल्यावर आणखी काय पाहिजे ? १८ आपल्या वंशाला शोभेल अशा रीतीनें बोललास. १९ सारभूत; मुख्य.

राया मला एक असे अपेक्षा, त्यावेगळी सर्व क्षणी उपेक्षा ।
मोजूनि माझ्या त्रिपदेंचि मातें, दे भूमि विप्रप्रवरोत्तमातें ॥ १० ॥

बळि ह्मणे अति सादर वामना, बहुत वाटसि गा बरवा मना ।
मन अशा भुवनत्रयपाळका, बहु न मागसि कां द्विजबाळका ॥ ११ ॥

शब्द मी धरिन मस्तकावरी, ब्राह्मणा अधिक भूमिका वरीं ।
वाटसी बहुत नेटका मना, जे असेल वद नीट कामना ॥ १२ ॥

द्विजसुता तुझिया वचनाऽमृतें, मज गमे उठतील शवें मृतें ।
निपुण दीससि निर्मळ आरसा, परि न मागसि अर्थहि फारसा ॥ १३ ॥

हरि ह्मणे मजला इतुकें पुरे, त्रिभुवनात्मक होउनियां उरे ।
त्रिपदमात्रचि कार्य असे बरें, अधिक मागति लोक न तें बरें ॥ १४ ॥

शब्दभाव बळिला न आकळे, शुक्र संनिध तयासि तो कळे ।
तो वदे भुज सभे उभारुनी, त्या बळीप्रतिच हाक मारुनी ॥ १५ ॥

अदितिच्या उदरीं हरि जन्मला, ह्मणुनि ये समयीं कळलें मला ।
विभवें राज्य हरील समस्त रे, यशहि विश्रुत होइल अस्त रे ॥ १६ ॥

ह्मण न देउं शकें तुज मी अगा, बइस मौनपणें अथवा उगा ।
ह्मणसि देइन यावरिही जरी, रिघसि दाटुनि पातकपंजरीं ॥ १७ ॥

संकल्प जो तूं करसील बापा, न देवत्रे पावसि सद्य पापा ।
पदद्वयीं विश्व पुरेचि जेव्हां, जाशील राया नरकासि तेव्हां ॥ १८ ॥

करूनि संकल्प न दे द्विजा तो, प्राणी स्वपापें नरकासि जातो ।
आधींच नेदीं ह्मणतां भला हो, वेसी ह्मणी वैखरिमाजि लाहो ॥ १९ ॥

जरि विचारुनि गोंविसि वैखरी, तरिच होइल जाण अगा खरी ।
ह्मणुनि शुक्र अजी बहु बोलतो, परि वदों वदला बळि बोल तो ॥ २० ॥

विचारूनि आचार्यवाचा निदानीं, बळी तो धरी बुद्धि सर्वस्वदानीं ।
ह्मणे बोलतां ते जरी सत्य वाणी, द्विजा कोविं वाचा वदों दैन्यवाणी २१

---

१ इच्छा. २ मज ब्राह्मणश्रेष्ठास. ३ प्रेतें. ४ तीन पावलें भूमि मला त्रैलोक्यासारिखी होईल. ५ हात वर करून. ६ वैभव. ७ प्रख्यात ' विश्रुत ' बद्दल ' विस्तृत ' असा-हा पाठ आहे. ८ " ह्मणुनि सांगतसें तुज मी अगा " असाही पाठ आहे. ९ " जावें तुवां कीं नरकासि तेव्हां " असा पाठ आहे. १० दान देतों असें तोंडानें ह्मणण्याचा मात्र तुला लाभ मिळेल; प्रत्यक्ष दान घडणार नाहीं. ११ वचन गुंत-विसील. १२ विचार करून.

हे भूमि वेश्या इसिं सर्व जाती[1], भोगूनियां मृत्युमुखासि जाती ।
लोभें इच्या लंघुनि विप्रवाणी, धिक् बोलणें वैखरि दीनवाणी ॥ २२ ॥

निगमविधिविधानें[2] मांडुनी हे पसारे
यजुनि विविधयागीं वंदिती यासि सारे ।
वरद हरिच तो हो विप्र कोण्हीच हो जी[3]
किति तरि मज मागो भूमि देतों अहो जी[4] ॥ २३ ॥

सर्वस्वदानीं बळि सिद्ध जाला, पूज्यासनीं बैसविलें द्विजाला ।
प्रक्षाळि त्या श्रीपदपंकजातें, ध्याती रमा अब्जभवादि[5] ज्यातें ॥ २४ ॥
आली समीप यजमानिन पट्टराणी, पाहे हरीस न पुरेच जिची शिराणी[6] ।
ओती करें कनकपात्र धरूनि वारी[7], सर्वस्व दे पति तयास न जे निवारी २५
कुंभस्तनी कनककुंभ धरूनि पाणी, ओती मणी चपल नासिकिंचे सुपाणी ।
मी लाविता बळि पदीं स्वकठोर पाणी, सर्वस्व पात्र बळिचें हरि चक्रपाणी २६
विद्युक्त संकल्प करूनि पाणी, घालूं ह्मणे पूजुनि चक्रपाणी ।
निघे न झारींतुनि नीरबिंदू, म्लानत्व पावे बळिचा मुखेंदू[11] ॥ २७ ॥
कीं[12] शुक्र झारींत रिघोनि गोळा, करूनि अंगें अजि होय बोळा ।
फोडी हरी घालुनि दर्भ डोळा, जना दिसे विप्रकुमार भोळा ॥ २८ ॥
पूजूनि ऐसे रिति दानवारी[13], घाली करीं तें बळि दानवारी[14] ।
ह्मणे स्वपादीं अजि भूमि मोजीं, जे अर्पिली, त्याचि पदीं नमोजी ॥२९॥
संकल्पयुक्त पडतां स्वकरांत पाणी, वाढे त्वरें करुनि वामन चक्रपाणी ।
पाताळ पादतळ मस्तक सत्यलोकीं, कानीं दिशा दिनमणी[15] नयनावलोकीं ३०
एका पदें भूमि भरूनि थोडी, पायें दुज्या अंडकटाह[16] फोडी ।
दे तीसरा पाद ह्मणे बळीला, ह्मणोनि पाशें दृढ आकळीला ॥ ३१ ॥
पदयुगें भुवनत्रय मोजिलें, बळिशिरीं तिसरें पद योजिलें[17] ।
पदनखें विधिअंड विदारिलें, पदजळें[18] भुवनत्रय तारिलें ॥ ३२ ॥
त्याकारणें प्रार्थुनियां हरीची, करी स्तुती प्रेमरसें विरंची[19] ।

---

१ ज्ञाति. २ वेदोक्त कर्ममार्गाप्रमाणें. ३ जी भूमि. ४ अहो स्वामी. ५ ब्रह्मदेव आदिकरून. ६ कौतुक. ७ उदक. ८ आड न येई. ९ उत्तम तेजाचे. १० " करूनि संकल्प करांत पाणी " असाही पाठ आहे. ११ मुखचंद्र. १२ कारण. १३ दैत्यशत्रु विष्णु; वामन. १४ दानासंबंधी उदक. १५ सूर्य १६ कटाह ह्म० कढई; कढईच्या आकाराचें ब्रह्मांड. १७ "पद तिजें बळिचे शिरिं योजिलें" असाही पाठ आहे. १८ पादतीर्थानें अथवा पादजल जी गंगा तिने. १९ ब्रह्मा.

प्रल्हाद आजा बळि भूपतीचा, आला महाभक्त रमापतीचा ॥ ३३ ॥
ह्मणे तुवां हे दिधली त्रिलोकी, नेली तुवां पूर्ण कृपावलोकीं ।
केला तुवां दंड कृतार्थ जाला, प्रल्हाद इत्यादि वदे अजाला ॥ ३४ ॥
पत्नी बळीची जगदीश्वरातें, वदूनि बोले कमलावरातें ।
ह्मणे धणी तूंचि चराचराचा, वृथाभिमान प्रभुजी नरांचा ॥ ३५ ॥
सर्वांचिया आइकतां स्तुतीतें, बोलावुनी त्याच महामतीतें ।
ह्मणे बळी दे तिसऱ्या पदातें, कीं भोगिं तापें बहु आपदांतें ॥ ३६ ॥
करूनि संकल्प न देसि जेव्हां, जासील राया नरकासि तेव्हां ।
बळी ह्मणे देइन देवराया, आहेचि संकल्प खरा कराया ॥ ३७ ॥
तैसा न भीं मी नरकासि देवा, या पाशबंधासहि वासुदेवा ।
न भीं सुरांच्या जयवाद्यनादा, भीतों जसा मी अपकीर्तिवादा ॥ ३८ ॥
करूनि संकल्पहि तूज देना, कोणी मला धन्य जगीं वदेना ।
माझ्या शिरीं ठेविं तिज्या पदातें, जें छेदितें सर्वहि आपदांतें ॥ ३९ ॥
करी बळी स्वात्मनिवेदनातें, संतोष ज्याणें मधुसूदनातें ।
दैत्येंद्र तत्काळचि मुक्त केला, प्रेमाऽमृताचा हरि हो भुकेला ॥ ४० ॥
देऊनिया सुतलराज्य अखंड दारीं, राहोनियां बळिचिया गृहपुत्रदारीं ।
झाला जसा हृदयमंदिरिं वामनाच्या, वृत्ती चिदात्म करितो अवघ्या मनाच्या
॥ इति श्रीवामनचरित्र ॥ ॥ ४१ ॥

---

# भागवत रामायण.

## ( कथेचा सारांश )

श्रीमद्भागवत नवमस्कंध यांत रामायणांतील कथा सारांशरूपानें दिली आहे, तिची ही टीका वामनपंडितांनीं केली आहे, ह्मणून हीस भागवतरामायण किंवा संकलितरामायण असें ह्मटलें आहे. विश्वामित्रानें रामचंद्रास मागून नेलं येथपासूनच ही कथा दिली आहे.

करिति चरण तूझे जे शिळा दिव्य रामा
हरुनि दुरित माझें होउ ते सेव्य रामा ।

---

१ स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे तीन लोक. २ श्रीविष्णूस. ३ उदारमनाच्या बळीस. ४ किंवा; नाहीं तर. ५ नवविध भक्ति सांगीतल्या त्यांतील एक; स्वसमर्पण. ६ मुलामाणसांत मिसळून. ७ रामाचे पादस्पर्शानें शिळेची अहल्या स्त्री झाली त्या गोष्टीस उद्देशून ह्मटलें आहे. ८ सुंदर स्त्री. ९ पाप. १० ते चरण मला सेवा करण्यास योग्य होवोत.

भ्रमर मन पदाब्जीं पाववीं त्या विरामा
भवहरें[2] भवचापध्वंसे[3] विश्वाभिरामा[4] ॥ १ ॥

जगीं तूं असा कीं घटीं एक माती, गुण श्लोककोटींत तूझे न माती ।
निरूपीन त्या सिंधुच्या बिंदुमात्रा, पुरे तेचि संसाररोगास मात्रा ॥ २ ॥
महा औषधांतूनि थोडेंच कांहीं, करी सेवितां नाश वातादिकां ही ।
पुरे आमुची हे अविद्या मराया, तुझें एकलें नाम जी रामराया ॥ ३ ॥
जरी नाशिली आमुची जी अविद्या, जितांही दिली मुक्ति देऊनि विद्या ।
तुझी किर्ति मुक्तीहुनी गोड वाटे, शुकादीकही चालती याच वाटे ॥ ४ ॥
ह्मणोनि जे भागवतीं शुकानें, लीला तुझी वर्णिलि कौतुकानें ।
टीका तिची मी क्षितिलोकवाणीं[10], करीन जेथें न सुखासि वाणी ॥ ५ ॥

बहु वृद्धी ग्रंथा न करुनि वदावी यशसुधा[12]
प्रतिश्लोकीं जे कां करि अमृतसंतृप्त वसुधा[13] ।
समश्लोकी टीका ह्मणुनि करितों जी रघुपती
जिला मंत्रप्राय स्मरति वदती लोक जपती[14] ॥ ६ ॥

निजाश्रमा राघव कौशिकानें[15], नेला कथा तेथुनि हे शुकानें ।
आरंभिली मंगळ तीस गातें, गातो मुनी उद्धरि जो जगातें[16] ॥ ७ ॥
चाले वनाप्रति पुलस्त्यसुतासि[17] मारी, पाळी स्वकोशलधरा[18] सह भूकुमारी[19] ।
या मंगलाचरणपद्यरसें[20] शुकानें, संक्षिप्त वर्णिलि कथा अतिकौतुकानें ॥८॥

टाकी ताताऽर्थ राज्यांवन[21] वन विचरे त्या पदीं[22] ज्यांस वाटे
सीताहस्ताऽब्ज भारी अनुजें[23] कपिपती[24] सेविती नित्य वाटे ।
बोलें निर्नासिकेच्या[25] असुर जनकजा[26] ने तयीं क्रोधलेशें

---

१ माझें भ्रमरासारखें मन तुझ्या चरणकमळीं विश्रांति पाववीं. २ हे संसार-नाशक. ३ शंकराचें धनुष्य मोडणाऱ्या. ४ अभिराम ह्म० सुंदर. ५ घटाचें कारण जशी एक मृत्तिका तसा तूं जगाचा एकच कारण आहेस. ६ कोटि श्लोकांत तुझे गुण मावणार नाहींत. ७ गुणसिंधु. ८ रसायन. ९ अज्ञान माया. १० देशभाषेंत. ११ कमताई. १२ यश हेंच अमृत. १३ पृथ्वी. १४ जिचा जप करितात. 'जपती' बद्दल "यजिती" असाही पाठ आहे. १५ विश्वामित्रानें. १६ "गाधीमुनी उद्धरि जो जगातें" असा एक पाठ आढळतो. १७ रावण. १८ कोशल देशचें राज्य; अयोध्या देश. १९ भूमिजा सीता. २० या मंगलाचरणरूप पद्यामृतानें. २१ राज्य—भवन; राज्यरक्षण. २२ ज्यास (पदास) सीतेच्या हस्तें भारा वाटे त्या पदीं वन विचरे (वनांत फिरे). २३ लक्ष्मण. २४ सुग्रीव. २५ जिचें नाक कापलें आहे. अशी शूर्पणखा तिच्या बोलें ह्म० सांगण्यावरून असुर (रावण) सीतेस नेई तव्हां. २६ सीता.

बांधे दापूनि सिंधू वधि रिपुकुळ त्यां रक्षिलें कोशलेशें ॥ ९ ॥

अहो विश्वामित्रें दशरथनृपा प्रार्थुनि जयीं

स्ववशातें नेला प्रभु असुर मारूनि विजयी ।

तयासंगें जातां करुण मिथुळाग्रामगमनीं

शिळा शापें मार्गी करि पदरजें हंसगमनी ॥ १० ॥

सातास्वयंवरगृहीं भवचाप हातीं, भंगी मुख क्षितिपं वीर अहो पहाती ।

लीलेंकरूनि गजबाळक इक्षुदंड, मोडी तसा भय करी ध्वनि तो उदंड ११

जिंकोनि ने स्वगुणरूपवयें समाना, सीता रमा स्वहृदयावरि लब्धमाना ।

निःक्षत्रिया क्षिति करी हरि गर्व वांटे, त्याचा जयास नृपबीज असह्य वाटे ॥

जो स्त्रीस लंपट सकाम तथापि त्याची, माथां धरूनि करि गोष्टि खरी पित्याची ।

राज्यादिकें त्यजुनि जाय वना सदार, प्राणावरी जितचि मुक्त तसा उदार१३

लंकापतीभगिनिच्या मुखदूषणातें, केलें वधी मग तया खरदूषणातें ।

मारी चतुर्दश सहस्रहि, चाप हातीं, कोदंड चंड वनिं कष्ट मुनी पहाती॥१४॥

सीताकथा परिसतां स्मरविव्हलानें, जो निर्मिला दशमुखें मृग हो खळानें ॥

मारीच तो वधि तया प्रभुकार्यदक्षा, जाऊनि दूरि, शिव संहरि जेंवि दक्षा १६

तो राक्षसाधम हरी जनकात्मजा ते, नेतां वृकें जशि अजा अति दीन जाते ।

तेव्हां वनीं रघुपती अतिशोक दावी, कीं स्त्रीप्रियास गति शेवटिं हे वदावी ॥

जातां स्वकार्य मृतदेह कबंध मारी, जे मित्र होति कपि शोधुनि भूकुमारी ।

वाळीवधाउपरि सांगति तेच वेळे, ये विश्ववंद्य मग यांसह सिंधुवेळे ॥१७॥

सक्रोधलोचनभयेंचि पडे समुद्रा, आंदोलतां जळचरें अतिमौनमुद्रा ।

जाला समूर्त्त शिरिं घेउनि पूजनातें, ये पाय वंदुनि वदे भवभंजनातें ॥१८॥

जो तूं अनंत सम जो न कुबुद्धि त्यातें, कूटस्थ आदिपुरुषा जगपाळित्यातें ।

---

१ समुद्रास सेतूचें बंधन करी. २ त्या बिभीषणास. ३ कोशलेश्वर राम त्यानें. ४ शापानें मार्गांत शिळा होऊन पडली होती तिला. ५ हंसाप्रमाणें मंदगतीनें चालणारी स्त्री. ६ शिवधनुष्य. ७ क्षत्रियवीर. ८ ऊस. ९ मोठा. १० मार्गांत. ११ त्या भार्गवाचा वाढत गर्व हरी, ज्यास राजांचें बीज दुःसह वाटलें होतें. १२ दशरथ. १३ स्त्रीसह. १४ जिवंत असून मुक्त मनुष्य जसा प्राणावर उदार असतो तसा. १५ शूर्पणखा. १६ राक्षसविशेष. १७ धनुष्य. १८ कनक मृगाचें रूप मारीचानें धरिलें होतें. १९ प्रभु जो रावण त्याचें कार्य करण्याविषयीं दक्ष. २० दक्षप्रजापतीस. २१ लांडग्यानें. २२ शेळी. २३ राक्षसविशेष ज्यास शिर मुळींच नव्हतें. २४ सीता. २५ समुद्रमर्यादेवर. २६ स्तब्ध. २७ शरीर धारण करून. ३० सर्वथा निर्विकार.

देवप्रजाधिपति भूतपति क्रमानें, मायापति सजिसि सत्त्वरजस्तमानें ॥१९॥
मानें तसें जलधितें अजि लंघिं मातें, श्री पाव मारुनि पुलस्तिसुताधमातें ।
पाषाण तारिं पसरे यश जेंवि लोकीं, गातील कीर्त्ति नृप सेतुपथाविलोकीं २०
सुग्रीव नीळ हनुमंत कपींद्रसेना, ते आणितां गिरिशिखो[1] नभ तें दिसेना ।
त्या सेतुनें रघुपती कपि[2]दग्ध लंका, देखे बिभीषण वदे मतिनिष्कलंका॥२१॥
वेष्टूनि ते नगरि वानर ते निघाले, लंकेंत घालिति गृहादि वरूनि घाले ।
हस्ती जसे ढवळिती [3]ह्रदिनीजळाला, देखोनि रावण अहो हृदयीं जळाला २२
पुत्र प्रहस्त[4] अतिकाय विकंपनादी, धूम्राक्ष दुर्मुख दिशा भरिती स्वनादीं[5] ।
सर्वांस त्यांस सह कुंभ निकुंभ धां[6]डी, तो कुंभकर्णहि उठे जग झोडि धा[7]डी२३
येतां निशाचरचमू अतिवीर्यशक्ती, हातीं धनुष्य शर तोमर शूल शक्ती ।
सुग्रीव लक्ष्मण मरुत्सु[8]त ऋ[9]क्ष नीळ, या अंगदा[10]दि सह ये प्रभु मेघनीळ ॥२४॥
त्या अंगदादि रघुनायक वानरांनीं, शस्त्रीं गदागिरितरूशरतोमरांनीं ।
ते मारिली निघनिघों च[11]तुरंग सेना, सीतापहारकदळीं शुभ तें दिसेना ॥२५॥
लंकेश लक्षुनि बळ[12]क्षय कोपतापें, ये वाहनावरि चढोनि महाप्रतापें ।
तों ये सुरेंद्र[13]रथ त्यावरि रामराया, हाणी शर त्रिशत रामशरें मराया॥२६॥
बोले रघूत्तम खळा मळ राक्षसांचा, तूं श्वान शून्यगृहभोजन भक्ष साचा ।
सीता परो[14]क्ष हरिसी तुज निस्त्रपां[15]तें, मी काळ मारिन अमोघबळा[16]स्त्रपातें२७
जों घे दशानन असा व्यवसाय कानीं, दापूनि त्यास रघुनायक सायकांनीं ।
भेदूनि ऊर वधि अनार्नि रक्त नाकीं, जैसा [17]थथें सुकृत[18]संचितरिक्त नाकीं[19] ।
रघुपति विजयी त्या रावणातें वधूनी, श्रम तदुपरि केला राक्षसांच्या वधूनीं ।
शुक मग विभु[20]लीला दिव्य जे तीस वर्णी, स्वपितृ[21]कृत वदे हे श्लोक बत्तीस[22] वर्णी ॥
श्लोकवृत्त कथिलें यमकानीं, गाति त्यांस न पडे य[23]म कानीं ।

---

१ पर्वताची शिखरें. २ वानरानें ( मारुतीनें ) जाळलेली. ३ ह्रदिनी ह्म० ह्रद ( डोह ) आहेत जिला अशी नदी. "नदिच्या जळाला" असाही पाठ आहे. ४ प्रहस्तादि रावणपुत्र. ५ आपल्या गर्जनेनें. ६ पाठवी. ७ घाला घालणारा. ८ मारुति. ९ जांबवान्. १० वालिपुत्र. ११ रथ, अश्व, पायदळ, व हत्ती हीं सैन्याचीं चार अंगें होत. १२ बळ ह्म० सैन्य त्याचा नाश. १३ इंद्राचा रथ. १४ नकळत. १५ निर्लज्जातें. १६ व्यर्थ न जाणाऱ्या, सफळ अशा बलवान् अस्त्रपातानें. १७ व्यर्थ ह्म० दुःख पावे. १८ पुण्यसंग्रह हारलेला मनुष्य. १९ स्वर्गांत. २० प्रभूची लीला. २१ शुकाचा पिता व्यास त्यानें केलेले. २२ बत्तीस अक्षरी श्लोक अर्थात् अनुष्टुप्. २३ मृत्यु.

पावतील रघुनाथपदातें, जे सदा स्मरति नाथपदातें ॥ ३० ॥
अष्टाऽक्षरी चरण तो यमकीं न साजे, लीलाच त्यांतिल सुखावह मानसा जे।
न प्रासही दिसति ज्यास बरे कदापि,कीं काळमृत्युस तदर्थचि एक दापी ३१
समश्लोकीमध्यें रघुपति[1] करीतों नियम कीं
कथावे श्लोकार्थ स्वगुणरचनायुक्त यमकीं ।
अनुष्टुप् पद्यातें ह्मणुनि विशद च्छंदनिं[2] करीं
करीतों रामाचे चरण शिरिं ते वंदुनि करीं[3] ॥ ३२ ॥

---

## अध्याय २.

मृतां राक्षसांची वधूवृंद[4] सेना, रडे आफळे अंत दुःखा दिसेना ।
स्त्रिया आणि मंदोदरी शोकरीती, निघोनी पुरींतूनि भारी करीती ॥ १ ॥
मेले सुमित्रात्मजसायकांनीं[5], आलिंगुनी त्यांसहि बायकांनीं ।
केला बहू शोक अनेक रीती, उच्चस्वरें रोदन ज्या करीती ॥ २ ॥
रडति दशमुखाच्या त्या स्त्रिया नाथ नाथा
तुजविरहित लंका आणि आह्मी अनाथा[6] ।
नगरिवरि रुसोनी वीरशेजे निजावें
तरि शरण पुरीनें[7] आजि कोणास जावें ॥ ३ ॥
होउनी वश तुवां मदनातें, आणिली प्रभुवधू[8] सदनातें ।
क्षोभली जनकराजकुमारी, तो प्रभावचि असा तुज मारी ॥ ४ ॥
लंका स्त्रियांसहित ते विधवाच केली, गृध्रान्न[9] ते तनुहि जे विषयीं भुकेली ।
सद्वंश[10]भूषणहि तूं नरकासि जासी, केला अनर्थ सकळां तनुजानुजांसी[11] ॥५॥
पुसोनि रामास बिभीषणानें, क्रिया[12] मृतांच्या कुलभूषणानें ।
केल्या स्वशास्त्रें परलोकरीती, तिळोदकीं लोक जसे करीती ॥ ६ ॥
दखे रघूत्तम अशोकवनांत सीते, नेत्रीं स्रवे विरहशोकवना[13] तसी ते ।
नाहींच बिंदुभरिही जळ ज्यांत कंठीं, कंठीतसे दिन अशी जळजातकंठी[14] ७

---

१ हे रघुपति. २ समुदाय. ३ हातांनीं. ४ स्त्रीसमुदाय. ५ लक्ष्मणाच्या बाणांनीं. ६ हे नाथ तुजवांचुन लंकापुरी आणि आह्मी अनाथा झालों. ७ लंकेनें. ८ सीता. ९ जे तनु ( शरीर ) विषयासक्त होय ती गिधाडांनीं खाण्यास योग्य. १० तुझा जन्म उत्तम कुळांत झाला असून. ११ तनुज ह्म० पुत्र आणि अनुज ह्म० बंधु. १२ और्ध्वदेहिक क्रिया. १३ शोकवन ह्म० शोकोदकें, अश्रु. १४ जलजात ह्म० शंख त्याचे सारखा आहे कंठ जिचा; कंबुकंठी.

पावली स्वविरहें तनु कंपा, राम तीवरि करी अनुकंपा ।
होय तोचि सुखवास रे सीते, मम रामसुखवासरसीं ते ॥ ८ ॥

जवळि अनुज सीता राम बैसे विमानीं
कपिपतिसह ज्यातें बंधुतें जेंवि मानी ।
दशमुखअनुजा दे उत्तमश्लोक लंका
पवनजसह यांनीं घे तया निष्कलंका ॥ ९ ॥

प्रभु करि चिरजीवी शत्रुच्या सोदराशी
रवि शशि गगनीं तों राज्य दे मोदराशी ।
रघुपति परते हो तें सुरां सौख्य वाटे
स्त्रविति कुसुमवर्षे त्या विमानांत वाटे ॥ १० ॥

गोमूत्रपक्क जेवें भक्षुनि वाट पाहे
येणें तदर्थ भरतावरि हो कृपा हे ।
कीं स्थंडिलावरि निजे क्षण कल्पें कंठी
जो प्राण ठेवुनि असे बसला स्वकंठीं ॥ ११ ॥

श्रवणिं भरत ऐके राम आला अयोध्ये
अभिमुख विभुतें ये येति आमात्य योद्धे ।
पुरजन गुरु संगें पादुका मस्तकांतीं
करिति रविशशींच्या ज्या अहो ध्वस्त कांती ॥ १२ ॥

वसे नंदिग्रामीं परि हृदय रामीं भरत तो
विना त्याचे पाय त्रिभुवनिं न जो लाभिं रततो ।
बसे वेदाध्यायीं धरि इतर ठायीं न मन तो
करी वाद्यांगीतांसहित पदपद्मा नमन तो ॥ १३ ॥

कनकमय पताका वृंद चित्रध्वजांचें
रथ चपळ तुरंगीं स्वर्णसन्नाह ज्यांचे ।

---

१ कृपा. २ सुखाचा दिवस. ३ रामासह सुख वास्तव्यरसांत. ४ सुग्रीवासह बसे, ज्या सुग्रीवास बंधूप्रमाणें मान देई. ५ रावणाचा धाकटा बंधु बिभीषण. ६ पुण्य आहे कीर्ति ज्याची असा राम. ७ निष्पाप असा बिभीषण त्यास पवनज म्ह० मारुतीसह पुष्पक विमानीं घेतलें. ८ बंधूस. ९ आनंदराशी १० पुष्पवृष्टि करून. ११ गोमूत्रांत शिजविलेले सातु. १२ नुसत्या जमिनीवर निजे. १३ एक क्षण कल्पाप्रमाणें लोटी असा भाव. १४ प्रभुस सामोरा येई. १५ ज्याच्या बरोबर नगरांतील लोक व गुरु वसिष्ठ आहेत. १६ तेज नाहींसें करितात. १७ चित्रविचित्र ध्वजांचे समुदाय. १८ ज्या घोड्यांचें सामान सुवर्णाचें होतें.

कवचसहित योद्धे मुख्य मुख्य प्रजांचे
प्रभु अभिमुख येती दास पादांबुजाचे ॥ १४ ॥
चिन्हें महाविभव राजविलास मुद्रा, आणी पुढें भरत त्या करुणासमुद्रा ।
प्रेमें पदावरि पडे विसरूनि देहा, आलिंगनें प्रभु भुजा पसरूनि दे हा १५
प्रथम शिरिंहुनी त्या पादुका पादपद्मा-
जवळि भरत ठेवी ज्या पदीं नित्य पद्मा ।
मग चरणिं पडे त्या क्षेमं दे सुस्वभावा
प्रभु नयनजळीं सप्रेम न्हाणी स्व-भावा ॥ १६ ॥
ब्राह्मणांस करि वंदन पायीं, हें मला प्रिय असें उपपादी ।
लक्ष्मण क्षितिसुतेसह पायीं, लोक वंदिति जयासि उपायीं ॥१७॥
कोसलाधिपति कोसललोकीं, देखिला बहु दिसां अवलोकीं ।
नृत्य वस्त्र उडवूनि करीती, पुष्पवृष्टि वरि कौतुकरीती ॥ १८ ॥
धरी भरत पादुका व्यजन चामरें वीजिती
बिभीषण कपींद्र जे निजसुखें तयाच्या जिती ।
सुधाकर धरी मरुत्सुत सितातपत्रा कृती
प्रवेश करि राघव स्वनगरीं पवित्राकृती ॥ १९ ॥
धरुनि सधनु भाते दास्य शत्रुघ्न मानी
धरि करिं जळझारी रामकांता विमानीं ।
धरियलि असिचर्में अंगदें ऋक्षपाळें
विभव नगरलोकां दाविलें हें कृपाळें ॥ २० ॥
रघुपति अति शोभे पुष्पकीं व्योमवाटे
द्विज गुरु सह नेत्रां उत्पला सोम वाटे ।
नटति युवति गाती कीर्ति बंदी विमानीं
प्रियतम जन आत्मा आपुला जेंवि मानी ॥ २१ ॥
रचित कुसुमरत्नें श्रीअयोध्या पुरी ते
जन अमृतरसाच्या वाहती त्या पुरीं तें ।

---

१ "प्रभुप्रति मुख येती" असाही पाठ आहे. २हा प्रभु राम. ३ ज्यापदीं नित्य पद्मा (लक्ष्मी) त्या पादपद्माजवळ पादुका ठेवी. ४ आलिंगन. ५ आपला बंधु त्यास. ६सीतेसह. ७ अयोध्येच्या लोकांनीं. ८ वारा घालिती. ९ चंद्र. १० शुभ्र छत्र. ११ धनु; कुशल. १२ ढाला. १३ आस्वलांचा स्वामी जांबवान् त्यानें. १४ आकाशमार्गानें. १५ नेत्रकमलास चंद्राप्रमाणें ,वाटला. १६ चंद्र. १७ भाट; स्तुतिपाठक. १८ प्रवाह.

नृपगृहिं गुरुपत्न्या माउल्या त्यांस भावें
नमन करि तयीं त्या तोषल्या बन्धुभावें ॥ २२ ॥

वंदिलें अवघियां वडिलां हो, धाकुटयां स्वपदवंदनलाहो ।
रामलक्ष्मणधरातनयांहीं, घेतलें पुजुनि पूजन यांहीं ॥ २३ ॥

वसे नंदिग्रामीं जननि हि विना राम नयनीं
न पाहे शत्रुघ्नासह भरत जो भूमिशयनीं ।
ह्मणोनी चौघांही भिजविति तिघी एकसमयीं
तनुप्राणन्यायें नयनजळिं मायारसमयी ॥ २४ ॥

मग उकलि जटांतें राम कोदंडपाणी
कुळगुरु जयिं न्हाणी घे चतुःसिंधु पाणी ।
त्रिदशगुरु सुरेंद्रा ये रिती रामचंद्रा
द्विज वडिलहि देती मान वंशाब्धिचंद्रा ॥ २५ ॥

सुस्नात होउनि असा करुणांबुराशी, अंगीकरी मग विभूषणअंबरासी ।
प्रार्थूनि दे भरत वंदुनि आसनातें, घे तो पदप्रद सुरां कमलासनातें ॥ २६॥

प्रजा स्ववर्णाश्रमधर्मवाटे, लावी जयां बापचि राम वाटे ।
प्रजा गमे संतति त्या पित्याला, स्पर्शो न दे दुःख कदापि त्यांला २७॥

त्रेतायुगीं कृतयुगींपरि काळ जाला, देखूनि राज्य करितां रघुवंशजाला
धर्मज्ञ राम सुख दे सकळां प्रजांला,प्रेमें प्रजा भजती त्या भरताग्रजाला २८

---

१ " नृपगृहिं गुरुपत्न्या माउल्या त्यांस भावीं, नमन करि तयां तोषले बंधुभावीं । "असाही पाठ आहे. येथें माउल्या ह्म० राममाता. २ धाकटे लोक होते त्यांस सीतारामादिकांस वंदन केल्याचा लाभ मिळाला ह्म०-ते यांच्या पायां पडले. असा भाव. ३तिघी राममाता नयनजळानें चौघां पुत्रांस भिजविती असा अन्वय. ४ मायेच्या योगानें प्रेमरसभरित झाल्या आहेत अशा. ५ कोदंडधनुष्य आहे हातांत ज्याच्या. ६ चार समुद्राचें जल अभिषेकार्थ घेई. ७ त्रिदश ह्म० देव यांचा गुरु जो बृहस्पति तो जसा इंद्रास मान देतो तसा ब्राह्मण व समस्त वडील माणसें रामास मान देतीं झालीं.८ सूर्यवंश हाच कोणी समुद्र त्यास आनंद देणारा चंद्रच. ९ करुणासागर. १० वस्त्रांस. ११ सुरांस आणि कमलासनास ह्म० ब्रह्मदेवास पद देणारा जो प्रभु तो आसनातें घे असा अन्वय. १२ प्रजेस स्ववर्णाश्रमाप्रमाणें वागण्यास लावी. १३ कृतयुगाप्रमाणें सत्यनिष्ठ व सुखप्रद. १४ रामचंद्रास पाहून.

वनें नद्या पर्वत सर्व खंडें, द्वीपांसमुद्रांसहितें अखंडें[१] ।
हे[२] कामधेनू सकळां प्रजांला, देखूनि होती भरताग्रजाला ॥ २९ ॥

बहु भिति यमलोका श्रीवरा रामराया
जन मरण न पावे जो न वैसे मराया ।
वळखति न जरा[३]धिव्याधिशोकादिकां या
श्रमभयअसुखांतें नेणती लोककाया[४] ॥ ३० ॥

रघुपती निजएकवधुव्रता[५], शिकवि हो जनचित्तमधुव्रता[६] ।
स्फुट करी गृहधर्म समस्त कीं, धरुत लोक कथारस मस्तकीं ॥ ३१ ॥

करि जनककुमारी नित्य निर्व्याज[७] सेवा
तुह्मि हि जन मनीं हो तो महाराज सेवा[८] ।
सगुण सलज्ज[९] सीता भाव जाणे पतीचे
मन हरिति पतीचें प्रेमसल्लाप[१०] तीचे ॥ ३२ ॥

रामवृत्त कथिलें यमकांनीं[११], गाति त्यांस न पडे यम कानीं ।
भिन्न अर्थरचना सम जावी, काव्यरीति चतुरीं समजावी ॥ ३३ ॥

---

## अध्याय ३.

नदुपरि[१२] शुक सांगे राम मांडी मखांतें[१३]
निज पदचि यजी[१४] जें हें जगद्धाम खातें ।
गुरुवचनविधानें लंकनाथारि[१५] पूजी
सुरमय सुर सेवी तद्रिपूचा रिपू जी[१६] ॥ १ ॥

दिशा पूर्व होत्या[१७] दिली दक्षिणा हो, दिली ब्रह्मयातें दिशा दक्षिणा हो ।
प्रतीचीस[१८] अध्वर्यु जो दे तयाला, उदीची[१९] दिशा देश उद्गातयाला ॥ २ ॥

---

१ नवखंडें. २ ही सर्व प्रजेस इच्छिलेलें फळ देणारी कामधेनु झाली. ३ जरा ( वृद्धपण ), आधि ( मानासिक व्यथा ) व्याधि (शारीर व्यथा) आणि शोक यांस; हा समाहारद्वंद्वसमास. ४ प्रजेचीं शरीरें. ५ एकपत्नीव्रत. ६ लोक चित्तरूपभ्रमरास; ‘ सधुव्रता ’ असा ‘मधुव्रता’ बद्दल पाठ आहे. ७ निष्कपट. ८ सेवन करा. ९ लज्जायुक्त. १० प्रेमसंभाषण. ११ यमक युक्त श्लोकांनीं. १२ त्यानंतर. १३ यज्ञातें. १४ पूजी; यज्ञ करी. १५ रावणाचा शत्रु राम. १६ देवांच्या शत्रूचा शत्रु जो सुरमय म्ह० देवस्वरूप राम तो सुर म्ह० देवांस सेवी. १७ होता, ब्रह्मा, अध्वर्यु व उद्गाता असे चार ऋत्विज यज्ञांत असतात. १८ पश्चिम. १९ उत्तर.

आचार्य जो मध्यम भू तयाला, देतां महा उत्सव दातयाला ।
हे निस्पृह ब्राह्मण सर्व लाहो, गोडी ह्मणे राम मतीस लाहो ॥ ३ ॥
तनुसें अंबरमात्रचि भूषणें, इतर सर्व दिलें रघुभूषणें ।
करि असें रघुनंदन दान कीं, उभि समंगलसूत्रचि जानकी ॥ ४ ॥
घेऊनियां ब्राह्मण सर्व लाहो, ते बोलती ब्राह्मणवत्सला हो ।
जो ब्राह्मणांचा स्वयमेव देव, प्रभूसि त्या बोलति भूमिदेव ॥ ५ ॥
न जी दीधलें काय आह्मांसि देवा, दिलें फार याहूनिही देवदेवा ।
प्रकाशोनि चित्तीं अविद्यातमातें, हरी देखतों त्याचि सर्वोत्तमातें ॥ ६ ॥
सर्वज्ञता दशशताननही न मोजी, ब्रह्मण्यदेव रघुराज तुतें नमो जी ।
तूं पुण्यमूर्ति अजि मस्तकरत्न देवां, जो दे स्वपादरज हंसजनां सदैवां ॥७॥
जयाचा जगीं कीर्तिसल्लाप होतो, स्वयें गूढ रातीं जना हो पहातो ।
वदे एक कोण्ही स्वभार्येस वाचा, तितें आयके श्रोत्रें तो राघवाचा ॥८॥
स्वयें जाशि दुष्टे पराच्या गृहातें, नव्हे राम मी कीं धरूं तूज हातें ।
दशग्रीव लावूनि ने हात सीते, वधूंलुब्ध अंगीकरी हा तसी ते ॥ ९ ॥
दुराराध्य जे अज्ञ ते लोकरीती, न जाणोनि वार्त्ता अशाही करीती ।
ह्मणूनी सतीतें वियोगश्रमातें, करी जाय ते वाल्मिकिआश्रमातें ॥ १० ॥

ऋषिजवळि असे ते गर्भिणी रामराणी
वनविभवहि मानी डोहळ्यांची शिरोणी ।
कुश लव सुत दोघे होति ते दिव्य काळीं
मुनि करि विधिकर्में उत्सवाच्या सुकाळीं ॥ ११ ॥

ऐसेच लक्ष्मणकुमारहि वंशकेतु, तो एक अंगद दुजा सुत चंद्रकेतु ।
तक्षाख्य पुष्कळ अशीं भरतात्मजांचीं, नामें कुळें बहुत विस्तरणार ज्यांचीं १२
शत्रुघ्नपुत्रीं स्वसमानसाचीं, नामें सुबाहु श्रुतसेन साचीं ।
शत्रुघ्न मारी असुरांस आणी, तद्वित्त रामार्पणहेतु आणी ॥ १३ ॥
शत्रुघ्ननामगत दाखवि अर्थ साचा, कीं पुत्र जो लवण त्या मधुराक्षसाचा ।

---

१ परिधान वस्त्र मात्र ठेवून बाकी सर्वस्व दान केलें. २ सीतेच्या गळ्यांत मंगलसूत्र मात्र ठेविलें. ३ ब्राह्मणांवर प्रीति करणारा. ४ ब्राह्मण. ५ शेष. ६ शिरोभूषण. ७ परमहंस; संन्यासीजन. ८ कान. ९ स्त्रीलंपट. १० सेवावयास कठिण. ११ सीतेस. १२ आवड. १३ वंशध्वज. १४ आणली. १५ त्या राक्षसांचें द्रव्य. १६ घेऊन येई. १७ शत्रुघ्न नावाचा शत्रूस मारणारा असा अर्थ.

मारूनि तो मधुवनीं मथुरा सजी कीं,जीमाजि कृष्णतनु राम खळास जिंकी ॥
पतीचीं पदें काननीं रामरामा, स्मरोनी ह्मणे आननीं रामरामा ।
मुनीच्या करीं पुत्र आणूनि घाली, क्षितीत स्वयें माय पोटीं निवाली १५
आयकोनि जरि शोक निवारी, चालिलेंच नयनांतुनि वारि ।
राखिले गुण तिचे हृदयातें, नावरेच अजि त्या सदयातें ॥ १६ ॥
सीताहेतु क्लेश आद्यंत रामा, एवं लोकीं दुःखमूलाच रामा ।
थोरां थोरां कष्ट यांच्याचि संगें, दावी ऐसें राम सीताप्रसंगें ॥ १७ ॥
तयाही वरी अग्निहोत्रादि याजी, करी ब्रह्मचर्य स्वयें तो क्रिया जी ।
अखंडाग्नि तेरा सहस्राब्द होमी,करी ख्याति कीं कर्मकर्ता असो मी १८

पदयुग मृदु जें कां पल्लवातुल्य वाटे
तदपि तुडवि कांटे दंडकारण्यवाटे ।
स्मरत चरित त्याला ठेवुनी तोचि ठेवा
गमन करि मनीं ते लोक हो पाय ठेवा ॥ १९ ॥

आश्चर्य कीं अधिक साम्य जया असेना,त्याला सहाय समरीं कपिऋक्षसेना।
बांधी समुद्र वधि रात्रिंचरादिक हीं,हे कीर्ति तारकहि त्यास न थोर कांहीं॥
गाती ऋषी नृपऋषीप्रति या यशातें, पापघ्न शुभ्र करि दिग्गज जो दिशांतें ।
तो राम मी शरण तच्चरणांबुजातें, सर्भावितां सुरनरेंद्रकिरीट ज्यातें ॥२१॥

रघुपतिचरणाचा दर्शनस्पर्शलाहो
उठत बसत चित्तीं राघव स्पर्शला हो ।
निघति परम योगी भाग्य तें कोसला हो
जितचि भव जयांचा राघवीं नासला हो ॥ २२ ॥
पुरुष रघुपतीच्या आयके जो कथा रे
भवभय न तयाचें हें घडी एक थारे ।
तटति सकळ कर्में होय दुःखाग्नि हिंसा
परम करुण भूतीं होय टाकूनि हिंसा ॥ २३ ॥
नृप पुसत शुकातें वर्त्तला केंवि राम
स्वजनभनुजलोकीं सर्वलोकाभिराम ।

---

१ निर्माण करी. २ राम कृष्णावतार धरून. ३ रामस्त्री सीता. ४ मुखानें. ५ स्वतः सीता. ६ दंडक. ७ क्रिया. ८ संचित द्रव्य. ९ राक्षसादिकांस. १० राजर्षि. ११ स्वच्छ. १२ देवांचे आणि राजांचे मुकुट. १३ संसार. १४ हिंसा म० हिमसा, थंडसा. १५ जीव हवन कर्म. "परम करुणमूर्ति" असाही पाठ आहे. १६ प्रजा आणि बंधुवर्ग यांच्या ठिकाणीं. १७ लोकप्रिय, अथवा सुंदर.

वद सकळ जनींही कोविं तो पूर्णकाम
प्रियतर वरिला जी हा करी पूर्ण काम ॥ २४ ॥

सिंहासनीं बसलियावरि दिग्जयातें, धाडी स्वबंधु वश सर्वहि ते जयांतें ।
भृत्यांसह प्रभु फिरे नगरीस पाहे, श्रीमूर्ति दाखवि जनांस करी कृपा हे २५
गजेंमदसलिलाचे कीं सडे चंदनाचे, सुरवरमुकुटांचे वोवसे वंदनाचे ।
नगर विविध दावी भाव हे मानसाचे, रघुपतिपदपद्मीं लाधले मान साचे२६

गोपुरें उपरमाडिया सभा, हेमकुंभ वरि देति यास भा ।
मंदिरीं सुरगृहीं ध्वजांचि था, साउल्या निबिड नित्य ज्यांचिया॥२७॥
प्रतिद्वारिं रंभादिपूगीफलांचे, तरू घोंस केले फुलांपोफळांचे ।
प्रभा तोरणामाजि कां आरशांची, महादीप्ति हेमांवरा फारशांची ॥२८॥
स्थळीं स्थळीं आणुनि पूजनातें, त्या पूजिती लोक निरंजनातें ।
ते बोलती पाळिं अजि क्षितीतें, पूर्वी तुवां उद्धरिलेंचि तीतें ॥ २९ ॥
देखोनि काळें बहु राघवास त्या, त्या पाहती टाकुनियां गृहा सत्या ।
ज्या सुंदरी वेंघेति मंदिरोपरी, पुष्पें बहू वर्षति हो परोपरी ॥ ३० ॥

ये त्यावरी निजगृहाप्रति जें विराजे, कीं देखिलें सकळ पूर्णहि राजराजें ।
वस्तू अमूल्य गणना न धना कदापी, जें कां कुबेरवरुणेंद्रगृहांस दापी ३१

स्वयंभा वैडूर्या करुनि रचिले स्तंभ वरवे
तयांच्याही पंक्ती क्षितिवरि बरी पाच मिरवे ।
प्रवाळांचीं द्वारें स्फाटिकमय भिंती विरचित
गृहाच्या रामाच्या सकळ रचना दिव्य उचिता ॥ ३२ ॥

शृंगारिलें चित्रविचित्रहारीं, मुक्तादिकीं रात्रितमोपहारीं ।
सर्वोपभोगार्थसमृद्धिकारी, वसे गृहीं त्या प्रभु निर्विकारी ॥ ३३ ॥
सुगंधी सदा धूपदीपीं विराजे, जन स्वामि त्याच्या गृहीं जेंवि राजे ।
स्त्रिया जेंवि देवांगना दास दासी, अशा मंदिरीं चित्त रामीं उदासी ३४

प्रभु करि सहसीता त्या गृहीं लोकलीला
श्रवणपठणमात्रें नाशिती ज्या कलीला ।

---

१ अहो. २ ज्या रामास. ३ गजांच्यामदोदकाचे. ४ व्रत, नियम. ५ सुवर्णाचे कळस. ६ शोभा. ७ केळी, सुपारी आदिकरून. ८ पुष्कळ अथवा कनकवर्णाची. ९ माडारहिवास. १० पौरक्रिया. ११ चढती. १२ कुबेरानें. १३ तिरस्कृत करी. १४ रत्नविशेष. १५ पापास.

स्वसुखरतविरक्तां सेव्य जो राम होतो
स्मर तदुरतिकाळीं श्रीघनश्याम हो तो ॥ ३५ ॥
स्वधर्मानुकूल प्रभू भोग सारे, यथाकाळ भोगूनि वर्णी असारे ।
बहू वर्षवृंदें जरी राहिला हो, दिला वामनाला पदध्यानलाहो ॥ ३६ ॥
॥ इति श्रीभागवतरामायण समाप्त ॥

## रामजन्म.

—:०:—

( कथेचा सारांश. )

कथाभाग प्रसिद्धच आहे. ही कथा वाल्मीकि रामायणावरून लिहिली नाहीं तर श्रीमद्भागवत व भारत यांच्या आधारानें रचिली आहे असें श्लोक ४६ वरून स्पष्ट दिसतच आहे.

हृदयिं आठवुनी पदसारसा, वदतसे अवतारकथारसा ।
सुरस जो मुनिवाल्मिक गातसे, सकळ रामकथा नुमि गा तसे ॥१॥
प्रगट रामचरित्र कलौ करी, जितचि मुक्ति तया आजि लोकरी ।
ह्मणुनि गा रघुनायक राम हा, तदनुरूप विलास करा महा ॥ २ ॥
शुक्लपक्ष मधुमास वसंतीं, रामजन्म नवमी तिथि संतीं ।
वर्णिली वदति अर्थहि लोकीं, त्या खुगा निपुण तो अवलोकी ॥३॥
योगीं अशा जन्म न राघवाचा, तो योग आला अशि गोष्टि वाचा ।
काळांत जो उत्तम जन्मकाळ, श्रीरामजन्मीं करिती सुकाळ ॥ ४ ॥
जनीं मनीं भक्तिकळा समृद्धी, केल्या जशा चंद्रकळासमृद्धी ।
वाढे सुखें चंद्र मनोभिमानी, तो शुक्लपक्षीं जनजन्ममानी ॥ ५ ॥
गोड रामरस केवळ संतीं, सेविला प्रथममासिं वसंतीं ।
त्या रसें मधुर तो मधु झाला, कीं जयांत अजि जन्म अजाला ॥६॥
ऋतुचा धनी सूर्य कालाभिमानी, वसंतासि जो उत्तमत्वेंचि मानी ।
वडीलें स्ववंशीं प्रभूजन्मकाळीं, तया दाखवी उत्सवाच्या सुकाळीं ॥ ७ ॥

१ वर्षसमुदाय; पुष्कळ वर्षें. २ कलियुगीं. ३ " तनुरूपें अवतारक हा महा " असा एक पाठ आहे. ४ चैत्रमास. ५ कोणाच्याच जन्मकाळीं असा योग याव-याचा नाहीं अशा योगावर रामाचा जन्म झाला असा भावार्थ. ६ पुष्कळ. ७ पूर्ण. ८ मनाची देवता, मनाची देवता चंद्र आहे ह्मणून मनोभिमानी हें विशेषण. ९ मधु १० चैत्र हें मधुर नांव पावला असा भावार्थ. १० सूर्य.

रामावतारार्थ जगीं भुकेल्या, भक्ती जनीं त्या श्रवणादि केल्या ।
नवप्रकारें भजती अजाला, जन्म प्रभूचा नवमीस झाला ॥ ८ ॥

नवदिन नवरात्री भक्ति लोकीं करा हो
नवविध निजभक्ती सूचवी किंकरा हो ।
नवरसनवमीस स्वामिचा जन्म झाला
नवरस नव अर्पा प्रीतिनें त्या अजाला ॥ ९ ॥

नवविधा नवरात्रिं महाधनें, गुणकथाश्रवणादिक साधनें ।
करुनि शेवटिं आत्मनिवेदना, भजति संत अहो रघुनंदना ॥ १० ॥
चित्त जो उपसमीपचि वासी, राघवीं करिल तो उपवासी ।
भक्तिवांचुनि दुज्या विषयातें, सेवितां सुख गमे विष यातें ॥ ११ ॥
अयोध्येमधें लोक ऐसेचि सारे, विना राम जे नेणती हे पसारे ।
तयाचेच गाती असे गीत नाना, न ज्या कीर्तनीं अन्यवार्तातनाना ॥१२॥

टळटळित दुपारां जन्मला रामराणा
ह्मणुनि सकळ गाती ठाउकें हें पुराणा ।
दशरथगृहमाथां सूर्य आला अहो तो
कुलटिलक पहाया तोचि मध्यान्ह होतो ॥ १३ ॥

त्यां सुखा रवि अखंड अपारा, वाटतें स्मरतसेल दुपारा ।
स्तब्ध यास्तव असेच घडी हो, कीं स्मरोनि सुख ते उघडी हो ॥ १४ ॥
स्वयें अंतरिक्षींहुनी लेंकुरातें, अहो भास्करें लावियेलें करातें ।
झणीं उष्ण लागे ह्मणे राघवातें, दुरूनीच दावी अशा लाघवातें ॥ १५ ॥
सूर्य यास्तव असे गगनींच, हे विचारुनि न ये मग नीचें ।
साउली करुनि आडचि पाहे, उष्णशंकित करी स्वकृपा हे ॥ १६ ॥
आर्या ह्मणे बाइल हे मला जे, घेऊनियां हे कर हेम लाजे ।
जातांचि भी अव्यवधान मातें, देखोनि सोडील रघूत्तमातें ॥ १७ ॥

१ श्रवण कीर्तनादि नवविध भक्ती. २ जन्मरहित रामाला. ३ नवरसांनी युक्त अशा नवमीस, नवविधा भक्ति शाखविण्यास्तव नवमीस जन्म घेतला असा भावार्थ. ४ नवे. ५ "श्रवण कीर्तन आदिक साधनें" असा एक पाठ आहे. ६ नवविधा भक्तींतील शेवटची भक्ती. ७ मायारूपी जगिक कथा. ८ अन्यकथा किंवा अन्य गीत. ९ जन्मकाळच्या. १० निरंतर. ११ सूर्य मध्यान्हास आला ह्मणजे एक मुहूर्त विश्रांति घेतो अशी उक्ति आहे. १२ खालीं. १३ रामास ऊन लागेल ही शंका धरून. १४ सावली दाव कोणी. सूर्यकी. १५ निर्वंध.

आणखी प्रकट कौतुकरीती, वाल्मिकीप्रभृति येथ करीती ।
मेषराशि पदवी बरवी हो, घे तयीं तदवलंब रवी हो ॥ १८ ॥
पुत्रउत्सव जयास विराजे, उत्तमासनिंच बैसवि राजे ।
सूर्य ये परम उच्चपदातें, सेविती ग्रह समस्त पदातें ॥ १९ ॥
प्रकटला प्रभु ज्या विमलक्षणीं, ऋषिवरां सुख दे शुभलक्षणी ।
म्हणति मारुनियां पुरुषाद हा, करिल शुभ्र दिशा स्वयशें दहा ॥ २० ॥
दशरथ-स्वसुतानन पाहतो, निज सुखें सुखि होऊनि राहतो ।
जगपटीं सुखतंतु विराजतो, प्रकटला नयनीं रघुराज तो ॥ २१ ॥
रवीच्या करें श्यामता ये घनासी, तयाचाचि संताप तो मेघ नासी ।
तया सूर्यवंशीं घनश्याम राम, करी कालवैवस्वताचा विराम ॥ २२ ॥
जसें चातकाला घनाचेंच पाणी, स्वभक्तां तसा राम कोदंडपाणी ।
म्हणूनी घनश्याम हा राम झाला, जयाकारणें जन्म घेणें अजाला ॥ २३ ॥
बुंगबुंग रव तुंग मृदंगीं, संगसंग नटती स्वहृदंगीं ।
अंगभंग बहु दावित रंगीं, रामरंग सुखसिंधुतरंगीं ॥ २४ ॥
दुमदुम ध्वनि वाजति दुंदुभी, सहितरावण राक्षसवृंद भी ।
सुख नरां सकळां अमरां महा, प्रगटतांचि रघूत्तम राम हा ॥ २५ ॥
रविकुळांत रघूत्तम राम हा, प्रकटतां सुख दे अमरां महा ।
सकळ पूर्णमनोरथ मेदिनी, करि तयाच अहा प्रथमे दिनीं ॥ २६ ॥
ब्रह्म पूर्ण गुणवैभव लोकीं, जन्मतां मग धरा अवलोकी ।
योग्य लेंकिस गमे नवरा हो, जो मनीं म्हणति मानव राहो ॥ २७ ॥
तो न्हाणितां राघव दानवारी, हस्तांत कन्यार्पणदानवारी ।
श्रीभूमि संकल्प करूनि घाली, विवाह तत्काळ करूं निघाली ॥ २८ ॥
आणीक आनंद अपार झाला, कीं लाधलें पायिंचिया रजाला ।
ऐशा सुखें राघवजन्मकाळीं, जनासि घाली धरणी झुंकाळीं ॥ २९ ॥

---

१ त्या मेषराशीचें अवलंबन; त्यावेळेस सूर्य मेषराशीस होता असा भाव. २ उंच स्थानीं म्ह० मेषराशीस. ३ रामपदातें ४ सुमुहूर्तीं. ५ शुभ आहेत लक्षणें ज्याचीं असा राम. ६ राक्षस रावण. ७ पुत्रमुख. ८ त्या सूर्याचा. ९ विवस्वान म्ह० सूर्य याचा पुत्र जो काळ वैवस्वत म्ह० यम. १० नाश, घन जसा सूर्यसंतापनाश करितो तसा घनश्याम हा सूर्यपुत्र जो यम याचा नाश करी असा भावार्थ. ११ धनुष्यपाणि. १२ मृदंगध्वनि दाखविणारा शब्द. १३ नाद. १४ मोठा. १५ हृद्-यरूप अंगांत. १६ हावभाव. १७ नृत्यांत. १८ लाटांमध्यें १९ पृथ्वी. २० कन्या सीता दिला. २१ राक्षसांचा शत्रु. २२ कन्यादानाचें उदक. २३ झुपिकांत.

असे सर्व भूतांसही वेगळाले, दिले सोहळे दोष त्यांचे गळाले ।
जळें न्हाणितां राम कोदंडपाणी, महादोष गेले ह्मणे आजि पाणी ॥३०॥
तारील पाषाण असें जळाला, वाटे ह्मणे दोष जळो जळाला ।
तेव्हां तरी तारकशक्ति[1] राम, देईल आह्मांसि मनोभिराम[2] ॥ ३१ ॥
देखूनियां जन्म असा अजाला, आनंद मोठा उदकासि झाला ।
ऐसाचि आनंद समस्तभूतां, श्रीराघवाची करि हो विभूती[3] ॥ ३२ ॥
भयें राक्षसांच्या सदा जो विझाला, स्वयें अग्नि तो दीप्त कुडांत झाला ।
ह्मणे अग्नि आला मला पाळणार, यया ऊपरी यज्ञही चालणार ॥३३॥
स्वसुतें[4] राघवदास्य मुखें करी, विभव हें अवलोकिन लोकरी ।
पवन[5] घे असि रामसुखें धणी, प्रकटतां कपिमारुतिचा धणी[6] ॥ ३४ ॥
पुत्र राम परमानंव साचा, व्यर्थ अन्य परमानवसांचा ।
पुत्र वास चुकवी नरकाचा, दुर्गती न चुकवी नर कांचा ॥ ३५ ॥
रामभक्त सुत मानव लोकीं, तत्पिता न नरका अवलोकी ।
गोष्टि हे अलिकडेच वदावी, त्यासि तों स्वपद राघव दावी ॥ ३६ ॥
वंशेजांत करि राघवसेवा, कीं कथा करिती त्यांत वसे वा ।
सर्व वंश करि धन्य अहो तो, एकही नर असा जरि होतो ॥ ३७ ॥
वंश धन्य करि राम धरित्रीं, अर्पितां हृदय रामचरित्रीं ।
पाडिली नगरि ओस यमाची, रामकीर्ति असि या नियमाची ॥ ३८ ॥
वायुस आनंद अपार झाला, कीं याचिया पायिंचिया रजाला ।
लाधेल सेवील रघूत्तमातें, स्वपुत्र तो धन्य करील मातें[13] ॥ ३९ ॥
श्रीरामजन्मसमयीं जन रामराम, प्रेमें ह्मणे ध्वनि उठे हृदयाभिराम ।
आकाश तो निरवकाश सुखेंचि झाला, लोकीं[14] शब्दकृतताप तयीं विझाला ॥
एक शब्दगुण[15] त्यासहि वाणी, रामनाम न वदे जनवाणी ।
खेद हा परम जो गगनासी, रामशब्द सहजीं मग नासी ॥ ४१ ॥
सुमित्रासुताच्या अहो अग्रजाला, जगीं जन्म झाला परेशा अजाला ।
असा सर्वभूतांसि आनंद झाला, अपेक्षी अहिल्या पदांच्या रजाला ४२
ऋषि समस्तहि राघवकीर्त्तनीं, चरित गाति निरोपिति नर्त्तनीं ।

---

१ पाषाण तरविण्याची शक्ति. २ मनाला आल्हाद करणारा. ३ अवतार. ४ मारुति. ५ वायु. ६ धन्यता; पुर्ण समाधान. ७ स्वामी राम. ८ मानवश्रेष्ठ. ९ इतर. १० कथा. ११ वंशांतील पुरुषांत. १२ भजकांत. १३ मला. १४ लोकांच्या प्राकृत दुःखांनीं झालेला त्रास. १५ आकाश.

बहु सुखी ऋषिवाल्मिकि वें खरी, करुनि दाखविली निजवैखरी ॥४३॥
विश्वामित्र स्वामिच्या जन्मकाळीं, नाचों लागे उत्सवाच्या सुकाळीं ।
कीं मी आतां आणिन स्वाश्रमातें, नाशील श्रीराम माझ्या श्रमातें ॥४४॥

भविष्यातें पाहे करुनि हृदयीं ध्यान मुनि तो
सुखें नाचों लागे त्वरित रघुनाथा नमुनि तो ।
स्ववंशीं रामाचें गुणरचित ऐसें समजला
ह्मणे हें हो भाग्य त्रिभुवनवरिष्टासि मजला ॥ ४५ ॥
श्रीमद्भागवतांत आणि इतर ग्रंथीं महाभारतीं
श्रीमद्रामकथा निरूपिलि बरी व्यासाचि ही भारती ।
गातां तेचि शुकादि गोत्रजकुळीं मध्यें वसिष्ठान्वयीं
माझा वामन राम गाइल तयीं लक्षूनि सर्वान्वयीं ॥ ४६ ॥

उपाध्याय रामास माने मुनी हो, स्ववंशीं स्मरे भक्त जो नेमुनी हो ।
सुखें राम सेवी अशा गोत्रजाला, स्मरो मी ऋषीमात्र संतुष्ट झाला ॥४७॥
इत्यादि रामचरितीं रस हे अपार, श्रीव्यासवाल्मिकिहि नेणति अंतपार ।
हा ग्रंथ वामननिरोपित राघवाचा, वाचा हरील मग ते सकळाघवाचा ॥४८॥

॥ इति श्रीरामजन्म समाप्त ॥

# अहल्योद्धार.

(कथेचा सारांश)

गौतमऋषीची अहल्या म्हणून पतिव्रता धर्मपत्नी होती. तिचा अभिलाष धरून इंद्र मुनिवेषानें गौतम ऋषि नसतां आश्रमांत शिरला. तेव्हां संभोग केला आणि गौतमानें अहल्येस तूं अरण्यांत शिळा होऊन पडशील असा शाप दिला. पण लागलाच त्याचा क्रोध शांत होऊन पुढें राम तुझा उद्धार करील असा उश्शाप दिला. त्याप्रमाणें ती सहस्रावधि वर्षें अरण्यांत शिळा होऊन पडली होती. पुढें विश्वामित्र श्रीरामलक्ष्मण घेऊन सीतास्वयंवरार्थ मिथिला नगरीस जात असतां त्या शिळेस प्रभूच्या पदस्पर्श होऊन अहल्या पूर्वरूप पावली.

करुनि नमन सीतावल्लभाच्या पदातें,
कथिन पदरजाच्या कीर्तिच्या संपदातें ।

१ निजवैखरी; "वें" बदल "कीं" असाही पाठ आढळतो. २ वाणी. ३ "त्या उत्सवाच्या सुकाळीं" असा एक पाठ आहे. ४ "नाशी माझा राघवो या श्रमातें" असाही पाठ आहे. ५ "त्रिभुवनिं वसिष्ठासि मजला" असाही पाठ आहे. ६ वसिष्ठाच्या वंशांत. ७ सर्वकुळ वाचा.

जड शिळ तनु झाली जे अहिल्या मतीची
निजचरणरजें ते उद्धरू राम तीची ॥ १ ॥

सुरेंद्रें[1] अहिल्या सतीशीं रमाया, तिला दाविली गौतमाकार[2] माया ।
प्रिया आत्मैयाची[3] तसा भाव दावी, अहंकार बुद्धीस ते पैं वदावी ॥ २ ॥
अहंकार[4] इंद्र प्रियात्मत्व दावी, रमे बुद्धिसीं ते अहिल्या वदावी ।
शिळा देह जो मी गमे ज्या मतीतें, जगीं उद्धरू तो पदें राम तीतें ॥३॥
चिच्छक्ति[5] चित्स्फुरण[6] निर्मल ज्या मतीतें, आत्मा सदा प्रिय गमे सुखधाम तीतें।
ते आत्मता तसिच मानुनि मीपणातें, संपादिते तनु शिळापण आपणातें ॥४॥
अहिल्या तशी स्वप्रियाकार मा[7]या, न जाणोनि गेली पराशीं रमाया ।
घडे या निमित्तें शिळाशाप तीतें, पती मानितां त्या शचीच्या[8] पतीतें ॥ ५ ॥

गौतमें करुनि कोपतीव्रता, शापिली निजसती पतिव्रता ।
पाववूनि अधमाधमा गती, मानिली निरपराध मागुती ॥ ६ ॥

शापूनि होय अनुतप्त[9] मुनी सतीतें, कीं उाउकें न सुरकृत्रिम[10] जीस तीतें ।
त्यां शापिली तरि जडात्मकता मतीची, नाशी रघूत्तम तशी हरु राम तीची

सागरीं दगड राघव तारी, या शिळेसि विभु तो अवतारी ।
उद्धरी जिस जडभ्रम तीतें, राम उद्धरि जसा कुमतीतें ॥ ८ ॥

कानीं असें वचन आयकतां पतीचें, झालें अचेतन शिळामय रूप तीचें ।
नासा[11] स्तन श्रवण[12] केशहि वेगळाले, देखूनि बाष्प[13] मुनिच्या नयनीं गळाले ९

अवयव अवघेही हे यथापूर्व सारे
करळ पसरले ते मूर्धजांचे[14] पसारे ।
करितिल वनिं चूर्ण श्वापदांचे चपेटे[15]
म्हणुनि मुनिमनीं हा शोकवन्हीच भेटे ॥ १० ॥

देखतां मुनि तिला तनुकंपा, पावला उपजली अनुकंपा ।
शोक होउनि अपार सतीचा, वेचवी तप कृपारस तीचा ॥ ११ ॥

विना वृक्ष येथें नसो जीव जाती, गजव्याघ्र निर्जीव होऊनि जाती ।
हिला पाय लागो मृगाकाननेंचा[16], घडो जंगमां[17] त्याग तो काननांचा[18] ॥१२॥

---

१ इंद्रानें. २ गौतम मुनीचें स्वरूप धरिलें. ३ आपली प्रिया असल्याप्रमाणें. ४ इंद्र हा अहंकार, बुद्धि हीच अहल्या आणि शिळा हा देह असें येथें रूपक केलें आहे. ५ ज्ञानशक्ति. ६ ज्ञानस्फुरण. ७ कपट. ८ इंद्राणीच्या. ९ पश्चात्तापयुक्त. १० इंद्राचें कपट. ११ नाक. १२ कान. १३ अश्रु. १४ केशांचे. १५ सपाटे. १६ चंद्रवदन रामाचा. १७ जनावरांस. १८ अरण्याचा.

वचन हें निघतां ऋषिआननीं, बसति जंगम जीव न काननीं ।
विपिनशासन ये रिति नेमुनी, निजतनू बदरीप्रति ने मुनी ॥ १३ ॥
साठां सहस्रां वरुषीं अजाला, वंशीं रवीच्या मग जन्म जाला ।
तो राम सीतावरंगप्रसंगें, ये त्या वना कौशिकविप्रसंगें ॥ १४ ॥
तो स्थावरांविण न देखत जंगमातें, सर्वज्ञ रामहि वदे अजि सांग मातें ।
हांसे ह्मणे मुनि सुरां विधिपूर्वकां ही, तूं निर्मिता विदितसे तुज सर्व कांहीं॥१५॥
सर्वज्ञ राम अजि लौकिकभाव दावी, म्यां कां तयाप्रति न पूर्वकथा वदावी ।
सांगे ह्मणोनि ऋषिवर्य मुनींद्र रामा,—वार्ता दिवाकरकुलांबुधिचंद्ररामा ॥१६॥
कथि कथा कुशिकान्वयनंदन, श्रवण तें करितो रघुनंदन ।
सकळ पावति गौतमआश्रमा, नयनिं देखति विप्रवधूभ्रमा ॥ १७ ॥
शिळा सारी नारी हसित अधरीं मंद मिरवे
मुखीं चंद्रज्योत्स्ना अवयव यथापूर्व बरवे ।
ऋषी विश्वामित्राप्रति सकळ देखूनि पुसती
सुखें कोण्या हांसे ह्मणति वद जी गौतमसती ॥ १८ ॥
दिलें तया उत्तर कौशिकानें, कीं शाप हा आइकतां स्वकानें ।
जाली सती हे अतिदीनवाणी, आक्रंदली सुस्वर दीन वाणी ॥ १९ ॥
करूनी गळा मोकळा सारसाक्षी, रडे कीं अगा सर्वसंसारसाक्षी ।
पतिप्रीतिकामी नसें पापकामी, असी तें अहा पावलें शाप कां मी ॥ २० ॥
पतिव्रता मी पतिहार कंठीं, घालूनि धर्मे निजकाळ कंठीं ।
वेंचें तया इंद्रभुजंगमातें, घे तों डसे दुष्ट भुजंग मातें ॥ २१ ॥
ज्याला तपें सकळ भूतभविष्य ठावें, ऐशा पतीसही असें तम कां उठावें ।
गेली स्वकांत ह्मणऊनिच जे रतीतें, शापें तिला रचियला अपकार तीतें॥२२॥
इत्यादि शोक परिसोनि मुनी सतीचा, मानी मनीं निरपराध विलास तीचा ।
आली कृपा तंव बहू ऋषिगौतमातें, बोले त्यजूनि अतिदीर्घतमोतमातें ॥२३॥
ह्मणे स्पर्शला काम देवाधमातें, अहल्ये तसा झोंबला क्रोध मातें ।
भली तूंचि मी इंद्र दोघे समान, त्रिलोकीं न होतील आह्मांस मान॥२४॥

१ मुखांत. २ अरण्यास आज्ञा. ३ बदरिकाश्रमाप्रत. ४ सीतास्वयंवरप्रसंगीं. ५ विश्वामित्र. ६ विधिसहित सुरांस; ब्रह्मादिदेवांस. ७ रामा ह्म० स्त्री अहल्या हिची वार्ता. ८ सागरासारखें विस्तीर्ण जें सूर्यकुल त्यापासून उत्पन्न झालेला चंद्र असा.९ कुशिकवंशाला आनंद देणारा. १० अहल्येचें दुःख.११ चंद्रप्रभा. १२ कमळासारखे नेत्र जिचे अशी. १३ कोंठीं. १४ इंद्र भुजंगमास पतिरूप हार समजून मी घेतें तोंच.१५अज्ञान.१६ अतिमोठे कोपास. १७ अधम असा इंद्र.

चित्तीं मला उपजला अनुताप साचा, दुर्वार शाप अतिदारुण तापसाचा ।
हें नाशिलें सुकृत म्यां तव घातपातें, आतां कृपेंकरुनि वेचिन थो तपातें ॥२६
हा शाप आणि पुरुषांतर तूजला गे, स्पर्शी अकल्पित तयीं अघ तूज लागे ।
दोहींस या परिहरूनि समागमातें, माझ्या पुन्हा मिळशि तूं वर माग मातें ॥
हें आयकोनि अबला ऋषिवर्यवाणी, आतां नको करुं ह्मणे करुणेसि वाणी ।
दे एक थोर वर ये रिति कीं कदापी, मी न च्यवेन मज कोणहि लोक दापी २७
ऋषि ह्मणे असि हे वर मागती, कशि घडे इसि हे परमा गती ।
बहुत दीर्घ विचारुनियां मुनी, हसितवक्त्र वदे तिस नेमुनी ॥ २८ ॥
ह्मणे सूर्यवंशांत पूर्णावतारी, शिळा सागरामाजि जो देव तारी ।
घनश्याम तो राम लावू पदातें, तुतें आणि दे चिंतिल्या संपदांतें ॥२९॥
पडे शब्द कानीं जसा हा सतीच्या, सुखें येनि रोमांच देहास तीच्या ।
जगीं पूर्ण जीना निजानंद जाला, मनीं आठवी रामचंद्रा अजाला ॥३०॥
झाली शिळा परि मनीं सुख तें सतीच्या, अद्यापिही दिसतसे मुखिं हास्य तीच्या ।
रामाचिया स्मरतसे हृदयीं पदातें, हें हास्य सूचवि मनोगतसंपदांतें ॥ ३१ ॥
हें आयकोनि मग या चरितप्रसंगें, इंद्राचिही पुसियली गति विप्रसंगें ।
बोले ऋषी, सतिस जों मुनि दे वरा या, तों ये कृपाकुतुक देखुनि देवराया ॥
अहल्या सती शापिली कोपतापें, सुरेंद्रासि तेव्हां तपाच्या प्रतापें ।
ह्मणे प्रीति ऐसी जयाला भगाची, तनू हो सहस्रां भगीं दुर्भगाची ॥३३॥
तेव्हां मुनीतें अनुताप जाला, देखोनि अक्रोध महाद्विजाला ।
समागमें इंद्रहि काननातें, चाले स्वयें झांकुनि आननातें ॥ ३४ ॥
देखोनि दीन मुनिसत्तम देवराया, शापापहार करि ये रिति दे वरा या ।
कीं हीं भगें दशशतें नयनाकृतीतें, पावूनि सूचउत भाव जनां कृतीतें ३५
केलीं भगें नयन यांत असी कृपा हे, कीं लोचनीं दशशतीं अति दूर पाहे ।
चित्तीं धरूनि अनुताप असीं कदापी, कर्म नको करुं असा सविवेक दापी ३६
निरोप देऊनि सुराधिपातें, शिळा सती आळवि अश्रुपातें ।
गेला तपस्वी परमा तपातें, सोशीतसे वर्षहिमातपातें ॥ ३७ ॥
तदारभ्य हा हीस कांतारवास, स्मरे हे शिळा होउनी राघवास ।

---

१ ऋषीचा. २ अन्यपुरुष. ३ पातक. ४ भकेन; पतन पावेन. ५ विप्रवर्गानें. ६ विश्वामित्र. ७ गौतम. ८ गौतमाच्या कृपाळुपणाचा चमत्कार. ९ इंद्र. १० सहस्र भोकें आहेत जिस्स असी. ११ भमंगळ. १२ क्रोधरहित गौतमास पाहून. १३ मुनिश्रेष्ठ. १४ सहस्र. १५ नेत्ररूप होऊन. १६ अन्यांस. १७ पाऊस थंडी आणि ऊन. १८ तेव्हांपासून. १९ वनवास.

सुखें त्या मुखीं हास्यसद्भाव दावी, मुनी हो इची काय शोभा वदावी ३८

असें विश्वामित्रा हसत पुसतां विप्रनिकरीं

तयांतें हे वार्ता कुशिकसुत तो वर्णन करी ।

कर श्रीरामाचा धरुनि ऋषिवृंदांतुनि मुनी

पुढें ने श्रीरामा पद इस म्हणे लावि नमुनी ॥ ३९ ॥

श्रीराम तेव्हां तिस पादपद्मा, लावी वसे ज्यांत अखंड पद्मा ।

तों रामराम ध्वनि आननांत, त्वरें उठे गर्जत काननांत ॥ ४० ॥

ते जों उठे गर्जत राम राम, प्रतिध्वनी होति मनोभिराम ।

ते कौशिकादिद्विज रामवाणी, उच्चारितां काय सुखासि वाणी ॥ ४१ ॥

स्पर्शे लोह करितां परिसाचा, काळिमा हरुनि त्यापरि साचा ।

देह हेमपरि सुंदर जाला, लागतांचि हरिपादरजाला ॥ ४२ ॥

जयि मतिस चिदात्मा चित्पदीं मात्र दावी

जड तनु तिचि तेही ब्रह्म तेव्हां वदावी ।

कपटपुरुषवेषें हे दशा जे सतीतें

रघुपतिपदपद्मीं स्पर्शतां नास तीतें ॥ ४३ ॥

पदरजें उठतां कुशल क्षणीं, प्रथम पाय यवांकुशलक्षणीं ।

दिसति शोभति अद्भुत नूपुरें, स्मरति ज्यासि विरंचि तनू पुरे ॥ ४४ ॥

उठे तों पुढें राम कोदंडपाणी, गळां हार मुक्ताफळांचे सुपाणी ।

घनश्याम दृष्टी दिसे कामिनीच्या, प्रभा अंतरीं दिव्य सौदामिनीच्या ॥ ४५ ॥

सजलजलदवर्णा दुःखसंसारभंगा

कनकरुचिरवर्णा सूर्यकोटिप्रभंगा ।

सशर करिं धनू त्या राघवा सानुजातें

स्तवित कमलनेत्रा कुंडलास्यांबुजातें ॥ ४६ ॥

पदरजा जसि लाधलि दुर्लभा, परम विस्मित गौतमवल्लभा ।

करुनि मागुति मागुति वंदना, स्तवितसे स्वमुखें रघुनंदना ॥ ४७ ॥

---

१ विप्रसमूहानें. २ पादकमल. ३ लक्ष्मी. ४ अहल्या. ५ " स्पर्श कांचन करी परिसाचा. " असाही पाठ आहे. ६ " कपटपुरुषवेषें हे दशा जीस तीतें, रघुपतिविण कोणी उद्धरावें सतीतें । " असाही पाठ आहे. ७ त्या दशेतें. ८ उत्तम समयीं " कुशलक्षणीविह्वल " कमलेक्षणी असाही पाठ आहे. ९ यव अंकुश इत्यादि लक्षणांनीं युक्त. १० विजेच्या. ११ हे जलयुक्त मेघाप्रमाणें वर्ण ज्याचा अशा रामा; हा श्लोक कित्येक पुस्तकांत (४४) श्लोकापुढें दिला आहे आणि शेवटचे चरणांत 'स्तवित' बद्दल 'नमित' असा पाठ आहे. १२ कुंडलयुक्त आहे आस्यांबुज मुखकमल ज्याचें.

ब्रह्मादिही हुडकिती पदनीरजाचा, जो रेणु लाभ मज आजि तया रजाचा ।
केलें मला परम धन्य जगन्निवासा, नासूनि शाप तनुदुःख अरण्यवासा ॥४८॥

स्वपदरज जयाचे उद्धराया उपाय
त्रिगुणविरहिता या देह ना हात पाय ।
प्रथम नवल हें कीं जन्म त्याही अजाला
तदुपरि चरणाच्या रेणुचा स्पर्श जाला ॥ ४९ ॥

चाले वदे ही वरदान दे ही, तथापिही राघव हा न देही ।
न देह हें भाग्य अहो जनाचें, विचित्र कर्तव्य निरंजनाचें ॥ ५० ॥
मनुष्य या शुद्ध निरंजनाला, जे मानिती त्या अबुधां जनांला ।
मोहावया राम तसेंचि दावी, विचित्र याची करणी वदावी ॥५१ ॥

सुरनदी भुवनत्रयपावनी, पदरजें प्रभु तो मज या वनीं ।
जडशिलात्व निवारुनि दीसतो, धरिन मी मनिं यामिनिदीस तो ॥ ५२ ॥
सेव्य जो सकळ देवदानवीं, त्या शिवासहि शिरीं सदा नवी ।
ते नदी जसिच पादनीर जी, धन्य मी तसिच पादनीरजीं ॥ ५३ ॥
विधिभवांसहि पावननीर जी, जनन तीस तुझ्या पदनीरजीं ।
मज शिळेसही हे तनुसंपदा, तव पदींच, नमो अजि त्या पदा ॥ ५४ ॥
पदरजेंचि पवित्र नदी सती, मजहि ते पद पावन दीसती ।
दिसतसे प्रभुचा मज वेष ही, विभव हें किति वर्णिल शेषही ॥ ५५ ॥
मनुजआकृति बाणधनुर्धरा, जलजलोचन कौस्तुभकंधरा ।
नयनिं देखतसे तरि त्या विना, इतर दैवत मानुनि सेविना ॥ ५६ ॥
ज्याचें पदाब्जरज भुंडिति वेदवाचा, नाभीसि संभव सरोरुहसंभवाचा ।
घेणार नामरससार पुरारिवाणी, तो रामचंद्र भजतां मज काय वाणी ॥ ५७ ॥
या दीनपालनकथा खलशासनाच्या, गाती निरूपिति सभे कमलासनाच्या ।
त्या राघवाविण दुज्या कवणा भजावें, सर्वात्मना शरण एक तयास जावें ५८
धरूनि स्तनीं लग्न संगीत वीणा, तुतें राघवा गाय वाणी प्रवीणा ।
कुचाग्रावरी वर्षते नेत्रपाणी, हृदब्जीं जिच्या राम कोदंडपाणी ॥५९॥

---

१ पादकमलाचा रेणु. २ जो निर्गुण व निराकार असून त्याच्या चरणरजाचा स्पर्श उद्धरण्यास उपाय होतो हा चमत्कार. ३ वरदानही देतो. ४ साकार; देहधारी. ५ गंगा. ६ रात्रंदिवस. ७ पादकमळी. ८ शंकर. ९ जी॰गंगा. १० गंगा. ११ कौस्तुभ आहे ज्याच्या कंधरेंत म्ह० कंठांत; " सुंदर कंधरा " असाही पाठ आहे. १२ जन्म. १३ महादेव. १४ शंकराची वाणी. १५ सरस्वती. १६ हृदय कमळांत.

तुतें ब्रह्मलोकीं सदा गाय वाणी, नसे जीस गातां निजानंद वाणी ।
स्तनाग्रावरी तेंधवां अंबुजाचें, अहो भाग्य त्या दिव्य नेत्रांबुजाचें ॥ ६० ॥
रघुपती तुज गाउनि भारती, सफळ मानितसे निज भारती ।
तनुवरी गुढियाच उभारती, उपजवी सनकादिसभारती ॥ ६१ ॥
विधाता पिता आणि तत्पुत्र दारा, तुतें गाति गा रामचंद्रा उदारा ।
असा तूं जगद्धाम विश्वाभिरामा, तुझे पादपद्मींच मी मुक्त रामा ६२
जे संपदा कमलजा सकळां सुरांची, जे माउली विधिहरादिक वांसुरांची ।
तेही स्तवी पद तुझे निज संपदातें, मानी तयां नमन मी करितें पदातें ६३॥
आक्रमी स्वचरणें त्रिजगातें, राम हा म्हणुनि शास्त्रहि गातें ।
त्या पदा नमुनि गौतमजाया, घे निरोप पतिसन्निध जाया ॥ ६४॥
श्रीत्रिविक्रम विराम वामनीं, नित्यही प्रियपणें नवा मनीं ।
चित्स्वरूप करि कामना शिळा, वामनें इतर काम नाशिला ॥ ६५॥
॥ इति श्रीअहल्योद्धार ॥

## सीतास्वयंवर.

( कथाभाग प्रसिद्धच आहे ).

श्री स्वयंवरवधू नवरा हो, तों अखंड मनिं राघव राहो ।
भग्न जो करि धनुष्य भवाचें, बीज तो हर अनादिभवाचें ॥ १ ॥
वंदूनियां पद तया प्रभुराघवाचे, सीतास्वयंवर निरूपिन लेश वाचे ।
जें व्यासवाल्मिकिमुखांतिल सार साचें, संक्षेप मी कथिन रूप तया रसाचें २
राम उद्धरुनि गौतमजाया, दे निरोप पतिसंनिध जाया ।
कौशिकासह गृहा जनकाच्या, ये स्वयंवरवधूजनकांच्या ॥ ३ ॥
रावणादिक पती असुरांचे, वृंद वृंद नृपभूमिसुरांचे ।
मान्यता जनक तो करि पूजी, तों मुनींत दशकंठरिपू जी ॥ ४ ॥
बुद्धि जे अनुभवी जनकाची, मूर्ति त्या निजसुखा कनकाची ।
पाहतां धणि पुरे न मनाची, न स्मृति स्फुरतसे नमनाची ॥ ५ ॥

---

१ तोटा, २ सरस्वती. ३ वाचा. ४ " असा तूं जगद्वंद्य विश्वाभिरामा । जयाच्या पदें मुक्त मी आजि रामा ।" असाही पाठ आहे. ५ लक्ष्मी. ६ वासनारूप शिळेस. ७ " आणि तोचि मनिं मानव राहो " असा एक पाठ आहे. ८ महादेवाचें. ९ जनकराजाच्या. १० सीता ऊर्मिला इत्यादि चौघी स्वयंवरवधू त्यांच्या पित्याच्या गृहा.

तो भक्तिसंस्कार वरी विदेह, पाळी पदीं दंडचि जेवि देह ।
उठे करी त्यावरि पूजनातें, करूनि पायीं अवनेजनातें ॥ ६ ॥
आले बहू आणिकही घरा जे, पुजी यथायोग्य मुनींद्र राजे ।
त्यानंतरें आणवि त्या धनुष्या, न जें ढळे दैत्यसुरां मनुष्यां ॥ ७ ॥

त्रिशत गण शिवाचे सत्वरें त्या धनुष्या
उचलिति न ढळे जें अन्यदेवां मनुष्यां ।
तिहिं बहुबहुकष्टें ठेविलें चाप रंगीं
दचकति नृप सारे देखतां अंतरंगीं ॥ ८ ॥
वाटे तयां परम दुर्लभ ते नवोढा
जेव्हां पुरोहित ह्मणे धनु कां न ओढा ।
कोणी धरूनि बसला बसल्याचि ठाया
उत्साहबुद्धि न मनाप्रति दे उठाया ॥ ९ ॥

घनाक्षरी—सीतास्वयंवरीं वीर, प्रबळ बलाढ्य धीर ।
नृपवर थोर थोर, सभे घनदाटले ॥
त्याच्या पूजनीं उपचार, महा जनक उदार ।
करी मनीं वाक्यसार, निज कर जोडिले ॥
ऐका सकळही पण, मृडकोदंड कठिण ।
निजभुजबळें गुण, चढवूनि वोढणें ॥
गुणनिपुणप्रवीण, सर्वही सुजाण पणें ।
पुरवील हा जो पण, त्यासि सीता अर्पणें ॥
वाक्य ऐकूनि तयाचें, चित्त भंगलें भूपांचें ।
कोणी न बोलेचि वाचे, टकमक पाहती ॥
अवघे तटस्थ भूप, कोणी न बोलेचि चूप ।
तेव्हां होउनि सकोप, बोले लंकाधिपती ॥ १० ॥

सवाई—तो दशकंठ अकुंठ विसां भुजिं तें विषकंठधनू उचली,
कष्टत कोष्टवरि द्विज ओष्टहि चावुनि ज्यां जरि ने खचली ।
चाप उरीं दडपे झडपे मग आननपंक्ति धरे रचली,
वासुनि दांत मुखांत दहांत पडे मति गाढ,तमीं पचली ॥ ११ ॥

घनाक्षरी—कोणी उचलीना चाप, बहु.पावले संताप ।

---

१ प्रक्षालनार्थें. २ शिवधनुष्य. ३ दोरी. ४ परंतु. ५ चिप; स्तब्ध. ६ अविभां-[illegible]. ७ मणगटापर्यंत. ८ दांत. ९ दोरी.

कोणी उफराटी चाप, चढवितां चाखली ॥
रावणें जों केला ताण, भुई पडला उताण ।
शक्ति कराया उत्थान, अंबिकेनें राखिली ॥
दडपे धनुष्यें ऊर, दाही कंठीं घुरघूर ।
जेणें ऐशी दशा क्रूर, कधीं नाहीं देखिली ॥
तोही पावतां विराम, उठे दाशरथी राम ।
तेव्हां मूर्ति अभिराम, जनीं मनीं रेखिली ॥ १२ ॥
नित्यमुक्त जरि नित्य विरक्त, श्री स्वयें स्वचरणीं अनुरक्त ।
हे अनन्यविषया निजरामा, यानिमित्त उठणें रघुरामा ॥१३॥
ह्मणे विश्वामित्र स्वमनें सकळांचे भरंवसे
कळों आले आतां मजजवळि विश्वंभर वसे ।
तया या श्रीरामाविण जनकजा अन्य न वरी
ह्मणोनी बोले कीं उठ रघुपती साधिं नवरी ॥ १४ ॥
श्रीराम तेव्हां मुनिपादपद्मा, वंदी जयाचे स्वपदींच पद्मा ।
आज्ञा गुरूची ह्मणऊनि साची, करीन बोलोनि उठे तसाची ॥१५॥
शृंगारवीरकरुणादि नवां रसांची, लीला जगद्गुरुचिया पदसारसांची ।
सप्रेम तो दशम त्यासह त्या नवांतें, दावी सभेसि उठतां सुरमानवांतें ॥१६॥
घनाक्षरी–दावी सीतेसि शृंगार, परि दिसे सकुमार ।
त्यांत बीभत्स विकार, निर्विकार दाखवी ॥
विप्र ह्मणती किशोर, चढवितां चाप घोर ।
कष्टी न हो हाचि थोर, कृपारस राघवीं ॥
ह्मणती मुंगीस पक्ष, मूढां हाचि हास्यपक्ष ।
मानिला हो वीर दक्ष, देवदैत्यदानवीं ॥
संतां शांत सीताधव, चाप मोडी अभिनव ।
मोडी रौद्र त्याचा रव, भयानक सूचवी ॥ १७ ॥
शृंगारशृंगउदयाचळधामचंद्रा, श्रीरंगतुंगहृदया रघुरामचंद्रा ।
अगांगसुंदरवरा नवमेघरंगा रंगांगणीं जनकजा जडि अंतरंगा ॥ १८ ॥

---

१ दहावा सप्रेम अथवा वत्सल रस तोही दाखवी. २ निर्विकार जो राम तो प्रेक्षकांस निरानिराळे रस दाखवी. त्यांत सीतेस शृंगाररस दाखवून सोकुमार्यामुळें धनुष्य भंगण्यास असमर्थ पाहून. सीतेची निराशा झाली हाच त्यांत बीभत्स रसही दाखविला. ३ मूल. ४ करुण रस. ५ हास्य रस. ६ राम. ७ शृंगार हेंच ज्याचें शिखर अशा उदयाचलावर राहणाऱ्या चंद्रा रामा.

शृंगार शृंगालयकेसरी हो, सांगा अनंगा नटकेसरी हो ।
कांसे विकासे पट केंसरी हो, श्री शंकली पंकजकेसरां हो ॥ १९ ॥
अनंगरंगांबुधिच्या तरंगीं, रंगीं शुभांगी जडि अंतरंगीं ।
भंगील हा हो धनु केविं रंगीं, ह्मणे कुरंगीनयनी सुरंगी ॥ २० ॥
शृंगाररूप पहिला रस चाखवीला, बीभत्स शोककर त्यांतचि दाखवीला ।
कीं पाहतां विषय मानुनि त्या मलाही, चितानळीं मन करीलचि काम लाही
सूर्यवंशपतिच्या सकुमारा, देखतां रघुपतीस कुमारा ।
चाप तें कठिन हो मृदु भारी, हें मनांत भय काम उभारी ॥ २१ ॥
लज्जावती फार तथापि त्याची, शंका न सीता धरि हो पित्याची ।
ह्मणे अहा तात अशा पणातें, केलें तुवां संकट आपणातें ॥ २२ ॥
बहु कठोर ह्मणे धनु जानकी, निपट कांसवपृष्ठसमान कीं ।
रघुपती तरि हा लघु आपण, अहह दारुण तात तुझा पण ॥ २३ ॥
मदनशत्रुशरासन हें महा, मदनमूर्तिच केवळ राम हा ।
करिल सज्ज कसा धनु आपण, अहह दारुण तात तुझा पण ॥२४ ॥
मज न ये नवरा दुसरा मना, निजपणीं दृढ हे स्मर कामना ।
रघुपती तरि हा लघु आपण, अहह दारुण तात तुझा पण ॥ २५ ॥
प्रतिज्ञा सोडावी मति असि न माने स्वजनका
वदे दुःखें तेव्हां सखिजवळि निंदूनि जनका ।
ह्मणे वैरी बाप त्यजुनि पण रामासि मजला
न दे या देहातें त्यजिन मज नाहीं समजला ॥ २६ ॥
सखीसीं असें बोलतां सारसाक्षी, कृपाक्लिन्न तो होय संसारसाक्षी ।
तिला आणि सर्वां जसी देव दावी, तसी गोड एथूनि लीला वदावी॥२७ ॥
मंडपांत मग तो जनकाच्या, त्या स्वयंवरवधूजनकाच्या ।
अंगणात विभु ये जनकाच्या, या प्रभा ह्मणति लोक न काच्या ॥ २८ ॥
रामचंद्र उठतां जनकाच्या, मंडपीं नवरिच्या जनकाच्या ।
या वयांतहि जगज्जनकाच्या, न प्रभा ह्मणति सज्जन काच्या ॥२९॥
ठावों उठे दशरथप्रभुदिग्गजाचा, घे चाप इक्षुसम तें पति भर्ग जाचा ।
शुंडा स्वबाहु उचलूनिच चालिला हो,घेती समस्त नयनीं प्रभुच्या लिला हो३०

---

१ देह धरणाऱ्या मदना. २ केशरीरंगाचा. ३ रंगांगणांत; सभेंत. ४ हरिणाक्षी. ५ उत्तमवर्णाची. ६ ' धनु आपण ' बद्दल " त्रिमणेपण " असाही पाठ आहे. ७ जनकराजास. ८ क्लिन्न ह्म० आर्द्र. ९ स्वयंवरवधूच्या पित्याच्या सभेंत विभु-ह्म० राम ये तेव्हां. १० कच्च्या. ११ बधा. १२ शिव ज्याचा स्वामी तें धनुष्य.

गजशिशुगति जैसी ओंवि शुंडा उभारी
रघुपति उचलूनी ये तसा बाहु भारी ।
करि करि चिमणासा इक्षुभंग स्वहस्तीं
प्रभुहि भवधनुष्या ध्वंसि तैसा स्वहस्तीं ॥ ३१ ॥

घे इक्षु वारण जसा करपुंष्करानें[3], श्रीराम चाप उचली करपुंष्करानें[4] ।
विध्वस्त कानन दशाननअंबुजांचें, चापप्रताप हरि आननअंबु[5] जांचें ॥३२॥

दश मुखकमळांतें हस्तपद्मा विसांतें
पडत असुर मूर्छेमाजि अब्जा तिसांतें ।
तनुजलजवनीं त्या वारणां अब्ययाला
दृढ मृडधनु वाटे ऊस हो दिव्य याला ॥ ३३ ॥

पद्मार्टवीस गज इक्षुमिसें निघाला, आला तथापिहि सरोजवनासि घाला ।
तोंडें दहा पसरिलीं सरली अहंता, पायीं उरीं ढकलि चाप तदीयहंता ॥ ३४ ॥

पाहूनि पूर्वा उठतांचि राम, श्रीमूर्ति देखूनि मनोभिराम ।
आली कृपा ते कसि विप्रसंघा, सिंहावलोकें परिसा प्रसंगा ॥ ३५ ॥

जन वदति रमा हे आजि हो रामरामा
मुनि नटति सुखें जे गाति कीं रामरामा ।
उडति उडविती ते विप्र अंगोस्तरातें
प्रभुहि भवधनुष्या मोडि या दुस्तरातें ॥ ३६ ॥

एवं दशाननउरावरि चाप हातें, हाणोनि लात उचली जन तें पहातें ।
पायीं उरीं ढकलि राम दशास्यहंता, ज्याचीं मुखें पसरलीं सरली अहंता॥३७॥

कीर्तिचा तरि जगीं रव याचा, दीसतो मृदु किशोरवयाचा ।
हो तथापि जय राघवराया, ये रमा त्वरित त्यासि वराया ॥ ३८ ॥

मोडो त्वरें हें भवचाप हातीं, ऐशा कृपेनें द्विज जे पहाती ।
तो भाव दावी स्वकृपारसाचा, जरि स्वयें पूर्ण अपार साचा ॥ ३९ ॥

मुंगीस पक्ष फुटले उठला तसा रे, अन्योन्य हें वदति हांसति चोंट सारे ।
श्रीराम हास्यरस ये रिति भाव दावी, आतां कथा किमपि वीररसीं वदावी ४०

---

१ हस्ती. २ आपल्या शुंडेनें. ३ शुंडाग्रानें. ४ हस्तकमलानें. ५ तोंडचें पाणी. ६ दहा मुखाब्जें व वीस हस्ताब्जें अशा तीस अब्जांमध्यें. ७ त्या हस्तिरूप रामाला रावणाच्या तनुकाननात मृडधनु ऊसासारखें वाटलें. ८ कमलवनास. ९ सिंहाप्रमाणें मागें मुरडून पाहून; पूर्वकथेकडे लक्ष देऊन. १० रामाची स्त्री. ११ चावट.

मोठ्या गजासहि जसा चिमणा हरी तो,गंडस्थळें अति विदारुनि संहरीतो ।
मोडील हें धनु असें कुशलांसि वाटे, चित्तांत वीररस ये नयनांसिवाटे ४१

संतें पात्र विभुशांतरसाचें, प्रीतियुक्त निज अंतर साचें ।
या सभे करिति वर्षति वृष्टीं, प्रेम ज्यां न भवदुःख अदृष्टीं ॥४२॥
अद्भुतांत विभु अद्भुत दावी, ते कथा विशद लेश वदावी ।
कोविं ओढिल धनुष्य भवाचें, आइका सुख निजानुभवाचें ॥४३॥
स्वउत्तरीयांवर त्यास माजीं, बांधोनियां चाप तया समाजीं ।
दशाननाच्या हृदयावरूनि, घे मस्तकीं कुंतल आवरूनी ॥ ४४ ॥
घंटापताकांसह चाप हातीं, घेतां स्त्रिया पूरुषही पहाती ।
किशोरही थोर पराक्रमी तो, जाणों उसातें गज आक्रमीतो ॥४५॥
घे आणि सज्ज निमिषें करि चाप हातीं,ओढी त्वरें नवल सर्वहि हें पहाती ।
स्वल्पा वयांत जन मानिति अद्भुतातें,या अद्भुतें स्फुट करी स्वरसामृतातें ४६
रौद्रावरी रौद्ररसासि घाली, गोडी रसज्ञांत असी निघाली ।
कीं रुद्रचापावरि रुद्रभावा, योजी असें रौद्ररसस्वभावा ॥ ४७ ॥
श्रीमद्राघवहस्तपद्मगुणें ये कर्णांत हो जेधवां
मोडे हें भवचाप अर्थ इतुका दावी जगीं तेधवां ।
कीं श्रीरामकरारविंदगुणही कर्णांत येतां स्वयें
मोडे हें भवचापकासेन असा भावार्थ हा निश्चयें ॥ ४८ ॥
जेव्हां कथेची गति हे वदावी, धनुष्य भंगी रस रौद्र दावी ।
कडाडितां चाप भयास कांहीं, करी दिसे उग्र भयानकां हीं ॥४९॥
कडकडकड चापीं जेधवां शब्द जाला,तडतड विधिअंड त्रास दे अब्जजाला।
तडफाडि फणिरोणा कंपभूमंडळाला,खडबडि कनकाद्री धाक आखंडलाला॥
घनाक्षरी–करीती खळांसि दंड, ऐसे रामबाहुदंड ।
तिहीं मृडचाप चंड, मोडितां कडाडिलें ॥
भांड ब्रह्मांड अखंड, सातां द्विपां खंड खंड ।
होऊं पाहे खंडें खंड, गगन गडाडिलें ॥५१ ॥

---

१ सिंह. २ येथें पुढील श्लोकही आढळतो "कामें करी काम मनीं असेना, मारी विना क्रोधहि उट्ठसेना । न वश्य लोभादिगुणां असतां, रामीं असा हा रस शांत संतां ॥" ३ शुद्ध. ४ कंबरेस. ५ केश. ६ निशाणे. ७ धनुष्याची दोरी आकर्ण ओढली जाई तेव्हां. ८ कौशल्य. ९ संसाररूप धनुष्य. १० ब्रह्मांड. ११ ब्रह्मदेवाला. १२ शेष. १३ इंद्र. १४ तुकडे.

राक्षसांत मुंड मुंड, रावणादि पुंड पुंड ।
होती त्यांचे पिंड पिंड, हृदय तडाडिलें ॥
झाले भूप लंड भंड, गज दिग्गज उदंड ।
तोंडीं उगळितां गंड,-शोणित भडाडिलें ॥ ५२ ॥
घंटा ज्यासी जडजड, पताकांची फडफड ।
करी चाप कडकड, मोडी राम जेधवां ॥
अब्जजांड तडतड, गिरीवरी खडखड ।
नक्षत्रांचे धडधड, डोले व्योम चांदवा ॥ ५३ ॥
झाले वीर धडधड, ज्यांचे मर्मी धडधड ।
राक्षसांचे धड धड, कांपले हो तेधवां ॥
रावणाची बडबड, राहे पडे हडबड ।
काळघन गडगड, आटले हो तेधवां ॥ ५४ ॥
सद्भक्त ते मूर्ति नवां रसांची, देखोनि नेत्रीं गति मानसाची ।
ते वर्षती प्रेम तयाचि वाटे, एवं दशावा रस त्यांसि वाटे ॥५५॥
मना सदा प्रीति सुखा निजाची, मूढां जनातें न कळोनि जाची ।
सप्रेम विद्याप्रद मूर्ति साची, भक्तांसि वाटे दशमा रसाची ॥५६॥
सुस नवहि रसांची रामरूपेंचि केली
तरि दशमरसाच्या आवडीनें भुकेली ।
दशम सुरस ओते त्यांत रूपें नवांचीं
दिसति सफळ विद्या तेधवां मानवांची ॥ ५७ ॥
रामरूपिं नवही रस पाहे, राम त्यावरि करीच कृपा हे ।
प्रेम तो दशम त्यां रस दावी, यानिमित्त रसरीति वदावी ॥५८॥
मोडी असें जों भवचाप हातीं, तों लोक रामीं रस हे पहाती ।
तों जानकी ये प्रिय देवराया, रंगांत मातंगगतीं वराया ॥ ५९ ॥
गजगती जगतीप्रति दाविते, वसुमती सुमती सुख भाविते ।
स्वतनुजा तनु जाणतसे धरा, नवरि ते वरिते मणिकंधरा ॥ ६० ॥
नवसुधा वसुधातनया स्मरा, जनमनीं न मनीं वश जे स्मरीं ।
स्वपति तों पतितोद्धर तो खरा, नवरि ते वरिते रघुशेखरा ॥ ६१ ॥
जगपित्यास जगज्जननीच ते, वरि न जाणति हें जन नीच ते ।

---

१ वाजलेले. २ धडाधड. ३ धडकी; भीति. ४दृढ शरीरें. ५ भीति. ६ भाळे. ७ गजगतीनें. ८ पृथ्वी. ९ मणि आहे कंठीं ज्याच्या असा राम. १० मदनाला.

नवरि जे वरिजे जगदीश्वरें, अमंळ ते मंळते न दुज्या वरें ॥ ६२ ॥
ध्वनि उठे चरणीं लघुभूषणीं, मन समर्पित ये रघुभूषणीं ।
परम हंसगती वरि त्या प्रिया, परमहंसगतीच जया प्रिया ॥ ६३ ॥
स्मर तिला रतिलाच न ईश तो, अतनु जो तनुजोत्तम दीसतो ।
नृपति ते पतितोत्तम पाहती, नवरि ते वरिते प्रभुतें सती ॥ ६४ ॥
अनादि हाचि प्रिय नाथ जीचा, मुखेंदु तो या रघुनाथजीचा ।
लक्षूनिही अन्य मुखांबुजा ते, पाहे नृपाच्या न मुखांबुजातें ॥ ६५ ॥
शवापरी मानुनियां नृपांगें, लक्षूनियां तुच्छपणें अपांगें ।
सर्वोत्तमा त्याचि रघूत्तमाला, अर्पी गळां श्री निजहस्तमाळा ॥ ६६ ॥
कमळजा मळजालसुरादिकीं, नवरि ते वरिते स्वभनादि कीं ।
स्वपति तो पतितोद्धर त्याविना, इतर ते तरते गुण भाविना ॥६७ ॥
सुवर्णमुक्तादिसुधाशुभांगीं, त्याली अलंकार असे शुभांगी ।
अंगांगशृंगार यथाविभागीं, सीता उभी ते प्रियवामभागीं ॥ ६८ ॥
अर्पी गळां हार जया सुकाळीं, सीता सुखाच्या पडली सुकाळीं ।
विचित्र वाद्यें जन वाजवीती, सीतापतीचें यश गाजवीती ॥ ६९ ॥
गेलीं अयोध्येसि सहस्र पत्रें, कीं राघवें हस्तसहस्रपत्रें ।
भवायुधध्वंसबळांतरंगीं, यशोब्धि केला धवला तरंगीं ॥ ७० ॥

भवधनु रघुवीरें भंगिलें विश्वसारें
तुह्मि सहपरिवारें पत्र वाचूनि सारे ।
निजतनयविवाहालागिं यावें प्रभावें
जनक दशरथातें हें लिही प्रेमभावें ॥ ७१ ॥
भिजवि सजलनेत्रें पत्र तें ज्यांत वाची
दशरथनृप साची कीर्ति ते राघवाची ।

---

१ पवित्र. २ दुजा वर वरून अपवित्र होणार नाहीं. ३ हंसासारिखी गति जीची ती. ४ परिव्राजकांस गति देणें. ५ या श्लोकार्धाचा अन्वयः—रतिलाच न तिला ( हि ) तो ईश अतनु असा स्मर तनुजोत्तम दिसला. तनुजोत्तम म० उत्तम शरीर धारण करणारा. ६ कटाक्ष. ७ सोनें व मोत्यें इत्यादिकांनीं शुभ, " मुक्तादिजादि सिता शुभांगी " असाही पाठ आहे. ८ मस्तकीं. ९ कागद. १० हस्तकमलानें. ११ शिवधनुष्यध्वंस करण्याचें बळ आहे ज्याच्या ठिकाणीं त्यानें. १२ शुभ. १३ विश्वासाचें बळ आहे ज्यांत अशा रामानें.

उके सकळ सभा ते राहिली प्रेमपाणी
स्रवति नयन चित्तीं राम कोदंडपाणी ॥ ७२ ॥
करि विभुजयवार्ता भग्न वार्ता भवाची
नवल न धनुकांबी ध्वंसिली हे भवीची ।
श्रवणिं निघत नाशी दुःखसंसार सारा
दृढपण मृडचापाहूनिही त्या असारा ॥ ७३ ॥
दशरथ नृपसंगें सर्व आमात्य योद्धे
इतरहि जन जाती चित्त ने घे अयोध्ये ।
सजल नयन सारे राघवातें पहाती
नवल ह्मणति यानें मोडिलें चाप हातीं ॥ ७४ ॥
पूजुनियां जनक त्यां सकळां स्वहातें, येऊनि दूर बहुसादर ने गृहातें ।
श्रीरामकीर्ति वदनेंचि किती वदावी, यालागिं चापशकलें नरदेव दावी ७५
असें देखतां मोडकें चाप भारी, शरीरीं गुड्या रोमराजी उभारी ।
स्वमांडीवरी राम घेऊनि माय, स्वयें पुसते प्रेम चित्तीं न माय ॥७६॥
ह्मणे श्रीकौसल्या परमसुकुमारा रघुपती
कडीं हातीं तुझ्या जडित जड चित्तांत खुपतीं ।
अशा या हस्ताब्जें उचलुनि धनू दोन तुकडे
कसे केले पाहों न शकति बळी थोर जिकडे ॥ ७७ ॥
नसे अंत या रामकीर्तिप्रवाहा, असो तें पुढें रामसीताविवाहा ।
जना देखतां फार आनंद झाला, अजा पद्मजा भेटली श्री अजाला॥७८॥
रामानुजा देखुनि सुप्रभावा, कन्या तिघी तें भरतादिभावां ।
विदेह तो देत विवाहरीती, कीर्ती जयांच्याच भवा हरीती ॥ ७९ ॥
श्रीविदेहतनया सुकुमारी, पूर्ण शांति निज भूमिकुमारी ।
आत्मयासि, वरि होउनि रामा, मूर्तिमंत सगुणा अभिरामा ॥ ८० ॥
रायें विवाहास मुहूर्त केला, लागे हरिद्रा नृपकन्यकेला ।
सुवासिनीच्या करपुष्करांनीं, सुवर्णकुंभां करपुष्करांनीं ॥ ८१ ॥
चहूंही मुक्तींचे कलश चहुं कोनीं मिरवती
न जे ब्रह्मीं हेमीं दिसतिहि खरेसे ह्मणविती ।

---

१ स्तब्ध. २ प्रेमाश्रु. ३ प्रभूची जयकथा भवाचा ह्म० संसाराचा नाश करी. ४ शंकराची. ५ जडाव्याचीं कडीं ह्म० वलयें. ६ जन्मरहित लक्ष्मी. ७ पराक्रमी. ८ हळद. ९ ब्रह्मरूप सुवर्णांत.

गुणीं शुभ्रीं दावी सगुणपण संतांस सुमती
असें न्हाणें वारी अभिनव वधू शांति सुमती ॥ ८२ ॥
चढे तीस सर्वात्मतेची हरिद्रा, न जे ठाउकी भेदवाद्या दरिद्रा ।
तिचें शेष ये षड्गुणा रामचंद्रा, अविद्याऽग्निसंतप्तविश्रामचंद्रा ॥ ८३ ॥
एक राम जनिं देवदेव कीं, भाव हा उभयदेवदेवकीं ।
जान्हवी पुरवि कांम कामना, वापिकाखनन काम कां मना ॥ ८४ ॥
जीव जे प्रकृतिअष्टक वर्गीं, तृप्त ते सकळ अष्टकवर्गीं ।
ज्योतिषी द्विज पुरोहित सारे, त्यांत एकहि न मोहितसा रे ॥ ८५ ॥
गुणत्रयाच्या तटिनीप्रवाहीं, सत्त्वांबु शोधूनि पृथक् विवाहीं ।
ते घालिती काळवेंडी द्विजाती, सत्यें घड्या रामनिमित्त जाती ॥८६॥
वाजवीत विविधा निगमातें, घे नृप श्रुतिचिया उगमातें ।
आणिला निजगृहा नवरा वो, जो मनीं ह्मणति मानव रावो ॥ ८७ ॥
पूजूनि राम निगमोदितबोधरीती, चित्तंतु आड पट मायिक जो धरीती ।
काढावयासिच निदेशुनि येत हातीं, शांतीसि अंतरहि हेंचि असें पहाती ८८
श्रीराममंगलकथा जन गात नाना, अध्यात्ममार्गें पहातांचि वृथा तनाना ।
न भ्रांतिचा पट फिटे ह्मणुनी द्विजाती, गाती सुमंगल सुधारसचित्रजाती ८९
ब्रह्मा वृद्ध, सकाम कामरिपु तो रुद्र श्मशानीं वसे
दैत्यत्रस्त सुरेंद्रें, इंद्र गुरुही इंद्राभिमानी असे ।
दुर्वासादि अशांत, शांत मजही जो कांत इच्छीत ना
माळा हे कमळा विचारुनि गळां घाली जगज्जीवना ॥ ९० ॥
इच्छीना मजला सुरासुर भला ऐसा दिसेना मला
आशेसीं रमला जिच्या नर तिला तो दाससा भासला ।
श्रीवत्सादि मला शिवे न शमला त्या या घनश्यामला
माला हे कमला विचारुनि गळां घाली जगन्मंगला ॥ ९१ ॥

---

१ ईश्वर व जगत् भिन्न मानणाऱ्यास; द्वैतवाद्यास. २ यश ऐश्वर्य इत्यादि सहा गुण ज्यामध्ये आहेत तो. ३ अज्ञान हाच अग्नि यानें संतप्त झालेल्यास चंद्राप्रमाणें शीतल असा. ४ दोहोंकडच्या देवक प्रतिष्टमध्यें. ५ यथेष्ट. ६ मग विहीर खणण्याची काय जरूर. ७ प्रकृति, महत्तत्व, अहंकार आणि पंचमहाभूतें असे जे आठ त्यांच्या वर्गी. ८ मंगळाष्टक. ९ नदीप्रवाहांत. १० सत्त्वगुणरूप उदक. ११ घटिकापात्र. १२ वेद. १३ श्रुतीचा उगम ह्म० परमेश्वर ( राम ). १४ वेदोक्त रीतीनें. १५ चैतन्यरूप तंतु ज्याचे असा मायिक. १६ इंद्र आहे त्यास दैत्यांची भीति. १७ बृहस्पति. १८ कोविद. १९ लक्ष्मी ह्म० येथें सीता; चौथ्या या चरणाबद्दल पुढील पाठ सांपडतो. "एवंभी नवरी हुजांस न वरी अर्थी मुकुंदीं मना ॥", २० ज्या लक्ष्मीच्या.

श्रीमद्भागवतांत आणि इतरग्रंथीं महाभारतीं
श्रीमद्रामकथा निरूपित वरी व्यासाचि ही भारती ।
गाती तेचि शुकादि गोत्रज कुळीं मध्यें वसिष्ठान्वयीं
माझा वामन राम गाइल तया लक्षुनि सर्वान्वयीं ॥ ९२ ॥
पौरोहित्यहि निंद्य तें विधि पिता दे या कुळाचें मला
या संबंधमिसेंचि लाधसि ह्मणे रामा घनश्यामला ।
तो मी आजि पुरोहितत्व करितों वैवाहिकें मंगलें
गातों रामरसें कृतार्थहि असें केलें जगन्मंगलें ॥ ९३ ॥
विश्वामित्र ह्मणे पवित्र चरणें माझ्या करी आश्रमा
संगें ये मिथिलेसि पादकमलें नामी अहल्याश्रमा ।
मद्वाक्यें भवचापभंग करितां माला रमा कंधरीं
घाली आजि विवाहमंगलदिनीं सीतेसि हातीं धरीं ॥ ९४ ॥
घनाक्षरी–सावधान सावधान, कांहीं नाहीं व्यवधान ।
आत्मलाभाचें निधान, लग्न बहू जवळी ॥
ह्मणे ज्योतिषी आचार्य, काळगणनादि कार्य ।
झालें बोले हें जों आर्य, घडीजेल कवळी ॥ ९५ ॥
ओं पुण्यादि हें अक्षर, मुखा येतां पदाक्षर ।
निरसें दिसे अक्षर, तंतु नेत्रां सकळीं ॥
शांति वधू आत्मा वर, वरितां हो परस्पर ।
अक्षतीं अक्षताक्षर, मुक्तिच्या मुक्ताफळीं ॥ ९६ ॥
गातां द्विजीं राघवमंगलाला, जो आड मायापट तो गळाला ।
परस्परें अर्पिति अक्षतांतें, मुक्ताफळां नूतनअक्षतांतें ॥ ९७ ॥
संतप्त सोनें जसि ज्योति यांची, सीताशरीरांतरिं मोतियांची ।
श्रीइंद्रनीळाचिसमें समान, श्रीरामदेहावरि भासमान ॥ ९८ ॥
जइं नवरि वरी हो श्री अजा श्रीअजाला
तइं अगड धडाधों घोष इत्यादि झाला ।
ध्वनि गगनिं अशब्दीं स्थावरां जंगमाचा
प्रकृतिपुरुषयोगें चिज्जडासंगमाचा ॥ ९९ ॥
कामक्रोधहुताशनीं[2] तडफडा होऊनियां भाजल्या
लाजा वृत्तिमयीं[3] न या चिदनलीं[4] त्या होमितां वाजल्या ।

---

१ अविंध मुक्ताफळें. २ कामक्रोधरूप अग्नींत भाजलेल्या लाह्या. ३ मनोवृत्तिरूप लाह्या. ४ चिद्रूप ज्ञानाग्नींत.

सातां आवरणांत सप्तपदिही होतां पुढें तो पती
तेव्हां कांत दुजा कधीं न वदवे वार्ताच या लोपती ॥१००॥
आत्मा सुवर्ण सचराचरवास मुद्रा, ऐशा धनें भरवि देहचतुःसमुद्रा ।
विद्याकरें भवदरिद्रपणासि नाशी,संतोष तो सुरनरां कमलासनासी ॥१०१॥
तत्त्वब्रह्मसमन्वयें ध्वनि उठे ते ताल घेती श्रुती
आलापी व्यतिरेकरूपकरिती कीं तन्नं तन्न श्रुती ।
वेदांता गणतर्ककर्कश खडे सांडूनि जे शोधिती
गीतागीत तदर्थनादचिहि असें तेथें जना बोधिती ॥१०१॥
दशाहि इंद्रिय अश्वें तनूरथीं, दशरथाख्य चिदंश महारथी ।
स्वसुखनंदनउत्सव पाहतो, श्रुतसुतैक्यसुखीं स्थिर राहतो ॥ १०२ ॥
कुलस्त्री कौशल्या सुमति निगमोक्ता कुशलता
करी कामें टाकी श्रुतिविहितवार्ता विषलता ।
धरी स्वात्मारामप्रभुसि उदरीं युक्ति नमनीं
करी सर्वात्मत्वें प्रकटहि तथा बुद्धि जननीं ॥ १०३ ॥
आणी शांति सुनेचिया सुनमुखा पाहावया ते सती
वृत्ती कोटि वराडिणी अवनिया ज्या चिन्मया दीसती ।
शुद्ध ब्रह्म सुवर्ण विश्व नग जें हाऊनि सांकारलें
अर्पी तें पहिलें सुनेसि विधिनें सासू गळां कारलें ॥ १०४ ॥
कामादि सां कुरसवर्जित षड्रसांचा, निष्कामनादि परिपाक विपाक साचा ।
सायुज्यतादिक चतुर्विध अन्नजाती,जें ज्यासि इष्ट जन सेवुनि तेंचि जाती ॥
समारंभ इत्यादि तो कोण वर्णी, वधूचा पिता तृप्ति दे सर्व वर्णी ।
हरी दुःख हें स्वल्पही रामवार्ता, निरोगी करी अल्पमात्रा भवार्ता ॥१०६॥
ओवाळितो स्वपुरुषार्थ चतुर्थहो मी, रामावरूनि म्हणऊनि चतुर्थ होमीं ।
दे सर्व आंदण फणींद्रहि जें न मोजी,न्यूनासि पूर्ण करिं तूंचि म्हणे नमोजी ॥
साडे करी सजललोचन कन्यकेला, सद्गुराजा निरवितां जन धन्य केला ।

---

१ कान. २ तें नाहीं तें नाहीं. ३ शरीररूपी रथास दश इंद्रियें हे अश्व जोडले आहेत आणि चिदंश हा महारथी त्यांत बसला आहे. ४ "आली" असाही पाठ आहे. ५ आकारास आलें. ६ पुतळ्यांच्या माळेच्या मध्यभागीं घालतात तें. ७ साह्य. ८ सलोकता, सरूपता, समीपता, आणि सायुज्यता अशा चार मुक्ति. ९ रसायन. १० "पुरुषार्थ चतुष्ट होमीं" असाही पाठ आहे. ११ कुळवानास कन्या देणें.

कांत स्वशांति तिस घेउनि ये अयोध्ये,श्रीराम आणि जन सर्व अमात्य योद्धे[1] ।
आद्यंत अध्यात्मचि हे कथा रे, जे वर्णितां न भ्रम शोक थारे ।
अध्यात्मरामायण नाम याचें, ठेवी असें व्यास अनामयाचें ॥ १०७ ॥
परंतु साधारण मानवाची, वाचा अजी हा महिमा नवा ची ।
म्हणोनियां राघवलोकलीला, उग्याचही[2] संहरती कलीला ॥१०८॥
अध्यात्मरामायण गीत संतीं, हें कोकिला जे वदली वसंतीं ।
आतां रुचीनें जन घेति सारे, वदों तया रामकथारसा रे ॥१०९॥
जिंके पुरीस फिरतां जमदग्नि जाला,जो भंगितां भवधनुष्य भडाग्नि जाला ।
ज्याला जगांत घडली बहु राजहिंसा,तो क्षत्रियानल करी रघुराज हिंसा[3] ॥

दशरथ नृप त्याला कंकणें आणि चोळी
भृगुवर[4] लपतां तो हस्त सक्रोध चोळी ।
दशरथसुत जिंके राम तैशास वाटे
दशमुखविजयाचें काय आश्चर्य वाटे ॥ १११ ॥

घनाक्षरी–राम असतां किशोर, भेटे जामदग्नी घोर ।
क्षत्रियांत गर्व थोर, त्यातें दूर जो करी ॥
अन्य राम वीररस, आयकावे हे सुरस ।
तुटे नामें हे कुरस, भवरोग लौकरी ॥
रावणासि बांधे धीर, बाहुसहस्रांचा वीर ।
कापी तशाचेंही शीर, परशु जो घे करीं ॥
ऐशा भृगुकुलीं राम, जिंकी त्यासि रघुराम ।
दशग्रीवादिसंग्राम, प्रेमें गावा किंकरीं ॥ ११२ ॥

ऋषित्वेंच ठेवूनि विप्रोत्तमाला, तयांतील रामांश रामीं मिळाला ।
अयोध्येप्रती श्रीस घेऊनि पावे, सदा हेंचि हो मंत्र त्याचे जपावे ११३
सीतास्वयंवर असें बरव्या मनानें, लक्षुनि शास्त्र अवलोकुनि वामनानें ।
भाषाप्रबंध रघुनाथकथारसाचा, केला प्रसाद अवघा पदसारसाचा ॥११४॥

॥ इति श्रीसीतास्वयंवर ॥

---

१ " क्षमादि योद्धे " असाही पाठ आहे. २ पातक. ३ हिमसा म्ह० थंड असा झाला. ४ परशुराम.

# भरतभाव.

## ( कथेचा सारांश )

रामचंद्र वनांत जातांच त्याच्या वियोगानें दशरथ मरण पावला. तेव्हां भरत मातुलगृही होता, तेथून त्यास वसिष्ठऋषींनीं आणविलें. राम वनवासास जाण्याला व दशरथाच्या मरण्याला कारण आपली माता कैकयी झाली हें समजतांच भरतास अत्यंत दुःख झालें. तो रामास वनांतून परत आणावें ह्मणून त्याजकडे गेला; परंतु रामानें त्यास सांगितलें कीं, मी चतुर्दश वर्षें वनास जावें व तूं राज्य चालवावें अशी पित्याची आज्ञा आहे, ती उल्लंघन करतां कामा नये, ह्मणून माझ्या आज्ञेनें तूं परत अयोध्येस जा आणि राज्य चालव. तेव्हां भरत निरुपाय होऊन रामाच्या पादुका मागून घेऊन त्यांची सिंहासनावर स्थापना करून आपण नंदिग्रामी अयोध्येजवळच राहिला. अशी कथा ह्या आख्यानांत आहे. ह्यांत भरताची अलौकिक बंधुप्रीति ( ह्म० रामाविषयीं भाव ) वर्णिली आहे ह्मणून या आख्यानास 'भरतभाव' असें नांव दिलें आहे.

करुनि वंदन जानकिनायका, भरतभाव निरोपिन आयका ।
जननि टाकुनि रामपदीं निघे, सुकृति तो मति हे समजोनि घे ॥ १ ॥

भरत जवळि नाहीं मातुलग्रामवासी,
भरतजननि धाडी कानना राघवासी ।
दशरथ मृत झाला राम जातां वियोगें,
तृण बहुत दिसांचें अग्निच्या जेंवि योगें ॥ २ ॥
मग भरत वसिष्ठें आणिला जों अयोध्ये,
नगरि गतधवा ते आणि निर्वीर्य योद्धे ।
जन मृतसम देखे हेतु कांहीं कळेना,
जननिकृत कुचेष्टा बुद्धितें आकळेना ॥ ३ ॥

वृत्तांत सांगे भरतासि माय, स्वानंद जीचा त्रिजगीं न माय ।
भेदूनि वक्षस्थल शब्द तीचा, करी महाक्षोभ महामतीचा ॥ ४ ॥
जाळील तीतें निजदृष्टिपातें, पाहे असा हालवितांच पातें ।
ह्मणे अहो पापिणि पापरूपे, जळो तुझें तोंड जडस्वरूपे ॥ ५ ॥
जाळीन हें तोंडचि जाण आधीं, मुखें जया देसि अनंत आधी ।
न माय तूं वैरिण होसि साची, माझे मनीं भाव खरा असाची ॥ ६ ॥

---

१ जननी टाकूनही जो रामपदीं निघे तो धन्य. २ महात्मा भरत त्याचा.

केला तुवां देखत भर्तृघात, क्षणें तिवाटा रचिल्या तिघांत ।
शत्रुघ्न मी लक्ष्मण राम जोडे, राजा तिजा तींसे अनर्थ जोडे ॥ ७ ॥
गिरिवनाप्रति राम रमापति, दवडिल्यावरि मृत्युमुखीं पती ।
निजविला मज हे विधवा धरा, ह्मणसि भोग अयोग्य वसुंधरा ॥ ८ ॥
वना धाडिलें जेधवां रामराया, तुवां हेतु केला स्वभर्ता मराया ।
अहा राम सीता अशा दंपतीतें, वना धाडिलें मारिलें कां पतीतें ॥९ ॥

न कळत पतिताचें खादलें अन्न ओकी,
तरि पतित नव्हे तो पापरूपें अहो कीं ।
ह्मणुनि उदरिं तूझ्या देह हा जन्मला गे
त्यजिन तरि मला हें पाप तूझें न लागे ॥ १० ॥

हे अभितापित घृतांत तनू जळेना, प्रत्यक्ष तो कधिंहि पावक आतळेना ।
रामापराधिनिसुतास शिवेल कां जी, घे ब्राह्मणोत्तम न अंत्यजपात्रकांजी ११

राजर्षियोगें निजधर्मपूतें, जीं कां स्वधर्मे वधिती रिपूतें ।
शस्त्रें न तीं आतळतील मातें, त्वद्गर्भसंभूतनराधमातें ॥ १२ ॥

मारील सद्य मज खाइन त्या विखातें, कीं पापियास निज पातक जेंवि खातें ।
तूं पापिणी त्वरित जासिल सैरवासी, होसी सदा निरयदारुणलोकवासी ॥१३॥

अवो कैकयी हें काय, केलें तुवां हाय हाय ।
न ह्मणवे तुज माय, जन्मो जन्मीं वैरिणी ॥ १४ ॥
सर्व जगदभिराम, वना धाडिला तो राम ।
केलें विख्यात कुनाम, कीं हे पतिमारिणी ॥ १५ ॥
तुझ्या वधें न अधर्म, तुज मारावें हा धर्म ।
परि निंदील हें कर्म, रामपापकारिणी ॥ १६ ॥
नाहीं तरी प्राणआज्य, तुझें घालूनियां प्राज्य ।
जाळूनियां सामराज्य, दाखवितों करणी ॥ १७ ॥

धिक्कारूनी गोष्टि मातेसि सांगे, कौसल्येच्या ये गृहा सानुरागें ।
त्यांतें देखे जेधवां राममाय, श्रीरामाचा शोक लोकीं न माय ॥ १८ ॥

मोकळा करुनि कंठ तेधवां, आठवूनि मनिं जानकीधवा ।
ते रडे भरतही तसा रडे, जोंवरी नयन होति कोरडे ॥ १९ ॥

---

१ तीन वाटा. २ शत्रुघ्न व मी ही एक जोडी, राम व लक्ष्मण दुसरी जोडी, आणि तिसरा राजा ह्या तीन वाटा केल्यास. ३ तिघांस. ४ अर्थात् दशरथाच्या मरणामुळें विधवा. ५ अतिशूद्राच्या भांड्यांतील पेज. ६ सर्व जगामध्यें सुंदर. ७ प्राण हेंच घृत. ८ पुष्कळ. ९ प्रीतीनें.

ह्मणे वासरा घात झाला असारे, तुझ्या माउलीचेच हे खेळ सारे ।
वृथा धाडिला राम माझा वनासी, न देखों शके त्या जगज्जीवनासी ॥ २० ॥
अरे राघवें व्यापिले लोक सारे, तरी नावरे शोक माझा कसा रे ।
तृषाक्रांत डोळे घनश्यामरामा, पहायास रे सर्वलोकाभिरामा ॥ २१ ॥

जानकी जनकराजकुमारी, पाय कोमल जिचे सुकुमारी ।
चालली जसि वना अनवाणी, बोलली कटकटा जनवाणी ॥ २२ ॥
सूनु[1] सूनहि वनाप्रति जाती, आणि जे[2] जित असेल कुजाती ।
मानवी तनु पशूंत गणावी, ते शिळा परि सजीव ह्मणावी ॥ २३ ॥
भरत शोक अनेक तिचे असे, परिसतां मग बोलत तो असे ।
जननि गोष्टि समस्तहि हे खरी, परिस येविषयीं मम वैखरी[3] ॥ २४ ॥

मी ब्रह्महत्याशतपाप लाहें, ठावें असे लेश जयीं मला हें ।
खड्गें वसिष्ठासि अरुंधतीतें, वधीं जरी ठाउक हें मतीतें ।
ह्मणे राममाता अरे वासरा मी, तुझा जाणतें प्रेमउल्हास रामीं
तुला रामसेवेविणें काम नाहीं, न राज्यादिकांची जया कामना ही ॥ २५ ॥

तों वसिष्ठ वदला भरतातें, रामपादनिजलाभरतातें ।
पाळिं यावरि समस्त धरा हे, राजनीति करिं सावध राहें[4] ॥ २६ ॥
राये तुतेंचि दिधलें स्वनृपासना रे, संपूर्ण तूं जननिची करिं वासना रे ।
शब्दार्थ हे न कळती गुरुलाघवाचे, साचे ह्मणुनि पद आठवि राघवाचे २७

घना० ह्मणे भरत हा राम, त्राहें त्राहें मेघश्याम ।
वसिष्ठ हा गुरु नाम[5], तोही मज कोपला ॥ २८ ॥
अंतरले तुझे पाय, तया राज्याचे उपाय ।
सांगे मज हाय हाय, नव्हे गुरु आपला ॥ २९ ॥
अग्नितुल्य वाटे राज्य, मज जाळिल सामराज्य ।
वरी ऋषी घाली आज्य, त्याणें जीव तापला ॥ ३० ॥
दावीं सत्त्वर चरण, किंवा स्वामी दे मरण ।
तुझ्या नामाचें स्मरण, त्याचा भव संपला ॥ ३१ ॥

स्मरोनि ऐसें रघुनंदनातें, त्या राघवाच्या पदवंदनातें ।
जावें असा भाव धरूनि साच, बोले वसिष्ठाप्रतिही तसाच ॥ ३२ ॥
राजाधिराज रघुराजचि एक जाणा, पाहों चला सकळ जाउनि त्या सुजाणा ।

---

१ पुत्र सून. २ जी मनुष्य तनु ( शरीर ) जीवंत असेल ती जाति कुत्सित ( निंद्य ) होय. ३ वचन. ४ रक्षण कर. ५ नाम अन्वर्थाचा खरोखर अर्थ.

आम्हीं समस्त जन किंकर राघवाचे, जें रामनाम जपतों भजि नित्य वाचे ३३
विना राक्षसी कैकयी काननातें, चला सर्व पाहूं मृगांकाननातें ।
प्रयत्नेंचि घेऊनि येऊं गृहातें, न येतां समर्पूं शरीरें स्वहातें ॥ ३४ ।
येणार ते या अथवा नका ही, राहेन मी हें न घडेचि कांहीं ।
बोलोनियां स्पष्टचि चालिला हो, शोकांतही घे प्रभुनामलाहो ॥ ३५ ॥
हा राम हा राम असेंचि वाचे, चित्तांत पाय प्रभु राघवाचे ।
त्यजी कुलाचार्यहि रामवाटे, कीं तो गुरू त्यास गुरू न वाटे ॥ ३६ ॥
येणार ते या अथवा नका ही, शब्दांत या अर्थ सखोल कांहीं ।
कीं जो गुरू अंतर रामपायीं, पाडी त्यजावा गुरु तो उपायीं ॥ ३७ ॥
श्रीरामही टाकुनि राज्य मातें, जो घे ह्मणे त्या ऋषिसत्तमातें ।
गुरुत्व कैंचें तरि मी उपेक्षा, करीन त्याची न मला अपेक्षा ॥ ३८ ॥
याकारणें या अथवा नका ही, राहेन मी हें न घडेचि कांहीं ।
ऐसी उपेक्षा वदनीं वदे तो, श्लोकांत या व्यासहि भाव दे तो ॥ ३९ ॥
नाहीं तरी या अथवा नका ही, गुरूस बोलेल घडेल कांहीं ।
रामानिमित्तें गुरुही त्यजावा, वाक्यांत भावार्थ असा भजावा ॥ ४० ॥
रामानिमित्तें जननीस टाकी, पाणी न पी राज्यनदीतटाकीं ।
लंघुनियांही गुरुसंगतीतें, पावे अहो दे गुरु ज्या गतीतें ॥ ४१ ॥
गुरुविणें न घडे परमा गती, गति शुकादि गुरूसचि मागती ।
परि गुरू करि अंतर राघवीं, न गुरु तो ठक दांभिक लाघवी ॥ ४२ ॥
तो बाप जो राघवभक्ति दावी, तसीच जे मायहि ते वदावी ।
जो राम दावी गुरु तोचि साच, श्रुत्यर्थ इत्यर्थ असे असाच ॥ ४३ ॥
वसिष्ठ घे राज्य ह्मणे चि साच, परंतु भावार्थ नव्हे तसाच ।
त्याच्या परीक्षार्थचि बोलिला हो, त्याहूनि आधीं मुनि चालिलाहो ४४
आज्ञा गुरूचीं अवघे करीती, सच्छिष्य ते लोकअलोकरीती ।
परंतु त्याच्या वचनें तयातें, न टाकिती सत्पददातयातें ॥ ४५ ॥
राम तोचि गुरु भेद असेना, भिन्न भाव तरि राम दिसेना ।
राम टाकि ह्मणणेंचि गुरूचा, त्याग आत्मसुखकल्पतरूचा ॥ ४६ ॥
तूं टाकिं माझ्या वचनेंचि मातें, शब्दें अशा जो गुरुसत्तमातें ।
टाकील शिष्याधम तो गणावा, टाकी न जो उत्तम तो ह्मणावा ॥ ४७ ॥

---

१ मृगांक ह्म० चंद्र त्यासारखें आहे मुख ज्याचें त्या रामास. २ तोंडपुजेपणा करणारा. ३ भरताच्या अगोदर. ४ लोकरीतीस अनुसरून असो अथवा नसो.

राम न त्यजि तईंच गुरूतें, न त्यजी स्वसुखकल्पतरूतें ।
जो असें वचनही न मनी तो, श्रीगुरूनमनिं हीनमनी तो ॥ ४८॥
लंघूनि शब्दहि असा गुरु तो उपेक्षी, शिष्यासि त्या मग कसा गुरु तो अपेक्षी ।
जो रामनिष्ठ गुरुनिष्ठचि निर्विकारें, सोडी वसिष्ठ भरतासि तया प्रकारें ४९
ह्मणे परीक्षार्थचि टाकिं मातें, तसा ह्मणे टाकिं रघूत्तमातें ।
उल्लंघितां शब्दचि इष्ट वाटे, ह्मणोनि लागे ऋषिवर्य वाटे ॥ ५० ॥
प्रकरणीं पुढिल्या गुरुराज तो, भरतसंगतिंतेंनच विराजतो ।
जरि पथीं गुरु होय समागमीं, तरिच राम मिळे निगमागमीं ॥५१
वसिष्ठ तो आणि समस्त माया, रामार्थ टाकूनि समग्र माया ।
सेना प्रजा सर्वहि त्याचवेळे, जाती जसे लंघिति सिंधु वेळे ॥५२॥
पायीं निघे भरत सानुज रामवाटे, रामाविणें इतर इष्ट न काम वाटे ।
माथां जटा मुकुट वल्कल नेसला हो, श्रीरामवेष वदनीं प्रभुनामलाहो॥५३
रामवल्कलजटादिक रीती, वेष तो उभय बंधु करीती ।
राम सानुज तसे भरतातें, देखती सकळ रामरतातें ॥ ५४ ॥
तों भेटला गुहकनाम किरात वाटे, श्रीरामभक्त परमाप्त तयास वाटे ।
गंगातटीं रघुपतीशयनास दावी, ते भक्ति काय ह्मणुनी मुखिं हो वदावी ॥
दर्भनिर्मित तया शयनातें, देखतां उदक ये नयनातें ।
भूतळीं भरत घालुनि घे हो, त्या स्थळींहुनि न चित्त निघे हो ॥५६॥
रामवृत्त रघुवंशवरातें, सर्व वर्णुनि गुहाख्य किरातें ।
लंघुनी सुरनदी भरतातें, ने ससैन्य रघुराजरतातें ॥ ५७ ॥
ब्रह्मा रमा वंदिति नित्य ज्यातें, त्या राघवाच्या चरणांबुजातें ।
पाहूं त्वरें हे भरता असोसी, वियोग तो प्राणवियोग सोसी ॥ ५८ ॥
कैकेयीच्या दुष्टभावें जळाला, इच्छी रामाच्या पदाच्या जळाला ।
तों स्वामीच्या देखिलें आश्रमातें, कांहीं चित्तें टाकिलें हो श्रमातें ॥५९॥
पादचिन्हित तये वसुधेतें, देखतां तृषित जीव सुधेतें ।
रामचंद्र पदसारसमुद्रा, वाढवी भरतसौख्यसमुद्रा ॥ ६० ॥
घालूनि घे भरत देखुनि त्या रजातें, शत्रुघ्नही अनुसरोनि निजाग्रजातें ।
चित्तीं स्मरे प्रभुचिया पदनीरजातें, प्रेमप्रवाह नयनीं सुखनीर जातें ॥६१॥

१ मानीत नाहीं. २ मार्गाला. ३ भरत. ४ भरताच्या सर्व माता. ५ मर्यादेस. ६ वल्कलें नेसून श्रीरामासारिखा वेष केला. ७ निषादपति. ८ रामाच्या शय. नास. ९ भागीरथी. १० पदकमलास. ११ आनंदाश्रु.

तनुवरी गुढियाचे उभारिती, कविमुखें किति वर्णिल भारती ।
भरत ये रितिनें अजि लोळला, प्रभुपदाब्जरजीं बहु घोळला ॥ ६२ ॥
हा राम राम रघुनंदन हेंचि वाचे, चित्तांत ते चरण दीसति राघवाचे ।
ते रेणु हे मुकुटमंडण जे शिवाचे, ऐसें ह्मणे त्यजुनि भाव अहो जिवाचे ॥६३॥
भरत पदरजीं त्या घोळला दीर्घकाळ
त्रिभुवनिंहि सुखाचा होय तेव्हां सुकाळ ।
न मिळति पदरेणू जे विरिंचादिकांहीं
सुलभ मज ह्मणे हें भाग्य माझेंचि कांहीं ॥ ६४ ॥
देखोनि राघवपदाब्जरजास वाटे, लोटांगणीं गडबडे सुख फार वाटे ।
आनंदनीरहृदयीं नयनांबुजाचें, चित्तांत रामपद घे रज अंबुजाचें ॥ ६५ ॥
वामअंकगत भूमिकुमारी, वामबाहु सुरता सुकुमारी ।
वल्कलांवर जटा अभिरामा, देखतो भरत त्या रघुरामा ॥ ६६ ॥
दुर्वादलश्यामलदीप्ति देहीं, सेवी पदें लक्ष्मण तो विदेही ।
गंगातटीं सेवित मंदवातें, देखे अशा श्रीरघुपुंगवातें ॥ ६७ ॥
देखोनि ऐशा रघुनंदनातें, धांवे त्वरेनें पदवंदनातें ।
अलभ्य जो हर्ष सुरादिकांहीं, तों होय त्यामाजिच शोक कांहीं ॥ ६८ ॥
रडे फुंदफुंदे शिरीं पादपद्मा, धरी सद्म मानी जया नित्य पद्मा ।
बळें क्षेम दे त्यास ओढूनि राम, स्वभक्तप्रिय स्वामि विश्वाभिराम ॥ ६९ ॥
मांडियेउपरि बैसविला हो, अश्रुनीर पुसि दे सुखलाहो ।
वासरा न रड सांग सुवार्ता, शब्द हा निववि दुःखदवार्ता ॥ ७० ॥
तों देखिला गुरु वसिष्ठ तयास वंदी, ब्रह्मण्यदेव जडला चरणारविंदीं ।
तों माउल्या तिघिहि सत्वर पावल्या हो,भेटोनियां तिघिहि सत्वर सेविल्या हो
पिता सुखी कीं ह्मणतांचि रामा, रडोनि त्या सांगति स्वर्गरामा ।
रडे अहो रामहि लोकरीती, स्त्रिया पुन्हा शोक महा करीती ॥ ७२ ॥
सपिंडिक्रिया राम गंगेतटाकीं,करी आणि तो पिंड गंगेंत टाकी ।
रडे लोकदृष्टीस शोकश्रमातें, प्रभू दाउनी ये पुन्हा आश्रमातें ॥ ७३ ॥
तों वदे भरत गोष्टि मनाची, प्रार्थना बहुत आगमनाची ।
मांडिली परि न राघव मानी, देखतां सुरवरांस विमानीं ॥ ७४ ॥

---

१ रोमांच. २ ब्रह्मादिकांस. ३ वैराग्ययुक्त. ४ रघुश्रेष्ठास. ५ दुःखरूप वणव्यानें पीडिलेल्यास. ६ स्त्रिया. ७ मरणाला. ८ देवांस पाहून त्यांचे कार्याची स्मृति झाली ह्मणून राघव भरताची प्रार्थना न मानी असा अर्थ.

म्हणि फिरे स्वपुरीप्रति राम हा, म्हणुनि आधि मनीं भ्रमरां महा ।
भरतशब्द तदर्थ न ये मना, पुरवणें प्रभुला सुरकामना ॥ ७५ ॥
आज्ञा पित्याची मज मोडवेना, वत्सा तुझी गोष्टिही तोडवेना ।
घालूं नको वा मज संकटांत, नको पडों या सहसा हटांत ॥ ७६ ॥
असी आयके जेधवां रामवाणी, मुखश्री करी बंधु तो दीनवाणी ।
म्हणे तात आज्ञा मृगांकानना रे, मला सांग जाईन मी कानना रे ॥७७॥
बापा ऐसें वर्ततां तों विशेषें, आज्ञाभंग प्राप्त दोघां अशेषें ।
एवं राज्यातें तुवां रे भजावें, ताताज्ञेनें कानना म्यांच जावें ॥ ७८ ॥
असी आयके जेधवां रामवाचा, करी कर्म जें बंध तोडी भवाचा ।
पुढें पांचवा भाव त्यामाजि वाचा, स्मरा आयका बंध तोडा भवाचा ॥
येना असें भरत देखुनि रामराया, गंगातटीं रचुनि दर्भ बसे मराया ।
पाहे वसिष्ठ मुनि वक्त्रसरोरुहातें, श्रीराम आणि खुण दाखवि हो स्वहातें॥
कीं सांग गुह्य अवतारचरित्र याला, जें तारितें चहुंयुगांत जगत्त्रयाला ।
बोले वसिष्ठ मग सन्निध जाउनीयां, कां प्राण टाकिसि म्हणे समजावुनीया॥
हा राम मारील दशाननासी, यालागिं जातो प्रभु काननासी ।
नको निवारूं भरता तयाला, ब्रह्मादिकांच्या पददातयाला ॥ ८२ ॥
येणार मागुति चतुर्दश वत्सरांतीं, राहो वनांत तितुके दिन आणि राती ।
आत्माच तो तुज वियोग तयासि नाहीं, येऊनियां करिल जे तव कामनाही॥
हें आयकोनि जरि शोकहि दूर केला, प्रत्यक्षदर्शनसुखास बहू भुकेला ।
तेव्हां उठोनि भरतें पदवंदनातें, केलें दुरूनि म्हणतो रघुनंदनातें ॥ ८४ ॥
देखोनियां गमननिग्रह राघवाचा, बोले उभा भरत निश्चयरूप वाचा ।
वर्षें चतुर्दश वरीच धरीन देहा, त्यानंतरें त्यजिन यास निरोप दे हा ॥ ८५ ॥
वर्षें द्विसप्तभरि काल समाप्त जाला, त्यानंतरें अजि तुझ्या चरणांबुजाला ।
स्पर्शों शिरें न जरि देह तयाच वारीं, यातें त्यजीनचि विरिंचि जरी निवारी ८६
वर्षें चतुर्दशहि रक्षिन शासनातें, अंगीकरीन न बसेन नृपासनातें ।
सिंहासनावरि तुझ्या पदपादुका मी, पूजीन जो तवपदांबुजलाभकामी ॥८७॥
पादुका जडित आणुनि हातें, रामचंद्र चरणांबुरुहातें ।
लावुनी निजशिरीं भरतानें, वंदिल्या रघुवरांघ्रिरतानें ॥ ८८ ॥

---

१ मनोव्यथा. २ आमहांत. ३ कित्येक पुस्तकांत भरतभावाचे पांच भाव म्हणजे अध्याय केले आहेत त्यास लक्षून म्हटलें आहे. पांचव्या भावांत म्हणजे या आख्यानाच्या शेवटल्या अध्यायांत. ४ तो राम सर्वांचा आत्माच आहे म्हणून तुझ्या जवळच आहे. ५ जाण्याचा आग्रह. ६ चौदा वर्षें. ७ चरणाचे ठायीं रत्न त्यानें.

भरतजननि जागी होय रामप्रतापें, विकळ रघुपतीच्या द्रोहपोपानुतापें ।
रडत कणतसें मी पापिणी रामराया, न धरिन तनु आज्ञा ये स्थळीं दे मराया ॥

रघुपति तिस बोले टाकिं हा शोक माते
इतुकिहि मम माया जींत ही सृष्टि माते ।
सकळहि सुरकार्यालागिं म्यां हेतु केले
अमर दशमुखाच्या मृत्युतें हो भुकेले ॥ ९० ॥
ह्मणी हो कैकेयी बुडविशिल शोकांत हृदया
तुझी माझेठायीं सुमति भरताहूनि सुदया ।
तुतें मी कौसल्येहुनि अधिक मीते समजतों
तुवां ऐसें केलें ह्मणउनि न वाटेच मज तों ॥ ९१ ॥

ह्मणे मंथरा रामराज्यार्थ सिद्धी, करीतो तुझा हो पती हे प्रसिद्धी ।
तुवां इष्ट मानूनि त्या भारतीतें, दिला सांगतां कंठिंचा हार तीतें ॥ ९२ ॥
शरीरीं तुझ्या यापरी देवमाया, रिघोनी करी ये रितीनें भ्रमाया ।
तुझा यांत अन्याय कांहींच नाहीं, करी मोह माया विरिंचादिकांही ॥ ९३ ॥
करुनि मागुति बुद्धि सकोमला, क्षणभरी विसरूंचि नको मला ।
तरि असा न पडे भ्रम मागुती, जितचि पावशि हो परमा गती ॥ ९४ ॥

भरतभाव असा बरवा मनें, सुरस सेवुनि सादर वामनें ।
अजि समर्पियला पदवंदनीं, रचुनि पद्यपदें रघुनंदनीं ॥ ९५ ॥

हरिगुणीं ग्रथिल्या यमकां पहा, धरिल थोरभयें यम कांप हा ।
हरिगुणांविण हो यमकां करी, तरि न दंड धरी यम कां करीं ॥ ९६ ॥

राम तुष्ट असिया यमकां हो, आणखी नियम संयम कां हो ।
वामनें हरिगुणीं रसनेला, अर्पितां अनुभवीं रस नेला ॥ ९७ ॥

॥ इति श्रीभरतभाव समाप्त ॥

## जटायुस्तुति.

(कथेचा सारांश)

जटायु ह्मणून एक गृध्र पक्षी होता, त्याचें आणि रावणाचें सीतेस घेऊन जातांना मोठें युद्ध झालें. शेवटी रावणानें यास कपटानें जिंकून प्राणशेष केलें. पुढें राम-

१ दुःखी. २ रामद्वेषाच्या पापापासून झालेल्या पश्चात्तापानें. ३ जिव्हेस.

चंद्र त्या वाटेनें सीतेचा शोध करीत आले तेव्हां रामचरणीं त्यानें देह ठेविला. त्यावेळीं हें त्यानें रामाचें स्तोत्र केलें आहे.

रघुपतितनु वाटे स्पष्ट चिद्वस्तु तीतें
स्मरत कथिन भाषे या जटायुस्तुतीतें ।
स्तवित जशिच गुंफी श्लोकधाटी द्विजाती
तसिच रचिल टीका वामनाख्य द्विजाती ॥ १ ॥

प्रथम ह्मणतसे जटायु वाचे, अगणित सद्गुण सद्गुणार्णवाचे ।
क्षितिरजाहि जरी धरूनि मोजी, परि न गणी गुण त्या करूं नमो जी ॥ २ ॥
प्रकट गुण करी जगीं रमाया, नमन तया तुज नित्य अप्रमेया ।
प्रथम उपजतां अनादि माया, ह्मणविसि आद्य न लिंपसी भ्रमा या ॥ ३ ॥
जग उगैंळि गिळी करी स्थितीतें, निरखि यथास्थित आत्मतास्थितीतें ।
रमति मुनिमनें स्वचित्स्वरूपीं, परम तयास विराम रामरूपीं ॥ ४ ॥
पर परम परेश जीवभूतें, सकळहि जो तुज त्या नमूं विभूतें ।
हर गॅर न निवे धरूनि चंद्रा, ह्मणुनि जपे तुज नित्य रामचंद्रा ॥ ५ ॥
अवधिरहित जो सुखस्वरूपी, नयनिं सरूप दिसे तरी अरूपी ।
निज परम उपाधिसार माया, करि विभु दृष्टि कशी तिला रमाया ॥ ६ ॥
धरुनि तनु समस्तही उपांगें, हृदयिं वसे प्रभुच्या कृपाअपांगें ।
निज अगुणपणीं अशी स्वमाया, ह्मणउनि सूचवि राम आगमा या ॥ ७ ॥
दशमुख अति दुःख दे सुरेंद्रा, ह्मणउनि हो अवतार या नरेंद्रा ।
भवभय नुरवी अनादि कांहीं, निजसुख दे चतुराननादिकां ही ॥ ८ ॥
नरवर शरचापहस्त राम, त्रिभुवनसुंदर जो मनोभिराम ।
वरद परम जो वरप्रदातें, नमिन मिं त्या तुझियाच जी पदातें ॥ ९ ॥
त्रिभुवन रमणीय रूप साचें, मन निववी अनुतप्त तापसाचें ।
तनु जसि यमुनासुनील पाणी, पुरवि अभीष्ट यथेष्ट चापपाणी ॥ १० ॥
सुरतरुतळिं राम बैसलाहे, अभय असें स्मरणार सद्य लाहे ।
चरण शरण येति त्यांस पाहे, नमिन जया रघुनंदनीं कृपा हे ॥ ११ ॥
भववनदवर्णाच नाम साचें, नुरविल लेशहि शेषतामसाचें ।
विगतरज जपोनि नामधेया, स्मरत असों पद हें मनामधें या ॥ १२ ॥

---

१ पक्षी जटायु. २ ब्राह्मण. ३ ज्याची इयत्ता करितां येत नाहीं तो. ४ वमन करी व० उत्पन्न करी. ५ विष. ६ मर्यादारहित. ७ पावे. ८ तुझें नाम भवकाननास अग्नि आहे.

रत सतत करूनि रामनामीं, विशद तया समजाविलों मना मी ।
वरद परम जे त्रिलोचनादि, रघुवर दैवत त्यांसही अनादी ॥ १३ ॥
शरणजनदयाळु देवदेव, स्मरति जयास शिवादि सर्व देव ।
दनुजपति असंख्य संहरी तो, परम दयाळु तथापि जो हरी तो ॥ १४॥
वधि असुर असंख्य चापपाणी, तनु यमुनेतिल जेंवि नील पाणी ।
जशिच बहिणै सांवळी यमाची, दनुज वधी तनु ते रघूत्तमाची ॥ १५ ॥
असुरहर दयाळु सर्व देवां, रघुपति दैवत जें मला सदैवां ।
अशुभ सकळ शीघ्र संहरीतें, रघुपति नाम भजों तया हरीतें ॥ १६ ॥
जडमति भवभावना विरेना, रघुपति तों बहु दूरि हो स्फुरेना ।
परिहरिति मुनींद्र जे अहंता, जवळि तयांसि दशाननादिहंता ॥ १७ ॥
भवजलधि तरावया उपाय, त्रिभुवनिं एकचि नाव रामराय ।
ह्मणवुनि रघुनंदना तयाला, शरण असें स्वपदप्रदा तयाला ॥ १८ ॥
शिर्वेगिरितनयामनीं निवास, प्रियतर त्यां उभयां जगन्निवास ।
सुरवर दनुजेंद्रही पदातें, भजति तयां प्रभु दे स्वसंपदांतें ॥ १९ ॥
गिरि धेरि मथितां सुधांबुधीतें, शरण तया तुज मी दयांबुधीतें ।
सुरवरद सुधा सुरांस पाजी, चरित जगीं सुचरित्र ते कृपा जी ॥ २० ॥
परधन परदारवासना हीं, परजनमत्सरही जयास नाहीं ।
परहिताचि जया स्वलाभ रामा, तव पद सेव्य तया मनोभिरामा ॥ २१ ॥
सुख पर गुणवैभवें करूनी, त्यजुनि ममत्व समत्व हें धरूनी ।
भजति जन असे मनोभिरामा, शरण मि त्यां तुज अंबुजाक्ष रामा॥ २२ ॥
विकसितमुखपद्म हास्य मंद, स्वसुख मनांतिल सूचवी अमंद ।
स्मरत भजत इंद्रनीलनीला, क्रमिति भले दिवसास यामिनीला ॥ २३ ॥
स्मरति सुलभ त्यांस रामचंद्र, स्वजनसुखार्णव नित्य पूर्णचंद्र ।
गुरुवर सकळां गुरूंस देवा, रघुपति तूं गति सज्जनांस दे वा ॥ २४ ॥
अमळ कमळ शुभ्र त्यासमान, प्रभुनयनद्वय भेदल्या समान ।
कथि निगमरहस्य जो विधीतें, करिन मि तद्भजनाचिया विधीतें ॥ २५ ॥
हरिहर विधिरूप तीन भेद, त्रिगुणउपाधिगुणें स्वयें अभेद ।

१ शंकरादि. २ दैत्येन्द्र. ३ यमुना. ४ शंकर आणि पार्वती यांच्या मनीं. ५ सुधेसाठीं समुद्रमंथन करितांना जो गिरि (मंदर पर्वत) धरी. ६ कमलाक्ष. ७ पुष्कळ. ८ इंद्रनील मण्याप्रमाणें नीलवर्ण. ९ राम. १० स्वतः निर्गुण असतां उपाधिगुणांमुळें त्रिगुण झाला.

बहु घट जळिं सूर्य बिंबला हो, ह्मणुनि तुझा सुमतीस आत्मलाहो ॥ २६ ॥
स्तविति तुजचि अंबुजासनादि, त्रिदशपतिस्तुतिपात्र तूं अनादी ।
सकळ सुरवरेश तूंचि देवा, स्तवित असें ह्मणऊनि देवदेवा ॥ २७ ॥
त्रिभुवनिं हि समान वस्तु तीतें, त्यजुनि करीं सुरमानवस्तुतीतें ।
अनृत गुण अपक्क कुंभपाणी, अमरपतिस्तुतिपात्र चापपाणी ॥ २८ ॥
रघुपतितनुसुंदरत्वकोटी, रतिपति पावति काय कोटि कोटी ।
करुनि घडि घडी अनंग खोटी, घडिल विधी तरि साम्यगोष्टि खोटी २९
शतचि शत सुमार्ग ज्यांत नाना, निगम असे करिती जगीं तनाना ।
रघुपति बहु दूरि बोधरीतीं, श्रुति अति बाधकता जरी धरीती ॥ ३० ॥
ह्मणउनि निगमोक्त भावना ही, विफळ जयीं रघुराजभाव नाहीं ।
यतिपतिहृदयारविंदवास, प्रभुस घडे जरि तो जगन्निवास ॥ ३१ ॥
रघुपतिविण अन्य काम नाहीं, यतिपण ये रिति तें फुका मना ही ।
करुनि परिहरी तनुश्रमातें, धरुनिहि काय चतुर्थ आश्रमातें ॥ ३२ ॥
वसतिहि रघुराजभक्त गेहीं, रघुपतिभक्ति निरूपिती उगे ही ।
तरि हितउपदेश गुह्य वाटे, यतिपति चालति जाति त्याचि वाटे ३३
यतिपण बहुतांस देति वाचे, यतिपति ते निजभक्त राघवाचे ।
पति यतिस दिसे जगन्निवास, तरि ह्मणवे यतिनाथ हन्निवास ॥ ३४ ॥
अधनपति धनाढ्य जेंवि राजे, यतिपतिवित्त असें जनीं विराजे ।
कनक रघुपती अकिंचनाचें, जग नगरूप तयाच कांचनाचें ॥ ३५ ॥
रघुपति भवभावना हरीतो, हरि जडदुःख ह्मणूनि कीं हरी तो ।
पदवि परम दे स्वसत्तमातें, शरण जटायु तया रघूत्तमातें ॥ ३६ ॥
ऐशा स्तवें राघव तुष्टलाहो, दे त्या जटायूस यथेष्ट लाहो ।
प्रसन्न त्याला रघुराज जाला, देतो स्वयें हे वर अंडजाला ॥ ३७ ॥
ह्मणे राम कीं जाइं माझ्या पदातें, सुखें भोगिं मुक्तीचिया संपदातें ।
तुझें स्तोत्र हें सर्व लोकांस तारूं, असें बोलतो जो भवांबोधितारूं ३८
बोले जटायुप्रति जो स्ववाचा, तो शब्द ऐसा प्रभु राघवाचा ।
तराल ज्याणें तुह्मि लोक सारे, थारे न तो बोल मनीं कसा रे ॥ ३९ ॥
अगा खगा वर्णिल या स्तुतीतें, पावेल तो जे परवस्तु तीतें ।
लाभेल माझ्या निज आकृतीतें, सारूप्य रे निश्चित त्या कृतीतें ॥ ४० ॥

---

१ कमलासन ब्रह्मा. २ इंद्र. ३ संन्यास. ४ पक्षी जटायु. ५ तारो. ६ नौका.
७ सारूप्य नांवाची मुक्ति त्यास मिळेल.

लिहुनि सादर घे अथवा स्तव, द्विजवरा पद त्यासहि वास्तव ।
पठनहि करि या सुखहेतुतें, गति तयासहि हो जासि हे तुतें ॥ ४१ ॥
असि राघववक्त्रवैखरी, अति हर्षे खग आयके खरी ।
रघुनंदनसाम्यसंपदा; धरि पावे श्रुति पूजिता पदा ॥ ४२ ॥
राघवें स्तुतिस या वरदानें, श्रेष्ठता बहु दिली वरदानें ।
अर्थ तोचि कथि वामन वाचा, लावुनी रसिक हो मन वाचा ॥४३॥
टीकेंत अर्थानुभव स्तुतीचा, अर्थात बोधें प्रियवस्तु तीचा ।
रामींच हे शेष पलंगसेजे, समर्पिली गाति विहंगसे जे ॥ ४४ ॥

॥ इति श्रीजटायुस्तुति ॥

---

## सीतालोपामुद्रासंवाद.

—:०:—

### ( कथेचा सारांश. )

श्रीरामचंद्र, सीतेसह पुष्पकविमानांत बसून लंकेहून अयोध्येस परत येत असतां अगस्ति ऋषींच्या आश्रमास आले. तेथें अगस्तिपत्नी लोपामुद्रा इणें सीतेस क्षेम विचारिलें असतां उभयतांचा जो संवाद झाला त्याचें यांत वर्णन केलें आहे.

वंदूनि श्रीराम संसारसाक्षी, ज्याचे अंकीं जानकी सारसाक्षी ।
लोपामुद्रेशीं तिशीं शब्दमाला, झाल्या अर्पूं त्याचि सर्वोत्तमाला ॥ १॥
मारूनि रावण विदेहसुताश्रमातें, नासूनि ये कलशसंभवआश्रमातें ।
तो सिंधुबिंदु करि हा मनिं गर्व वाहे,त्याची वधू, विदितसे मति राघवा हे॥
न तीपुढें सेतुकथा वदावी, ह्मणोनि सीतेप्रति भाव दावी ।
बोलोनिही सांवरिजे स्ववाचा, हा शब्द तो सूचवि लाघवाचा ॥३॥
विचारी मनीं सर्वसंसारसाक्षी, जरी वारिली जानकी सारसाक्षी ।
सदा सेतुलीलानिदिध्यास तीतें, वदेल स्ववाचे ऋषीचे सतीतें ॥४॥
सांवरी कथुनिया गुणवाणी, रामगोष्टि असि कौतुकवाणी ।
क्षारसिंधु ह्मणतांचि समुद्रा, हे करी कुशलबुद्धिस मुद्रा ॥ ५ ॥

---

१ रामाचे मुखांतील शब्द: २ वरदात्यानें. ३ ज्ञान. ४ पक्षी. ५ शब्दपरंपरारूप माला. ६ जानकीच्या दुःखास. ७ अगस्ति ऋषि, ज्यानें समुद्राचें आचमन केलें होतें. ८ खुबीचा. ९ सदैव चिंतन. १० "बापरी कथुनि ते शुकवाणी" असाहीपाठ आढळतो. ११ मौन; खूण.

सर्वा कथा कार्थे अगस्तिवधूसि सीते,क्षाराब्धिसेतुरचना न कथीं सतीतें ।
कीं चूळ जो जलधिची करि त्या मुनीची,कांता ह्मणेल तववल्लभकीर्ति नीचीं॥
प्रमाण आज्ञा ह्मणवूनि रामा, वंदूनि जातां मुनिवर्यधामा ।
पुसे तिला क्षेम तया प्रसंगीं, संवाद हा राघवविप्रसंगीं ॥ ७ ॥
राम तो स्वैरत नित्य विरक्त, हा नसेल तुजशीं अनुरक्त ।
कीं असेल सुख तें वद सीते, सांग गोष्टिहि सुखप्रदसी ते ॥ ८ ॥
काय बोलत असे अभिराम, श्रांत तूज अवलोकुनि राम ।
सांग आणिकहि वल्लभवार्ता, ज्या कथा करिति सौख्य भवार्ता ॥९॥
स्वरत अद्दय राम असे खरें, मजसि याचि गुणें रघुशेखरें ।
स्थिरचरात्मपणें रमणें सये, जरि अहंममतादि न यास ये ॥१०॥
विरक्त बाई रघुराज साचा, भोक्ता नव्हे राजसतामसांचा ।
दुःखा बहू कल्पतरूपमा ते, दे सोहळे कल्पितरूप मातें ॥ ११ ॥
जसि बहु रवितप्ता साउली गोड वाटे
तसि वनिं पतिलाडें मानित्यें कोड वाटे ।
घरिंहुनि मज बाई सोहळे काननाचे
सजलजलदसंगें मोर वो कां न नाचे ॥ १२ ॥
पथीं मागें मागें परम अनुरागें रघुपती
उभा राहे पाहे गुणहि मुनि हे हेचि जपती ।
कृपापांगें अंगें निववि करि संसार धिवंसा
धरा माता भ्राता शशिच सविता होय दिवसा ॥ १३ ॥
रघुपतिसह शय्या भूमि हे माय वाटे
मृदु सुपंतिहुनीही चालतां पायवाटे ।
श्वशुर दिनमणीही होय एणांकभाऊ
न कळत जन ऐसे क्लेशनिःशेष भावूं ॥ १४ ॥

१ कधीं. २ अगस्तीच्या आश्रमास. ३ राघव आणि विप्र ह्म० अगस्ति एका ठिकाणीं असतां हा संवाद एकीकडे झाला असा अर्थ. ४ आपल्या स्वरूपीं रममाण. ५ संसारपीडितास. ६ " न या बहू कल्पतरूपमा ते " असाही पाठ आहे. ७ जे जे सोहळे मनांत आणावे ते ते दे. ८ कौतुकः ह्या चरणाबद्दल असाही पाठ आहे.—" तसि वनिं पतिलाडें चालतां पाय वाटे. " ९ जलयुक्त मेघासमोर. १० कृपाकटाक्षानें. ११ हौसेचा संसार. १२ गादी. १३ मृगांक; चंद्र. १४ अज्ञान लोक ह्यांस क्लेश भावोत ह्म० मानोत.

पवन वनसुवासें उष्ण होतांचि वाटे
उपजवि सुख पुत्रस्वामिनी ज्यासि वाटे ।
तनु करि अनसूया नित्य ओली सुगंधें
नव्हति अजुनि बाई म्लान पुष्पें सुगंधें ॥ १५ ॥
तिथें पावलों अत्रिच्या आश्रमातें, तयाची वधू ते हरी वो श्रमातें ।
तयीं हार हे गंध लावूनि घाली, स्वआतिथ्यकौशल्य दावूं निघाली ॥ १६॥
ये देखतां बहु कृपा मज दत्तमाते, पूजूनि ये रिति वदे सति उत्तमा ते ।
वेणी फणी करिल वो तुज कोण वाटे, वाईट हें मज ह्मणे सति फार वाटे१७
म्लानता कधिं न यो सुमनांतें, केश क्लेश न करूत मनातें ।
गंध आर्द्रचि असो अनसूया, दे असा वर न जीस असूया ॥ १८ ॥
करतळ न दुखोंदे फोड वो जेंवि पाणी
वनिं धरि मन माझें ये रिती चापपाणी ।
कनकमृग ह्मणे तों पाडिसी राम लागे
दशमुख हरि ऐशामाजि मेला मला गे ॥ १९ ॥
मृग प्राण सोडी तयीं दीनवाणी, अरे लक्ष्मणा धांव ऐसी खुवाणी ।
वदे तों मला रामवाणीच वाटे, ह्मणोनी बळें लाविलें त्यास वाटे ॥२०॥
न जातां तया बोलिलें दुष्ट वाचा, अरे घात तूं इच्छिसी राघवाचा ।
तुला प्राप्त होणार कां देवरा मी, धरीसी असा कां ह्मणे भाव रामीं ॥२१॥
अशा शब्दवाणी सुमित्रात्मजाला, अवो विंधितां तो मृतप्राय जाला ।
रडे जाय तो राघवा लोकपाळा, करूं काय आतां ह्मणे मी कपाळा ॥२२॥
जाय तो रडत दाटत कंठ, प्राप्त होय मजला दशकंठ ।
पद्मिनी उपडुनी गज हस्तीं, ने तसा उचलुनी मज हस्तीं ॥ २३ ॥
असि सकळ अनर्था मूळ माझीच वाणी
धरुनि मज पळे तैं होय मी दीनवाणी ।
बहुत मजनिमित्तें राघवें शोक केला
करुण ह्मणुनि न स्त्रीकामकामीं भुकेला ॥ २४ ॥
मजनिमित्त करी गडि वानरां, सुलभ जो न सुरां अथवा नरां ।
धरि मदर्थ असा व्यवसाय कीं, दशमुखा वधि राघव सायकीं ॥२५॥

---

१ अनसूयेनें दिलेल्या अंगरागानें. २ अनसूयेस. ३ येवो. ४ दिरास. ५ स्त्री. कामककामी ह्म० स्त्रीलंपट ह्मणून त्यानें शोक केला नाहीं तर करुण ह्मणून शोक केला.

धरि करीं कमला कमलापती, मथुनि सिंधु तसाचि मला पती ।
जलधिमध्यपुरींत तिचा धणी, वधुनि दे मज आत्मसुखें धणी ॥२६॥
जे जळांत बुडणार तीव्र ते, थोर पर्वत अवो पतिव्रते ।
सागरीं तरति सेतुवाट ते, हे अतर्क्य करणीच वाटते ॥ २७ ॥
परतता जलधीवरि पाहतें, तरति पर्वत विस्मित राहतें ।
जळ तळीं वरि हो धरणी सये, करि तसे तुलना करणीस ये[2] ॥२८॥
समुद्रावरी सैन्य ये पायवाटे, मनीं हें सदा जसि आश्चर्य वाटे ।
कसी सेतुची गोष्टि तीच्या मुखाचे, नये बोलं ते वीसरे राघवाचे ॥ २९ ॥
शरीरीं भरे वर्णितां रामवारें, उठाणें मनाचीं तयीं दुर्निवारें ।
पतीचीं यशें जे निरोपीत जाते, वदे गोष्टि हेही विदेहात्मजा ते ॥३०॥
विदेहात्मजा पावली विस्मृतीतें, ह्मणे बांधला सिंधु जों त्या सतीतें ।
जसें हास्य ये स्वामिचे भारतीतें, स्मरे तों स्फुरे हा चमत्कार तीतें ॥ ३१ ॥
क्षीराब्धिसेतु ह्मणि सांगसि तीस सीते, जीचा पती जलधि चूळ करी तसी ते ।
शब्दांत या रघुपतीच खुणेस दावी, की क्षार मूत्र असि गोष्टि पुन्हा वदावी ३२
ह्मणे लोपामुद्रा चुळभरि समुद्रा करि पती
तया या आयासें हरुनि उतरे कां रघुपती ।
द्विजाच्या हो मूत्रा शिवति अपवित्रा न कपि ते
ह्मणे सीता नाहीं तरि सगिरि सप्ताब्धिहि पिते ॥ ३३ ॥
लोपामुद्रेशीं अशा शब्दमाला, जाल्या अर्पी त्याचि सर्वोत्तमाला ।
प्रेमें वर्णी बुद्धि ते वामनाची, वाणी रामीं हेचि सेवा मनाची ॥ ३४ ॥

॥ इति श्रीसीतालोपामुद्रासंवाद समाप्त ॥

---

१ समुद्रामध्यें असणाऱ्या लंकापुरीचा धणी रावण त्यास. २ या करणीस. ३ सेतुसंबंधानें बोलूं नको ह्मणून रामानें सांगितलेली गोष्ट. ४ जसें लोपामुद्रेस हास्य ये (आलें) तसें सीता स्वामीची (रामाची) भारती (वचन) स्मरे असा अन्वय. ५ आंतील पर्वतांसह सप्तसमुद्र. ६ "लोपामुद्रेशीं असा राघवाचा, संवाद श्रीजानकीची सुवाचा । बोले वाणी, बुद्धि जे वामनाची, वर्णी रामीं हेचि सेवा मनाची ॥" या श्लोकाचा असाही पाठ आहे.

# भर्तृहरि.

## नीतिशतक.

मी जीस चिंतित असें न रुचे तिला मी,
मानी तिला अपर तो पर अन्यगामी ।
संतुष्ट मद्विषयिं अन्य वधूच पां ही,
धिक् तीस त्यास मदनास मला हिला ही ॥ १ ॥

करूं ये समाधान जो मूर्ख त्याचें, धरूं ये सुखें चित्त पैं जाणत्याचें ।
न जाणे न नेणे अशा पामराला, बुझावूं शकेना विधाता तयाला ॥ २ ॥

बळानें काढूं ये मणि मकरदाढेंत दडला
महासिंधूलाटातरण करुं येई भुजबळा ।
महासर्पातें ही कुसुमसम धरूं ये निजशिरीं
परंतु क्षुद्राचें हृदय धरवेना क्षणभरी ॥ ३ ॥

प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेल हि घडे
तृषार्ताची तृष्णा मृगजळजळें जाण विघडे ।
सशाचें ही लाधे विपिनें फिरतां शृंगहि जरी
परंतु क्षुद्राचें हृदय धरवेना क्षणभरी ॥ ४ ॥

सर्पातें बिसतंतुनें सुदृढ तो बांधावया इच्छितो
किंवा वज्रमणी शिरीषकुसुमें भेदावया धांवतो ।
किंवा तो मधुबिंदुनें मधुरता क्षाराब्धिला आणितो
जो मूर्खास सुभाषितें वश करूं ऐसें ह्मणी बोलतो ॥ ५ ॥

त्रिनिर्मिलें झांकण अज्ञतेचें, स्वाधीन हें पद्मभवें फुकाचें ।
मूर्खासि जें मौनचि फार साजे, सभेसि त्यांच्या बहु जाणते जे ॥ ६ ॥

जधीं कांहीं कांहीं हरि कवि असे शब्द शिकलों
तधीं मी सर्वज्ञ द्विपसम मदें याच भरलों ।
जधीं कांहीं नेणें ह्मणुनि वदले पंडित मला
तदा माझा गर्वज्वर सकळ ही हा उतरला ॥ ७ ॥

चंद्राला दिवसां प्रकाश नसणें, ये कामिनीला जरा,
पद्मावीण जलें, निरक्षर मुखीं जो साजिरा गोजिरा ।

---

१ आपलीच. २ समजुत देवू. ३ फुलाप्रमाणें. ४ नाहीशी होते. ५ अरण्य. ६ कमलतंतुनें. ७ शिरीषाच्या फुलानें. ८ ब्रह्मदेवानें. ९ हत्तीप्रमाणें.

दात्याला धनलोभ, नित्य वसतें दारिद्र्य विद्वज्जनीं,
दुष्टाचा पगडा महीपतिगृहीं हीं, सात शल्यें मनीं ॥ ८ ॥
शाणोल्लेख जया असा मणि, रणीं जो वीर घायाळला,
संभोगें शिणली अशी नववधू, हस्ती न मस्तावला ।
ज्यांचीं स्वच्छ शरदृतूंत पुलिनें त्या निम्नगा, चंद्रही
बीजेचा, प्रभु पात्रदत्तधन जो, हे शोभती सर्व ही ॥ ९ ॥
दुर्बळिकेंत पसा यव इच्छितो, प्रभुपणीं धरणी तृण मानितो ।
म्हणुनियां कृपणत्व उदारता, घडतसे समयोचित तत्त्वता ॥ १० ॥
विपत्कालीं धैर्य, प्रभुपणिं सहिष्णुत्व बरवें,
सभे पांडित्याचा प्रसर, समरीं शौर्य मिरवे ।
स्वकीर्तीच्या ठायीं प्रचुर रति, विद्याव्यसन जे,
तयांचे हे स्वाभाविक गुण सदा सत्पुरुष जे ॥ ११ ॥
त्यानेंत निंदोत सुनीतिमंत, चलो असो वा कमला गृहांत ।
हो मृत्यु आजीच घडो युगांतीं, सन्मार्ग टाकूनि भले न जाती ॥१२॥
न चोराला लाधे, प्रगट न दिसे, दे सुख सदा
दुणावे कीं देतां, किमपि न सरे लेश हि कदा ।
न कल्पांतीं पावे निधन धन विद्याभिध असे
असे त्याचें त्यांशीं प्रतिभट तिजे पामर पिसे ॥ १३ ॥
जे कां ज्ञानें लाधले सद्विचार, संपत्तीचा त्यांपुढें काय तोरा ।
पद्माचा जो तंतु तो वारणाला, वारायाला पैं म्हणे सिद्ध झाला ॥१४॥
झाला क्षीण बहु क्षुधेस्तव जरी कीं व्यापिला वार्धकें
आली कष्टदशा घडो मरण हीं कीं तेज गेलें निकें ।
ऐसाही मृगराज जीर्ण तृण तो खाईल कीं काय हा
शौर्यें भेदुनि हस्तिमस्तकशुभग्रासींच ज्याला स्पृहा ॥१५॥
सुनीतिपथ सेवणें, मलिन कर्म मानेच ना
घडो मरण नावडे खलजनाप्रति प्रार्थना ।
विपत्तिसमयीं पर प्रकटवीचना दीनता
भल्याविण असें असिव्रत करूं शके कोणता ॥ १६ ॥

---

१ सहाणेवर घासलेला. २ वाळवंटें. ३ नद्या. ४ लक्ष्मी ५ प्रतियोद्धे. ६ इतर.
७ तरवारीच्या धारेवर निजण्याचें व्रत.

ज्यांचीं देहमनें तशींच वचनें पुण्यामृतें ओतिलीं
कीं जेहीं स्वकृतोपकारविभवें सर्वत्र विस्तारिलीं ।
लोकांचे परमाणुतुल्य गुण जे मेरूपरी वानिती
चित्तीं तोषहि पावती सुजन ते नेगों किती नांदती ॥ १७ ॥
एकत्र केशव वसे अपरत्र वैरी, अन्यत्र पर्वत शतक्रतुभीत भारी ।
कीं वाडवाग्नि इतरत्र असे उदार, पाहे कसें पण सरित्पतिचें शरीर ॥१८॥
महीपृष्ठीं केव्हां अवचट पलंगीं पहुडतो
क्षुधेतें शाकानें अवचट सदन्नें निवटितो ।
कधीं कंथाधारी अवचट सुवस्त्रीं मिरवतो
मनस्वी कार्यार्थी किमपि सुखदुःखें न गणितो ॥ १९ ॥
अंकित जे विधिचे सुर सर्व हि त्यांस उगा प्रणिपात करावा,
प्राक्तन कर्म तसें फल दे तरि तो विधि थोर किमर्थ ह्मणावा ।
कर्मबलें कळतील फलें तरि कर्मिच भाव कसा न धरावा,
दुर्बल ते सुर, दुर्बल तो विधि काय तयांस्तव अर्थ घडावा ॥ २० ॥
दुर्मंत्रें नृप, संगतिस्तव यती, कीं पुत्र ही लालनें,
वेदानध्ययनें द्विजाति, कुल दुष्पुत्रें, खलाराधनें ।
नासे शील, न पाहतां कृषि, मदें माँ, लाज मद्यें फुका,
शाठ्यें मित्रपण, प्रवास गमनें स्नेह, प्रमादें रुका ॥ २१ ॥
लज्जेनें जड, दांभिक व्रतिपणें, कापट्य शौचें गणी
शौर्यें निर्दय, आर्जवें लडबडचा, कीं दीन सद्भाषणीं ।
मानेच्छा तरि मूर्ख, कीं बडबडचा वक्ता निकामी भला
ऐसा तो गुण कोणता खलजनीं नाहींच जो निंदिला ॥ २२ ॥
राहो जाति रसातलीं सुगुण हे राहोत कीं खालते
शैलाग्राहूनि शील सत्वर पडो सौजन्य अग्नींत तें ।
शूरत्वावरि आदळो अशनि कां हें सर्व ही नावडे
अर्थप्राप्ति असो निरंतर मला त्यावीण हें बापुडें ॥ २३ ॥
पेटीमाजि निरोधला न सुटका ज्याला भुकेला फणी
तों केलें बिल मूषकें अवचितां तो आंत गेला ह्मणी ।

१ एकीकडे. २ दुसरीकडे. ३ इंद्रास भ्यालेले. ४ समुद्राचें. ५ एकारे वेळीं. ६ निवारितो. ७ मोठ्या मनाचा. ८ पूर्वीचें. ९ वेदाध्ययन न केल्यामुळें. १० लक्ष्मी. ११ पैसा. १२ व्रतें पाळल्यानें. १३ वीज.

त्यानें भक्षुनि सर्प तत्कृतपथें निश्चिंत गेला पहा
ऐसें कर्म अतर्क्य यास्तव तुम्ही कीं स्वस्थ चित्तें रहा ॥ २४॥
आस्फालितां हि स्वकरें न राहे, चेंडू जसा तो उसळेचि पाहें ।
विपत्तियोगें पडले जरी कां, तें स्थैर्य नोहे तरि साधुलोकां ॥ २५ ॥
चेंडू पडे आणि उठे तसाची, दृष्टांत हा सत्पुरुषांस साची ।
मृत्पिंड जो त्या उठणेंच नाहीं, दृष्टांत हा केवळ दुर्जना हीं ॥ २६ ॥
जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच, जें दे पतीस सुख फार कलत्र तेंच ।
जो एकरूप सुखदुःखपणीं गड्ी तो,हा लाभ पूर्वसुकृताविण केंवि होतो ॥२७॥
संपत्कालीं कोवळें सज्जनाचें, होतें चित्त जातिपंकेरुहाचें ।
आपत्कालीं शैल हीं आदळो कां, धाकेना जें गाजवी धैर्य डंका ॥ २८ ॥
विद्यासमान्वित हि दुष्ट परित्यजावा, त्याशीं बुधें न सहवास कधी करावा ।
ज्याच्या असे विमल ही मणि उत्तमांगीं[3], तो सर्प काय न डसे खलअंतरंगीं २९

क्षीरानें दिधले स्वकीय गुण ही नीरास आत्माश्रयें
त्या क्षीरास हुताशनें श्रमवितां तें तोय मेलें स्वयें ।
झाला ताप विशिष्ट अग्निवदनी तें दुग्ध जेव्हां पडे
तेव्हां धांवुनि तोय शीतल करी मित्रत्व हें चोखड ॥ ३० ॥

स्थापी दुर्जनता भल्यास बुध जे स्थापी तयां मूर्खता
आप्तांमाजि अनाप्तता कुवचनें स्थापी बळें तत्त्वता ।
पीयूषास हि कालकूट करिते सेवी तये चंडिके
तीणें पावसि सौख्य साधुपण हें लावील तूतें भिके ॥ ३१ ॥

मलिन रुधिरमांसा वेगळें हाड दैवें
अवचट मिळतां तें श्वान संतोष पावे ।
क्षुधित हि गजहंता[4] जंबुकातें न मारी
अवसरिं समजावी क्षुद्रता आणि थोरी ॥ ३२ ॥

योजी हिताप्रति निवारुनि पापकर्में, वर्णी बरेच गुण झांकुनियां कुकर्में ।
दे आपणास असतां व्यसनीं त्यजीना, सन्मित्रलक्षण असें वदताति जाणा ३३

तृणें मृगाला सलिलें झषाला[5], संतोष हे वृत्ति[6] महाजनाला ।
तयांस निष्कारण तीन वैरी, किरात[7] कैवर्तक[8] दुष्ट भारी ॥ ३४ ॥

---

१ आफळतां. २ खचेना. ३ मस्तकावर. ४ सिंह. ५ माशाला. ६ जीवन ७ पारधी. ८ धीवर.

तोयाचें परि नांव ही न उरतें संतप्त लोहांतरीं
तें भासे नलिनीदलावरी पहा सन्मौक्तिकाचेपरी ।
तें स्वातिस्तवें अब्धिशुक्तिपुटकीं मोतीं घडे नेटकें
जाणा उत्तममध्यमाधम दशा संसर्गयोगें टिके ॥ ३५ ॥

कुलाल व्यापारी कमलभव जेणें करविला
दहा घेरे घे रे ह्मणुनि हरि धाकें भरविला ।
भिकारी ज्या कर्मं करुनि हर लोकीं फिरविला
नमावें त्या जेणें रवि परि रिकामा नुरविला ॥ ३६ ॥

पुष्पापरी दोंपरिंचीच साची, हे वृत्ति संभावित जे तयांची ।
लोकांचिये एक शिरीं सजावें, वनींच कीं एक सुकोनि जावें ॥ ३७ ॥

मौनें मूक दिसे, वदे तरि महावाचा, स्वपार्श्वीं फिरे
तेव्हां धीट, तसा विवेकच नसे जैं चालतां अंतरें ।
क्षांतीनें तरि भ्याड, शांति न धरी तैं गांवढा, यापरी
सेवाधर्म असा अगाध कथिला हा जाण योगीश्वरीं ॥ ३८ ॥

नम्रपणेंच सभेंत महोन्नत जे गुण वर्णुनियां परकीय जनाचे,
सांगितल्याविण दाविति कौशल सर्वजनांप्रति जैं स्वगुणांचें ।
स्वार्थ परार्थहि साधिति जिंकिति शांतिबळें मुखरत्व खलांचें,
संत महाद्भुतभाजनं यापरि सेवन कोण करी न तयांचें ॥ ३९ ॥

तैं कां दुर्गुण लोभ जैं, पिशुनता जैं कां महापातकें
काशाला तप सत्य जैं, मन मुरे जैं कां सुतीर्थादिकें ।
काशाला जन जैं भलेपण असे, कां भूषणें कीर्ति जैं,
सद्विद्या जरि कां धनें, मरण कां दुष्कीर्ति लोकींच जें ॥ ४० ॥

अदृष्ट झालें प्रतिकूळ जेव्हां वारील तें पद्मविहार तेव्हां ।
जे क्षीरनीरादिविवेकं नाना त्या हंसकीर्तीस हरूं शकेना ॥४१॥

खल्वाट चंडकिरणें अतितप्त झाला, छायार्थ तालतरुमूलसमीप गेला ।
तत्काल थोर पडलें फळ तो निमाला, ये जेथ दैवहत येइल तेथ घाला ४२

विद्या सुरूप कुलसेवन शील पाहीं, याचे गुणीं किमपि कांचनलब्धि नाहीं ।
तें पूर्वपुण्य समयींच फळे नराला, कालीं जसें फळ घडे धरणीरुहांला ४३

---

१ स्वाति नक्षत्राचें. २ ब्रह्मदेव. ३ भवतार. ४ पाळीमागें. ५ बडबड. ६ अद्भुत रसाचें पात्र. ७ खलत्व. ८ कमलविहार. ९ पाणी आणि दुध यांचे पृथक्करण करण्याचे गुण. १० टकल्या. ११ झाडाला.

भाग्याला सुजनत्व भूषण असे, कीं मौन शौर्यास तें,
ज्ञानाला शम, त्या शमास विनय, द्रव्यास दातृत्व तें ।
अक्रोधत्व तपा, क्षमा प्रभुपणा, धर्मास निर्दंभता
या सर्वांस हि मुख्य भूषण पहा सच्छील हें तत्त्वता ॥ ४४॥
हे तों सत्पुरुष स्वकार्य त्यजिती अन्यार्थ ही साधिती
हे तों मध्यम जे निजार्थ करूनी अन्यार्थ संपादिती ।
हे तों राक्षस जे स्वकार्यविषयीं अन्यार्थ विध्वंसिती
जे कां व्यर्थ परार्थहानि करिती ते कोण कीं दुर्मती ॥ ४५ ॥
खरें वचन बोलवी, जडपणास कीं मालवी,
महोन्नतिस डोलवी, दुरित मारुनी चालवी ।
मनीं सुख अमोल वीं, यश जगत्त्रयीं कालवी
अनेक गुण पालवी सुजनसंग तो भूलवी ॥ ४६ ॥
वांछा सज्जनसंगमीं, गुरुकुलीं वंदारुता नम्रता,
निंदेचें भय, तुष्टता परगुणीं, स्वस्त्रीसुखीं लुब्धता ।
विद्याभ्यास, महेशभक्ति, खलसंसर्गी अनासक्तता,
चित्ताचा जय यां गुणांस निधि जे त्यां वंदिजे तत्त्वता ॥४७
तृष्णेतें निवटीं, क्षमेस जवटीं, गर्वादिकांतें पिटीं,
सत्यातें उमटीं ह्रदंबुजपुटीं, सेवीं दया गोमटी ।
विद्वत्स्नेहतुटी नको करू, भले त्याच्या गुणातें लुटीं
वंशीं कीर्तिवटी उभारिं, अरिषड्वर्गासि तूं आपटीं ॥ ४८ ॥
खोटें बरें कार्य असो तयाचा, विचारिजे कीं परिणाम साचा ।
कर्तव्य कीं जें विबुधें विवेकें, तें अन्यथा शल्य वडे विपाकें ॥४९ ॥
श्रीखंडाच्याच काष्ठें करुनि शिजवितो पेंड वैडूर्यपात्रीं
किंवा तो अर्कमूलास्तव कनकहलें नांगरीतो धरित्री ।
केळी तोडूनि टाकी त्वरित चहुंकडे परितो कोद्रवांतें
जो या येऊनि लोकीं सुकृत न करितां आचरे दुष्कृतातें ॥५०॥
वनीं रणीं शत्रुजलाग्निसकटीं, महार्णवीं पर्वतवास दुघटीं ।
निजो वसो आणि फिरो अरण्यें, त्या त्या स्थलीं रक्षिति पूर्वपुण्यें ५१
होती अरण्येंच पुरें तयाला, समस्तही होतिल आप्त त्याला ।
मही तया होइल पूर्ण रत्न, ज्याला जसें संचित पूर्वपुण्य ॥ ५२ ॥

१ उत्पन्न करितो. २ जवळ करी. ३ परिणाम, ४ हरीक.

अब्धीमाजि बुडो प्रयत्न करुनी हेमाद्रिशृंगीं चढो
शत्रूतें रगडो रणीं क्रयकृषिव्यापारकर्मी भिडो ।
विद्या सर्व पढो कडोविकडिच्या व्योमास लंघो उडो
जें होणार चुकेचि ना विधिवळें कोणी रडो ना रडो ॥ ९३ ॥
मरावें कीं होतें सुरपतिस देऊनि झगडा
प्रहारें वज्राच्या करुनि धरणीं इंगळसडा ।
पित्यातें संग्रामीं त्यजुनि भय निःशंक भिडणें
नव्हे त्या मैनाका उचित जलधीमाजि दडणें ॥ ९४ ॥
ज्याला नीति वदे बृहस्पति, करीं वज्राअसीं आयुधें
विष्णूचें बल शुभ्र वारण तशीं स्वर्गादि नानाविधें ।
दुर्ग, सैनिक देव यद्यपि तरी युद्धीं पळे वृत्रहा
धिक् धिक् पौरुष यत्न यास्तव खरें प्रारब्ध मोठें पहा ॥ ९५ ॥
कर्मानुसार घडते मति सर्व लोकां, कर्माअधीन फल येथ नसेच शंका ।
हें सत्य यद्यपि तरी असतां विवेकें, होणार हो मग सुखें निजकर्मपाकें ९६
आलस्य जें कार्यविघातकारी, असूं नये तो रिपु या शरीरीं ।
उद्योग सद्बंधु तया न टाकीं, त्या सेवितां पावसि सौख्य लोकीं ॥९७॥
वनचरांसह शैलवनांतरें, निजमुखें फिरणें तरि तें बरें ।
जरि घडे सहवासचि पामरीं, तरि जळो असणें सुरमंदिरीं ॥९८॥
द्रव्यास हे गमनमार्ग यथावकाश, की दान भोग अथवा तिसरा विनाश ।
जो घे न भोग जरि पात्र करीं न देही, त्याच्या धनास मग केवल नाश पाहीं ॥
असे जयाला धन तोचि पंडित, कुलीन तो तोचि गुणी बहुश्रुत ।
तो मान्य तो सुंदर तो विचक्षण, धनाश्रयें राहति सर्वही गुण ॥ ६० ॥
अमूल्य रत्नीं सुर ते न धाले, हालाहला देखुनियां न भ्याले ।
सुधेविणें यास्तव जे समर्थ, न निश्चितार्थाविण ते कृतार्थ ॥ ६१ ॥
शनिबुधकुजदेवाचार्यशुक्रादिकांतें
असमबल ह्मणोनी राहु टाकी तयांतें ।
दुधड हि जरि झाला ग्रासितो सूर्यचंद्रां
ह्मणउनि पुरुषार्थी तो न सोडी स्वमुद्रा ॥ ६२ ॥
श्रुतींचि कीं श्रोत्र न कुंडलानें, दानेंचि कीं पाणि न कंकणानें ।

---

१ हिमालयाचा पुत्र. २ इंद्र. ३ शनि, बुध, मंगळ, गुरु, आणि शुक्र. ४ ऐ-श्वर्यानें.

साजे तसा देह हि हा न भानें, परोपकारेंचि न चंदनानें ॥६३॥
जयाचें असे पुण्य कीं सावकाश, विशेषें जनीं शोभती ते कवीश ।
जयांचा यशोदेह आकल्प राहे, जरामृत्युवार्ता जयाला न साहे ॥६४॥

ब्रम्ह्यानें लिहिलें ललाटफलकीं जें द्रव्य ज्याला असे
तें लाधे मरुमंडलीं अधिकता मेरूस गेल्या नसे ।
सेवीं धैर्य धनांध त्यांप्रति वृथा दावूं नको दीनता
कूपीं कीं जलधींत कुंभ जल घे जें मापिलें तत्त्वता ॥ ६५ ॥

तें श्वान एक तुकड्यास्तव चारे नाना, दावी धन्यास जठरार्थ कसें पहाना ।
दे आळवूनि जरि हस्तिप बापभाई, घे तोचि घांस गजराज कशी वढाई ।
प्रजा हाच कीं वत्स भूधेनुकेचा, नृपा तूं करीं फार सांभाळ याचा ।
स्ववत्साचिया जाण वात्सल्ययोगें, अभीष्टार्थ देईल हे भूमि वेगें ॥ ६७ ॥

केव्हां सत्य वदे वदे अनृत ही केव्हां वदे गोड ही
केव्हां अप्रिय ही दयालु हि असे केव्हां करी घात ही ।
जोडी अर्थ हि जे यथेष्ट समयीं कीं वेच ही आदरी
ऐशी हे नृपनीति भासत असे वारांगनेचे परी ॥ ६८ ॥

क्षणी विसंबाल महीपतीला, स्वकीय कोणीच नसे तयाला ।
अध्वर्यु हो कीं यजमान त्यातें, हुताश जाळी धरितांच हातें ॥ ६९ ॥
हे तों नव्हेत कुलपर्वत कीं ढळाया, कीं क्षुद्र सागर नव्हेत उचंबळाया ।
ज्यांचें महाप्रलयिं धैर्य पहा चळेना, त्यांशीं दुराग्रह नको तुज हें कळेना ७०
फुका कोरडें वैर कीं निर्दयत्व, परस्त्री परद्रव्य हें मुख्य तत्त्व ।
अनिष्टत्व चिंती सुहृद्बांधवांचें, स्वतःसिद्ध हें रूप पैं दुर्जनांचें ॥ ७१ ॥
कांताकटाक्ष शर हे हनती न ज्याला, तावी न कोपज हुताशन ही जयाला ।
ज्याच्या मनीं न जडती विषयादि पाश, तो धीर जिंतित जगत्त्रय सावकाश ॥
आरंभीं जे फार शेखी न कांहीं, आधीं थोडी जे क्रमें फार पाहीं ।
छाया पूर्वार्द्धापरार्द्धा दिनाची, तैशी मैत्री दुर्जनाची भल्याची ॥ ७३ ॥
दे दान गुप्त उपकार करी न बोले, मानी प्रमोद जरि मान्य घरास आले ।
दावी न गर्व विभवें गुण घे पराचे, खड्गाग्रतुल्य विषमव्रत हें भल्याचें ॥७४॥
कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें, तो क्षीणही विधु महोन्नति घे क्रमानें ।
जाणोनि हें सुजन ज्या दुबळीक आली, त्याशीं कदा न करिती सहसा टवाळी॥

१ कुसव्यानें. २ मारवाडांत. ३ घाले. ४ कठीण व्रत. ५ चंद्र.

आली जरी कष्टदशा अपार, न टाकिती धैर्य तथापि थोर ।
केला जरी पोत बळेंचि खालें, ज्वाला तरी ते वरती उफाळे ॥ ७६ ॥
दारिद्र्य ज्यांजवळि अप्रिय बोलण्याचें, भांडार ज्यांजवळि वाग्रसमाधुरीचें ।
स्वस्त्रीपरायण अनिंदक जेच तेही, भूभाग हे विलसिती अतिरम्य पाहीं ॥ ७७ ॥
पद्में[3] प्रफुल्ल करितो सविता स्वयें हा, रात्रीं विकास कुमुदांप्रति चंद्र दे हा ।
अप्रार्थितां जलद दे जल या जनाला, मुक्तार्थ कीं परहितोत्सव सज्जनाला ७८

बरें तें या देहीं महिवरि कडेलोट करणें
महासर्पाच्या कीं वदनिं तरि ही हात धरणें ।
उडी कीं वन्हींत त्वरित जरि घालूनि मरणें
जळो तें तें लोकीं त्यजुनि निज सच्छील फिरणें ॥ ७९ ॥

त्याला वान्हि जलापरी जलधि हा कीं ओहळाचे परी
मेरु स्वल्प शिलेपरी मृगपती तो ही कुरंगापरी ।
कीं तो सर्प फुलापरी विषजलें पीयूषवृष्टीपरी
होतें सर्व हि यापरी वसतसे सच्छील ज्याचे शिरीं ॥ ८० ॥

क्रोधें जळे मणि अचेतन सूर्यकांत, ज्या लागतांच दिननायकपादघात ।
संभावितांत गणना पहिली जयाची, साहेल तो पण कशी शठता दुजाची ८१
ज्या आवडेचि खल आपण ही तसाच, दुर्वृत्त फार निरपत्रप दुष्ट नीच ।
आलें तयास जरि वैभव दैवयोगें, नांदे तयास्तव दुजें मग कोण सांगें ॥ ८२ ॥

विद्या हे पुरुषास रूप बरवें कीं झांकलें द्रव्य ही
विद्या भोगसुकीर्तिदायक पहा ते मान्य मान्यास ही ।
विद्या बंधु असे विदेशगमनीं विद्या महादेवता
विद्या पूज्य नृपास हा नरपशू तीवेगळा तत्त्वतां ॥ ८३ ॥

करीं साजे त्याग श्रवणयुगलीं सच्छ्रवण जें
मुखीं सत्य स्वच्छाचरण विलसे शौर्य हि भुजें ।
स्वशीर्षें थोराला नमन विभवा वांचुनि पहा
भल्याचा कीं स्वाभाविक शुभ अलंकारविधि हा ॥ ८४ ॥

शूरेंचि अथवा शूरें हें भूमंडल सर्वथा ।
पादाक्रांत करावें कीं इतरांची असो कथा ॥ ८५ ॥

वाहे महीतें स्वशिरीं फणी तो, तयासि पाठीवरी कूर्म वाहतो ।

१ मशाल. २ गोडवाणीचें. ३ कमलें. ४ सूर्यानें. ५ किरण, पाय.

समुद्र घे त्यास हि मांडियेवरी, थोरांचि हे थोरवि जाण यापरी ॥८६॥
उपजणें मरणें न चुके नरा, फिरत नित्य असे भवभोंवरा ।
उपजला तरि तोच मला गमे, कुल समुन्नति ज्यास्तव घे रमे ॥ ८७ ॥
वृक्ष फार लवती फलभारें, लोंबती जलद घेउनि नीरें ।
थोर गर्व न धरी विभवाचा, हा स्वभाव उपकारपराचा ॥ ८८ ॥
तळीं भार कूर्मापरी जे न नेती, ध्रुवाचे परी ऊर्ध्व मेढा वहातीं ।
वृथा जन्मती पावती नाश तैसे, मधें उंबराच्या फळीं जंतु जैसे ॥८९॥
जीं बंधनें गजभुजंगविहंगमाला, कीं राहुवेध रजनीशदिवाकराला ।
दारिद्र पंडितजनावरि फार लोटे, हें पाहतां मग अदृष्ट बलिष्ट वाटे ॥ ९० ॥
जे पात्र कां पुरुषरत्न महागुणांचें, ते निर्मितो विधि विभूषण भूमिकेचें ।
कीं त्यास ही त्वरित मृत्युमुखांत लोटी,त्याची गमे मज अपंडितता करंटी॥
सिंहाचा जो बाल तो ही चपेटा, मारी त्याला जो करी मत्त मोठा ।
तेजस्वी जे वृत्ति ऐसीच त्यांची, तेथें नाहीं चाड कांहीं वयाची ॥ ९२ ॥
सद्रत्न हार मणि ताइत बाहुदंडीं, कीं स्नान चंदन फुलें तशि लांब शेंडी ।
यांनीं खरी घडतसे पुरुषा न शोभा, वाणीच भूषण सुशिक्षित शब्दगर्भा ९३
वाणी खरी दान बरें अहिंसा, नसे परद्रव्यसतीपिपासा ।
दया अतृष्णा नतिभाव जो कां, सन्मार्ग हा चोपट सर्व लोकां ॥ ९४ ॥

( शृंगार शतक. )

विधिहरिहर जणें दास केले स्त्रियांचे
चरित अतुल ज्याचें वर्णवे हो न वाचे ।
त्रिभुवनविजयी जो पुष्पधन्वा तयाला
सकलसुरवरिष्टा म्यां नमस्कार केला ॥ १ ॥
मंद हास निजभाव दावणें, बोल लाज परतोनि पाहणें ।
खेळणें झडगणें न हांसणें, स्त्रीस्वभाव अवघे न बंधनें ॥ २ ॥
भ्रूभंगयोजित कटाक्ष हि गोड वाणी,दावूनि हास्य वरि त्यांत हि लाज आणी ।
कीं चालणें हळुच थोपुनि राहणें हें, कांतास भूषणही शस्त्रही हेंचि पाहें ॥ ३ ॥
आतां कसें करूं कोठें जाऊं या निर्मिल्या कृशा ।
यांच्या विचित्र नेत्राब्जीं व्यापिल्या सर्व ही दिशा ॥ ४ ॥
चंद्रतुल्य मुख राजस डोळे, स्वर्णवर्ण वपु कुंतल काळे ।

१ कीर्ति, मोठेपणा.

मांसल स्तन नितंब हि लेणें, हें स्त्रियांप्रति अकृत्रिम बाणे ॥ ६ ॥
डोळे विशाळ अति चंचळ मंद हास, चातुर्ययुक्त वचनीं मिरवे विलास ।
शोभा हरी चरण कोमल पल्लवांची, कीं चांगलीच तरुणत्वदशा स्त्रियांची ॥
प्रेमप्रसन्न वनितामुख पैं पहावें, कर्णीं तिचें वचन सादर आयकावें ।
आस्वादिजे तदधरामृत ते स्मरावी, ते स्पर्शिजे ह्मणुनि तन्मय तीस भावी ।
झणत्कार ज्यांच्या पदीं नूपुरांचा, रणत्कार ज्यांच्या करीं कंकणांचा ।
कुरंगेक्षणा ज्या स्वनेत्रांतपातें, हरीनात कोणाचिया या मनातें ॥ ८ ॥
पीन जिचे कुच शोभति भारी, केशरचंदनचर्चित गौरी ।
नूपुरशब्द पदाब्जविहारी, ते कवणा न करी वश नारी ॥ ९ ॥
अबला या वदताति जे स्त्रियांला, कवि त्यांला विपरीत बोध झाला ।
जित केले सुर सर्व दृष्टिपातें, अबला नाम दिजे कसें तयांतें ॥ १० ॥
सत्य आज्ञाकार तीचा मकरध्वज भासतो
तन्नेत्रसूचितस्थानीं वेगीं तत्काल धांवतो ॥ ११ ॥
मोठे संयमशील केश नयन श्रुत्यंत हीं पावले ।
अंतर्वक्त्र सुनिर्मल द्विजगणीं जें सर्वदा सेविलें ।
मुक्तांचा सतताधिवास हृदयीं सद्वृत्तता ही स्तनीं
ऐसें शांत शरीर ताप करितें कां सांग वो कामिनी ॥१२॥
मुग्धे तुझी अपूर्वा हे धनुष्मत्ता दिसे निकी ।
विंधिसी लोकचित्तातें गुणांहीं न च सायकीं ॥ १३ ॥
असो दीप असो अग्नि असोत मणि सर्वरे ।
अंधकार विना कांतामुखचंद्रें न संहरे ॥ १४ ॥
स्वभावें उद्वृत्त स्तन चपल हें लोचनयुग
तसा रागी ओंठ प्रकृतिकुटिल भ्रूभ्रमण गे ।
करो पीडा मातें तदपि तव सौभाग्यलिपिका
करीं कष्टी मध्यें स्थित असुनियां रोमलतिका ॥ १५ ॥
भास्वद्देहशशी वक्त्र गुरु हि स्तनभार ते ।
शनैश्चर पदद्वंद्व महरूप विराजते ॥ १६ ॥
मांड्या, नितंब जघन स्तन पुष्ट तीचे, पूर्णेंदु साम्य न धरी सखिच्या मुखाचें ।
हें आकुलत्व झणि टाकुनियां मना तूं, साधीं महासुकृत सर्व सुखैकहेतू ॥१७॥
भल्यांस मी प्रार्थितसें स्वभावें, मात्सर्य टाकोनि निकें वदावें ।
नितंब सेवूं धरणीधरांचे, किंवा मदोन्मत्तविलासिनींचे ॥ १८ ॥

चंद्रकांत तिचें वक्त्र महानील हि केश ते ।
पद्मरागपदद्वंद्वीं रत्नरूप विराजते ॥ १९ ॥
थोपत थोपत जाते कोणी रमणी वनद्रुमच्छाये
वारी चंद्रकरांतें उचलुनि पदरा जयाचिया सोये ॥ २० ॥
न देखतां दर्शनलोभ दाटे, ते देखिल्या उत्सव कैंवि भेटे ।
आलिंगितां काम असा उदेजे, देहद्वया भेद कदा न कीजे ॥ २१ ॥
बरा चंदनालेप देहासि साजे, शिरीं मालतीपुष्पमाला विराजे ।
उरीं कामिनी जीस तारुण्य माजे, असें सौख्य ज्या तेथ त्या स्वर्ग गाजे ॥२२॥
पहा संभोगांतीं उपरि सुरतश्रांत ललना
उरीं लोळे डोळे उघडि तशि झांकी सुनयना ।
असे गंडद्वंद्वीं पुलकित वरी मुक्तकवरी
तिची गोडी घेतो कुशल जन चावूनि अधरीं ॥ २३ ॥
हा थोर अक्रम नव्हे उचित प्रसंग, वृद्धास ही पर विकार करी अनंग ।
तों भोग जीवनहि जों स्तनपात नाहीं, केलें न पंकजभवें चतुरें असें ही ॥२४॥
विनय प्रेम विराजे गोडी ज्यामाजि काम ही माजे ।
वनितालाप असे जे ऐके सुकृती विविक्त पैं सेजे ॥ २५ ॥
करावा वास गंगेच्या सलिलीं पाप हारिजे ।
अथवा तरुणीपीनस्तनाभ्यंतर सेविजे ॥ २६ ॥
हा संसार असार त्यांत हि गती या दोन अत्युत्तमा
ब्रह्मानंदसुखें चि काल हरणें टाकूनि मायाभ्रमा ।
कांतेचे कुचकुंभ पुष्ट भग त्या मांड्या महासुंदरा
त्यांतें कीं कुरवाळिती रतिभरें हा काळ गेला बरा ॥ २७ ॥
सुरतरसभरानें नेत्र झांकूनि राहे
प्रिय रमण तयाशीं जे न बोले न पाहे ।
नवघड तरि तो ही त्या दशेतेंच पावे
नवसुरतरसाचे भाव कोणें वदावे ॥ २८ ॥
आरंभींच नकोनको सखिवदे त्यानंतरें सोडितां
नीविग्रंथि सलज्ज पैं हळूहळू ते ढोल दे ओढितां ।
टाकी धैर्य रत प्रियासह भरें संभोग तो माजतां
अंगें उद्यम ही करी सरि नसे ऐशा कुलस्त्रीरता ॥ २९ ॥

## वसंतवर्णन.

राहे तोंवरि कांतेच्या हृदयीं कोप दारुण ।
संचार न करी जों हा चंदनाद्रिसमीरण ॥ ३० ॥
परिमलान्वित वायु नवांकुरीं, तरु विराजित फार वनांतरीं ।
शुकपिकप्रमदाजन माजतो, बहु तयांस वसंत नवाजितो ॥ ३१ ॥
शोभा धरी स्त्रीविरहानलाची, जे मंजरी आम्रमहीरुहाची ।
पिकावली सादर तीस पाहे, श्रीखंडशैलोद्भव वायु वाहे ॥ ३२ ॥
कोकिलध्वनि सुशीतल वारे, काल उत्तम वसंत पहा रे ।
कामिनीविरहवेध जयाला, दुःखदायक समस्त तयाला ॥ ३३ ॥
द्वारीं लतामंडप रम्य नारी, पुष्पें पिकालाप परोपकारी ।
गोष्टी कवींशीं हिमरश्मिसेवा, ज्या सौख्य हें तोच गृहीं वदावा ॥३४॥
आम्रद्रुमीं बार उठे वसंतीं, सौरभ्य संचार करी दिगंतीं ।
करी द्विरेफावली जें तनाना, कोणास तें काम करीं कशीना ॥३५॥

## ग्रीष्मवर्णन.

सत्पुष्पहार घनसार विलेप जाणा, मंदानिल व्यजनजन्य वधू सुजाणा ।
माडी मनोहर सुशीतल चंद्रिका हो, घेतो निदाघसमयीं सुकृतीच लाहो ॥३६
उद्दाम हार घनसार विलेप चंद्र, माडी सुमध्य पवन व्यजनीय सांद्र ।
कांता मनोज्ञसख रे वसनें उन्हाळा, हा सोहळा सुकृतपुंज जया तयाला ३७
माडी शुभ्र सुधांशु पूर्ण रमणीवक्त्राब्ज माला फुलें
श्रीखंडद्रव जो वरा मगमगी हें सर्व जें बोलिलें ।
येणें क्षोभ घडे तयास हृदयीं जो मन्मथें जिंकिला
यांतें पाहुनि ही कदापि न ढळे जो कां विरागी भला ॥ ३८ ॥

## वर्षावर्णन.

वरतें पटल घनाचें नर्तन करिती महीवरी मोरें ।
भूतल हिरवें पथिकें सोडावी दृष्टि कोठें रे ॥ ३९ ॥
कोणास न करी हर्ष वर्षा हे तरुणीपरी ।
पयोधरें पुष्पगंधें मदना माजवी बरी ॥ ४० ॥
नवमेघवृंद गगनीं भरणी हे, जलपूरजर्जरित होउनि राहे ।
शिखिकूजनें मिरवतें वन जेव्हां, नर हृष्ट खिन्न हि समुत्सुक तेव्हां ४१॥
विद्युल्लता हे वन केतकी हे, हे मेघ हें वर्हिणनृत्य पाहें ।
ऱ्हईकडे हे सुटली धुमाळी, वियोगवत्स्त्री सखि केंवि टाळी ॥४२॥

न मार्ग हि दिसे असे तम तमाम वेष्टी दिशा
नभीं जलदवृंद यास्तव हि माजलीसे निशा ।
अशा समयि ना कशी झळकतांचि विद्युल्लता
प्रमोद भय ही धरी स्वमनिं जारिणी चालतां ॥ ४३ ॥

वर्षतां घन गृहीं निज नारी, पोटिशीं धरुनि घुंगट मारी ।
दुर्दिन प्रियतमाकुचसंगें, होतसे सुदिन हो रतिभोगें ॥ ४४ ॥

शरद्वर्णन.

करुनि निधुवनातें जो निजेला श्रमोनी
तृषित मग निशीथीं तोय मागे उठोनी ।
शिशिर जल सखी दे गात्र संक्रांत जीचें
अतुल सुख असें हें मंदभाग्यासि कैंचें ॥ ४५॥

हेमंतवर्णन.

मिष्टान्न आज्य दधिदुग्ध यथेच्छ झोडी, तांबूलकुंकम विलेपन भोग गोडी ।
स्त्री पोटिशीं धरुनियां सखलात ओढी, खोलींत शेज हिमरात्रि तयासि थोडी ॥

शिशिरवर्णन.

ओष्ठीं करी व्रण हि चुंबुनि गंडदेशीं, निर्मी कसा पुलक पीनकुचद्वयाशीं ।
वस्त्रांत ही घुसतसे जघनासि झोंबे, जारापरी शिशिरवायु रतें न थांबे ४७
केशां करी व्याकुल नेत्र झांकवी, बळेंचि वस्त्रें उडवी थरारवी ।
सीत्कार दंतांसि रची समीर हा, कांतांसवें शैशिर पैं रते पहा ॥ ४८ ॥

---

भल्यांच्या मनोमंदिरामाजि तोंच, विवेकप्रदीप स्फुरे स्पष्ट साच ।
तयातें कटाक्षांचलें जों न वारी, कुरंगेक्षणा यौवनोन्मत्त नारी ॥ ४९ ॥
वाचाल रे पंडित लोक जे जे, वैराग्य त्यांचें वचनींच साजे ।
जो कामिनीच्या जघना भुलेना, असा असे कोण मला कळेना ॥ ५० ॥
आहेत शूर मदवारणकुंभभेत्ते, या भूतलीं कितिक सिंहविनाशकर्ते ।
सर्वांपुढें करुनि मीच वदें तथापि, शूरांत तो विरल जो स्मरवर्ग दापी ५१
मीं बोलतों सत्य न पक्षपातें, जें सत्य लोकांत हि मान्य होतें ।
मनोहर स्त्रीसम आन नाहीं, तत्तुल्य दुःखप्रद ही न कांहीं ॥ ५२ ॥
युक्तिशून्य बहु बोलुनि काय, सौख्यदायक तिजा न उपाय ।
कामिनीकुचयुगा कवळावें, कीं वनाप्रति उठोनि पळावें ॥ ५३ ॥

अत्युत्कट प्रेमभरें स्त्रिया हो, ज्या ज्या क्रियेचा धरितील लाहो ।
करूं शके विघ्न न तो विधाता, तेथें दुज्याची मग काय वार्ता ॥ ५४ ॥
मोठा प्रतारक हि पंडित लोक पाहें, निंदी स्त्रियां तदभिलाष मनांत वाहे ।
नानातपीं घडतसे सुरलोकवास, तेथें परंतु सुखद प्रमदाविलास ॥ ५५ ॥
महत्त्व पांडित्य कुलीनता जे, विवेक अत्युत्तम तोंचि साजे ।
देहीं न जों तो मदनाग्नि पेटे, हे यां समस्तांसहि जो चपेटे ॥ ५६ ॥
भोगांस वैराग्यभरें त्यजोनी, निंदोत दोषास्पद हे ह्मणोनी ।
तरी वदों स्त्रीसम रम्य नाहीं, परोपकाराहुनि पुण्य कांहीं ॥ ५७ ॥
न कोणीच तृष्णासमुद्रांत पावे, नृपा जोडि कां व्यर्थ तारुण्य धांवे ।
जरेनें न जों जर्जरीभूत केली, मृगाक्षी गृहा जाइजे तोंचि हाली ॥५८॥
सन्मार्गी तोंचि राहे प्रभुपण मिरवी तोंच त्या इंद्रियांचें
लज्जेतें तोंचि वाहे विनयपण निकें दावितो तोंचि साचें ।
भ्रूचापा ओढुनीयां श्रवणपथवरी मारिला नेत्रबाणीं
नाहीं जों कामिनींहीं पुरुष मिरवितो तोंचि हीं सर्व लेणीं ॥ ५९ ॥
या निर्मिल्याच नसत्या जरि रम्य नारी,सौंदर्ययौवनविभूषण ज्यांस भारी ।
सेवागुणें सकल टाकुनियां विवेक, कां सेविते खलनृपांगण थोर लोक ॥६०॥
तरे या संसारीं विरल जन आत्मज्ञ सुकृती
विवेकी वेदांतश्रवणविनयोपस्कृतमती ।
स्त्रियेची भ्रूकुंची नरकनगराचींच कुलुपें
बळें उद्घाटी त्या स्थलिं जन भरे टाकुनि तपें ॥ ६१ ॥
स्त्रीजाति मुद्रा मकरध्वजाची, सर्वार्थसिद्धिप्रद जाण साची ।
न मानिती जे स्मर त्यांस दंडी, लावी भिके नग्न जटाळ मुंडी ॥ ६२ ॥
संसारीं मोक्षपदवी दुरी नाहीं विचक्षणा ।
मध्यें या दुस्तरा नसत्या जरि हो मदिरेक्षणा ॥ ६३ ॥
स्त्री हा महागल पहा स्मरधीवराचा, विस्तारिला भवसमुद्रजलांत साचा ।
जे झोंबताति नरमीन तया गळाशीं, काढूनि रागदहनीं शिजवी तयांशी ॥६४॥
वाडा स्वच्छ मनोहर प्रियतमा छत्रें विराजे रमा
ऐसें शाश्वत मानुनी अनुभवी पावे महासंभ्रमा ।
तें याला न कळे स्वपुण्य सरतां होईल हो त्यापरी
दाणादाण सुतंतु मात्र तुटतां मुक्ताफळें ज्यापरी ॥ ६५ ॥
विस्तीर्ण आणि अतिचंचल नेत्र ज्यांचे, कीं पुष्ट यौवनमदें स्तन हीं जयांचे ।

मंदोदर त्रिवलियुक्त अशा स्त्रियांतें, पाहोनि जे न ढळती नर धन्य पैं ते॥६६॥
योगाभ्यासें चित्तचैतन्यमैत्री, केली ज्यांहीं जे निजानंददात्री ।
ज्या ज्या रंगें मूढ ती वश्य केले, वाजेगारी त्यांपुढें हे न चाले ॥ ६७ ॥

विलासिनीची सहज क्रिया जे, मूढाचिया ते हृदयांत साजे ।
स्वभावयोगें नलिनी विकासे, तेथें फिरे गुंतुनि भृंग आसे ॥ ६८ ॥

जेथें सिद्धजनीं बऱ्या दरकुटचा सानंद हो सेविल्या
खांदा घांसुनि जेथ शंकरवृषें वृक्षत्वचा काढिल्या ।
जेथें या मदनास्त्र चंचलदृशा नाहींत उच्छृंखला
ऐसा तो असतां हिमाचल लवे कां हो मनस्वी खला ॥ ६९ ॥

कांते पंकजलोचने विपुल हे श्रोणी तुझी नेटकी
सुभ्रू तूं जलजानने तटतटी पीनस्तनीं कंचुकी ।
ऐसें आळवुनी प्रियेस भुलतो संभोगितो वानितो
ज्ञाताहि अपवित्र नश्वर असें जाणोनि ही मोहतो ॥ ७० ॥

नसे स्त्रीविना आन पीयूष जाण, नसे कालकूट स्त्रियेवीण आन ।
सुधा तेचि कांतानुकूल स्वभावें, विषप्राय जे तेचि अन्यत्र धांवे ॥ ७१ ॥

स्मरतां करिते ताप पाहतांच करी पिसें ।
स्पर्शतां भुलवी जे ते दयिता बोलिजे कसें ॥ ७२ ॥

जे डोहो संशयाचा अविनियगृह जे ग्राम जे साहसाचा
दोषाचें क्षेत्र जे कां कपट अणि अविश्वास ठेवा तयांचा ।
स्वर्गाचें विघ्न नानानरकमुख महामोह त्याचीच पेटी ।
कोणें स्त्री निर्मिली हे विष अमृत गमे पाश हे सर्वसृष्टी ॥ ७३ ॥

चंद्राची उपमिती दीधली मुखाला, कीं फुल्लांबुजतुलना विलोचनाला ।
त्वङ्मांस प्रचुर जयांत मांस हाडें, स्त्रीदेहा कनक वदे कवीश वेडें ॥७४॥

जें पूर्णचंद्रोपम कामिनीचें, मुखाब्ज रे पात्र सुधारसाचें ।
तारुण्य जातां मग तोंड तेंच, विषापरी होइल तूज साच ॥ ७५ ॥

त्रिवली तरंग मुख तेंच सरोज, आणि चक्रवाकयुग जाण उरोज ।
वनिता नदी कुटिल हे निजसंगें, भवसागरीं बुडविते सर मागें ॥७६॥

गाते मनोहर सुगंध इचे मुखाचा, तो कायसा रस वदों अधरामृताचा ।
आलिंगितां निरखितां सुख फार वाटे, येणें रिती विषयलंपट मूढ बेटे ७७

स्त्रीदेह वन त्यामाजी कुच पर्वत ते स्थलीं ।
न फिरें रे मना तेथें स्मरचोर वसे बैली ॥ ७८ ॥

शृंगार द्रुम त्यास होय घन जें क्रीडारसाची नदी
जें काय प्रिय यौक्तिकवचोमुक्ता तया अंबुधी ।
कांतानेत्रचकोर त्यास विधु जें सौभाग्यभांडार जें
ऐसें यौवन पावल्या न विचले तो धन्य हो बोलिजे ॥ ७९ ॥

गृह विषयरतींचें हेतु जें दुर्गतींचें
घनपटल असे जें ज्ञानताराधिपाचें ।
मदनसुहृद बीज भ्रांत्यनर्थादिकांचें
अघजनक जनीं या यौवनावीण कैंचें ॥ ८० ॥

जात्यंधाप्रति दुर्मुखाप्रति तथा वार्धक्ययुक्ताप्रती
कीं मूर्खाप्रति दुष्कुलाप्रति गलत्कुष्ठें खतें त्याप्रती ।
द्रव्याशेस्तव ओपिती निजतनू वेश्या अशा वोंगळा
त्यांशीं कोण रतेल नश्वरसुखज्ञाता विवेकी भला ॥ ८१ ॥

जासूद भाट भट भांड विटादिकांनीं
केलें असे मुख जिचें जरि पीकदानी ।
शोभा तिच्या यदपि अद्भुत ओष्ठबिंबीं
कोणी कुलीन नर उत्तम त्यासि चुंबी ॥ ८२ ॥

वेश्या हे मदनज्वाला माजली यौवनेंधनें ।
कामातुर सदा तेथें होमिती यौवनें धनें ॥ ८३ ॥

चिंती एकास, एकातें पाहे, बोले दुज्यासवें ।
स्त्रियांला प्रिय हो कोण हें कदापि न जाणवे ॥ ८४ ॥

न मंत्रा आटोपे किमपि न जया औषध दिसे
व्रतें दानें होमें उपशम न ज्याचा घटतसे ।
स्मरापस्माराख्य प्रबलतर हा रोग भुलवी
पिसें लावी त्यानें नर विकल तो नेत्र फिरवी ॥ ८५ ॥

तेजस्वी अतिदीर्घ वक्र चपल श्यामांग भोगी अही
कांतिचा तरि या समस्तहि गुणीं संयुक्त जे सर्वही ।
तो डोंबे जरि सर्प त्याप्रति असे मंत्रौषधादिक्रिया
कांहीं मंत्र उपाय भेषज नसे स्त्रीदृष्टिदष्टास या ॥ ८६ ॥

विलास ते तांडव रे फणेचे, कटाक्ष हालाहल ते जयाचे ।
स्त्रीसर्प तो टाकुनि त्यास जाई, तद्दष्ट जे त्यांस उपाय नाहीं ॥८७॥

## वैराग्यशतक.

---

अभिज्ञांस तों ग्रासिलें मत्सरानें, धनाढ्या प्रभू व्यापिलें दुर्मदानें ।
शिरीं थोर मूर्खांस अज्ञान ओझें, जिरालें निजांगींच पांडित्य माझें ॥१॥

शिणोनि फिरलों महाविषमदुर्गदेशांतरीं
तथा प्रभुहि सेविले न फल लाधलें कीं तरी ।
सशंक तरि जेविलों परगृहीं जसा कावळा
परंतु न दिसे मला कठिण आस हे दुर्बळा ॥ २ ॥

कांहीं द्रव्य असेल कीं उकरिली म्यां या भ्रमें ही मही
राजेही बहु सेविलेचि गिरिचे म्यां जाळिले धातु ही ।
रात्रीं मंत्रजपें श्मशान धरिलें पाथोधि उल्लंघिला
झाली प्राप्त कपर्दिका न मज तों सोडीं दुराशे मला ॥ ३ ॥

म्यां साहिली खलजनोक्ति कठोर पां ही, पोटांत दुःख वरिचेवरि हांसलों ही ।
कीं प्रार्थिलें स्वजठरार्थ मदांध लोकां, आशे अशीच मज नाचविसी किती कां।

दिसे ज्या प्राणांची स्थिति जलजपत्रोदक जसें
तयांसाठीं केलें विविध बहु म्यां पातक असें ।
पुढें द्रव्याढ्यांच्या प्रचुरधनलोभास्तव वृथा
बिलँज्यें म्यां केली बहुतर मृषात्मस्तुतिकथा ॥ ५ ॥

क्षमा केली धाकें त्यजुनि गृहसौख्यासि फिरलों
हिमोष्णादि क्लेशां अनुभवुनि अंगें न तपलों ।
विना शंभुध्यानें अनवरत वित्तास जपलों
मुनीच्या कर्मातें करुनि मुनिभाग्यासि मुकलों ॥ ६ ॥

न भोगिले भोगहि मीच भोगिलों, न साधिलेंही तप मीच तापलों ।
न काल गेला तरि मीच चालिलों, न खुंटली आस हि मीच खुंटलों ॥ ७ ॥

वदना रदनावलिनें त्यजिलें, शिर सर्वहि शुभ्रपणें पिकलें ।
उठतां बसतां अणु शक्ति नसे, परि आस निरंतर माजतसे ॥ ८ ॥

---

१ प्रवेश करण्यास कठीण अशा अन्यदेशीं. २ ससैन्य. ३ धानिक. ४ आशा. ५ श्मशानांत मंत्रसाधन केलें. ६ समुद्र; द्रव्य मिळेल म्हणून समुद्रांतून व्यापार केला. ७ कवडी. ८ पोटाकरितां. ९ कमलपत्रावरील बिंदुप्रमाणें चंचल ज्यांची स्थिति. १० निर्लज्जपणें. ११ खोटी आत्मस्तुति. १२ तपश्चर्या केली. १३ मुख-सारखा. १४ दंतपंक्ति. १५ वाढते.

मी हा अहंकार संभोग गेला, तुल्यायुषी स्वर्ग समीप बैसला ।
काठीविणें ज्या फिरणें च नाहीं, तथापि धीके मरणास देहीं ॥९॥

आशा थोर नदी, मनोरथ तिचें पानीयें, वीची तृषा
स्त्रीपुत्राद्यनुराग हीं जलचरें जे पूर्ण कूलंकषा ।
संसारभ्रमभोंवरा गरगरी चिंताच ओघीं तटें
तीतें जे तरले मुनीश न कधीं ते पावती संकटें ॥ १० ॥

न संसाराची हीं दिसत चरितें जाण कुशलें
विपाकें पुण्याच्या मज विवरितां ज्ञान घडलें ।
व्ययें पुण्याच्या हे विषय विषयी जे जन तयां
सुखें देती जाती व्यसन मग देऊनि विलया ॥ ११ ॥

अवश्य जाणारचि भोग शेखीं, कां होतसे यास्तव लोक दुःखी ।
मुक्त्यर्थ आसक्तपणें श्रमावें, सुखें अनासक्तपणें असावें ॥ १२ ॥

जीं कां पूर्वी भोगिलीं आणि भोग्यें, ज्ञानी ऐसीं टाकिती सर्व भोग्यें ।
द्रव्याचें तों तोंड कल्पीं दिसेना, वांछा मात्र त्याग आह्मां घडेना ॥ १३ ॥

ध्याती ब्रह्म सदैव धन्य नर ते राहूनियां कंदरीं
ज्यांचीं बाष्पजलें विहंगम पिती बैसूनी मांडीवरी ।
एकांतीं स्वमनोरथेंचि रचितां उद्यानवापीगृहें
स्त्रीसौख्यादिक आमुचें सरतसे हा हंत आयुष्य हें ॥ १४ ॥

भिक्षाटणें अशन तें क्षण एकवार, शय्या महीवरि जयास न रांड पोर ।
कंथा जया वसन कीं शतखंड तेही, टाकीच ना तदपि तो विषयास देही १५

सोन्याचे कुंभ हे कीं ह्मणउनि वदती गोंठलें मांस त्याला
थुंका शेंबूड यांचें सदन वदन त्या चंद्र दृष्टांत केला ।
दुर्गंधिस्थान मूत्रस्थल जघन तया तुल्य सोंडेस बोले
वर्णी या निंद्यरूपा कविवर न कळे यास हीं काय झालें ॥ १६ ॥

भोगी विरागी जन जे तयांचा, धनी गमे शंकर एक साचा ।
देहार्थ ही दे तिजत्रीण थोर, त्यागी न भोगी जन हा पुरार ॥ १७ ॥

---

१ भोगेच्छा व अहंकार बरोबरच गेले. २ बरोबरीचे लोक स्वर्गास गेले. ३ भितो. ४ प्राणी. ५ जळ. ६ लाटा. ७ स्त्रीपुत्रादिकांविषयीं लोभ. ८ तटांस फोडून जाणारी नदी. ९ हे विषय विषयी जनांस व्यसन ह्म० दुःख देऊन मग विलयास जातात. १० शेवटीं. ११ स्तनाच्या मांसग्रंथीस सुवर्णाचे कलशाची उपमा देतात. १२ उत्तम कविही या अशा निंद्यरूपास असल्या उपमा देतो.

न जाणतां टोळ पडे हुताशीं, नेणोनियां मीनें गिळी गळासी।
अभिज्ञ आम्ही विषयासि जेव्हां, सांडूंच ना मोह बलिष्ठ तेव्हां ॥ १८ ॥
तृषा बाधतां स्वीकरी तोय पानें, क्षुधासंभवीं भक्षितो षड्रसानें।
अनंगानलें तप्त कांतेसि भोगी, भ्रमें औषधी मानितो सौख्य रोगी ॥ १९ ॥

मोठें मंदिर, पुत्र पंडित बरे, संपत्तिही फारसी
भार्या हे गुणशालिनी, वय नवें, मूढासि माया अशी।
मानी शाश्वत विश्व हें, पडतसे संसार[illegible]गृहीं
ज्ञानी [illegible] दृश्य मानुनि मनीं संन्यास घे सत्वरीं ॥ २० ॥

पोरें सदैव रडती क्षुधितें कृशांगें, स्त्री वस्त्र जर्जरित नेसुनि दीन वागे।
पाहोनि दुःख घरिंचें जठरार्थ कैसें, देहीति[4] गद्गदरवें वदिजे प्रयासें ॥ २१ ॥

अभिमतजनमानग्रंथिकेतें हरीतें
गुण कमल तयाला कौमुदीप्राय होतें।
अति विपुल सुलज्जा वल्लिकेची कुठारी
जठरपिठरिका हे दुर्दशेतें न भारी ॥ २२ ॥

जेथें श्रोत्रियं पुण्यशील वसती सद्विप्र गंगातटीं
त्या ग्रामीं अथवा वनीं निजसुखें राहोनि निःसंकटीं।
हातीं खर्पर घेउनी मधुकरी मागोनि जो भक्षितो
लोकीं तोच सुखी तदानन जळो जो दीनता भोगितो ॥ २३ ॥

गंगेनें स्वतरंग सुंदरकणीं जीं भोंवतीं शिंपिलीं
जीं का चारुशिलातळीं वसुनिया विद्याधरीं सेविलीं।
स्थानें काय हिमाद्रिचीं क्षयदशा तीं सर्वही पावलीं
कीं पोटें अपमानपूर्वक नरीं अन्यालयीं पोशिलीं ॥ २४ ॥

ते कंदें[11] काय अवघेचि गळोनि गेले, किंवा प्रवाह नदिचे अति शुष्क झाले।
कीं वाणि[12] आजि विपिनीं तरुवल्कलांचीं, कां पाहताति वदनें[13] न कळे खळांचीं २५
नेसूं तृणें[14] कंदफळेंचि खाऊं, शय्यामही चाल वनासि जाऊं।

---

१ अग्नींत. २ मासा. ३ ज्ञानी हा सर्वदृश्य वस्तु नश्वर आहेत असें जाणून संसारांत पडत नाहीं तर संन्यास घेतां क्ष० त्यांचा त्याग करतो. ४ ' पोटास दे' असे शब्द कष्टानें बोलावे लागतात. ५ दुःखानें कंठ भरून. ६ कुलीन पुरुषाचा मानभंग करणारी. ७ कुऱ्हाड. ८ उदर हाच खळगा. ९ वेदवेत्ते ब्राह्मण. १० खापर; मातीचें भांडें. ११ रानांत कंदमूळें मिळत नाहींत काय? १२ तोटा. १३ मग चरितार्थासाठीं लोक खळांच्या तोंडाकडे कां पाहतात न कळे. १४ वल्कलें.

तेथें पहा क्षुद्र धनेश्वरांची, वार्ता न कानीं पडणार साची ॥ २६ ॥
फळें श्रमावांचुनि भूरुहांचीं, पदोपदीं शीत जलें नदीचीं ।
असोनियां कोमलपत्रशय्या, द्वारीं प्रभूच्या श्रमतावि कांया ॥ २७ ॥
होतीं वासर दीर्घ जे धनपतिद्वारीं तयां प्रार्थितां
नाना सौख्यभरें क्षणोपम मला जे लोटले नेणतां ।
निःसंगत्वपणें धरूनि बसलों हे पर्वताची गुहा
आतां त्या दिवसांसि हांसत असें ध्यानावसानीं पहा ॥ २८ ॥
दैन्याला घसरी सुखास पसरी भ्रांतीस जे संहरी
मात्सर्यास करी पराङ्मुख वैरी दे लाभ चिंताशिरीं ।
झोळी शीघ्र भरी, सुपावन करी, तोषास दे अंतरीं
शंभूची निज सोइरी मधुकरी ते सेव्य योगीश्वरीं ॥ २९ ॥
मृत्यूनें जननास, वार्धकपणें कीं यौवना रोखिलें
लोभें आक्रमिली स्वतुष्टि, वनितामोहें शमा व्यापिलें ।
मात्सर्यें सुगुणा, वना फणिकुलें, पृथ्वीपतीला खलें,
अस्थैर्यें विभवास, सांग कवणें कोणास न ग्रासिलें ॥ ३० ॥
आरोग्यातें ग्रासिलें सर्व रोगें, लक्ष्मीतें ते धांवती क्लेश वेगें ।
होतां प्राणी पाठिशीं मृत्यु लागे, देवें केलें कोणतें स्वस्थ सांगें ॥ ३१ ॥
सौदामिनीस्फुरणचंचल भोग सारे, आयुष्य वायुविहताभ्रजलापरी रे ।
ऐशी जनस्थिति मनीं समजूनि वेगीं, हे बुद्धि निश्चल करीं शुभ योगमार्गीं ३२
हें आयुष्य तरंगतुल्य युवता कीं दों दिसांची असे
हे तों अर्थ अनर्थ, वीज चमके जे भोग तेही तसे ।
कांतेचें परिरंभणें स्थिर नसे टाका म्हणी हें पिसें
ब्रह्मीं चित्त धरा भवांबुधि तरा हें आयका सौरसें ॥ ३३ ॥
कष्टें वेष्टित पोटीं करुनि वसतसे सर्वही आंग गोळा
तारुण्यीं हेचि चिंता अनवरत मरे कीं दुरावे न बोला ।

---

१ झाडांचीं. २ जे दिवस धनवानांची हांजी हांजी करितांना कंटाळवाण्यासारखे अतिदीर्घ झाले. ३ भिक्षा. ४ जन्माच्या पाठीस मृत्यु लागलाच आहे. ५ स्त्रीमोह. ६ सर्पांनीं. ७ अस्थिरता; अशाश्वतता. ८ विजेच्या चमकण्याप्रमाणें अस्थिर. ९ वाऱ्यानें उडविलेल्या मेघजलाप्रमाणें. १० लाटांप्रमाणें चंचल. ११ यौवन. १२ आलिंगन. १३ वेड. १४ सुशोभित. १५ स्त्री.

काठी घेऊनि जातां चरमवयपणीं हांसती नीर[2]जाक्षी
संसारीं रे सुखाचा लव मज न दिसे तूंच चित्तीं निरीक्षीं[3] ॥३४॥
व्याघ्रीपरी भय करीत उभी जरा रे, देहासि रोग करिती रिपुतुल्य सारे ।
आयुष्य भिन्नघटनीर सरे तसें हें, पापें तथापि जन आचरताति पाहें ॥३५॥
हे नानाविध भोग भंगुर वृथा तन्मूल संसार रे
कां मूढा भ्रमसी तदर्थ सहसा हें सर्व आतां पुरे ।
आशापाशशतासि टाकिं परतें कामासही हो भला
हा अस्मद्वचनार्थ रे जरि तुला आहे खरा मानला ॥ ३६ ॥
ब्रह्मादि सौख्यें तृणरूप भासती, हे अन्य राज्यादिक भोग ते किती ।
कोणी महाभोग असा असे रते, तेथेंच तूं टाकुनि हें अशाश्वतें ॥ ३७ ॥
गेला तो नृप ते प्रधान अवघे ते पंडितांची सभा
गेली ते नगरी तशा शशिमुखी ज्या तप्तहेमप्रभा ।
गेला तो नृपपुत्र त्या शुभकथा ज्यां देखिलें सर्व जें
तें जेणें स्मरणास योग्य रचिलें कालासि त्या वंदिजे ॥ ३८ ॥
जेथें एक अनेक तेथ मिळती स्वाऱ्या तयांच्या तुटी
होतां एक उरे सर्वेचि मरती तेही नुरे शेवटीं ।
फांसे रात्रिदिनाख्य झेलित पहा तो काळ खेळे असे
प्राण्यांचीच करूनियां भवगृहीं ते सोंकटीं चौरसें ॥ ३९ ॥
गतीनें सूर्याच्या पलपलपणें माप भरतें
नसे व्यासंगानें दिवसरजनी ज्ञान पुरतें ।
जगीं पाहे दुःखें विविध नुपजे त्रासहि जरा
कशी या लोकाला बहुत चढली मोहमदिरा ॥ ४० ॥
येतो वासर तोच तेच रजनी, व्यापार नानापरी
प्राणी हे करिताति, आयु सरतें हें नेणवे अंतरीं ।

---

१ म्हातारपणीं. २ कमलाप्रमाणें नेत्र ज्यांचे अशा तरुण स्त्रिया. ३ नीट पहा. ४ म्हातारपण. ५ फुटलेल्या घड्यांतील पाण्यासारखें. ६ तप्तसुवर्णाप्रमाणें ज्यांची कांति अशा शशिमुखी ललना. ७ ज्या घरांत एक मनुष्य होता तेथें अनेक झाले. ८ तोटा; कमीपणा. ९ दिवस व रात्र हे दोन फांसे घेऊन व प्राणी ह्याच सोंकट्या संसाराच्या पटांतील घरांत लावून काळ खेळत असतो.

तुच्छें चर्वितचर्वणोपेम सुखें जीं तींच तीं भोगितां
संसारीं विकृति प्रसंग नुपजे हे कोण निर्लज्जता ॥ ४१ ॥
संसाराब्धि तरावया हरपदा चित्तीं न म्यां चिंतिलें
स्वर्गद्वारकपाटभेदक न तें सत्कर्म संपादिलें ।
स्वप्नीं ही कुचभारभंगुरकटी नालिंगिली सुंदरी
. झालों कीं निजमातृयौवनवनच्छेदीं कुठारा परी ॥ ४२ ॥
विद्या जे मतवादिवृंददमनी तेही न संपादिली
स्वर्गातें गजकुंभ भेदुनि न कीं सत्कीर्तिही धाडिली ।
कांताकोमलपल्लवाधर न तो चंद्रोदयीं सेविला
गेलें हें वय दीप निष्फल जसा शून्यालयीं लाविला ॥ ४३ ॥
नाहीं वित्त उपार्जिलें प्रखरशी विद्या न संपादिली
अंबातातपदद्वयें दृढमनें तींही न म्यां सेविलीं ।
स्वप्नींही मृगलोचना शशिमुखी नालिंगिली सुंदरी
नेला काळ परान्नलोलुपपणें म्यां वायसाचे परी ॥ ४४ ॥
झालों जयांपासुनि ते निमाले, ते आमुचे तुल्यवयस्क गेले ।
आह्मी असों सांप्रत जाण तैसे, नदीतटीं जर्जर वृक्ष जैसे ॥ ४५ ॥
आयुष्य वर्षशत त्यांत निमें निजेलें, त्याही निमेंतहि निमें दिन बाई झाले ।
वार्धक्य शैशवपणें, उरलें वियोगें, दुःखामयेंचि सरलें, सुख काय सांगें ४६
एकदां तरुण बाल एकदां, भाग्यवंतहि अभाग्य एकदां ।
एकदां जरठ जाय सत्वरी, धर्मराजसदना नटापरी ॥ ४७ ॥
तूं राजा जरि, मी श्रुतिस्मृतिमहाविद्याभिमानी असें
भाग्यें विश्रुत तूं, मदीय कविता सत्कीर्ति लोकीं वसे ।
आहे अंतर फार तूज मज रे तूं गर्व जें दाविशी
मीही निस्पृह भाग्यवंत गगना नाहीं मला फारशी ॥ ४८ ॥
अशीन तृण पशूला भक्ष्य वायू फणीला
अतिसुलभ विधीनें जीवनोपाय केला ।

---

१ तींच तींच सुखें पुनःपुनः भोगिलीं असतां. २ वीट, कंटाळा "न तिरस्कुरुते उपजते" असाही पाठ आहे ३ जेणेंकरून मला स्वर्गाचें द्वार खुलें होईल असें सत्कर्म. ४ कुचभारानें वांकली आहे कटि जिची. ५ कुऱ्हाड. ६ मतवादी लोकांस जिंकील अशी. ७ युद्धांत हत्तीचीं गंडस्थळें भेदून. ८ मातापितर. ९ मेले. १० सोबती. ११ झोपेंत गेलें. १२ जरा. १३ दुःख आणि रोग यांनीं. १४ म्हातारा. १५ यम. १६ प्रसिद्ध. १७ भक्ष्य.

इहपरंगतिविवेके त्यांस हे वृत्ति केली
उदरभरणदुःखें सर्वविद्या बुडाली ॥ ४९ ॥
गगनीं रजनीस शशी विलसे, दिवसा रवि त्या स्थलिं मांदतसे ।
उदयास्त अशांस न है चुकती, स्थिर मानितसे जन हा कुमती ॥५०॥
काणे रोड विपुच्छकर्ण दुबळे पोटाविणें लंगडे
अंगीं घाव तयांत पू अणि किडे हेंही असो थेरडें ।
ऐसें श्वान चढे शुनीवरि गळा ज्या कांठमोरा असे
मेल्यातें स्मर मारितो रगडुनी बेट्यास लज्जा नसे ॥ ५१ ॥
असतां वनीं शुभ फळें अशनाला, जल शीत निर्मल तृषोपशमाला ।
तरुवल्कलें असुनियां वसनाला, वद कोण सोशिल मदांधमदाला ॥ ५२ ॥
विपुल हृदय ज्यांचें निर्मिलें विश्व तींहीं
निजशिरिं हि परांहीं वाहिलें सर्व पाहीं ।
तृणसम दिधलें हें विश्व जिंतूनि एकीं
कितिक असति भोक्ते गर्व कां क्षुद्रलोकीं ॥ ५३ ॥
गेले जिला भोगुनि भूप सारे, त्या भूमिलाभें तुज गर्व कां रे ।
हेंही असो एक धरूनि खेडें, कां मातले हे बहुसाल वेडे ॥ ५४ ॥
गोळा असे जो अणु मृत्तिकेचा, जयास वेढा पडला जलाचा ।
भांडूनियां भोगिति जे तयातें, धिक् त्यांस कीं मागति जे अशांतें॥५५॥
आह्मी नसों गायक भाट भांड, किंवा नसों दुर्जनही प्रचंड ।
आह्मी नसों कीं प्रमदा वरी तों, भेटोंवया कोण नृपास होतों ॥ ५६ ॥
झाला असाही सुकृती जयाचें, कपाल तें भूषण शंकराचें ।
लोकीं मला कीं प्रणिपात केला, ह्मणूनि कां गर्व नराधमाला ॥ ५७ ॥
खाऊनि राहूं सुखरूप भिक्षा, करूं दिशांवस्त्र पहा परीक्षा ।
निजूं सुखें भूमितळींच सेजे, भूपाल त्यां सेवुनि काय कीजे ॥ ५८ ॥

---

१ इहलोक व परलोक साधण्याची ज्यांना बुद्धि आहे अशांस. २ जीवनोपाय. ३ सर्व कौशल्य सरलें. ४ शेपूट व कान तुटला आहे ज्याचा. ५ कुत्री. ६ ज्याच्या गळ्यांत खापर अडकलें आहे. ७ तहान भागविण्यास. ८ गर्विष्ठ धनिकांच्या मदाला. ९ दुसऱ्यांनीं. १० हे एका खेड्याचे जहागीरदार. ११ पृथ्वी ह्मणजे विश्वाच्या मानानें एक मातीचा लहानसा गोळा. १२ समुद्राचा. १३ लढाई करून. १४ अशा क्षुद्र राजापाशीं जे याचना करितात त्यांस धिक्कार असो. १५ सारांश असल्या लोकांपैंच राजद्वारीं तेज. १६ नग्नही राहूं.

धनपति जरि तूं रे मी असें शास्त्रवेत्ता
भेट समरिं जरी तूं मी महावादि जेता ।
अनुचर जरि तूंतें सेविती छात्र मातें
न गणसि मज जातों तुच्छ मानूनि तूतें ॥ ५९ ॥
जधीं कांहीं कांहीं 'हरि, कवि' असे शब्द शिकलों ।
तधीं मी सर्वज्ञ द्विपसम मदें याच भरलों ।
जधीं कांहीं नेणें ह्मणुनि वदले पंडित मला
तदा माझा गर्वज्वर सकलही हा उतरला ॥ ६० ॥
गेला मान जनांत भाग्य सरलें भृत्यादिकीं सोडिलें
झाले याचकही पराङ्मुख वरीं, तारुण्यही लोटलें ।
सुज्ञांहीं मग युक्त हेंचि करणें कीं जंन्हुकन्यातटीं
सेवावा बरवा निकुंज गिरिचा किंवा गुहा गोमटी ॥ ६१ ॥
संतुष्ट लोकांस करावयासी, कां रे मना तूं तरि खिन्न होसी ।
प्रसन्न चिंतामणि तूंचि जेव्हां, होसी तुला वाण नसेचि तेव्हां ॥ ६२ ॥
भेटावें तरि हा नसे समय हो अंतःपुरीं तो वसे
आहे निद्रित अश्व पाहत असे स्वारीस गेला असे ।
आतां क्रुद्ध ह्मणूनि भृत्य वदती टाकीं तया दुर्जना
मुक्तद्वार महेशमंदिर सुखें जाऊनि सेवीं मना ॥ ६३ ॥
नदीतटाकीं तप आचरावें, कीं सद्वधूभोगभरीं भरावें ।
कीं शास्त्रकाव्यामृतसार पीजे, आयुष्य थोडें बहु काय कीजे ॥६४॥
सर्प हार रिपु बंधु सोइरे, पुष्पतुल्य अणि मृत्तिका हिरे ।
साम्यदृष्टि मज हो पडो तनू, चिंतितां 'शिवशिवेति' हा मनू ॥६५॥
हिमाचल शिलेवरी सुरनदीतटीं बैसुनी
त्यजूनि जनसंगती सुदृढबंध पद्मासनीं ।
सुखें करुनि डोलतां प्रचुर योगनिद्राभरें
कधीं डवचिती मला हरिणपोत शृंगांकुरें ॥ ६६ ॥

१ बोद्धा. २ मोठ्या वाद्यास जिंकणारा. ३ शिष्य. ४ 'हरि, कवि' इत्यादि रूपावळींतील कांहीं शब्द. ५ मी विद्वान् ह्मणून हत्तीसारखा मदांध झालों. ६ योग्य. ७ भागीरथीच्या कांठीं ८ गुंफा. ९ सुंदर. १० सारांश मन संतुष्ट आहे तर त्याला कशाचा तोटा? ११ शंकराचे मंदिरांत त्या दुर्जन प्रभूच्या घराप्रमाणें जाण्यास प्रतिबंध कधींच नाहीं. १२ एक प्रकारचें आसन आहे. १३ हरिणाचीं बाळकें. १४ शिंगाच्या टोकांनीं.

जें चंद्रिकेनें अतिशुभ्र हो तें, भागीरथीचें तट रम्य तेथें ।
सानंद बैसोनि कधीं शिवातें, स्मरेन संसारभयार्तचित्तें ॥ ६७॥

स्वर्गापासुनि शर्वमस्तकतटीं तेथूनिया भूधरीं
ग्रावाग्राहुनि भूतलीं उतरली ते स्वर्णदी सत्वरी ।
गेली तेथुनि अर्णवाप्रति मर्दे ते वंचकी कष्टली
जे कां दुर्मद त्यां अधःपतनता आहे बरी निर्मिली ॥ ६८ ॥

या संसारीं फिरत फिरतां फार म्यां शोध केला
ऐसा नाहीं पुरुष विषय श्रोत्रनेत्रांस झाला ।
जो कां ज्ञाता विषयकरिणी भोगितां घे मदाला
जेणें अंतःकरणगज तो संयमें रुद्ध केला ॥ ६९ ॥

सर्वस्वदान सुखरूप करूनि हातें, हें सौख्य नश्वर असें समजोनि चित्तें ।
जें चंद्रिकाधवल पुण्य अरण्य ऐसें, तेथें बसोनि शिव चिंतिन कैं विलासें ॥

लक्ष्मीनें जरि तुष्ट तूं, बहुसुखी मी वल्कलानें असें
दोघांचा परितोष तुल्य असतां आधिक्य कांहीं नसे ।
आशा ज्यास दरिद्र तोचि समजे नैराश्य पैं वाणतां
भाग्याचा नर कोणता मग बरें निर्भाग्य तो कोणता ॥ ७१ ॥

स्वेच्छाविहार सहवास महाभल्यांचा, मिष्टान्नभुक्ति अणि निग्रहही मनाचा ।
लोकोपकारक धुरंधरभाव साचा, हा घोर जाण परिपाक महा तपाचा ॥ ७२ ॥

ज्यांचें पात्र पवित्र पाणियुग हें भिक्षान्न जे भक्षिती
ज्यांचें वस्त्र दिशा, जया मळें नसे, शय्या जयांची क्षिती ।
ज्यांला दैन्य नसे, विरक्ति वनिता, जे तोसवें नांदती
ज्यांला कर्मकलाप बाधित नसे ते धन्य येणे रिती ॥ ७३ ॥

कोण सेवन करील तयांचें, अश्वतुल्य चल चित्त जयांचें ।
देह तो न अजरामर पाहीं, सौख्य यास्तव तपाविण नाहीं ॥ ७४॥
चांडाल कीं ब्राह्मण शूद्र कीं हा, योगीश कीं यापरिं लोक पाहा ।
वदे, जया हर्षविषाद नाहीं, निःसंग तो धन्य जनांत देही ॥ ७५ ॥

---

१ चांदण्यानें. २ शंकर. ३ पर्वतावर. ४ पर्वताच्या शिखरावरून. ५ भागीरथी. ६ समुद्रास. ७ पाहिला नाहीं किंवा ऐकला नाहीं. ८ विषयरूप हत्तीण. ९ बांधला. १० भोजन. ११ लोकोपकार करण्याविषयीं दृढनिश्चय. १२ फळ. १३ हाताची अंजुळी हें पाणी पिण्याचें पात्र. १४ पातक. १५ कर्मसमुदाय; अनेक कर्मांचें बंधन. १६ चंचल.

श्रम पावसी विषयरोनभरीनें, शुभ मार्ग दुःखकर सेविं सुखानें ।
धरिं शांततेस चपलत्व न घेईं, न पुनर्भवाप्रति मना मन देईं ॥ ७६ ॥

त्यातें तूं भजरे महापुरुष जे मोहासि संहारिती
निष्ठा सांबशिवीं धरीं सुरनदीतीरीं वसें संप्रति ।
लक्ष्मी सर्व तरंग बुद्बुद नदी सौदामिनी कामिनी
हे. माझी स्थिर राहती म्हणुनियां मानूं नये कीं मनीं ॥ ७७ ॥

पुढें गायनें सत्कवी पार्श्वभागीं, स्त्रिया ढाळिती चामरें सुंदरांगी ।
असें जें घडे तें वसें तूं भवीं या, सख्या अन्यथा सोडिं संसारमाया ७८

क्षणभंगुर संग टाकिं कामिनीचा, करिं मैत्री सहवास सज्जनांचा ।
जघन स्तनभार मांज सुंदरीचा, स्मरतां वास न चुके दुर्गतीचा ॥ ७९ ॥

हिंसात्याग अलोभता परधनीं सत्यत्व संभाषणीं
तृष्णाच्छेद परांगना विमुखता भूतानुकंपा मनीं ।
दान प्रश्रय भाव सद्गुरुकुलीं सन्मार्ग सर्वांस हा
संसाराब्धि तरावया स्मृतिशतीं कीं बोलिजेला पहा ॥ ८० ॥

पद्मे विलासपुरुषीं सुखरूप राहीं, मी त्यक्तभोग न तुझी मज चाड कांहीं ।
भक्षूनि भैक्ष्य शुभसक्तु पलाशपात्रीं, मी वर्ततों मज नसे रुचि भोगमात्रीं ॥

वनितासुख मंदिर गान बरें, वद हें न रुचे कवणास खरें ।
वसती विपिनींच परंतु मुनी, क्षणभंगुर हें समजोनि मनीं ॥ ८२ ॥

कल्पांताग्नि बळें सुमेरु गिरि जो होतो तसाही चुना
होती सागर शुष्क ते जलचरें ज्याची न संभावना ।
पृथ्वी जे धरिली महागिरिवरीं तेही बुडे अंतरीं
वार्ता काय कलेवरीं चपल जें मत्तेभकर्णापरी ॥ ८३ ॥

एकलाच करपात्र वागवा, शांत निस्पृह असा कधीं शिवा ।
सांग होइन खरा जसा पिसा, दक्ष कर्म दहनीं हुताशसा ॥ ८४ ॥

प्राप्त सर्व विभवें तरि काय, तोषिले स्वजनही तरि काय ।
कल्प आयुहि घडे तरि काय, भोगिलें सुख बहू तरि काय ॥ ८५ ॥

---

१ विषयाटवीत घिरल्यानें. २ शंकर आणि अंबा म्ह॰ पार्वती यांचे ठिकाणीं. ३ बुडबुडे. ४ वीज. ५ कंबर. ६ विनय. ७ अनेक स्मृतींत; अनेक शास्त्रांत. ८ सातु. ९ पळसाच्या पत्रावळीवर. १० मग शरीराची काय कथा. ११ मत्त हत्तींच्या कर्णाप्रमाणें चंचल असें हें कलेवर. १२ अग्नीसारखा.

महादेवीं निष्ठा जननमरणाचें भय सदा
नसे बंधुस्नेह स्मरकृतविकारादि न कदा ।
वनीं राहे संगा त्यजुनि धन वैराग्य पदरीं
न मागावी ऐसी मज दिसतसे अद्भुत परी ॥ ८६ ॥
तें ब्रह्म यास्तव अनश्वर पूर्ण बापा, सेवीं उगाचि करशील कुतर्क कां पा ।
तत्सौख्यलेशलवगर्भित भोग यां हे, ज्याकारणें विषय लोलुप गुंतले हे ॥८७
आकाश पाताल दिशा समस्ता, कां हिंडसी व्याप धरूनि नेस्ता ।
चिंतीं परब्रह्म मना न धांवें, जेणें तुला तुष्ट यथेष्ट फावे ॥ ८८ ॥
शय्या मही, भुजउशी, नभ चांदवारे, शीतांशु दीप विजणें अनुकूल वारे ।
शांत्यंगनेसं शयनीं सुखरूप भोगी, राजापरी निजतसे यति तो विरागी ८९
पुरे पुराणें स्मृतिवेदशास्त्रें, आमुष्मिकें वैदिक कर्मतंत्रें ।
जेणें सरे हा भव तें विचारीं, या वेगळी सर्व दुकानदारी ॥ ९० ॥
ब्रह्मांड तों केवळ तुच्छ पाहें, ज्ञानी तया काय करूं शके हें ।
हाले जळीं फारहि मीनराणा, कीं धाकला अब्धि मनास आणा ॥९१॥
जैं व्यापिली कामतमें स्वदृष्टी, तैं देखिली स्त्रीमय सर्व सृष्टी ।
आतां विवेकांजन अंजितां हें, सर्वत्र मी चिन्मय रूप पाहें ॥ ९२ ॥
चंद्राची द्युति रम्य, जे तृणवती ते रम्य कीं भूमिका
साधूंचा सहवास रम्य, कविच्या उक्ती मनोवेधका ।
कांतेचें मुख रम्य जें नेत्रशिलें कोपाश्रुबिंदूत्करें
तेव्हां रम्य वसेचि कीं किमपिरे हें चित्त जेव्हां मुरे ॥ ९३॥
स्वेच्छाविहार गतसंग महातपस्वी, भिक्षान्नभक्षक विरक्त असा मनस्वी ।
कंथैक वस्त्र निरहंकृति जो सुखी तो, टाकूनि भोग शमसौख्य मनीं वरीतो ९४
माते मेदिनि, मारुतीं स्वजनका, तेजा सख्या सोदरा
तोया आणि नभा तुम्हां नमितसें जोडूनि भावें करां ।
जालें ज्ञान भव स्तव मला आतां पहा सत्वरी
ब्रह्मीं मी मिळतों जलीं समरसें वर्षोपलांचे परी ॥ ९५ ॥
जों हे स्वस्थ तनू, जरा त्रसतसे जों दूर, जों इंद्रियें
शक्तें, कीं सरलें न आयु पुरतें जों, पंडितानें स्वयें ।

१ नाहीं तसला व्याप. २ चंद्र हाच दीप. ३ पंखा. ४ शांतिरूप पत्नी. ५ इह लोकचीं. ६ मासा. ७ विवेकरूप अंजन डोळ्यांत घातल्या बरोबर. ८ ब्रह्म भरलेलें. ९ व्यास झालें. १० हे पित्या वायो. ११ गारा. १२ जोंपर्यंत इंद्रियें सशक्त आहेत.

आत्मप्राप्तिसुखार्थ यत्न करणें कीं तोंच हीं फारसा
होतां मंदिर दीप्त कूपखननीं उद्योग तो कायसा ॥ ९६ ॥
जाले जीर्ण मनीं मनोरथ पहा मी वंचलों यौवना
होते जे गुण सर्वही विफल ते जाले गुणज्ञाविना ।
युक्तायुक्त विचार काल न करी निःशंक सर्वात्मना
आतां हें सुचलें दुजी गति नसे गौरीशपायांविना ॥ ९७ ॥

॥ इति वैराग्यशतक समाप्त ॥

---

## भूगोलवर्णन.

### ( कथेचा सारांश. )

श्रीमद्भागवत पंचमस्कंध, अध्याय १६ यांत भूगोलाचें जें वर्णन केलें आहे, त्या मताप्रमाणें हें वामन पंडितानीं वर्णन दिलें आहे. यांत पृथ्वीचा आकार कमलाप्रमाणें आहे व त्यांत सप्तद्वीपें आहेत असें मानिलें आहे. या सप्तद्वीपांचे मध्यभागीं जम्बुद्वीप मुख्य आहे. त्याचा विस्तार एक लक्ष योजनें असून तें क्षार समुद्रानें वेष्टित आहे. यांत नवखंड व आठ मर्यादाचल आहेत. सर्वांच्या मध्यें इलावृत आहे व त्याच्या नाभिभागीं कर्णिकाकार मेरुपर्वत लक्षयोजनें पसरला आहे. इलावृताच्या उत्तरेस नील, श्वेत, व शृंगवान् असे तीन पर्वत आहेत ते रम्यक हिरण्मय व कुरु वर्ष या खंडांच्या मर्यादा होत. दक्षिणेस निषध, हेमकूट व हिमालय हे पर्वत असून ते हरिवर्ष व किंपुरुष आणि भारत यांच्या मर्यादा झाले आहेत. पूर्वेस गंधमादन पर्वत भद्राश्व याची मर्यादा झाला आहे. व पश्चिमेस माल्यवान केतुमाल खंडाची सीमा होय. असे नवखंड व आठ मर्यादाचल झाले. मेरुपर्वताच्या चारी दिशांस मंदर, सुमंदर सुपार्श्व, व कुमुद असे द्वीप आहेत.

आत्मा हेम[४] जसें तसा स्थिर-चरीं नाना नगीं[५] संचला
हें नेणे नुसतें सुवर्ण वळखे आत्मत्व तो वंचला[६] ।
एवं जो भगवंत विश्व अवघें वंदूनियां त्यास मी
हा भूगोल तरंग वर्णित असें त्या चित्समुद्रीं समीं ॥ १ ॥
सहस्र-पत्राब्जें[७] तशी धरा हे, तत्कर्णिका होउनि मेरु राहे ॥
द्वीपाचिया सिंधुचिया जळाच्या, पंक्ति तयाच्याच जशा दळाच्या ॥२॥

---

१ आग लागल्यावर विहीर खणूं लागलें तर काय उपयोग. २ सर्वथा. ३ शंकराचे चरणावांचून. ४ सोनें. ५ अलंकारांत. ६ फसला. ७ कमल.

कोटापुढें खंदक खंदकाशीं, पुढें दुजा कोटचि जेंवि कांहीं ।
द्वीपापुढें सागर सागराशी, द्वीप क्रमें त्यासहि वारिराशी ॥ ३ ॥
अशी योजनें भूमि पन्नास कोटी, मधें मंडलाकार हे मध्य कोटी ।
पुढें कंकणाकार सर्वा धरा हो, तसे सिंधुही हा मनीं बोध राहो ॥ ४ ॥

अशीं सप्त द्वीपें क्षितिवरि मधें त्यांत मिरवे
वरी जंबुद्वीपें क्षिति नवचि ते भाग बरवे ।
तयांमध्यें मेरु तळिंहुनिहि जो रुंद वरता
उभा गांवें लक्षप्रमित ह्मणती वेद पुरता ॥ ५ ॥

॥ ओव्या ॥ मेरुस दक्षिणदिशे । निषध नाम पर्वत असे । नीलाद्रि उत्तरे वसे । माल्यवान पश्चिमेसी ॥ ६ ॥ पूर्वेसी गंधमादन । समुद्रपर्यंत यापासून । भूमी भद्राश्व ह्मणून । ह्मणवी खंड ॥ ७ ॥ पश्चिमे माल्यवान पर्वत । त्यापासून समुद्रपर्यंत । केतुमाल ह्मणोनी विख्यात । तिसरें खंड ॥८॥ पूर्व पश्चिम समुद्र वरी । तीन खंडें यापरी । इलावृत चहूंकडे चारी । सीमा पर्वत ॥ ९ ॥ त्यास दक्षिणेस निषधगिरी । पूर्व पश्चिम समुद्र-वरी । दक्षिणे जातां आडवा परी । पूर्वपश्चिम तो नीट ॥ १० ॥ त्यासही दक्षिण दिशे । हेमकूट पर्वत असे । या दोहींमध्यें खंड वसे । हरिवर्ष ह्मणूनी ॥ ११ ॥ हेमकूट पुढें पर्वत । दक्षिणेस उभय सिंधूंपर्यंत । या दों गिरींमध्यें विख्यात । किंपुरुष खंड ॥ १२ ॥ हिमाचल दक्षिण दिशे । समुद्रवरी पृथ्वी असे । तेथें हें भरत खंड वसे । कर्मभूमी ॥ १३ ॥ एवं पूर्व पश्चिम दोन्ही । मध्यें एक दक्षिण तिन्ही । मेरु भोंवतीं खंडें नेमुनी । सांगितलीं सहाच ॥ १४ ॥ आतां मेरू भोंवतें इलावृत । त्यास उत्तरे नीलपर्वत । त्याही पुढें नामें श्वेत । गिरि आडवा उत्तरे ॥ १५ ॥ या दों पर्वतांभीतरी । पूर्वपश्चिम समुद्रवरी । रम्यक खंड तया वैखरी । बोले मुनींची ॥ १६ ॥ यासही उत्तर दिशे । शृंगवान् पर्वत तैसाच असे । तेथपर्यंत वसे । हिरण्मय खंड ॥ १७ ॥ तेथून उत्तरे समुद्रवरी । उत्तर-कुरुखंड यापरी । एवं नवखंड कुसरी । जंबुद्वीपाची ॥ १८ ॥

॥ श्लोक ॥ मधें मेरु त्याभोंवती भू अखंड, गिरी चौंत दावी इलावृत्त खंड ।
तया मध्यखंडास जे पूर्वभागीं, तया नाम भद्राश्व पृथ्वीविभागीं ॥ १९ ॥
इलावृत्ताहूनि हि पूर्वभागीं, तें खंड भद्राश्व धरा विभागीं ।
जें पश्चिमे तें तरि केतुमाल, या दोंसही सागर युग्ममाळ ॥ २० ॥

---

१ समुद्र. २ लक्षयोजन. ३ वापी. ४ व्यास.

घनाक्षरी–लोक अतळे वितळ, तयातळीं ही सुतळ ।
तळातळ महातळ, एक एका खालते ॥
तया खालें रसातळ, तया खालेंही पाताळ ।
तया तळीं महा व्याळ, व्यास वाणी बोलते ॥
भूमीवरी भुवर्लोक, स्वर्गावरी महर्लोक ।
जनतपसत्य लोक, एक एका वरते ॥
ब्रह्मांड हें विवरण, वरी वरी आवरण ।
पुढें वामनचरण, सत्त्व तेंची करतें ॥ २१ ॥
कोटि योजन पन्नास, अंड कोटीचा विन्यास ।
सांगितलासे धन्यास, राजयासी श्रीशुकें ॥
मध्यें भुगोलाचें स्थळ, मेरु सोन्याचा अढळ ।
तया भोंवते अंचळ, असंख्यात कौतुकें ॥
कर्णिका सहस्र दळीं, तसा मेरू भूमंडळीं ।
जैशा केशराच्या वळी, हेमगिरी शतकें ॥
मेरूभोंवतें भूतळ, जैसें वर्तुळ कमळ ।
जंबुद्वीप तें केवळ, लांब रुंद तितुकें ॥ २२ ॥
लक्ष योजनें विशाळ, मेरु सोन्याचा सुढाळ ।
जंबुद्वीप भूमी माळ, भोंवतीं त्या पर्वत ॥
सोळा सहस्र योजन मेरू, भूमींत निमग्न जैसें धेंतुरू ।
सुमन रुंद जों जों वरू, द्विगुण सहस्र योजनें ॥
तया भोंवती ते धरा, तोची जंबुद्वीप खरा ।
लांबी रुंदीनें जो बारा, लक्ष गांवें पुरता ॥
तया वेष्टण कंकण, सिंधुनामें जो लवण ।
स्वयें वर्तुळ आपण, लक्षगांव पुरता ॥ २३ ॥
जंबुद्वीप हा अखंड, नद्या पर्वत उदंड ।
त्याही मध्यें नवखंड, भूमंडळ वर्णिती ।
मध्यें मेरू हा पर्वत, तेथें खंड इलावृत्त ।
दोन्ही समुद्रपर्यंत, दोन्हीकडे असती ॥

---

१ अतळ, वितळ, इत्यादि सप्तपाताळ लोकांचीं नांवें. २ शेष. ३ भूवर् स्वर् इत्यादि सप्त ऊर्ध्वलोक एकून चतुर्दश लोक झाले. ४ परिक्षितीराजास. ५ पर्वत. ६ धोतऱ्याचें फूल. ७ योजनें. ८ क्षारसमुद्र.

तीन खंडें दक्षिणेस, तीन खंडें उत्तरेस ।
शेवटील दोन्ही जैशा, धनुष्याच्या आकृती ॥
सिंधु उत्तर दक्षिण, दोन्ही धनुष्य लक्षण ।
सीमा पर्वतांचे गण, दोही अंतीं ये रीती ॥ २४ ॥
सिंधु नामें जो लवण, पूर्व पश्चिम दक्षिण ।
हिमाचल तो आपण, गिरिराज उत्तरे ॥
तें हें भरतानें खंड, पुण्य सद्गति उदंड ।
येथें प्राणी लंड भंड, तेचि नरकीं खरे ॥
येथें करिती जे पाप, तया नरकीं संताप ।
जों जों पुण्याचा प्रताप, तों तों लोकही बरे ॥
येथीलचि पुण्यफळ, द्वीपें खंडें हें सकळ ।
स्वर्ग अतळ वितळ, तेथुनीच हे सारे ॥ २८ ॥
चित्तशुद्धीनें चिद्भक्ति, हरिभक्तीनें विरक्ति ।
भक्तिविरक्तीनें मुक्ति, ऐसें शास्त्रें बोलती ।
पाक ज्ञानाचा न ज्यास, सत्यलोकीं तया वास ।
तेथें करूनी अभ्यास, अंतीं मोक्ष पावती ॥
मोक्ष अन्यत्रही परी, तेथें ज्ञान होय जरी ।
मोक्षप्रदत्वही तरी, याच खंडीं साधिती ॥
ज्ञानाविण चित्तशुद्धि, तेणें जन्मांतरीं सिद्धी ।
आत्मतत्त्वज्ञान बुद्धि, याच भूमीवरती ॥ २६ ॥
लक्ष योजनें समुद्र, खोल तितकाच रुंद ।
लंकादिक द्वीपवृंद, त्याचि मध्यें वर्णिती ॥
पुढें द्वीप नामें लक्ष, तेथें प्लक्षनामें लक्ष ।
रुंदीनें तो दोन लक्ष, लांब कंकणाकृती ॥
रस उसाचा केवळ, तैसें सागराचें जल ।
त्यानें द्वीप तें केवळ, वेष्टिलें हो बोलती ॥
पुढें शाल्मली म्हणून, वृक्षनामेंचि करून ।
द्वीप तयाचें वेष्टन, महासागर असे ॥ २७ ॥
त्याही पुढें कुशद्वीप, कुशस्तंभ जेंवि दीप ।
ऐसें तेज तो सधीप, जाणों द्वीपांचा दिसे ॥
घृतसिंधूचें वेष्टन, त्याही पुढें विचक्षण ।

क्रौंच द्वीपाचें लक्षण । बोलताति हो ऐसें ॥
ज्यांत क्रौंच डोंगर । घेरा क्षीराचा सागर ।
जया क्षीराब्धींत वर । त्याचे कन्येचा असे ॥
क्षीरनिधी पुढें धाम । शाकद्वीप त्याचें नाम ।
शाकवृक्ष अभिराम । त्याचें नाम त्याप्रती ॥ २८ ॥
त्याही भोंवता तो अब्धी । त्याचें पाणी जाणों दधी ।
पुढें द्वीप ते अवधी । सातवें हें बोलती ॥
तया वेष्टन जें जळ । गोड सिंधूचें केवळ ।
त्याही पुढे तो अचळ । लोकालोक येरीती ॥
कीं ज्या भीतरीं हे लोक । जया बाहेरी आलोक ।
सूर्य चंद्र अवलोक । जयापुढें न असती ॥
ब्रह्मांडाचा मध्यभाग । भूमी त्याचा हा विभाग ।
जिला शिरीं शेषनाग । अहर्निशी वाहतो ॥ २९ ॥
वरी वरी सत्यलोक । ब्रह्मपद जे विशोक ।
लेखिता तें सत्यलोक । कटाहचि राहतो ॥
अंडकटाहाचें दळ । कोश दशगुण जळ ।
दशगुणचि अनळ । वायु पुढें वाहतसे ॥
नभ अहं महत्तत्त्व । दशदशगुणकत्व ।
साक्षीपुढें निर्गुणत्व । वामन हें पाहतो ॥ ३० ॥

॥ इति भूगोलवर्णन ॥

## ध्यानमाला.

### ( कथेचा सारांश )

सांख्य शास्त्रप्रणेता जो कपिल महामुनि याणें आपली माता देवहूति इजला आत्मज्ञानाचा बोध केला, तो श्रीमद्भागवत स्कंध ३ येथे सुविस्तर वर्णिला आहे. कपिलमुनि देवहूतीस योगाभ्यासाचा प्रकार सांगत असतां, योग्यानें आपलें चित्त ईश्वरस्वरूपी स्थिर केल्यावर ईश्वराच्या निरनिराळ्या अवयवांचें ध्यान कसें करावें हें अध्याय २८ श्लोक २१–३४ यांत दिलें आहे. त्या श्लोकांची वामनानीं समश्लोकी टीका केली आहे. तिजला ' ध्यानमाला ' ' भगवद्ध्यान ' किंवा ' ध्यान-

' १ पांत. २ लक्ष्मीचा. ३ समुद्र. ४ आंत ५ पाहा. ६ कडई.

स्तुति ' असें म्हटलें आहे. कित्येक पुस्तकांत 'कपिलस्तुति ' असेंही म्हटलें आहे. या श्लोकांवर वामन पंडितांनीं समश्लोकी केल्या आहेत.

वंदूनियां जलधिजापतिच्या पदांतें, वर्णीन त्या हरिचिया तनुसंपदांतें ।
बोले मुनी कपिल भागवतीं स्ववाचे, मातेस तेचि गुण गाइन केशवाचे १

श्लोक–संचिन्तयेद्भगवतश्चरणारविन्दं वज्राङ्कुशध्वजसरोरुहलाञ्छनाढ्यम् ।
उत्तुंगरक्तविलसन्नखचक्रवालज्योत्स्नाभिराहतमहद्धृदयान्धकारम् ॥ १ ॥

ध्यावें बरें हरिचिया पदपंकजातें, वज्रांऽकुशध्वजसरोरुह अंक ज्यातें ।
आरक्त वर्तुळ नखें हृदयीं प्रभा ते, नाशी अनादि तम सूर्य जसा प्रभातें १

दिव्य शशांक दशांगुलिकांवरि शोभति रम्य पदाब्जनखें,
आठवितां मनिं संत महत्तमें नामुनि उत्तम देति सुखें ।
लेश महत्त्वहि वर्णु म्हणे परि भागलिं शेषअशेषमुखें,
ध्यान असें बहु दान तपें जन मानसिं होय अनेक सुखें ॥ १ ॥

यच्छौचनिःसृतसरित्प्रवरोदकेन तीर्थेन मूर्ध्न्यधिकृतेन शिवः शिवोऽभूत् ।
ध्यातुर्मनःशमलशैलनिसृष्टवज्रं, ध्यायेच्चिरं भगवतश्चरणारविन्दम् ॥ २ ॥

प्रक्षालितां चरण ते शिव त्या जळाला, घेतां शिरीं गरळदाह निवे जळाला ।
माथां धरूनि शिवं तें शिवं नीर जाला, ध्यावें असें स्मरत त्या पदनीरजाला २

पादसरोज उरोजयुगावरि ठेवुनि सेवि सरोजभवा,
भृंग असंगमुनींद्र मनीं रस घेति जयांतिल नित्य नवा ।
ध्यानपरास निधान सुखप्रद विष्णुपरंपद जेथ जिवा,
अंबुजसंभव धौतपदाबुज जें चरणांबु किरीट शिवा ॥ २ ॥

जानुद्वयं जलजलोचनया जनन्या, लक्ष्म्याऽखिलस्य सुरवंदितया विधातुः ।
ऊर्वोर्निधाय करपल्लवरोचिषा यत् संलालितं हृदि विभोरभवस्य कुर्यात् ॥ ३ ॥

मांडीवरी चरणसुंदरपादपद्मा, पासूनि जानुवरि ठेवुनि नित्य पद्मा ।
प्रीतीकरूनि चुरिते जननी जनाची, माता विधीचिहि वधू भवभंजनाची ३

चित्त असें चरणद्वय चिंतुनि चिंतितसे वरि वर्तुळ घोंटे,
हाटकपीतपटीं कटि त्यावरि वेष्टित पुष्ट तनू मनिं वाटे ।

---

१ लक्ष्मीपतीच्या. २ चिन्ह. ३ सकाळीं. ४ चंद्र. ५ मोठा अंधकार. ६ उद्- काला. ७ विषदाह. ८ दग्ध झालेला. ९ महादेव. १० कल्याणदायक. ११ पदपं- कजाला. १२ स्तनयुग्म. १३ लक्ष्मी. १४ संगरहित मुनि हेच भृंग. १५ ध्यान- परायण. १६ कमलोद्भव ब्रह्मा त्याणें धुतलेल्या. चरणाचें तीर्थ. १७ लक्ष्मी. १८ ब्रह्मदेवाची. १९ कनकवर्णी.

विश्वसरोजसुनाभिसरोवरिं ज्यांत सरोरुहसंभव भेटे,
पोट सुरम्य वलित्रय ज्यावरि आंत जगत्त्रय कोटि न दाटे ॥ ३ ॥

ऊरू सुपर्णभुजयोरधिशोभमानावोजोनिधी अतसिकाकुसुमावभासौ ।
व्यालंबिपीतवरवाससि वर्तमानकांचीकलापपरिरंभि नितंबबिंबम् ॥

ज्या मांडिया खगभुजांवरि वर्तमाना, ज्या सांवळ्या अतसिकाकुसुमासमाना ।
पीतांबरावरि कटी अतिरम्य कांची, पंक्ती जिला मणिमया लघुघंटिकांची ॥४॥

श्रीप्रियमंदिर सुंदर तो उर शोभतसे सुविशालपणें,
केवळ जो करुणावरुणालय तो कमलालय याचि गुणें ।
करुं नये सम रम्य गळा परि सिंधुसुता निजबंधु तिणें,
आणुनियां समते ममतेस्तव सार्थक केलें तयाचें जिणें ॥ ४ ॥

नाभिह्रदं भुवनकोशगुहोदरस्थं, यत्रात्मयोनिधिषणाखिललोकपद्मम् ।
व्यूढं हरिन्मणिवृषस्तनयोरमुष्य ध्यायेद्द्वयं विशदहारमयूखगौरम् ॥ ५ ॥

नाभीह्रदीं कमळपुत्र विरंचि ज्यांत, त्रैलोक्य उद्भव जया जगदंबुजांत ।
विस्तीर्ण ऊरु नवयौवनभाव दावी, पाची स्तनीं उगवल्या असि भो वदावी ५

सायुध सुंदर बाहुचतुष्टय पुष्ट जसे करिचे कर ते,
जे भुज वीररसा अवलंबुनि लंबहि जानुंवरी पुरते ।
स्कंद सुरम्य न साम्य दिसे वृषें होति पशुत्वगुणें परते,
वक्ष अपूर्व वरी रविचे कर पूर्वगिरीशिखरावरते ॥ ५ ॥

वक्षोऽधिवासमृषभस्य महाविभूतेः, पुंसां मनोनयननिर्वृतिमादधानम् ।
कंठं च कौस्तुभमणेरधिभूषणार्थं, कुर्यान्मनस्यखिललोकनमस्कृतस्य ॥ ६ ॥

श्रीयुक्त वक्षकमळ त्या भवमोचनाचें, जें दे मनासि सुख वाढवि लोचनाचें ।
ध्यावें चराऽचरनमस्कृतकंधरातें, जो कौस्तुभा मिरवितो अति सुंदरातें ॥६॥

श्रीमुख तें सुखनीरसरोरुह ज्या वदनीं निगमामृतवाणी,
बिंबफलाधर कोटि कलाधर आणुं शके उपमेसि न वाणी ।
सेवि रमा परमामृत जेथिल पाहवयाचि जियेस न वाणी,
पाहि अनादि अनादिपणें तरि दृग्भ्रमरांचि पुरे न शिराणी ॥ ६ ॥

---

१ विश्वरूप कमल. २ ब्रह्मा. ३ ' जगत्त्रयसंभव दाटे ' असाही पाठ आहे. ४ गरुडाच्या खांद्यावर. ५ जवसाचें फूल. ६ 'लघुकिंकिणींची' असाही पाठ आहे. ७ करुणासागर. ८ लक्ष्मीचें स्थान. ९ शंख. १० लक्ष्मी. ११ मांड्या. १२ हिरवा रगड, पाचेचा खडा. १३ शोभा. १४ हत्तीची सोंड. १५ गुडघ्यापर्यंत. १६ बैल. १७ उदयाचलावरील सूर्याचे किरण. १८ मान. १९ ' श्रीहरिचें मुखनीरसरोरुह ' असाही पाठ आहे. २० चंद्र. २१ आवडी.

बाहूंश्च मंदरगिरेः परिवर्तनेन निर्णिक्तबाहुवलयानधिलोकपालान् ।
संचिन्तयेद्दशशतारमसह्यतेजः शंखंच तत्करसरोरुहराजहंसम् ॥ ७ ॥

जे मंदरें मथिति बाहु सुधांबुधीतें, ध्यावें तया सकळवीररसांबुधीतें ।
धारा दशशत सुदर्शनचक्र हातीं, पद्मांत हंस करिं शंख असा पहाती ॥७॥

श्रीहरिचें मुखपंकज त्यांतहि लोचनपंकजयुग्म वसे,
श्रीहरिचा मुखचंद्र तयांतहि सुंदर ते द्विजपंक्ति दिसे ।
प्राकृत पंकज चंद्र न त्यासम अद्भुत हा रस तेथ नसे,
ध्यान कवी करिती हरिचे मनिं सांपडती रस त्यांस असे ॥ ७ ॥

कौमोदकीं भगवतो दयितां स्मरेत दिग्धामरातिभटशोणितकर्दमेन ।
मालां मधुव्रतवरूथगिरोपघुष्टां चैत्यस्य तत्त्वममलं मणिमस्य कंठे ॥ ८ ॥

कौमोदकी प्रिय गदा स्मर अंतरंगें, जे माखिली असुरमर्दनि रक्तरंगें ।
गुंजारवें करुनि सेविति भृंग माळा, कंठीं मणी जिवचि जो स्थिरजंगमाला ८

आस्यसरोरुह हास्यलवें अति रम्य उपास्य मनोभ्रमरीं,
भ्रूयुग भूरि अनुग्रहसूचक भूसुर भृग ऋषी अमरीं ।
लेश अनुग्रह घेउनि दानव मारियले अमरीं समरीं,
भक्त विरक्त जनीं तरि त्यांसिच मागितलें विधिच्या कुमरीं ॥ ८ ॥

भृत्यानुकंपितधियेह गृहीतमूर्तेः संचिन्तयेद्भगवतो वदनारविंदम् ।
यद्विस्फुरन्मकरकुंडलवल्गितेन विद्योतितामलकपोलमुदारनासम् ॥ ९ ॥

झाला स्वभृत्यकरुणेंच करूनि रूपी, त्याचें मुखाब्जसुख कोण जगीं निरूपी ।
गंडस्थलीं मकरकुंडलमौक्तिकांची, डोले प्रभा सरलता अति नासिकाची ९

नासिक ते तिलपुष्प म्हणो तरि त्यासि न ये तिल हे उपमा,
प्राकृत हे शुकचंचु न ये रिति चित्सुख नासिकिं जो महिमा ।
भाळ विशाळ टिळा वरि सुंदर वाणि न वर्णुं शके सुषमा,
चांगुल गाल हनू अतिसुंदर विस्मित देखुनि जेथ रमा ॥ ९ ॥

यच्छ्रीनिकेतमलिभिः परिसेव्यमानं भूत्या स्वया कुटिलकुंतलवृंदजुष्टम् ।
मीनद्वयाश्रयमधिक्षिपदब्जनेत्रं ध्यायेन्मनामयमतंद्रित उल्लसद्भ्रु ॥ १० ॥

श्री ज्यांत लुब्ध कुटिलालकभृंगजाला, श्री मीनयुग्म करि ज्या वदनांबुजाला ।
सुभ्रू मुखाब्ज नयनाब्जयुगेंकरूनी, शोभे जळस्थळसरोरुहभा हरूनी ॥१०॥

---

१ अमृतसमुद्र. २ करात शंख आहे तो जसा कमलावर हंस बसला आहे. ३ श्रीविष्णूच्या गदेचें नांव. ४ कौस्तुभमणि. ५ मुखकमल. ६ मनोरूप भ्रमरास उपासना करण्यास योग्य असें मुखकमल. ७ पुष्कळ. ८ ब्राह्मण. ९ देवांनीं. १० नारदानें. ११ चमत्कार. १२ शोभा. १३ कुंतल केश हाच भृंगसमूह.

होनि सहस्रदळें चरणीं तसिं चारि करीं हरिच्या कमळें,
लोचन आनन अंबुजकानन अंबुरुहें सकळें विमळें ।
चित्सुख यांत सुधारस केवळ याकरितां मुनिभृंगकुळें,
केशमिषें करि केशवमस्तकिं देखिलिं दिव्य मनें कुशळें ॥ १० ॥

तस्यावलोकमधिकं कृपयातिघोरतापत्रयोपशमनाय निसृष्टमक्ष्णोः ।
स्निग्धस्मितानुगुणितं विपुलप्रसादं ध्यायेच्चिरं विपुलभावनया गुहायाम् ॥ ११ ॥

ध्यावें विशेष अवलोकन लोचनाचें, तापत्रया निववि जें भवमोचनाचें ।
सस्नेह ज्यांत अतिसुंदर हास्य मंद, प्रेमप्रसाद शुभ ज्यांत असे अमंद ११

रत्नकिरीट शिरीं मकराकृति कुंडल कौस्तुभ कंठिं मणी,
श्रीवनमाळ गळां पद तोंवरि वेष्टित ज्यांत रमा रमणी ।
पीतपटीं कटिं सूत्र सुनूपुर दुःख हरे विरुदें चरणीं,
अंगद कंकणसंघ भुजांवरि रत्नसमूह जसे तरणी ॥ ११ ॥

हासं हरेरवनताखिललोकतीव्रशोकाश्रुसागरविशोषणमत्युदारम् ।
संमोहनाय रचितं निजमाययास्य भ्रूमण्डलं मुनिकृते मकरध्वजस्य ॥ १२ ॥

शोषी अशेष भवशोकसमुद्रवारी, हांसे असा परम सुंदर दानवारी ।
पीडा करी मुनिमनांत रिघोनि काम, भ्रूमंडलें भुलवि त्यांसहि पूर्णकाम १२

वर्णिति वर्ण अनेकविध श्रुति तप्त सुवर्ण सुगौर तसा,
सत्ययुगीं स्फुरतो स्फटिकोपम कर्मयुगीं उदयार्क जसा ।
द्वापरिं नील सुनील सुनीरद माधव याहि युगांत असा,
श्यामल कोमल वामनमानसिं सुंदर या कलिमाजि ठसा ॥ १२ ॥

ध्यानायनं प्रहसितं बहुलाधरोष्ठभासारुणायिततनुद्विजकुन्दपङ्क्ति ।
ध्यायेत्स्वदेहकुहरेऽवसितस्य विष्णोर्भक्त्यार्द्रयार्पितमना न पृथग्दिदृक्षेत् ॥ १३ ॥

ध्यानास आश्रय असें अतिहास्य देवें, केलें जसें इतर नाठविजे सदैवें ।
आरक्त दंत अधरामृततेज यांत, ध्यावा असा स्मरत विष्णु हृदंबुजांत १३

श्रीधरणीचरणीं मन ठेवुनि सेविति ज्या विमलादिक शक्ती,
होउनि भाट अचाट गुण श्रुति वर्णिति शास्त्र पुराण सयुक्ती ।
दृष्टिलवामृतवृष्टिस लक्षुनि धांवति जे स्थलिं चारिहि मुक्ती,
अंबुजसंभव शंभु मुखीं पद पूजियलें सनकादिकिं भक्ती ॥ १३ ॥

---

१ मुनिरूप भ्रमरांचा समुदाय. २ पुष्कळ. ३ आपादलंबी माळा. ४ स्त्री. ५ समुदाय. ६ सूर्य. ७ त्या कामालाही भुलविणारीं भ्रूमंडलें. ८ मेघ. ९ स्तुतिपाठक.

एवं हरौ भगवति प्रतिलब्धभावो भक्त्याद्रवद्धृदय उत्पुलकः प्रमोदात् ।
औत्कंठ्यबाष्पकलया मुहुरर्द्यमानस्तथापि चित्तबडिशं शनकैर्वियुक्ते ॥ १४ ॥

रूपीं अशा हरिचिया जडतांचि भाव, प्रेमें महा उठति सात्त्विके अष्टभाव ।
तो नाठवे हरिहि मानसहंसरूपीं, जाऊनियां मन बुडे निजचित्स्वरूपीं ॥ १४

अंग पलंग करूनि भुजंगपती सुपती स्वतनूचिच केली,
स्तोत्र अजस्र सहस्र मुखें मति मागुति भक्तिनिमित्त भुकेली ।
वामन वैखरि तृप्ति नव्हे परि वर्णुनिया हरिमूर्ति निवाली,
ध्यानविधान सवाइ चतुर्दश रत्नकला हरिअर्पित जाली ॥ १४ ॥

हे ध्यानपद्धति चतुर्दशरत्नमाला, पायीं समर्पिलि तया पुरुषोत्तमाला ।
पद्यासि पद्यचि निघे मुखि वामनाच्या, वृत्ती असोनि हरिरूपमया मनाच्या ॥

॥ इति श्रीध्यानमाला समाप्त ॥

---

## रामस्तव.

मुनिमनें रमती रघुनंदना, तुजमधें दशकंधरसूदना ।
ह्मणुनि निर्गुण जानकिनायका, ह्मणति राम तुतें गतिदायका ॥ १ ॥
करुनि दिव्य अलौकिक सुव्रतें, रमविशी मन तू सगुण व्रतें ।
सगुण संत असे रित राम तूं, सुजन हृत्कमळीं अभिराम तूं ॥ २ ॥
सूर्यवंश अमृताबुधि सोमा, रामचंद्र ह्मणती तुज रामा ।
पाप ताप हरि नाम जिवाचे, दाह शांत करणार शिवाचे ॥ ३ ॥
चंद्र आणि धरिली शिरिं गंगा, होय ना तरि विषानलभंगा ।
रामनाम जपता मग वाचे, दाह शांत करणार शिवाचे ॥ ४ ॥
राम हृत्कमळिं आतंळवेना, रामनाम वदनीं पळवेना ।
कालकूट मग शंकरकंठीं, काळ राघवभयास्तव कंठीं ॥ ५ ॥
शर्वकंठविषगर्व हराया, शक्त नामचि तुझें रघुराया ।
सेतु सागर कपी उतराया, नामसेतु भवसिंधु तराया ॥ ६ ॥
नाम राममय रामचि लोकीं, हें न जाणत वृथा शिणलों कीं ।

---

१ स्वेद, रोमांच, वेपथु इत्यादि सात्त्विक आठ भाव. २ गादी, बिछाना. ३ हे रावणहत्या. ४ मुनिमनें रमती ह्मणून राम. ५ हृदयांत राम आहे ह्मणून तेथें राहवेना व वदनांत आहे ह्मणून तिकडुन बाहेर निघवेना अतएव कालकूट विष शिवाचे कंठीच राहिलें असा अर्थ. ६ पालखी.

रामनाम धरिलें जयिं वाचे, तूटले तयिंच पाश भवाचे ॥ ७ ॥
सिंधुसेतु रचिला रघुरामें, नाशिला भवसमुद्रचि नामें ।
तारिली स्वनगरी अवतारीं, रामनाम भुवनत्रय तारी ॥ ८ ॥
मूर्ति तें प्रकटली घनवर्णी, जो दिवाकरकुळीं नृपवर्णी ।
तोचि हे गुणहि वामन वर्णी, मूर्ति आदिकवि वाल्मिकि वर्णी ॥ ९ ॥
॥ इति श्रीरामस्तव ॥

## हनूमत्स्तवः

जो ध्यातसे पवनपुत्र रघूत्तमातें, तो प्राण मुख्य तरि त्या कपिसत्तमातें ।
जे सेविती प्रकट राघव त्यास होतो, चित्तीं स्मरा ह्मणवुनी हनुमंत हो तो १
वेध राघवविलासकळांचा, प्राण मुख्य कपि तो सकळांचा ।
रामभक्ति हृदयींच निघाली, त्यासि जो स्वमनिं आणुनि घाली ॥ २ ॥
जेथें विलास रघुनंदनगायनाचे, तेथें समीरसुत आपण गाय नाचे ।
जोडोनि अंजलिपुट स्वशिरावरी तो, ऐके स्मरोनि रघुवंशवरा वरी तो ३
एका उड्डाणेंचि उडे समुद्रा, दे राघवाची क्षितिजेस मुद्रा ।
जो जानकीवृत्त रघूत्तमाते, सांगे स्मरा त्या कपिसत्तमातें ॥ ४ ॥
राघवाविण रुचे न मनाते, धन्य त्यासि करिती नमना ते ।
वायुपुत्र सुचरित्रचि साचा, वामनीं तरिच आदर साचा ॥ ५ ॥
॥ इति श्रीहनूमत्स्तव ॥

## दत्तात्रेयस्तव.

आपणासि करि आपण दत्त, श्रीपती, ह्मणति यास्तव दत्त ।
हें उदारपण या अवतारीं, कोण त्याविण भवार्णव तारी ॥ १ ॥
ज्या मतींतुनि गळेल असूया, बुद्धि तेचि ह्मणवी अनसूया ।
आत्मते करुनि तीसहि दत्त, आपणासि करि आपण दत्त ॥ २ ॥
भवाब्धीस मिथ्या करूनी तराया, स्मरा अत्रिच्या नंदना दत्तराया ।
भजे त्यास देईन मी आपणातें, स्व नामें असा दाखवी तो पणातें ॥ ३ ॥

प्रीतिनें स्मरत अत्रिज गा तो, धन्य पावन करी त्रिजगा तो ।
गेय जो श्रुतिकदंब रवासी, श्रीचिदंबर दिगंबरवासी ॥ ४ ॥

भजा दत्तात्रेया त्वरितचि तराया भवजळा,
निजश्रेया ध्याया धरुनि हृदयीं दीप उजळा ।
तया सर्वात्मत्वें स्मरत जपतो वामन मनीं,
सदा मागे प्रेम प्रभुसि जगदात्मत्व नमुनी ॥ ५ ॥

॥ इति श्रीदत्तात्रेयस्तव ॥

## गोरसविक्रय.

श्लोकः–विक्रेतुकामा किल गोपकन्या, मुरारिपादार्पितचित्तवृत्तिः
दध्यादिकं मोहवशादवोचद्, गोविंद दामोदर माधवेति ॥ १ ॥

विकावया गोरस गोपदारा, जातां मनीं आठविती उदारा ।
दुग्धादि नामें हरिनाम घेती, गोविंद दामोदर माधवेति ॥ १ ॥
घ्या दुग्ध बोलों रसनेसि वाटे, तों ये हरी आंतुनि त्याच वाटे ।
श्रीकृष्णनामेंचि मुखासि येती, गोविंद दामोदर माधवेति ॥ २ ॥
न्हाणी स्वदुग्धें सुरभी जयाला, गोपी स्मरे त्या व्रजराजयाला ।
घ्या दुग्ध ऐसें ह्मणतां सतीच्या, गोविंद येतोच मुखास तीच्या ॥ ३ ॥
घ्या गे दहीं ये रिति जों वदावें, तों पोटिसी ऊखळ आणि दावें ।
ऐशा हरी आठवितांचि दारा, दामोदरा घ्या ह्मणती उदारा ॥ ४ ॥
मथूनि दुग्धाब्धि घृतासमान, काढूनियां मा धव तीस मान ।
दे त्यास घ्या या वचनामृतातें, त्या बोलती माधवा या घृतातें ॥ ५ ॥

॥ इति गोरसविक्रय समाप्त ॥

---

१ अत्रिनंदन; दत्तात्रेय. २ स्तवन करण्यास योग्य. ३ जिव्हेस. ४ कामधेनु. ५ गोपस्त्रिया. ६ लक्ष्मी.

Library,